

# जिवोळी

लता देशपांडे

# नातीगोती

लेखिका

लता देशपांडे

फुलराणी प्रकाशन

**प्रकाशक :**
फुलराणी प्रकाशन
२, गंगा ग्रीन व्ह्यू कॉम्प्लेक्स,
नॅन्सी कॉलनी, एस.टी. स्टँडजवळ,
बोरिवली (पूर्व), मुंबई – ४०००६६.
फोन : +९१ २२ २८९७४५११

**पहिली आवृत्ती :**
२२ एप्रिल २०११

**मुखपृष्ठ :**
सतीश भावसार

**मूल्य :** रु. १६०/-

**मुद्रक :**
आनंद लिमये
इंडिया प्रिंटिंग वर्क्स
इंडिया प्रिंटिंग हाऊस,
४२, गं. द. आंबेकर मार्ग,
वडाळा, मुंबई – ४०००३१
फोन : +९१ २२ ६६६२४९६९
ई-मेल : ipw@vsnl.net

# भावभावना

काही अनाकलनीय परंतु अपरिहार्य कारणास्तव लताचं – माझ्या दिवंगत बहिणीचं – आत्मचरित्र 'सूर्यास्ताचे किरण' हे तिच्या निधनानंतर त्वरित प्रसिद्ध होण्यास बराच विलंब झाला. परंतु हे काम दृष्टिपथात आल्यावर मात्र एक विचार मनात परत वर उसळून आला, तो म्हणजे तिने पूर्वी लिहिलेल्या अनेक अप्रकाशित कथांपैकी काही निवडक कथांना उजाळा देण्याचा!

'अनिकेत' हा तिचा पहिला कथासंग्रह 'ग्रंथाली' तर्फे २००३ मध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर, काहींच्या आग्रहास्तव तिने दुर्धर आजारात, वेदनांशी सामना करताकरता, आशा–निराशेच्या लहरींवर तरंगत असताना, उत्साहानं 'सूर्यास्ताचे किरण' हे आत्मकथन तसेच अनेक कथा लिहिल्या होत्या. त्यांतील काही कथा 'एकता', 'रुची', 'बृहन्महाराष्ट्रवृत्त' तसेच 'चैत्राली'च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाल्या होत्या. तर काही होत्या प्रसिद्धीच्या प्रतिक्षेत! त्यातील काही निवडक कथा दुसऱ्या कथासंग्रहाच्या रुपात प्रसिद्ध करून तिच्या जिद्दीचं, उत्साहाचं व कष्टाचं  चीज व्हावं याकरता केलेला हा प्रांजळ प्रयत्न!

ह्या कथा वाचून त्या प्रसिद्ध करण्याबाबत पाठपुरावा करून मार्गदर्शन केल्याबाबत माझे साहित्यिक व पत्रकार स्नेही राजीव जोशी यांचा मी ऋणी आहे.

– अजित खटखटे

# थोडंसं लताबद्दल

माझी प्रिय पत्नी व या पुस्तकाची लेखिका लताला जाऊन सहा वर्षे होतील. चव्वेचाळीस वर्षांच्या तिच्या सहवासातील स्मृती माझ्याबरोबर कायम आहेत. तिच्या निधनापूर्वी ८-१० महिने ती बरंच काही लिहीत होती, एवढं मला माहीत होतं. पण मी त्याबद्दल विचारल्यावर तिच्याकडून फार माहिती मिळत नसे. व्यक्तिस्वातंत्र्याला प्राधान्य देणाऱ्या देशात असल्यामुळे तिच्या व्यवहारात जास्त लुडबुड करण्याची माझी इच्छा नव्हती. आपण लिहिलेल्या लिखाणावर नवऱ्याचे critical evaluation न मिळण्याची भीती असण्याची पण शक्यता आहे.

तिच्या निधनानंतर काही महिन्यांनंतर तिने लिहिलेल्या लिखाणाच्या फाईल्स चाळतांना मला दोन फाईल्स प्रामुख्याने दिसल्या. एक म्हणजे तिने लोकाग्रहास्तव लिहिलेलं आत्मचरित्र आणि दुसरं म्हणजे काही प्रसिद्ध व न प्रसिद्ध केलेल्या कथांचा संग्रह हे दोन्ही आपण जाण्यापूर्वी प्रसिद्ध व्हावेत हे तिला निश्चित वाटत असावे. हे प्रसिद्ध करण्याचा मी तत्काळ निश्चय केला! तिच्या इच्छेनुसार प्रथम मी तिचे आत्मकथन हे माझा मेव्हणा अजित याच्या मदतीने; काही अपरिहार्य कारणामुळे बराच विलंब झाला तरी डिसेंबर २०१० मध्ये 'सूर्यास्ताचे किरण' या शिर्षकाखाली प्रसिद्ध करू शकलो. या पुस्तकाला छानच प्रतिसाद मिळत आहे.

तिचे कथासंग्रहाचे पुस्तक करावे की नाही या संभ्रमात असताना अजितने पुढाकार घेऊन थोड्याच अवधीत ते प्रसिद्ध करण्याचा निर्धार केला. या पुस्तकाकरता पण त्याने बरीच मेहनत घेतली. त्याचे आभार न मानता मी त्याचे मनःपूर्वक कौतुक करतो. त्याचे साहित्यिक व पत्रकार स्नेही राजीव जोशी यांनी पण हा कथासंग्रह वाचून व प्रसिद्धीबाबत मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

हे पुस्तक वास्तवात आणण्याच्या कामात 'ग्रंथाली/फुलराणी प्रकाशन'चे श्री. सुदेश हिंगलासपूरकर यांचा मोठा वाटा आहे. त्यांचे तसंच ग्रंथाली/फुलराणीचे श्री. प्रदीप गुजर यांचेही मनःपूर्वक आभार. पुस्तकाचे उत्कृष्ट मुखपृष्ठ करून दिल्याबद्दल मी श्री. सतीश भावसार यांचाही आभारी आहे.

विशेष म्हणजे 'इंडिया प्रिंटिंग वर्क्स' चे श्री. आनंद लिमये यांनी यापूर्वीच्या 'सूर्यास्ताचे किरण' पुस्तकाची, तसेच या कथासंग्रहाची उत्कृष्ट व सुबक छपाई केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

**– शरद देशपांडे**

10210, Pine Bough Court,
Ellicott City, MD 21042, USA
Ph. 410-465-4576
email : sharla.desh@verizon.net

# अनुक्रमणिका


१. आईला निरोप कसा देऊ? ................................ १
२. मांजर रडत राहिलं ................................ १९
३. झाकली मूठ ................................ २९
४. फसवणूक ................................ ३९
५. नातीगोती ................................ ५९
६. मिस्टर डिसूझा ................................ ७१
७. सायंकाळची सोबत ................................ ७९
८. अखेरची इच्छा ................................ ८९
९. कशासाठी हा अट्टाहास! ................................ १०५
१०. आजन्म कारावास ................................ ११९
११. क्षण एक पुरे मोहाचा ................................ १२९
१२. न चाललेली पाऊलवाट ................................ १३९
१३. निर्णय ................................ १४७
१४. आहे मनोहर तरी ................................ १५४

# आईला निरोप कसा देऊ ?

मी अवांछित होते, अनवाँटेड होते हे आजी माझ्या मनावर ठसवण्याचा सारखा प्रयत्न करत असे. मी अवांछित होते, पण कुणाला ? आजीला ? का तर तिला नातू हवा होता म्हणून ? पण ती तर माझे खूप लाड करत होती. आईबाबांना मी नकोशी होते का ? तसं तर वाटत नव्हतं. ती दोघंही माझ्यावर फार प्रेम करत होती. आजीही माझ्यावर अपार माया करत होती. का ? आईवर सूड उगवावा म्हणून ? मग या घरात खरं नको वाटणारं माणूस कोण होतं ? मी की आई ? "I hate goodbyes" असं आई अनेकदा म्हणत असे. ते का ? तिचे आईवडील तिला तिच्या लहानपणीच सोडून गेले म्हणून ? की बाबा किंवा मी तिला कधीतरी सोडून जाऊ म्हणून ? तिने मात्र तेच केलं. घर सोडून गेली तेही गुडबाय न करता, निरोप न घेता, आणि आता अखेरचा गुडबायसुद्धा तीच नव्हती का करत ? चुकीच्या मार्गाने गेल्यावर रस्ता चुकीचा आहे हे समजल्याने मागेच वळावं लागतं कारण पुढे जाणं धोक्याचं ठरतं म्हणून ? की पुन्हा एकवार संधी मिळावी म्हणून ? आईला कसं समजून घेऊ मी ?

गेली दोन-तीन वर्षं मी माझ्या वडिलांबरोबर राहत आहे. दोन-तीन वर्षांपूर्वी आईला आपण यापुढे आई न राहण्याचा साक्षात्कार झाला किंवा आपण आई होण्यात चूक केली याची प्रचिती आली असावी. अर्थात आईला आपली चूक उमगायला दहा वर्ष उशीर झाला होता. मी त्या वेळी दहा वर्षांची होते. तिच्या मातृत्वाचं किंवा चुकीचं मी ऐंशी पौंडी, चालतं-बोलतं प्रतीक होते. असं असतानाही ती निघून गेली होती.

आजी, माझ्या वडिलांची आई, आमच्याकडेच राहत असल्यामुळे माझी कधीच आबाळ झाली नाही. प्रेमस्वरूप आई, वात्सल्यसिंधू आई असं

कथाकवितांतून मातृदेवतेचं माहात्म्य वाचलं की माझ्या मनात राग उसळी मारून येत असे. रक्त तापून कानशिलं गरम होऊ लागत. तिन्ही जगांचा स्वामी आईविना भिकारी का ठरतो हे मला कधीच उमगलं नव्हतं.

माझी आई माझ्या आयुष्यात एक छाया होऊन राहिली आहे. छाया जेव्हा जवळ असते तेव्हा ती दिसली तरी तिचा हाताला स्पर्श होऊ शकत नाही, आपण तिला पकडू शकत नाही. ती काहीही करू शकत नाही. फक्त उजेडी किंवा सूर्यप्रकाशात प्रकट होते.

आजी माझी खूप काळजी घेत असे, मला फार जपत असे. पण आजीचा आईवर कशासाठीतरी फार राग आहे हे समजण्याएवढी मी शहाणी होते. आजीच्या दृष्टीनं आई उच्छृंखल (मला या शब्दाचा अर्थही माहीत नाही), स्वार्थी व बेजबाबदार होती. का ते मला समजावून सांगण्याचा तिने प्रयत्नही केला. आपल्या कोवळ्या वयाच्या मुलीची जबाबदारी न स्वीकारता केवळ स्वार्थापायी, स्वतःची चैन पुरी करण्यासाठी ती घरदार सोडून गेली होती म्हणे. एका खासगी कंपनीत मोठ्या हुद्द्यावर होती माझी आई. आजीच्या मते तिला मुळी कसलं वळणच नव्हतं. म्हणून माझ्या मनाला चांगलं वळण लावण्यासाठी, त्यावर चांगले संस्कार घडवण्यासाठी ती मला रामायण-महाभारतातील गोष्टी सांगत असे, पूजा, नमस्कार करायला लावत असे.

माझी आईसुद्धा रोज रात्री झोपण्यापूर्वी मला गोष्टी सांगत असे, पुस्तकं वाचून दाखवत असे. पण त्या वेगळ्या राजकन्या-राजकुमारांच्या कथा असत. ज्या पद्धतीने आई त्या सांगे किंवा वाचून दाखवी त्यामुळे मला हसू आवरत नसे. झोप येण्याऐवजी मी त्या गोष्टी ऐकून बराच वेळ जागी राहत असे. आईसुद्धा माझ्याबरोबर सारखी हसत असे. तिला गंभीर झालेलं पाहिल्याचं माझ्या आठवणीत नाही. कितीही गंभीर व काळजी करण्यासारखी घटना घडली तरी तिच्या चेहऱ्यावरील हसू कधी मावळलं नाही. अनेकदा तिच्या चेहऱ्यावर हसू असलं तरी डोळ्यांत मात्र खुशी नजरेस पडत नसे. झाडांची किंवा झुडुपांची पानं कारणाशिवाय गळू लागली की त्यांच्यात काही कमी आहे किंवा त्यांना काहीतरी दुःख आहे याची जाणीव होते. परंतु माणसांचे हातपाय दुःखाने कधी गळत नाहीत. त्यामुळे डोळ्यांत आसू दिसले नाहीत तर अनेकांच्या मनात काही दुःख किंवा वादळ असेल याचा पत्ता कधी लागत नाही. आई घरी होती तेव्हा खरंच खूप मजा येई. ती असताना बाबाही खूश असत. त्या दोघांना हसतं-खेळतं पाहताना मला

तर खूपच आनंद होत असे. पण अशा वेळी आजी मात्र नाखूश असे व त्यांच्याकडे नाराजीच्या नजरेने पाही.

माझी आई म्हणजे एक चालतं-बोलतं, सर्वांना आनंद देणारं, नजरेला प्रसन्नता देणारं, सर्व रंगांनी नटलेलं इंद्रधनुष्य होतं. ती नेहमी उंची, रंगीबेरंगी व चांगल्या अभिरुचीचे कपडे वापरत असे. हलकासा, पण साजेसा मेकअप पण करत असे. दागिने साधेच, पण भरपूर होते. प्रत्येक साडीला शोभणारे वेगवेगळे सेट्स होते. ती पार्टीला जायला तयार झाली की एखाद्या परीसारखी सुंदर दिसे. रोज ऑफिसला जातानाही साध्या व नीटनेटक्या कपड्यांत सुरेख दिसे. बाबांची नजर तिच्यावरून हलत नसे. ते तिची नेहमी चेष्टा करत की त्यांच्या नकळत एक दिवस कुणी सिनेमावाले तिला नक्की पळवून नेतील. या वेळी आजीचा चेहरा मात्र पाहण्याजोगा होई. तिची नाराजी तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट उमटत असे. तिला आईचं नटणं, नीटनेटकं राहणं, बाबांच्या किंवा स्वत:च्या मित्रमैत्रिणींशी मोकळेपणी वागणं मुळीच पसंत नव्हतं. ती आईवर सारखी चिडचिड करत असे. पण आईने मात्र हसण्याखेरीज इतर कोणतेही भाव चेहऱ्यावर कधी उमटू दिले नाहीत.

आई धाडसी होती, निसर्गावर तिची भक्ती होती. बाबांप्रमाणेच पिकनिक, कॅंपिंग, गडावर चढणं, हायकिंग यांची तिला फार आवड होती. आईशी ओळख झाल्यापासून बाबा खूप हसत असत, प्रत्येक वाक्यात कोटी करत. आज मात्र विश्वास बसणार नाही एवढे बाबा गंभीर व अबोल झाले आहेत. त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य केव्हाच लोपलं आहे. वयाबरोबर बाबांना आलं तसं आईला कधीच प्रौढत्व आलं नाही. आजीची त्याबद्दलसुद्धा सतत तक्रार चालू असे. आई-बाबा व आजी यांच्यामध्ये माझी मात्र अडकित्त्यात सापडल्यासारखी स्थिती झाली होती.

माझे आजोबा म्हणजे बाबांचे वडील त्यांच्या फार लहान वयात गेल्यामुळे आजीने खूप काबाडकष्ट करून त्यांचं पालनपोषण व शिक्षण केलं. बाबांच्या लहानपणीच्या अनेक गोष्टी आजी मला रोज सांगत असे. पैशांच्या अभावी काही दिवस आपल्या भावांकडे राहून तिने आपलं शिक्षण पुरं केलं व नंतर शाळेत शिक्षिकेची नोकरी धरली. पैशांचा प्रश्न थोडाफार सुटला तरी जागेअभावी भावांकडेच राहावं लागल्यामुळे तिला व बाबांना बराच त्रास सहन करावा लागला होता. केवळ बाबांच्या हुशारीकडे व भवितव्याकडे पाहून तिने भावजयीचा जाच,

टोमणे व दुस्वास सहन केला होता. शिक्षण संपल्यावर बाबांना चांगली नोकरी लागताच आपली सर्व शिल्लक खर्चून व थोडं कर्ज काढून तिने एक ब्लॉक बाबांकरता घेतला होता. आजीने केलेल्या कष्टाची बाबांनाही पूर्ण जाणीव होती. तिच्या उतारवयात तिला आरामात व खूप सुखात ठेवण्याचा त्यांनी निर्धार केला होता.

बाबांना मुली सांगून येऊ लागल्या तेव्हा आजीला आभाळ ठेंगणं वाटू लागलं. कुणा एका धनाढ्य उद्योगपतीची मुलगी तिने पसंत केली होती. मुलगी फार सुरेख नसली तरी नाकीडोळी चांगली होती. एका इंजिनियरिंग कंपनीच्या मालकाची एकुलती एक मुलगी असल्यामुळे त्याच्या इस्टेटीची तीच वारस होती. पदवीधर होती. मुलीच्या वडिलांची एकच अट होती की, बाबांनी लग्नानंतर त्यांच्याच कंपनीत काम करून हळूहळू कंपनीची सर्व जबाबदारी सांभाळावी. बाबांना मात्र हे मुळीच मान्य नव्हतं. ते याला सोन्याचा पिंजरा म्हणत. त्यामुळे आजीची नाराजी त्यांना सहन करावी लागली. आजीने म्हणे बरेच दिवस त्यासाठी त्यांच्याशी अबोला धरला होता. त्यात बाबांनी आणखी एक मोठा स्फोट केला. त्यांचं एका सुरेख, सुशिक्षित, प्रेमळ, कर्तबगार, पण आईवडिलांचं छत्र नसलेल्या मुलीवर प्रेम होतं. तिच्याशीच लग्न करण्याचा निर्णय त्यांनी पक्का केला होता. न पेक्षा आजन्म लग्न न करण्याचा निर्धार केला होता. यामुळे आजीचा अगदीच नाइलाज झाला. बाबांना ती काहीच करू शकत नव्हती. आजीने हळूहळू सर्व राग आईवर काढायला सुरुवात केली. कोणत्याही छोट्याशा गोष्टींवर आई खुदकन हसत असे. बाबांशी किंवा त्यांच्या मित्रांशी सतत विनोद करून त्यांना हसवत असे. सुरुवातीला आजीने बाबांतर्फे आईच्या हसण्याला मुरड घालण्याचा खूप प्रयत्न करून पाहिला. पण बाबा तिला उडवून लावीत असत. तिचं बोलणं हसण्यावारी नेत. शेवटी तिने स्वतःच आडून टोमणे मारायला सुरुवात केली. बाबा त्यांच्या कंपनीत फार वरच्या हुद्द्यावर होते. त्यांना अनेकदा घरी पार्टी द्यावी लागे. पार्टीची सर्व तयारी व स्वैपाक आई हौसेने व उत्साहाने करत असे. न दमता हसून सर्वांचं स्वागत व आदरातिथ्य करायला ती तयार असे. तिला सगळ्याची फार हौस होती. आजीला बाबांच्या वरच्या हुद्द्याचा फार अभिमान व कौतुक होतं. पण आईच्या हुशारीची, कर्तबगारीची, तिला मिळालेल्या यशाची तिला पर्वा नव्हती. आईला कधी व्यावसायिक पार्टी देण्याची वेळ आली की आजीची धुसफुस सुरू होई. बाबांनी तिला समजावण्याचा खूप प्रयत्न करून पाहिला, पण आजीपुढे त्यांचं काहीही चालेना. आईचं सर्वांशी मिळूनमिसळून वागणं बाबांना कधी वावगं वाटलं नाही. परंतु आजीच्या नजरेला मात्र ते खटकत असे.

आईचा मोकळेपणा, स्वतंत्र वृत्ती व लाघवी स्वभाव हे आजीच्या सुनेबद्दलच्या साच्यात बसत नसे. तिला घर सांभाळून सोशलवर्क करणारी, महिलामंडळात जाणारी, कमीत कमी तीन मुलांना जन्म देणारी सून हवी होती. माझ्या जन्माच्या वेळी आईला बाळंतपणाचा त्रास तर झाला होताच, पण बाळंतपणात तिच्या जिवाला धोका असल्यामुळे डॉक्टरांनी यापुढे मूल होऊ न देण्याची दक्षता घेण्यास सांगितलं होतं. आजी खूप नाराज झाली, पण बाबांना त्याचं काहीच वाटलं नाही. आईवर त्यांचं निस्सीम प्रेम होतं व आईचीही त्यांच्यावर तेवढीच भक्ती होती. दोघांच्या स्वभावात जरी जमीन-अस्मानाचा फरक होता तरी त्याचा त्यांच्या एकमेकांवरील प्रेमावर काही विपरित परिणाम होत नसे. आजीला नेमकं तेच आवडत नसे. आपला मुलगा आपल्या हातांतून निसटला व त्याची आपल्यावरील माया दिवसेंदिवस कमी होत चालली असल्याची भावना तिच्या मनात अधिकाधिक दृढ होत चालली होती. तिला आईचा हेवा तर वाटत नाही ना अशी शंका अनेकदा माझ्या मनात डोकावत असे. आई आपल्या हसऱ्या, आनंदी स्वभावाने व विनोदबुद्धीने सर्व काही हसण्यावारी नेत असे. आजी मात्र आपलं वर्चस्व कमी होत चालल्याबद्दल व आपली कुणी दखल घेत नसल्याबद्दल मनातल्या मनात कुढत होती. आईला तिने सतत धारेवर धरलं होतं. आपलं वय झाल्यामुळे स्वतःची घरात काही मदत मिळणार नाही असं तिने प्रथम जाहीर केलं. त्याचबरोबर नोकरचाकरांनी केलेला स्वैंपाक आपल्याला मुळीच चालणार नाही हेही जाहीर केलं. ऑफिसचं काम सांभाळून घरचीही बरीचशी कामं आईलाच करावी लागत. अनेक वेळा तिची तारांबळ उडताना पाहून आजीच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव उमटल्याचं माझ्या ध्यानात येई. आपला हा नवीन डाव यशस्वी होण्यासाठी आजी माझा उपयोग करू लागली. मी एकुलती एक नात म्हणून आजीने माझे फार लाड करून मला चढवून ठेवलं होतं. त्यामुळे मी फार शेफारून गेले होते. खाण्यापिण्याच्या व कपड्यांच्या बाबतीत माझ्या अनेक खोडी होत्या. मी मागेन ते मला तिच्याकडून मिळत असे. बाबांचाही माझ्यावर अतोनात जीव होता. आईला माझ्याकडे लक्ष देण्यास वेळ न मिळाल्यामुळे तिचं माझ्याकडे दुर्लक्ष होत आहे अशी तक्रार आजी बाबांकडे करू लागली. ती बाबांना स्वस्थ बसू देईना. त्यामुळे तेही कावून आईवर चिडचिड करू लागले. तरीही आईच्या हसण्यात व वागण्यात त्यामुळे काही फरक पडला नाही. ती सर्व हसतमुखाने सहन करत होती. हळूहळू आईबद्दलच्या तक्रारी आजी माझ्यापर्यंत आणू लागली. आई कशी स्वार्थी आहे, ऑफिसच्या कामामुळे माझ्याकडे लक्ष देण्यास तिला

कसा वेळ नसतो, ती मला सारखी कडक शिस्तीत ठेवण्याचा कसा प्रयत्न करते अशा गोष्टी माझ्या मनावर बिंबवण्याचा आजी प्रयत्न करत होती. माझाही त्यावर हळूहळू विश्वास बसत चालला होता. मी आईकडून जास्तीत जास्त अपेक्षा करू लागले. नेहमी काही ना काही हट्ट धरून बसू लागले. तिने बाहेर न जाता माझ्याबरोबर वेळ घालवावा असा आग्रह धरू लागले.

आईने वाचून दाखवलेल्या व सांगितलेल्या कोणत्याच गोष्टींत तथ्य नाही, त्या माझ्या वयाला योग्य नाहीत असं सांगून, माझ्या मनावर चांगले संस्कार व्हावेत म्हणून आजी मला पुराणकथा व रामायण-महाभारतांतील गोष्टी सांगे. मी टी.व्ही.वरील फक्त निवडक कार्यक्रम पाहावे, अशी आईने मला अट घातली होती. परंतु तिला चुकवून आजी बऱ्याच वेळा मला हवे ते कार्यक्रम पाहू देई.

आईबद्दल आजीच्या इतरही अनेक तक्रारी वाढल्या होत्या. त्या ती शेजाऱ्यापाजाऱ्यांजवळ व कधीमधी माझ्याजवळ बोलून दाखवत असे. ऑफिसमधील सहकाऱ्यांबरोबर अधिकाधिक वेळ घालवायला मिळावा म्हणून आई उशिरापर्यंत काम करते असा या तक्रारींचा रोख असे. याच वेळी बाबांना ऑफिसच्या कामासाठी तीन महिने युरोप-अमेरिकेच्या दौऱ्यावर जाण्याचा योग आला. त्याचवेळी कसल्याशा ट्रेनिंगसाठी आईला दोन-तीन आठवडे दिल्लीला जावं लागणार होतं. बाबांना त्यात काही वावगं वाटलं नाही. परंतु आजीने मात्र आकाशपाताळ एक केलं. आईचे हे थेर मुळीच चालू देणार नाही म्हणून तिने आईच्या दिल्लीला जाण्यास स्पष्ट नकार दिला. मीही अर्थातच आजीचीच बाजू उचलून धरली. आईचा अगदीच नाइलाज झाला. तिचा असा भकास व उदास चेहरा यापूर्वी कधी पाहिल्याचं माझ्या आठवणीत नाही. लगेच तिने दिल्लीला न जाण्याचा आपला निर्णय जाहीर केला. तिच्या चेहऱ्यावर आता पूर्ववत हसू उमटलं. पुढल्याच महिन्यात बाबा युरोपच्या दौऱ्यावर निघून गेले. आईचा चेहरा त्यांच्या होणाऱ्या विरहाने पिळवटून गेल्यासारखा दिसत होता. आजीचा चेहरा मात्र विजयाच्या आनंदाने उजळला होता. आईच्या बाबतीत छळणुकीला बाबांच्या गैरहजेरीत धार आली.

आईच्या प्रत्येक हालचालीवर आजी टीका करू लागली. मलाही ती चिथवत होती. मीही अभ्यासाकडे बरंच दुर्लक्ष करू लागले. जास्त वेळ टी.व्ही. पाहण्यात खर्च होऊ लागला. परिणाम अपेक्षेप्रमाणेच झाला. मी एका विषयात नापास होऊन मला कसंबसं वरच्या इयत्तेत ढकलण्यात आलं त्याचं खापरही

आजीने आईच्या माथ्यावर फोडायला कमी केलं नाही. आईचं माझ्याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे मी बिघडते आहे असं ती सर्वांना सांगू लागली.

बाबांना यायला आठवड्याचा अवधी होता. तीन-चार दिवस आई मला फार विचारात गढलेली आढळली. मी तिच्याजवळ जाताच तिचा चेहरा आनंदाने उजळून येई व ती मला पुन्हा पुन्हा जवळ घेई. एक-दोन दिवस ती मला घेऊन खरेदीला गेली आणि मी सांगितलेल्या अनेक वस्तू व कपडे मला घेऊन दिले. मला माझ्या पसंतीच्या सिनेमालाही घेऊन गेली. आम्ही चौपाटीवर जाऊन भेळ खाल्ली. आईच्या सहवासात मी खूश होते. आम्ही खूप मनसोक्त गप्पा मारून घेतल्या. दोघींनीही मोकळेपणी पोटभर हसून घेतलं. त्या क्षणीच आजीचं ऐकून आईला पुन्हा कधीही न दुखवण्याचा निर्णय मी मनाशी पक्का केला.

संध्याकाळी आम्ही उशिरा परतलो तेव्हा अपेक्षेप्रमाणे आजी आईवर खूप चिडली होती. ती आईला बरंच काही उणंदुणं बोलली. स्वत:प्रमाणे ती मुलीलाही बिघडवू पाहात असल्याचा तिच्यावर आरोप केला. आईने नेहमीच्या सवयीप्रमाणे शांतपणे सर्व बोलणं हसतमुखाने ऐकून घेतलं. मला मात्र त्या शांत हसऱ्या चेहऱ्यामागे काहीतरी गुपित दडलं असल्याचा संशय येऊ लागला. तिच्या चेहऱ्यावर हास्य दिसत होतं खरं, पण डोळ्यांत मात्र खुशी नजरेस पडत नव्हती. त्यामुळे ते हास्य खोटं, उसनं वाटत होतं. त्या रात्री मी आईजवळ झोपण्याचा हट्ट धरला. त्यामुळे आजीचा नाइलाज झाला; पण आई मात्र खूश दिसत होती. मी जेव्हा तिच्या कुशीत शिरून तिच्या गळ्यात हात टाकले तेव्हा तिचा चेहरा मला ओला असल्यासारखा वाटला. माझ्या केसांवरून हात फिरवत ती गप्प होती. माझ्या अंगावरून फिरणाऱ्या तिच्या हाताचा स्पर्श कापरा वाटत होता. झोप कधी लागली ते मला कळलंही नाही.

सकाळी आजीच्या आरडाओरड्यामुळे मला जाग आली. आई खोलीत नव्हती व आजीच्या ओरडण्याचा रोख माझ्या उशिरा उठण्यावर होता. मला न उठवता आई आधीच ऑफिसमध्ये निघून गेली होती. मला उशीर झाल्याबद्दल आजी आईला दोष देत होती. लगबगीने तयारी व नाश्ता करून मी नेहमीप्रमाणे शाळेत गेले. आई परत मिळाल्याच्या व बाबांच्या लवकरच परत येण्याच्या खुशीत मी होते.

घरी येताच आजीच्या चेहऱ्याकडे लक्ष गेल्यावर माझ्या आनंदावर विरजण पडलं. आजी कपाळाला हात लावून बसली होती. जवळच आईच्या हस्ताक्षरातील एक पत्र पडलं होतं. मी आजीच्या परवानगीने पत्र वाचण्यास सुरुवात केली.

ती. आईंना सा. नमस्कार,

घरातल्या घरात लिहिलेलं माझं पत्र वाचून तुम्हांला आश्चर्य वाटणं साहजिक आहे. कदाचित माझा रागही येईल. परंतु सर्वांच्या भल्याकरता मी हा निर्णय घेण्याचं ठरवलं आहे.

बारा वर्षांपूर्वी मी राजीवशी लग्न करून या घरात प्रवेश केला. त्या वेळी अनेक आशा–आकांक्षा व उमेदी सोबत होत्या. तेच घर आज सोडून जात असताना सोबत राजीवही नाही व उमेदी पण नाहीत. तो परत येण्यापूर्वी मी हे घर सोडून जात आहे. कारण तो घरी असताना हा निर्णय अमलात आणणं मला शक्य झालं नाही. म्हणून त्याच्या अनुपस्थितीत मी आज हे घर सोडून जात आहे.

माझे आईवडील मला आठवतही नाहीत. लग्नानंतर आई मिळणार म्हणून मी फार आनंदात होते. परंतु तो आनंद अल्पायुषी ठरला. तुम्हांला बड्या, श्रीमंत घराण्यातील सून अपेक्षित होती, पण पदरात मी पडले. जिला मोठेपणच काय, पण आईवडीलही नव्हते. तुमच्या झालेल्या निराशेची मला पूर्ण जाणीव होती. पण कधीतरी तुमचं मन मी नक्की जिंकू शकेन या आशेच्या छोट्या धाग्यावर मी इतकी वर्षं काढली. माझ्या या घरातील अस्तित्वाने तुमची झालेली निराशा दूर करण्यात मी अपयशी ठरले. तुम्हांला होत असलेलं दुःख आणि पर्यायाने प्रिया व राजीवच्या वाट्याला आलेलं दुःख मी जर माझ्या जाण्याने नष्ट करू शकले तर त्यातच मी आनंद मानून घेईन.

राजीवचं तुमच्यावर व प्रियावर जिवापाड प्रेम आहे. त्या दोघांवरील तुमच्या मायेतही कधी कमतरता येणार नाही हेही मी जाणून आहे. तुम्हां सर्वांच्या सुखासाठी मीच हे घर सोडून जाण्याचा निर्णय घेतला आहे.

लांबच्या एका शहरातील नोकरी मी पत्करली आहे. माझा शोध घेण्याचा वृथा प्रयत्न करू नका. तुम्ही प्रियावर जिवापाड प्रेम करता व तिलाही तुमची तितकीच ओढ आहे हे मला ठाऊक आहे. त्यामुळे मला तिची मुळीच काळजी वाटत नाही. राजीवला मी सर्व बंधनांतून मुक्त करत आहे. त्याला पुन्हा केव्हाही लग्न करण्याची मोकळीक आहे. माझा शोध करू नका.

प्रियाच्या सहवासात घालवलेले शेवटचे दोन दिवस मला आयुष्यभर साथ देण्यास पुरेसे आहेत. राजीव अजून तरुण व देखणा आहे, त्याला फार वरच्या हुद्द्याची नोकरीही आहे. बड्या घरची मुलगी त्याला आजही मिळू शकेल. यापुढे सर्व काही तुमच्या मनाजोगं घडून तुमचं उर्वरित आयुष्य सुखात जावो ही ईश्वराकडे प्रार्थना आहे.

तुमची

छाया

पत्र वाचताच माझ्या नजरेसमोर अंधार झाला व मी मटकन जमिनीवर बसले. इतक्या वर्षांनंतर आज प्रथमच आईची ओळख पटत होती तर तीच मला सोडून निघून गेली होती. गेल्या दोन दिवसांतील तिच्या स्पर्शांतील उत्कटता व तिच्या स्वभावाविरुद्ध तिच्या स्वरात डोकावलेला हळवेपणा यांचा आता उलगडा होत होता. माझी नजर आजीच्या चेहऱ्याकडे गेली. भय, राग व आनंद यांचं मिश्रण तिथे दिसल्याचा मला भास झाला.

विमानतळावर बाबा नजरेस पडताच मी एकदम त्यांच्याकडे झेपावले व त्यांच्या गळ्यात हात टाकून हमसाहमशी रडू लागले. त्यांना माझ्या वागण्याचा अर्थच उमजेना. फार दिवसांनी वडिलांची भेट झाल्यामुळे कदाचित मला उमाळा आवरत नसावा अशी आजीने सारवासारव केली. बाबांनी मला जवळ घेतलं खरं, पण त्यांची चौफेर भिरभिरणारी नजर मात्र आईच्या शोधात होती. आजीच्याही नजरेतून ही गोष्ट सुटली नाही. आई विमानतळावर न आल्याचा घरी पोहोचल्यावर उलगडा होईल असं सांगून तिने वेळ मारून नेली.

घरी पोहोचून चहापाणी झाल्यानंतर, शेजारीपाजारी पांगल्यावर आजीने आईचं पत्र बाबांच्या हाती ठेवलं. ते वाचल्यानंतर केविलवाणा झालेला बाबांचा चेहरा माझ्या आठवणीतून कधीच जाणार नाही.

"तरी मी तुला सांगत होते तिच्यावर विश्वास ठेवू नको म्हणून. असलं वागणं शोभतं का तिला या वयात? कुणाचा हात धरून गेली तीच जाणे !" आजीने आजवर कोंडलेली वाफ शब्दांत गुंफली.

"जरा पाय मोकळे करून येतो. घरात फार उकाडा होतोय," असं सांगून धाडकन दार आपटून बाबा मोकळ्या हवेत श्वास घेण्यास घराबाहेर पडले. मी मात्र आजीचं वक्तव्य ऐकून घेण्यासाठी घरात अडकले. त्या दिवसापासून आजीत व माझ्यात दुरावा निर्माण झाला.

दुसऱ्या दिवसापासून घरातील व्यवहार पूर्वीप्रमाणे सुरू झाले. परंतु बाबांच्या चेहऱ्यावरील हास्य मात्र पूर्णपणे लोपलं. ते यंत्रवत काम करत होते. त्यांनी मला जवळ घेताच त्यांच्या स्पर्शातील माया व प्रेम मला जाणवत असे. मी त्यांच्या अधिकाधिक जवळ येत होते. आजीशी मात्र ते मोजकंच बोलत. मी आता बाबांकडे जास्त लक्ष देऊ लागले, त्यांना काय हवं, काय नको याची दखल घेऊ लागले. जणू काही जाताना आई ते काम माझ्यावर सोपवून गेली होती. कसे राहत होतो या घरात आम्ही तिघंजण ! एकत्र राहूनही कुणी कुणाच्या बरोबर नव्हतं. ज्याप्रमाणे तळ्यात किंवा फिश टँकमध्ये मासे राहतात, सगळे एकमेकांच्या जवळ राहतात; पण कुणी कुणाच्या सोबत नसतं.

नाही नाही म्हणताना आईला घर सोडून जवळजवळ अडीच-तीन वर्ष निघून गेली. बाबांनी आईला परत बोलावण्याकरता पेपरात पत्र लिहून तिची आर्जवंही केली. पण आई परतली नाही. आजी या मधल्या काळात आईच्या घर सोडण्याची बातमी विपर्यास करून शेजारीपाजारी सांगत असे. ती आईबद्दल बोलू लागली की मी मात्र तिथून उठून जात असे. बाबांनी लवकरच पुन्हा लग्न करावं असं आजीचं प्रामाणिक मत होतं.

"आता माझं फार थोडं आयुष्य शिल्लक राहिलं आहे. प्रियालाही आईची फार गरज आहे. घरात कुणी बाईमाणूस असणं जरुरीचं आहे. माझे डोळे मिटण्याआधी लग्न कर रे बाबा." आजीचं असं टुमणं सुरू झालं की बाबा मात्र काहीही न बोलता पाय मोकळे करण्यासाठी घराबाहेर पडत. कधीकधी मीही त्यांच्याबरोबर जात असे. मी कितीही प्रयत्न केला तरी बाबा मात्र फारसं बोलत नसत. आई या शहरातच असणार कारण ती आपल्यापासून फार दूर जाऊ शकणार नाही; चोरून का होईना अधूनमधून आपल्याला व प्रियाला पाहण्यासाठी नक्की येत असेल याबद्दल बाबांची खात्री होती. मलाही त्याबद्दल विश्वास वाटत होता. पण या दोन वर्षांत ती कधीच नजरेस पडली नाही हे मात्र खरं. मला आईची उणीव फार जाणवत होती. मी वयात येऊ लागले होते. काही गोष्टी फक्त आईलाच मोकळेपणी सांगता येतात किंवा तिच्याकडून शिकता येतात. त्या समजावून सांगायला माझी आई जवळ नव्हती. त्यामुळे मीही हळूहळू एकलकोंडी बनत चालले होते. माझा एकटेपणा दूर करण्याचा बाबा आपल्यापरीने खूप प्रयत्न करीत असत. मला सिनेमाला, फिरायला, चौपाटीवर, रेस्टोरांत जेवायला नेत असत. माझी एकुलती एक मैत्रीण सुहास अनेक वेळा आमच्यात सामील होत असे.

सुहासची आई जुन्या वळणाची, जुन्या मतांची होती. ती नोकरी करत नसे, पण तिला माझ्या आईचं फार कौतुक होतं. ती माझ्या आईबद्दल आदर व्यक्त करीत असे. मी सुहासकडे व तिच्या आईकडे मोकळेपणाने बोलत असे. माझ्या भावना उघड करीत असे. त्यांच्यापाशी रडत असे. आईच्या अनेक आठवणी सांगत असे. त्यामुळे माझं मन हलकं होई. आजीने हळूहळू बाबांच्या मागे लग्नाचा लकडा लावणं बंद केलं.

माझ्या या उदास, निराश व कंटाळवाण्या भासणाऱ्या रहाटगाडग्यात सुहासने एके दिवशी आणलेल्या सनसनाटी बातमीने खळबळ उडवली. आदल्याच दिवशी सुहास माझा वाढदिवस साजरा करण्यासाठी आमच्या घरी आली होती. आपल्या घरी परत जाताना म्हणे तिने नाक्यावर उभ्या असलेल्या एका गाडीत माझ्या आईला बसलेलं पाहिलं. खूप वाळली होती म्हणे ! पण ती माझी आईच होती याबद्दल तिची खात्री होती. सुहासने गाडीचा टिपलेला नंबर बाबांना दिला. त्यांच्या डोळ्यांत आनंदाचे सूर्यकिरण इतक्या वर्षांनी चमकलेले पाहून माझाही आनंद द्विगुणित झाला. इतक्या वर्षांनंतर आज प्रथमच बाबांना गाणं गुणगुणताना ऐकून आजीही चकित झाली. बाबांनी कदाचित पुन्हा प्रेमात पडण्याचं धाडस केलं असावं असा तिने कयास बांधला.

एका आठवड्यानंतरची गोष्ट. बाबा आज फारच खुशीत दिसत होते. मला हाक मारून म्हणाले,

"मी एक-दोन दिवसांसाठी पुण्याला जातो आहे. बेटा, तू सुहासला सोबतीसाठी दोन दिवस राहायला बोलव. मी फोन करतो तिच्या घरी." एक आनंदाची बातमी घेऊन येण्याचं आश्वासनही त्यांनी मला दिलं. आता मात्र आजीला आपला त्यांच्या प्रेमात पडण्याबाबतचा अंदाज खरा आहे असं वाटू लागलं.

बाबा रविवारी परत येणार होते. आजी गुलाबजाम व रसमलाई करून त्यांची वाट पाहत होती. गुरुवारी अत्यंत खुशीत पुण्याला निघालेले बाबा अतिशय उदास व काळवंडलेल्या चेहऱ्याने परत आले आणि तडक आपल्या खोलीत निघून गेले. आजीला व मला काहीही उमजेना. मी हळूच त्यांच्या बेडरूमचा दरवाजा ढकलून उघडण्याचा प्रयत्न करून पाहिला तेव्हा आतून कडी लावल्याचं माझ्या ध्यानी आलं. आजीने जेव्हा दारावर थापा मारून त्यांना जेवायला बोलावण्याचा प्रयत्न केला तेव्हा ते तिच्यावर जोरात ओरडले व स्वत:ला एकटं राहू द्यावं म्हणून सांगितलं. त्यांचा असा तोल गेलेला मी यापूर्वी कधीच पाहिला नव्हता. आम्ही तिघंही त्या रात्री न जेवता झोपलो. अर्थात झोप लागणं शक्य नव्हतं.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी बाबांनी मला आपण ऑफिसच्या कामासाठी तीन-चार दिवस पुण्याला जात असून, गरज लागल्यास आपल्या हॉटेलचा नंबर देऊन ठेवला व ते पुण्याला निघून गेले. त्यांच्या भकास चेहऱ्याकडे पाहवत नव्हतं, परंतु काय गडबड आहे हे विचारायचं धाडसही होत नव्हतं. आजीच्या कुशीत शिरून मी त्या रात्री मनसोक्त रडून घेतलं.

गुरुवारी सकाळी बाबा पुण्याहून परतले व लगेच ऑफिसमध्ये निघून गेले. संध्याकाळी ऑफिसमधून आल्यावर त्यांनी मला जवळ घेऊन माझ्या केसांवरून मायेने हात फिरवला तेव्हा माझ्या भावनांचा उद्रेक मला अनावर झाला. ते काहीही न बोलता माझ्या केसांवरून हात फिरवत राहिले. आल्यापासून बाबा आजीशी एक शब्दही बोलले नाहीत. हा अबोला का हे तिलाही उलगडत नव्हतं.

त्यानंतर बाबा फक्त झोपण्यापुरते घरी येत. कित्येकदा मला झोप लागल्यानंतर घरी येत. एक-दोनदा रात्री झोपेतही ते माझ्या केसांवरून, चेहऱ्यावरून हात फिरवत असल्याचा मला भास होत असे. एका घरात राहूनही आम्ही एकमेकांपासून फार दूर होतो. बाबांना काहीही विचारण्याचं धाडस मला किंवा आजीला होत नव्हतं. बाबा तर काहीच सांगायला तयार नव्हते. त्यानंतर दोनच दिवसांनी ''संध्याकाळी बाहेर जाण्यासाठी तयार राहा'' असं मला सांगून ते ऑफिसला जाण्यासाठी निघून गेले. आजीशी तर त्यांनी जवळजवळ अबोलाच धरला होता. ती बिचारी आता पुन्हा आपलं काय चुकलं ते न समजून स्वत:शीच काहीतरी पुटपुटत सतत येरझाऱ्या घालत होती. काहीतरी चुकलं होतं हे खरं ! तिच्या पुटपुटण्यातही मधूनमधून आईचा उद्धार होत असल्याचं मला जाणवत होतं. मला ते सहन होईना. शेवटी मीच तिला थांबवून म्हटलं,

''आजी, माझ्या आईला जाऊन दोन वर्षं केव्हाच उलटून गेली. आता तरी ती तुला त्रास देत नाही ना ? यापूर्वी देत होती असंही नाही. उलट तूच तिला सारखं टोचत होतीस. सगळा दोष तुझाच आहे. आई तुझ्यामुळेच निघून गेली आणि बाबा पण तुझ्यामुळेच दु:खी झाले. तुला आयुष्यात सुख भोगता आलं नाही म्हणून तुला आईचं सुख पाहवलं नाही. दुष्ट आहेस तू !'' इतक्या दिवसांचा तिच्यावरील माझा राग बाहेर पडला. मी काय बोलते आहे तेही मला कळत नव्हतं. ती अविश्वासाने भ्रमिष्टासारखी माझ्याकडे पाहत राहिली.

''तुम्हां सर्वांसाठी एवढ्या खस्ता काढल्या त्या हा असा दिवस पाहण्यासाठी. ह्यांच्या पश्चात त्रास, कष्ट सोसत या राजीवला वाढवलं, शिक्षण दिलं,

अधिकारीपदावर पोहोचवलं, त्याचे तू हे असे उपकार फेडतेस? त्यानं तर माझ्याशी बोलणंच सोडलं. तुझ्यासाठी काय कमी केलं म्हणून मला हे ऐकवलंस तू ?'' एवढं बोलून तिने बिछान्यावर अंग लोटून दिलं. ती हमसाहमशी रडू लागली.

काय होत होतं ते मलाही समजत नव्हतं. मी मूकपणे अश्रू ढाळत तिच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावरून हात फिरवत राहिले. कुणाचं चुकलं होतं ? बाबांचं ? का तर त्यांनी अनाथ आईशी लग्न केलं म्हणून ? अजूनही तिच्यावर प्रेम करत होते म्हणून ? की माझं चुकलं ? का तर मी आजीच्या प्रत्येक गोष्टीवर विश्वास ठेवला म्हणून ? की आईची किंमत कळल्यावर ती नसतानासुद्धा तिच्यावर प्रेम केलं म्हणून ? की आई चुकली ? ज्याच्यावर जिवापाड प्रेम केलं तो व त्याची आई यांना सुख लाभावं म्हणून लोकनिंदेची पर्वा न करता स्वत:ला दु:खाच्या खाईत लोटण्यालाही मागेपुढे पाहिलं नाही म्हणून ? की चूक आजीची होती ? स्वत:ला लक्ष्मीचं वरदान न मिळाल्यामुळे काढाव्या लागलेल्या कष्टांनी श्रीमंत घरच्या सुनेची आशा बाळगली म्हणून ? की त्यामागे स्वत:ला जे सुख तरुणपणी पारखं झालं ते या पोरक्या पोरीलाही लाभू न दिल्यामुळे होणारा आनंद होता ? आजीने आईला का छळलं ते तिच्याशिवाय कुणालाच कळणार नव्हतं. त्यामागे काही का कारण असेना, घडलं ते सत्य होतं. आजीच्या वागण्यापायी आम्ही चौघंही दु:खी झालो होतो. आजीला कधी त्याबद्दल पश्चात्ताप होण्याची शक्यता आहे का ? विचार करून माझं डोकं फुटण्याची वेळ आली होती.

मी बाहेर जाण्याची तयारी करून बाबांच्या येण्याची वाट पाहत बसले. आजी बिछान्यावर पडून होती. बाहेर ढगांचा गडगडाट चालू होता, पण पाऊस पडण्याचं चिन्ह मात्र दिसत नव्हतं. मला आतल्या आत गुदमरल्यासारखं वाटत होतं. मनातही अंधार दाटून आला होता. बाबा अगदी वेळेवर आले आणि न थांबताच मला घेऊन गाडीत बसले. त्यांनी गाडी चौपाटीकडे वळवली तेव्हा मला आश्चर्याचा धक्काच बसला. चौपाटी, वाळू, समुद्र या माझ्या आवडीच्या गोष्टी. मी, आई व बाबा कधीकधी इथं नियमित येत असू. येथील वाळूशी माझ्या जुन्या व सुखद आठवणी निगडित आहेत. बाबा आज मला इथं का घेऊन आले ? त्यांना आईची आठवण तर असह्य होत नसेल ? माझं विचारचक्र चालूच होतं.

''प्रिया,'' बाबांनी घोगऱ्या आवाजात गंभीरपणे बोलायला सुरुवात केली. ''तुझ्या आईबद्दल तुझं काय मत आहे ? की तुझा तिच्यावरचा राग अद्याप कमी झालाच नाही ?''

“आई निघून गेल्याबद्दल मी तिच्यावर कधीच राग धरला नव्हता बाबा. उलट तिच्या सोशिकपणाचा आणि तिने केलेल्या त्यागाचा मला अभिमान वाटतो. तुम्हांला, आजीला आणि मला सुखी करण्यासाठी तिने फार मोठा त्याग केला आहे बाबा.” माझ्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले.

“आई भेटली तर तुझी काय प्रतिक्रिया होईल ? तुझी आई कुठे आणि कशी असेल याचा तर्क आहे तुझा ?”

“आई कुठेही असली तरी सुखी असावी असं मला वाटतं. ती जर मला भेटली तर मी तिला पुन्हा कुठेही जाऊ देणार नाही. आई कुठे आहे बाबा ? मला भेटेल ? ती माझ्यावर रागावली तर नाही ना ?” मी आईला भेटण्यास अधीर झाले होते.

“बेटा, तुझी आई भेटेल तुला. दोन आठवड्यांपूर्वीच तिची माझी भेट झाली. तीसुद्धा फार उत्सुक आहे तुला भेटण्यासाठी.” मी आश्चर्याने आणि आनंदाने त्यांच्याकडे पाहिलं व त्यांचा हात घट्ट पकडला.

“त्याबद्दल तुझ्याशी बोलण्यासाठी, तुझ्या मनाची थोडीफार तयारी करण्यासाठी मी आज तुला इथे घेऊन आलो.” बाबांनी माझा हात तसाच आपल्या हाती ठेवत म्हटलं, “दोन आठवड्यांपूर्वी मी तिचा शोध घेतला. तुझ्या मैत्रिणीचा – सुहासचा – मी शतशः ऋणी आहे. तिने जो गाडीचा नंबर दिला त्यावरून तुझी आई सापडू शकली. घर सोडल्यावर तुझ्या आईनं आपलं नावही बदललं. माहेरचं नाव लावून ती पुण्याला शिक्षिका म्हणून काम करत होती. अधूनमधून मैत्रिणीच्या गाडीतून आपल्या घराजवळ येऊन दुरून तुझं आणि माझं दर्शन घेऊन जात असे. तुझ्या वाढदिवसाच्या दिवशी अशीच गाडीत बसून राहिली असताना सुहासने तिला पाहिलं. गाडीच्या नंबरवरून तिच्या मैत्रिणीचा आणि नंतर तिचा शोध लागला.” बाबांचा आवाज कापरा झाला होता.

आईला घरी आणून पूर्वी कधीही न मिळालेलं सुख तिला द्यावं अशी बाबांची फार इच्छा होती. पण आजीमध्ये काही बदल होण्याची शक्यता होती का ? मी तिच्यासाठी आजीचं मन वळवण्याचा निर्धार पक्का केला.

घरी परतल्यावर नेहमीप्रमाणे मी माझ्या खोलीत निघून गेले. काही वेळाने बाबा काही कामासाठी बाहेर गेले तेव्हा मनात काहीतरी ठरवून आजीशी बोलण्यासाठी मी तिच्या खोलीत पाय ठेवला. आजी दिवा न लावता अंधारात बसली होती. मी दिवा लावला तेव्हा ती डोळे पुसत असल्याचं मला आढळलं.

तिच्या कुशीत शिरत मी तिला विचारलं, ''आजी, या जगात देव आहे का ? अगदी खरं सांग.''

आजी उदासपणे हसली. ''देव असता तर तुझा काही दोष नसताना तू अशी पोरकी झाली असतीस का ? पण तरीसुद्धा देव आहे, बेटा, नक्की आहे.''

''आजी, माझी आई मला कधी भेटेल का ग ?''

''मनापासून देवाची प्रार्थना कर. नक्की भेटेल.''

''पण आजी, ती आली तर तू रागावणार नाहीस ना तिच्यावर ? कदाचित तुझ्या भीतीने ती येणारही नाही.''

''प्रिया, तुझी आई जर भेटली तर मीच तिला घेऊन येईन. पोरी, चूक घडली माझ्याकडून. मी प्रायश्चित्त घेतलं तरी झालं गेलं भरून येणार नाही. पण यापुढे तिला तिची हक्काची जागा आणि मान नक्कीच परत मिळेल. मनापासून तिची क्षमा मागेन.''

मी होकारार्थी मान डोलावली.

दुसऱ्याच दिवशी सकाळी आईचा शोध लागल्याचं बाबांनी आजीला सांगितलं व ते तिला घरी आणायला जात असल्याचं सांगून निघून गेले. कित्येक वर्षांनी आजीच्या अंगात एक वेगळीच शक्ती आल्याचं मला जाणवलं. पायांना भिंगरी लागल्याप्रमाणे ती उत्साहाने घरभर फिरत होती. भरलं वांगं, उसळ, मसालेभात हे आईला आवडणारे पदार्थ तिने काशीबाईंकडून करवून घेतले. गुलाबजाम तिने स्वतः केले. आरतीची तयारी करून ती आईबाबांच्या येण्याची वाट पाहत बसली. माझाही धीर निघत नव्हता. प्रत्येक क्षण तासाप्रमाणे लांबलचक भासत होता. मी गॅलरीतून सारखं आतबाहेर करत होते. गाडीचा हॉर्न वाजताच मी व आजी दाराच्या दिशेने धावलो. गाडीतून उतरणाऱ्या आईच्या चेहऱ्याकडे नजर जाताच माझ्या छातीत धस्स झालं. आजीचे थरथरणारे हात जोरात कापू लागले. कसं कोण जाणे, पण आईला ओवाळण्यासाठी हात उचलण्यापूर्वीच तिच्या हातातील आरतीचं तबक जमिनीवर पडलं. धावत पुढे येऊन काशीबाईंनी ते उचललं. येणाऱ्या अशुभ सावटाची ती पूर्वसूचना तर नव्हती ?

धावत पुढे जाऊन मी आईला घट्ट मिठी मारली. आता पुन्हा माझ्या हातातून मी तिला निसटू देणार नव्हते. दोन-तीन वर्षांपूर्वीची माझी आई हीच का, असा मला क्षणभर संभ्रम पडला. लांबसडक असलेले आईचे केस विरळ झाले होते.

डोळे खोल गेले होते. त्यांच्याभोवती काळी वर्तुळं उमटली होती. फार फार अशक्त झाली होती आई. फक्त बदललं नव्हतं ते चेहऱ्यावरील हसू! मला सांभाळत तिने वाकून आजीला नमस्कार केला. आजीने तिला छातीशी धरून हुंदके देण्यास सुरुवात केली.

आई अशी का दिसते ? ती आजारी आहे का ? काय झालं आहे तिला ? अनेक प्रश्न मला भेडसावत होते. तिच्यापासून दूर जाण्यास मी मुळीच तयार नव्हते. आजीही आईच्या चेहऱ्याकडे पुन्हा पुन्हा काळजीपूर्वक पाहत होती. पण काही विचारायला धजत नव्हती. आई मात्र खुशीत येऊन सारखी हसत होती. पण तिच्या डोळ्यांत कुठेही हसू दिसत नव्हतं. ती फार कष्टाने संथपणे बोलत-चालत होती. माझ्याकडे परत परत टक लावून पाहात होती.

जेवणं आटोपल्यावर बाबांनीच बोलायला सुरुवात केली.

"घर सोडून गेल्यावर छायाने आपलं नावही बदललं आणि माहेरच्या नावाने तिने पुण्याला शिक्षिकेची नोकरी पत्करली. ती आपल्या मैत्रिणीच्या आईवडिलांकडे राहात होती. जेव्हा जेव्हा शक्य होईल तेव्हा ती आपल्या मैत्रिणीच्या गाडीतून आपल्या घराजवळ गाडी पार्क करून प्रियाचं आणि माझं दर्शन घेत असे. प्रिया, तुझ्या वाढदिवसाच्या दिवशीही ती अशीच गाडीत बसली असताना सुहासने तिला पाहिलं आणि तिच्या गाडीचा नंबर टिपला. त्यावरून तिचा शोध लागला. गेल्या आठ-दहा महिन्यांपासून तिला फार थकवा वाटू लागला आणि भूक मंदावली. वजनही बरंच कमी झालं. हॉस्पिटलमध्ये सर्व चाचण्या झाल्यावर ल्युकेमियाचं निदान करण्यात आलं. तुझी आई फार आजारी आहे प्रिया. ती फक्त थोड्या दिवसांची सोबतीण आहे." बाबांचा गळा दाटून आला. त्यांना पुढे बोलवेना. त्यांच्या चेहऱ्यावर वेदना स्पष्ट उमटल्या होत्या. थोड्या वेळाने स्वत:शीच बोलल्याप्रमाणे ते डोळे पुसत, घसा खाकरून पुढे बोलू लागले, "तिचे उरलेले दिवस सुखात जावेत म्हणून गेले दोन आठवडे मी तिला माझ्या मित्राच्या रिकाम्या फ्लॅटमध्ये ठेवलं होतं. तिच्या सेवेला व सोबतीला एक नर्स ठेवली होती. मी तिला रोज भेटत असे." बाबा आजीच्या चेहऱ्याकडे पाहाणं टाळत होते. माझ्याबरोबर आजीसुद्धा हमसाहमशी रडू लागली.

पुढील दोन-तीन महिन्यांत आजीने आईला आपल्या मुलीप्रमाणे वागवलं. तिची सेवा केली. तिचा प्रत्येक शब्द, प्रत्येक इच्छा कटाक्षाने पाळली. केलेल्या अपराधाचं परिमार्जन करण्याचा ती आपल्यापरीने प्रयत्न करत होती. आईच्या व

बाबांच्याही चेहऱ्यावर समाधान दिसत होतं. आईचं हसणं कायम होतं, पण ते आता तिच्या डोळ्यांतूनही ओसंडू लागलं होतं. परंतु तिची प्रकृती मात्र भराभर ढासळत होती.

माझी स्थिती अतिशय केविलवाणी झाली होती. आई जवळ होती तेव्हा ती जवळ असूनही माझी नव्हती. कारण मीच तिला जवळ येऊ दिलं नव्हतं. ती दूर गेल्यावर तिला भेटण्यास मन आक्रंदत होतं. आता ती जवळ असूनही कायमची दूर जाणार या चिंतेने तिच्या सहवासाचा मनाजोगा उपभोग घेता येत नव्हता.

''आय हेट गुडबायूज'' असं आई पूर्वी अनेक वेळा म्हणत असे. का ते मला कधीच कळलं नव्हतं. काय अर्थ असावा त्यामागे ? तिचे आईवडील तिच्या लहानपणीच तिला एकटं सोडून गेले म्हणून ? की मलाही तिच्यापासून कुणी दूर नेईल याची तिला भीती वाटत होती ? की बाबा तिच्यापासून दुरावतील याचं भय वाटत होतं ? तिनेही तेच केलं नाही का ? घर सोडून गेली तीही गुडबाय न करता ! आता तिचा अखेरचा निरोप घेण्याची तयारी मी करत होते.

◈◈◈◈

# मांजर रडत राहिलं

बिपिन अहुजा यांच्या घरी नोकरी मिळाली तेव्हा खेळण्याचं वय असलेली कृष्णा एक निष्पाप लहान मुलगी होती. घरामध्ये अठराविश्वे दारिद्र्य व खायला बरीच तोंडं होती. तिच्या आईने अगदी नाइलाजास्तव ही नोकरी तिच्यासाठी निवडली असल्याचं तिला ठाऊक होतं. परंतु कृष्णाच्या घरातून जाण्यामुळे खाणारं एक तोंड व कपड्यांसाठी एक शरीर कमी होणार होतं. जाण्याच्या दिवसाच्या आदल्या संध्याकाळी कृष्णाला वाटलं की ही रात्र कधी संपूच नये.

"मला जायलाच हवं का ?" झोपडीच्या दरवाज्याला टेकून बसलेल्या आपल्या आईला तिने काकुळतीने विचारलं. बाहेरच्या अंधाराकडे नजर लावीत आईने आपले न थांबणारे अश्रू पुसण्याचा प्रयत्न केला.

"तुझ्याप्रमाणे मलाही फार दुःख होतं आहे ग," आई हुंदके देत म्हणाली. "पण मी तरी काय करू ? अगदी नाइलाज आहे माझा. बांधकाम करणाऱ्या तुझ्या बापाचा पगार अगदी अपुरा पडतो. त्यातील अर्ध्याच्यावर पगार त्याच्या पिण्यात जातो. तू, तुझी धाकटी तीन भावंडं आणि आणखी सहा महिन्यांनी होणाऱ्या मुलाला खायला घालण्यासाठी कुठून पैसे आणू मी ?" यावर कृष्णाच्या तोंडातून अचानक एक हुंदका बाहेर पडला. तिला आपल्या आईची दया आली. तिने पाहिलं होतं की मुलांच्या तोंडी अन्नाचा घास घालण्यासाठी ती बिचारी उपाशी राहात असे. तिने विचार केला की मी सर्वात मोठी. मला स्वार्थी होऊन चालणार नाही. काही न बोलता आईजवळ जाऊन तिने आईच्या मांडीवर डोकं टेकलं.

"माझी मुळीच हरकत नाही, आई." ती पुटपुटली. "मी मेहनत करीन आणि तू माझा पगार नेण्यासाठी दर महिन्यातून एकदा येत जा. त्या वेळी नक्कीच आपली भेट होईल."

त्या दिवशी सुक्याच्या कालवणाचा खास बेत जेवणासाठी केला होता. कृष्णाने जेवणानंतरची सफाई केली, भांडी घासली व ती झोपण्यासाठी चटईवर पडली. झोप तिच्यापासून दूर पळाली होती. ती आईच्या शेजारी चटईवर स्वस्थ पडून राहिली.

पहाट होताच तयारी करून मायलेकी निघाल्या. कारण तिच्या नोकरीच्या गावी पोहोचण्यासाठी त्यांना बरंच अंतर काटायचं होतं. तिथे पोहोचे पर्यंत सूर्य डोक्यावर आला होता. काही वेळातच दोघी मायलेकी एका प्रशस्त घरासमोर उभ्या राहिल्या. ढगाळ, मलिन कपडे घातलेल्या, विस्कटलेल्या केसांच्या एका छोट्या नोकराने त्यांना घरामागील दरवाज्यापाशी नेलं. सौ. अहुजांचं आगमन होईपर्यंत दोघीजणी बराच वेळ तिथे बसून राहिल्या. थोड्या वेळाने मिसेस अहुजा – एक मध्यम उंचीची, थोडी स्थूल असलेली स्त्री – तिच्या हाऊसकोटमध्ये त्यांच्यापुढे उभी होती. चेहऱ्यावर हास्याची उणीव होती व डोळ्यांत एक प्रकारची जरब होती. कृष्णाला प्रथम त्यांची भीतीच वाटली. आल्याबरोबर सौ. अहुजा खुर्चीवर बसली.

"ही तुझी मुलगी का ?" तिने कृष्णाच्या आईला प्रश्न केला.

कृष्णाची आई उतावळेपणाने म्हणाली, "हो बाई, हीच माझी मुलगी कृष्णा."

"ही किती वर्षांची आहे ?"

"जवळजवळ अकरा वर्षांची असेल."

"अकरा म्हणजे जरा लहानच आहे, नाही का ?" सौ. अहुजा म्हणाली. "लहान मुलांना नोकरीवर ठेवताना आम्हांला फार खबरदारी घ्यावी लागते आजकाल."

"ते मलाही ठाऊक आहे बाई. पण इतर अनेक घरं आहेत जिथे घरकाम करणाऱ्या मुलांची गरज आहे. इथे नाही तर कृष्णाला इतर कुठेही नोकरी मिळू शकेल. अंगावर पडलेलं कोणतंही काम करण्याची तिला सवय आहे. आम्हांला फार मोठा पगार नको आहे. तिला जेवणखाण, काही कपडे व थोडे रुपये दिल्यास पुरेसे आहेत."

"ठीक आहे. मी तिला ठेवून घेईन. तुम्ही येताना काही खाऊन आला आहात का ?"

"आम्हांला फार लवकर निघावं लागल्यामुळे खाण्यासाठी वेळ मिळाला नाही. शिवाय वाटेत खाण्यासाठी आमच्याकडे पुरेसे पैसे नव्हते."

"मेरी," सौ. अहुजांनी आवाज दिला तेव्हा एक मध्यमवयीन, शिडशिडीत स्त्री धावत आली. "या लोकांना काही खायला दे आणि नंतर या मुलीला माझ्या मुलाकडे पाठवून दे." बेडरूममध्ये जाऊन सौ. अहुजांनी त्यांच्या छोट्या नोकराच्या हाती पाच रुपयांची एक नोट कृष्णाच्या आईकडे पाठवून दिली.

अहुजांची दोन मुलं सांभाळण्याचं काम कृष्णाकडे होतं. चार वर्षांची मुलगी रीना शांत स्वभावाची होती. परंतु सात वर्षांचा रणजित मात्र अक्षरशः सैतान होता. सर्व बाबतींत आपलंच म्हणणं खरं करायची त्याला सवय लागून गेली होती. त्याने कृष्णाला फार त्रास दिला. त्याच्यामुळे तिला त्याच्या आईकडून बरीच बोलणी खावी लागली. कृष्णाला त्याने आपल्या खोड्यांचं मुख्य लक्ष्य बनवलं होतं. मुलांजवळ नसे त्या वेळी तिला घरसफाई, बागेची सफाई किंवा लहानसहान कपडे धुणं या कामांत दंग ठेवण्यात येई.

अनेक वेळा स्वयंपाकखोलीत तिला मेरीच्या मदतीसाठी पाठवण्यात येई. स्वैंपाकाचं वाटणं, चपात्यांचं पीठ मळणं, छोटी भांडी विसळणं अशा प्रकारची कामं तिच्याकडून करून घेतली जात असत. मेरी व दुसरा नोकर तिच्याकडे तुच्छतेने पाहात असत व तिला कमी लेखीत असत. कारण ती झोपडपट्टीत राहणारी होती. मालकिणीच्या नकळत ते तिच्याकडून बरीच कामं करून घेत असत. मेरी तिच्यावर इतकं तोंडसुख घेई की तिचा आवाज ऐकताच कृष्णाला कापरं भरत असे. कृष्णा सर्वांच्या नंतर झोपायला जाई व सर्वांआधी उठे. बाजारातून सामान खरीदण्यासाठी पैसे देणं व स्वयंपाकाचा मेनू ठरवण्याव्यतिरिक्त सौ. अहुजांचा नोकरचाकरांशी फार थोडा संबंध येत असे. ती एक आरामप्रिय गृहिणी होती आणि आपला मौल्यवान वेळ महिला मंडळ, क्लब व मैत्रिणींबरोबर रमीच्या अड्ड्यावर खर्च करीत असे. एरव्ही वेळ उरलाच तर तो ब्युटी पार्लरमध्ये व तथाकथित सोशल वर्क करण्यात घालवला जाई. कधीकधी संध्याकाळी कृष्णा मुलांना घेऊन मालकिणीबरोबर फिरायला जाई तर अनेकदा ती एकटीच मुलांना घेऊन पार्कमध्ये जाई. कृष्णाला कपड्यांचे चार सेट्स दिले गेले होते. दोन रोजच्या कामाच्या वेळी घरात घालण्याचे तर दोन बाहेर जाण्यासाठी. तिच्या आजवरच्या आयुष्यात तिने स्वतःसाठी इतके कपडे घेतलेले पाहिले नव्हते.

दर महिन्याच्या अखेरीस कृष्णाची आई न विसरता तिचा पंचवीस रुपये पगार घेण्यासाठी येत असे. अंतर फार असल्यामुळे खूप चालावं लागे. त्यामुळे ती बहुधा एकटीच येत असे. अधूनमधून कृष्णाच्या भावाला किंवा बहिणीला बरोबर

आणत असे. तिच्या आईच्या प्रत्येक भेटीच्या वेळी मेरी त्या बसत असलेल्या व्हरांड्यातून आपला मुक्काम हलवत नसे. ही भेटीची वेळ कृष्णाला फार अपुरी असल्यासारखी वाटे. निराशा व त्यापायी आलेल्या वैफल्यामुळे कृष्णा हळूहळू स्वत:च्याच विचारांत, विश्वात अधिकाधिक गुरफटू लागली होती. क्वचित तिला घरी जाण्यासाठी परवानगी देण्यात येई; पण तिला आता आपली झोपडी, आपलं घर व आपली माणसंही परकी वाटू लागली होती. बाल्य संपण्याआधीच कृष्णा मोठी झाली होती.

एके दिवशी घरात अचानक गोंधळ सुरू झाला. श्री. व सौ. अहुजा नोकरांच्या साहाय्याने घरातील सामान बांधण्यात गढून गेले. सौ. अहुजांना एवढी शारीरिक व्यायामाची सवय नसल्यामुळे त्या फार लवकर थकून जात व सुस्कारे सोडीत नोकरचाकरांवर आग पाखडीत. हे सामान बांधणं जवळजवळ दोन आठवडे चालू होतं. मेरी व गोविंद यांना सर्व ठाऊक असूनही कृष्णाला कुणी काही सांगितलं नव्हतं. त्यामुळे ती अगदी गोंधळून गेली होती. एक दिवस मेरी शेजारच्या घरातील आयाशी बोलताना कृष्णाने ऐकलं. श्री. अहुजांची वरच्या हुद्द्यावर मुंबईबाहेर बदली झाली होती. ''ही मंडळी पुण्याला जाणार आहेत. पुणं इथून दूर असल्यामुळे मी मात्र त्यांच्याबरोबर जाणार नाही. गोविंद त्यांच्याबरोबर जाईल'' मेरी सांगत होती.

त्यांचं हे संभाषण ऐकताच कृष्णा चपापली. आता आपलं काय होणार याची चिंता तिला वाटू लागली. त्यांचा संवाद अडवून ती मध्येच म्हणाली, ''मेरी, आता मला माझ्या आईकडे पाठवतील का मालकिणबाई ?''

''मूर्खपणा करू नकोस,'' मेरी कडाडली. ''घरी जाऊन तरी तू आईवडिलांना ओझं बनूनच राहणार ना ? मालक-मालकीण तुझ्याशी चांगलं वागतात हे आपलं नशीब समज. एवढी चांगली नोकरी सोडून कुठे जाणार आहेस ? अधूनमधून आईला पत्र धाडत जा म्हणजे झालं.''

''पण मला कुठे येतं लिहायला किंवा वाचायला ?''

''मालकिणीकडून लिहून आणि वाचून घेत जा.''

इथून मुक्काम हलण्यापूर्वी आपल्या आईवडिलांना भेटायला मिळावं एवढीच कृष्णाची इच्छा होती. पण श्री. अहुजांना लवकरात लवकर नव्या हुद्द्याच्या जागी पोहोचणं जरुरीचं असल्यामुळे तिची आशा फोल ठरली. त्याच सुमारास तिला नवीन भावंड झाल्यामुळे तिची आईसुद्धा तिला भेटण्यासाठी येऊ शकली नाही.

आपल्या मालकांबरोबर पुण्याच्या गाडीत बसल्यावर कृष्णाच्या मनात भीतीचा गोळा उभा राहिला. यापुढे कधीही आपल्या कुटुंबाशी भेट होणं शक्य नाही ह्या आशंकेने तिचं मन आक्रंदत होतं. हा आगगाडीचा प्रवास तिच्या दृष्टीने एक आगळा अनुभव होता. ती यापूर्वी कधीही आगगाडीत बसली नव्हती. घाटातून जाताना दिसणाऱ्या खोल दऱ्या, उंच डोंगर, दाट वनराई पाहून ती स्वत:ला हरवून बसली. सर्व देखावा डोळ्यांत भरभरून साठवून ठेवण्याचा प्रयत्न ती करत होती. गाव जवळ येत चाललं तेव्हा काही क्षण तिच्या दृष्टीत एक झोपडपट्टी आली. अर्धनग्न, मलिन मुलं झोपड्यांसमोर रस्त्यावर खेळत होती आणि धावणाऱ्या गाडीला, त्यातील प्रवाशांना हात उंचावून खुणा करत होती. घरच्या आठवणींनी कृष्णाच्या पोटात गलबलून आलं व डोळ्यांत आसू दाटून आले. आपली झोपडी तिला पुन्हा दिसणार होती का ?

अशीच काही वर्षं निघून गेली. कृष्णाचं बाल्य आता भूतकाळात जमा झालं होतं. किडकिडीत, बेडौल असलेली कृष्णा आता यौवनात पदार्पण केल्यावर भरीव, तरतरीत, तेजस्वी डोळ्यांची तरुणी झाली होती. तिच्या आईचं पत्र तिला कधीच मिळालं नाही. तिच्यातर्फे सौ. अहुजांनी तिच्या आईला पाठवलेली एक–दोन पत्रं परत आली होती. पहिल्या ठिकाणचं बांधकाम पुरं झाल्यावर तिच्या आईवडिलांनी बहुधा दुसऱ्या झोपडपट्टीत मुक्काम हलवला असावा. कधीही न संपणारी धुणीभांडी, स्वैंपाकपाणी व मुलांचं संगोपन ही रटाळ कामं नेहमीच्या रहाटगाडग्यात तिच्यासाठी चालूच राहिली होती. ती मालकांच्या विश्वासातील नोकर बनली होती. मालक सुटीत बाहेरगावी जात तेव्हा तिलाही सोबत नेत असत. कामातून मात्र तिची कधीच सुटका होत नसे. तिचा वाढलेला पगार आता तिला स्वत:वर खर्च करण्यासाठी मिळत असे.

श्री. अहुजांना मोठ्या हुद्द्याची नोकरी असली तरी ते एक प्रामाणिक, सज्जन, साधे गृहस्थ होते. ते तिच्याशी क्वचितच बोलत. तीही त्यांचा मान राखत असे, आदर करत असे. इतर आयांकडून त्यांच्या त्यांच्या मालकांच्या वाकड्या नजरेबद्दल अनेक गोष्टी तिच्या कानावर आल्या होत्या. पण श्री. अहुजांसारखा सज्जन, सभ्य मालक मिळाल्याबद्दल ती स्वत:ला नशीबवान समजत होती.

श्री. अहुजांची पुन्हा बदली झाली; ती अशा तालुक्याच्या ठिकाणी झाली, की त्या गावाला शहर म्हणता आलं नसतं. तिथे इंग्रजी माध्यम असलेल्या शाळाही नव्हत्या. त्यामुळे तिथे आल्यावर मुलांना बोर्डिंग स्कूलमध्ये पाठवण्यात आलं.

कृष्णाच्या वाट्याला आता बराच मोकळा वेळ येऊ लागला. या नव्या गावातील घराचं जुनाट रूप तिला फार आवडलं. घर थोड्या उंच अशा निर्जन जागी असून आजूबाजूला बरीच फळांची झाडं होती. मालकीण कुणाच्या घरी किंवा खरेदीला गेली की कृष्णाला या फळांच्या बागेतून फिरायला अवसर मिळू लागला. फळं तोडून खात असताना ती अनेक स्वप्नं रंगवू लागली. घरापासून खाली काही अंतरावर राहणाऱ्या एका कुटुंबाशी तिची ओळख झाली व त्यांची मुलगी सोना हिच्याशी तिची मैत्री जमली. या सोनाचे अनेक चाहते होते आणि ती त्यांच्या दोस्तीबद्दलच्या कथा तिला रंगवून सांगत असे. कृष्णाही त्यांना भुलून स्वतःला हरवून बसत असे. सोना तिची अगदी निकटची पहिलीवहिली मैत्रीण झाली होती.

आपला भाऊ गोविंद याच्याबद्दल कृष्णाला बातम्या खुलवून सांगण्यास सोना नेहमी उत्सुक असे. त्याला एका थोड्या दूरच्या गावी सुतारकाम व घराचं बांधकाम शिकण्यासाठी पाठवण्यात आलं होतं. गावातील एका थोडी जमीन व घरदार असलेल्या सुखवस्तू गृहस्थाच्या मुलीशी तिच्या आईवडिलांनी त्याचं लग्न ठरवलं होतं. त्याला मात्र ती मुलगी फारशी पसंत नव्हती. त्याने तसं सोनाला अनेक वेळा सांगितलं होतं. वडिलांना प्रत्यक्ष तसं सांगण्याचं धाडस त्याच्यापाशी नव्हतं. ते काम सोनाने आपल्यासाठी करावं अशी त्याची अपेक्षा होती. सोनाने त्याला पत्रांतून आपल्या या लांब केसांच्या, तेजस्वी डोळ्यांच्या मैत्रिणीबद्दल बरीच माहिती पुरवली होती व कृष्णा त्याला नक्कीच आवडेल असंही त्याला कळवायला ती विसरली नव्हती. ते ऐकून कृष्णा आयुष्यात प्रथमच लाजली होती.

"तू असं करायला नको होतंस, सोना" ती उत्तरली. "मी एक मामुली नोकर आहे. ना घरदार, ना आईबापाचा, कुटुंबाचा, नातेवाइकांचा पत्ता. मला या जगात कुणीही नाही. मी लहान असताना माझे वडील नेहमी म्हणत की, जंगलचा राजा हत्ती आहे. त्याच्यापुढे इतर छोट्या जनावरांनी नमतं घ्यावं, दबून राहावं, त्याची कधीही बरोबरी करू नये. मी तुझ्या भावाला न भेटणंच योग्य होईल."

तिचा हात हाती घेत सोना म्हणाली, "तू असं बोलू नकोस. मी माझ्या भावाला चांगलं ओळखते. माझ्याप्रमाणे तोसुद्धा पैशांपेक्षा गुणांची जास्त कदर करतो. तू मुळीच काळजी करू नकोस."

केव्हाही भेटल्या की दोघी मैत्रिणींच्या संभाषणाचा विषय गोविंदच असे. प्रणयाचं पहिलंवहिलं बीज कृष्णाच्या मनात रुजलं होतं.

नवीन वर्ष सुरू होण्यापूर्वी दोन दिवस आधी गोविंद घरी आला. फळझाडांच्या बागेत सोनाने कृष्णाची त्याच्याशी ओळख करून दिली. त्याच्या नजरेतील कौतुकाचे भाव पाहून कृष्णाची छाती धडधडू लागली. त्याच्या प्रेमात पडल्याबद्दल तिची खात्री पटली. सोनाच्या म्हणण्यात बरंच तथ्य होतं. तो खरोखरच देखणा होता, त्याचे दंड बळकट होते व त्याच्या घोगऱ्या आवाजात अशी काही जादू होती, की तो आवाज तिच्या सर्वांगात एक वेगळीच शिरशिरी उठवून गेला.

नवीन वर्षाच्या आदल्या संध्याकाळी अहुजा दांपत्य त्यांच्या एका मित्राकडं पार्टीला गेलं होतं. कृष्णा घरी एकटीच होती, एकटीच जेवणार होती. तिला थोडा थकवाही आला होता. कारण सबंध दिवस ती सौ. अहुजांबरोबर पार्टीला नेण्यासाठी अनेक पदार्थ करण्यात दंग होती. ती थोडा वेळ स्वस्थ बसली आणि तिने स्वत: करता स्टोव्हवर खिचडी फोडणीस टाकली. दूर कुठेतरी मांजर रडत असल्याचा आवाज तिच्या कानांवर आला. कानात बोटं घालून तिने काम बंद करण्याचा प्रयत्न केला. कारण मांजराचं रडणं म्हणजे लवकरच घडणाऱ्या अशुभाची सूचना, असं तिने लहानपणी आईकडून ऐकलं होतं. तिची अन्नावरची वासनाच उडाली. केलेली खिचडी तशीच झाकून ठेवून ती झोपण्यासाठी आपल्या खोलीत जाण्यासाठी उठली. तेवढ्यात स्वैंपाकखोलीच्या दरवाज्याजवळ कुणी व्यक्ती उभी असल्याचा तिला संशय आला.

ती व्यक्ती म्हणजे गोविंद होती. त्याने तिला दरवाजा उघडण्यास सांगितलं. आत आल्यावर गप्प बसण्यास सांगून तिला स्वत:जवळ बोलावलं. तिचा हात धरून तिला ओढत त्याने स्वैंपाकखोलीच्या बाहेर नेलं व तेथील पायऱ्यांवर आपल्यापाशी बसवलं. प्रथमच ती एकटी त्याच्या सान्निध्यात आली होती. त्यामुळे ती भीतीने थरथरू लागली. तिला स्वत:पाशी ओढून धीर देत घाबरण्याचं काहीही कारण नसल्याचं त्याने आश्वासन दिलं.

"उद्या नवीन वर्षाचा उत्सव संपला की मी इथून जाणार आहे. एवढंच तुला सांगण्यासाठी मी इथे आलो आहे."

"पण का ?" ती हळूच कुजबुजली.

"कारण मी माझ्या लग्नाबद्दल माझ्या वडिलांनी केलेल्या बेताशी सहमत नाही. त्यांनी ठरवलेल्या मुलीशी मी लग्न करू इच्छित नाही, माझं तुझ्यावर प्रेम आहे. माझ्या शिक्षणाच्या गावी मी नोकरीच्या शोधार्थ जात आहे. नोकरी मिळताच मी येऊन तुला घेऊन जाईन. तू येशील ना माझ्यासोबत ?"

कृष्णा आता रडू लागली. ''मी नक्की येईन गोविंद,'' ती हळुवारपणे उत्तरली. त्याचवेळी कुत्र्यांचं भुंकणं सुरू झालं. मालक-मालकीण आल्याची ती सूचना होती. ''मालक आले'' एवढंच बोलून ती आत पळाली.

रोज दिवसा आणि रात्रीही ती गोविंदाच्या परतण्याची स्वप्नं पाहू लागली. त्या अवधीत बदली न होता श्री. अहुजांची बढती करण्यात आली. कंपनीच्या गाडीव्यतिरिक्त सौ. अहुजांसाठी त्यांनी स्वत:ची गाडी खरीदली व त्यासाठी शंकर या ड्रायव्हरची नेमणूक करण्यात आली. त्याच्या सफेद युनिफॉर्ममध्ये तो रुबाबदार दिसत असे. अनेकदा तिच्या जेवणाच्या वेळी तो कुठूनतरी अचानक हजर होत असे व तिच्यासोबत जेवण्याचा हट्ट धरत असे. ती स्वैंपाकखोलीच्या बाहेरील पायऱ्यांवर बसून एकटीच जेवत असे, तेव्हा तो तिच्याशेजारी बसून जेवत असे. तो नेहमी तिच्या सुगरणपणाची स्तुती करी तर कधी येताना तिच्यासाठी अत्तर, साबण, बांगड्या, इयरिंग्ज अशा बारीकसारीक वस्तू भेट म्हणून आणत असे. तीही या वस्तू आपल्या ट्रंकेच्या तळाशी जपून ठेवत असे. हळूहळू त्याने तिचा हात आपल्या हाती घेऊन कुरवाळायला सुरुवात केली व थोड्याच दिवसांत चुंबनापर्यंत मजल मारली. कृष्णाही स्वत:ला फार भाग्यवान समजू लागली. तिच्या मनातून गोविंदा कालांतराने अस्पष्ट होऊ लागला.

गोविंदला जाऊन काही महिने लोटले तेव्हा तो आता कधीच परतणार नाही याबद्दल कृष्णाची खात्री पटली. आपल्या मैत्रिणीला, सोनाला मात्र ती विसरली नाही. गोविंद निघून गेल्यापासून सोनावर तिच्या आईवडिलांनी बरीच बंधनं लादली होती. तिचं लग्नही ठरवण्यात आलं होतं. त्यामुळे तिच्या भेटीगाठीही दुर्मीळ होऊ लागल्या होत्या. सोनाकडूनही कृष्णाला गोविंदबद्दल काहीच बातमी मिळाली नव्हती.

एका रविवारी अहुजा दांपत्य दोन दिवसांसाठी समुद्रकाठी असलेल्या आपल्या मित्राच्या गावी गेलं होतं. त्या दिवशी तिला पूर्वीप्रमाणेच किचनच्या दारापाशी गोविंदचं दर्शन झालं. त्याचं वजन बरंच कमी झालं होतं. त्याच्या नजरेत निराशा, वैफल्य डोकावल्याचा तिला भास झाला.

''मला यायला थोडा उशीर झाला, पण तुला दिलेल्या वचनाला जागून मला चांगली नोकरी मिळाल्यामुळे तुला नेण्यासाठी आलो आहे,'' गोविंद म्हणाला.

कृष्णाची नजर स्वत:च्या पायांवर रोखली होती. ''मला क्षमा कर गोविंद.'' ती शांतपणे, चेहरा निर्विकार ठेवून त्याला म्हणाली, ''तुझ्या-माझ्यातील प्रेम हे

दोन अननुभवी माणसांचं बालिश, अपरिपक्व प्रकरण होतं. तुला न भेटता अनेक दिवस गेल्यानंतर माझ्या ते ध्यानी आलं आहे. माझं मन आता बदललं आहे.''

गोविंदने बर्फासारख्या थंडपणाने तिच्यावर आपली नजर स्थिर केली व तिला विचारलं, ''तुझं मन असं अचानक कसं बदललं ? याचा अर्थ काय कृष्णा ?''

''याचा अर्थ एवढाच की माझ्या मालकांना माझी फार गरज आहे. ते सर्व बाबतीत माझ्यावर अवलंबून राहतात. त्यांनी आजवर मला फार मदत केली आहे. त्यामुळे मी माझी नोकरी अशी तडकाफडकी सोडू शकत नाही. मी त्यांना असं संकटात लोटणं मला योग्य वाटत नाही.''

गोविंद तिच्याजवळ आला व तिची हनुवटी दांडगटपणे आपल्याकडे वळवून गुरगुरला, ''हे सारं खोटं आहे, ते तू जाणून आहेस. तुला काय वाटलं की गेले काही महिने मी आनंदात जगत होतो ? अनेक वेळा उपाशीपोटी झोपलो, चांगल्या नोकरीसाठी वणवण फिरलो, कुटुंबाला मुकलो, आणि हे सर्व केवळ तुझ्यासाठी, तुझ्या प्रेमापायी. तुला आता माझ्याबरोबर यावंच लागेल. तुला आवडो न आवडो, पण माझ्याबरोबर आलंच पाहिजे.''

ओरडणं म्हणता येईल इतपत त्याचा आवाज चढला होता. कृष्णा शांतपणे खालच्या सुरात म्हणाली, ''ते आता शक्य नाही. तुला ते समजू शकणार नाही.''

गोविंदचे डोळे किलकिले झाले. त्यात खुनशी भाव असल्याचा तिला भास झाला. ''मला हळूहळू सारं समजू लागलं आहे.'' तो फिस्कारला, ''या सर्वाचं कारण नक्कीच तो तरुण ड्रायव्हर असला पाहिजे. सोनाकडून मला काही गोष्टी कळल्या आहेत. तुला बहुधा ठाऊक नसावं की शंकरचं लग्न झालेलं आहे. त्याला एक मुलगाही आहे.''

शंकरने गळाला लावलेल्या आमिषाला कृष्णा बळी पडली व गळात अडकली.

''खोटं आहे ते सारं. तो माझ्याशीच लग्न करणार आहे. तसं वचन दिलं आहे त्याने मला.''

गोविंदच्या ओठांवर आता विकट हास्य दिसू लागलं. त्याचा चेहरा रागाने काळानिळा झाला. ''शेवटी आपल्या जातीच्या वळणावर गेलीस. माझ्या गैरहजेरीत हे धंदे करत होतीस ?''

खिशात हात घालून त्याने काहीतरी वस्तू बाहेर काढली. अंधारात प्रथम तिला ती दिसली नाही. त्याने हात वर उचलला तेव्हा स्वैंपाकघराच्या दिव्याच्या प्रकाशात त्याच्या हातातील चाकू चकाकला.

किंचाळण्याचा प्रयत्न करण्यापूर्वीच गोविंदने कृष्णाचा गळा पकडला. त्याच्या हातातील चाकू पुन्हा पुन्हा तिच्या शरीरात रुतत होता. तिची शुद्ध हरपत होती. आपण जमिनीवर कोसळत असल्याची तिला जाणीव झाली. पडता पडता तिचे ओठ हलले, "आई, आई ग ऽ आई, कुठे आहेस तू ?"

बेशुद्ध होण्याच्या क्षणी तिच्या कानावर दुरून येणारे मांजराच्या रडण्याचे सूर हळूहळू अस्पष्ट होत गेले.

◈◈◈◈

# झाकली मूठ

शांतपणे जेवण झाल्यावर काशीताईंनी दिलेली सुपारी सावकाशीने चघळत अण्णा स्वैंपाकखोलीतून बैठकीच्या खोलीत आले. चाळीतील दोन खोल्यांच्या जागेतील ह्या दिवाणखान्याचा बेडरूम म्हणूनही वापर करण्यात येत असे. दारासमोरील दहा-बाय-चौदाच्या भिंतीला टेकून ठेवलेली एक लोखंडी कॉट व त्यावर रचलेली उंचसखल गाद्यांची उतरंड. कॉटवर खादी ग्रामोद्योगच्या एके काळी गडद असलेल्या, परंतु आता विटलेल्या एका चादरीवर भिंतीला टेकून रचलेल्या उशा, हे या बैठकीच्या खोलीतील मुख्य फर्निचर. कॉटला लागून असलेल्या भिंतीवर लावलेले देवादिकांचे फोटो खोलीला शोभा देत होते. डोकं टेकवण्याच्या जागी तेलाचा मोठा डाग पडलेली आरामखुर्ची खिडकीजवळच्या कोपऱ्यात होती. या खुर्चीचा वापर अण्णा व काशीताई आलटून पालटून करीत असत. खुर्चीलगत एक काचेचं कपाट होतं. परगावी जाऊन आल्यावर कधी काळी मुलांनी भेटीदाखल आणलेल्या वस्तू त्यात ठेवल्या होत्या. उरलेल्या कप्प्यांत ज्ञानेश्वरी, भागवत, तुकारामगाथा यांसारखे ग्रंथ रचले होते. कॉटला लागूनच स्वैंपाकखोलीचा दरवाजा होता. तिथल्या भिंतीचा वापर काशीताईंनी देवघरासाठी केला होता. ही एवढी जागाही त्या दोघांना अगदी राजवाड्यासारखी वाटे.

काशीताई व अण्णा यांचा थोरला मुलगा कुबेर व त्याची पत्नी उज्ज्वला दोघंही डॉक्टर होती. त्यांचं गावातच एक मॅटर्निटी होम होतं. दुसरं मॅटर्निटी होम उघडण्याच्या प्रयत्नात ती दोघं होती व त्यासाठी पैशांची जमवाजमव चालू होती. त्यांची मुलं कॉन्व्हेंट स्कूलमध्ये शिकत होती आणि घरात आया, नोकर व स्वैंपाकी यांचं राज्य होतं. धाकटा मुलगा जय व त्याची पत्नी स्मिता दोघं इंजिनिअर असून स्मिता जयला त्याच्या व्यवसायात मदत करत होती. तिच्या आईवडिलांचं हे

एकच अपत्य आपल्या देशात राहत होतं. तिचे दोन्ही भाऊ अमेरिकेत स्थायिक झाले होते. त्यामुळे जय घरजावई बनून सासऱ्यांची फॅक्टरी सांभाळत होता. आईवडिलांपासून दूर राहिली की मुलं धीट व स्मार्ट होतात या समजुतीने त्यांनी आपला मुलगा विवेक ऊर्फ विकी याला बोर्डिंग स्कूलमध्ये ठेवलं होतं. काशीताई व अण्णा यांची आठवण नातवंडांना क्वचितच येत असे. या आजीआजोबांना भेटण्यास त्यांच्यापाशी वेळच नसे. अण्णा–काशीताईंच्या गिरगावातील चाळीबद्दल मुलांना फारसं प्रेम नव्हतं. जमल्यास कुबेर दोन–तीन महिन्यांतून एकदा मुलांना आईवडिलांचं दर्शन घडवण्यासाठी घेऊन येत असे.

काशीताईंची तब्येत तोळामासाच होती. अण्णांना सेवानिवृत्त होऊन दहा वर्षं झाली तरी ते तब्येतीने बरे होते. सेवानिवृत्तीनंतर ते आपली प्रकृती सांभाळून एक स्वतंत्र व्यवसाय करीत असत. आजही सकाळी ते साडेदहाच्या सुमारास घरातून आपल्या व्यवसायाच्या स्थानी जाण्यास निघण्याच्या तयारीत होते. काशीताईंनी एका कळकट पिशवीत थोडं खाण्याचं सामान त्यांच्या हाती दिलं. ॲल्युमिनियमची एक वाटी आत घालायला त्या विसरल्या नाहीत. ते निघणार एवढ्यात कुबेर घरात शिरला. स्वारी थोडी घुश्श्यातच होती. त्याला या वेळी आलेला पाहून दोघांनाही आश्चर्याचा धक्काच बसला. दोघंही त्याच्याकडे निरखून पाहू लागली. तो असा अवेळी का यावा याचा उलगडा होईना. आल्याबरोबर कुबेरने कॉटवर बसकण मारली. दोघांच्यामध्ये थोडी जागा राखून काशीताई सरकून बसल्या. त्यांना आठवलं की तो लहानपणी याच कॉटची मोटार करून चालवत असे.

''अण्णा, मी एका महत्त्वाच्या बाबतीत तुमच्याशी बोलायला आलो आहे.''

''असं कोणतं महत्त्वाचं काम काढलंस की ज्यासाठी काम सोडून अवेळी तुला इथं यावं लागलं ?''

''तुम्ही आपला व्यवसाय सोडून द्यावा अशी तुम्हांला विनंती करण्यास मी आलो आहे. तुम्ही मला आणि जयला शरमेने मान खाली घालायला लावलं आहे.''

''का बरं ? काम करून पोट भरण्यात कसली लाज आहे ?'' अण्णा.

''काम करण्यात कसलीच लाज नाही. पण तुम्ही कामाच्या नावाखाली जे काही चालवलं आहे ते घृणास्पद आहे. तो एक फ्रॉड आहे.''

''मला नावं ठेवण्याचा तुला मुळीच अधिकार नाही कुबेर. कुणालाही न लुबाडता, न दुखावता, कुणाचीही चोरी न करता मी प्रामाणिकपणे माझा व्यवसाय करतो.''

''तुमच्या व्यवसायाबद्दल फार काही ऐकण्याची माझी मुळीच इच्छा नाही. त्याबाबत मला काहीही सांगू नका.''

''तुम्हां मुलांकडून मी कसलीच अपेक्षा करत नाही. मी जे काही करतो त्याचा तुझ्याशी किंवा तुझ्या भावाशी काहीही संबंध नाही. असं असताना तुम्ही माझ्या व्यवसायाबद्दल का तक्रार करता ?''

''संबंध आहे अण्णा. आम्ही मुलं आहोत तुमची. आपापल्या व्यवसायांत यशस्वी झालो आहोत. थोरामोठ्यांच्या मुली सुना आहेत तुमच्या. तुमच्या व्यवसायासंबंधी पूर्ण माहिती माझा मित्र वसंत याच्याकडून काल प्रथम कळली. त्याने तुम्हांला तुमच्या व्यवसायाच्या ठिकाणी पाहिलं आणि लगेच ओळखलं. तुम्ही त्याला पाहू शकणार नाही अशा जागी उभं राहून त्याने तुमचं बराच वेळ निरीक्षण केलं. तुम्ही रोज सकाळपासून दुपारपर्यंत देवीच्या देवळासमोर व संध्याकाळी हाजी अलीसमोर हात पसरून भीक मागता असं त्याच्याकडून कळलं. तुमची आमच्याकडून अपेक्षा तरी काय आहे ?''

''मला कुणाकडून कसलीच अपेक्षा नाही. मी कुणाला कसलाही त्रास देत नाही. लुबाडत तर नाहीच, पण कुणाची चोरीही करत नाही.''

''तुमच्या या उत्तराचं आश्चर्य वाटतं अण्णा. तुम्ही आम्हां सर्वांना त्रास, दुःख देत आहात. आमचा अभिमान दुखवत आहात. आमचा अपमान करत आहात. समाजात आम्ही मिळवलेलं स्थान नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहात. आपला बाप भिकारी असलेला कुणाला आवडेल ?''

''आता मात्र तू माझा अपमान करतो आहेस, कुबेर.''

''तुम्ही लोकांना असं फसवणं बंद करेपर्यंत मला तुमचा अपमान करावाच लागेल.''

''मी लोकांना फसवतो या विधानाचा खुलासा करशील का जरा ?''

''तुम्हांलाच जर ते फसवणं वाटत नाही तर मी सांगून तरी काय उपयोग ?''

त्या दोघांसाठी चहा करण्याच्या तयारीत उठून उभ्या राहिलेल्या काशीताईंना अण्णांनी खुणेने खाली बसायला लावलं.

''नाही. मी त्याला फसवणं नाही म्हणू शकत. फसवण्यासाठी त्या व्यक्तींशी बोलावं लागतं. त्यांच्याकडून त्यांच्या मनाविरुद्ध काही घ्यावं लागतं. मी तर कुणाशी एक शब्दही बोलत नाही. एका स्टुलवर बसून मी येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांकडे बघत राहतो.''

''खरं आहे. हातात वाटी व घाऱ्या डोळ्यांत करुण भाव दर्शवून ना ?''

''माझे डोळे घारे व करुण आहेत त्यात माझा काय दोष आहे ? येणारा-जाणारा प्रत्येकजण माझ्या वाटीत पैसा टाकतो, तोही भरपूर आणि मनापासून. मी त्यांना नाही म्हणत नाही एवढंच.''

''लोक तुम्हांला पैसे देतात ते तुमच्या करुण, दीन चेहऱ्याकडे आणि डोळ्यांकडे पाहून. त्यांना तुमची दया येते म्हणून.''

''बिचारे प्रेमाने देतात देवाच्या नावाने. फार चांगले लोक आहेत. त्यांत काही लक्षाधीश, कोट्याधीश पण असावेत. सढळ हाताने दान करतात, दान करण्यात आनंद मानणारे लोक आहेत. मी तर त्यांच्याशी बोलतही नाही. मी त्यांना फसवतो असा आरोप तू माझ्यावर करू नकोस.''

''केवळ बोलूनच लोकांना फसवता येतं असा काही नियम नाही. इतरही मार्ग आहेत त्यासाठी. त्या मार्गांचा तुम्ही स्वतःच्या फायद्यासाठी अवलंब करत आहात.''

''मी चार्मिंग लुच्चा असल्याचा माझ्यावर आता आरोप करणार आहेस का ?''

''हो. तुम्ही स्वतःचं लोभसवाणं, निरागस, कारुण्याने भरलेलं रूप या कमाईसाठी वापरत आहात.''

''मी करतो त्यात काय चुकलं माझं ?''

''ऐका अण्णा, ऐका ! जरा कान खोलून ऐका. तुमच्यावर भीक मागण्याची वेळ यावी त्या अर्थी तुम्ही नक्कीच गरजवंत आहात, अगदी हताश झालेले आहात असा त्याचा अर्थ होतो.''

''कोण म्हणतं असं ?''

''मी म्हणतो. भीक मागणं ही अपमानाची शेवटची स्थिती, शेवटची पायरी आहे.''

''खोटं आहे ते ! भीक मागणं ही एक कला आहे.''

''म्हणून तुम्ही त्याबद्दल आदर बाळगता ?''

“नाही. माझे पाय अद्याप जमिनीवरच टेकलेले आहेत.”

स्वैंपाकखोलीत जाऊन काशीताई पदराने डोळे पुसून, चेहरा पाण्याने धुऊन परत आल्या.

“अण्णा, आता गंभीर व्हा थोडा वेळ. मला एवढंच सांगायचं आहे की ज्याच्याजवळ पुरेसं काही नाही असं समजतात, त्याच व्यक्तीला लोक दान किंवा भीक देतात.”

“ते तुला कधी आणि कसं समजलं कुबेर ?”

“मी विचार करू शकतो म्हणून कळलं मला. भिकाऱ्यांवर ज्या ज्या वेळी माझी नजर जाते त्या त्या वेळी ते उपाशी असल्याचं जाणवतं मला.”

“मी तर म्हणेन, तुझं मनच नीट चालत नाही.”

“तुमच्या दृष्टीने नीट चालण्यासाठी माझ्या मनाने कसं चालायला हवं ?”

“व्यावहारिकपणे आणि वास्तविकपणे. भिकारी नजरेस पडतो तेव्हा मनाने म्हटलं पाहिजे की या माणसाला योग्य व साजेसा व्यवसाय मिळालेला आहे. त्याने याचं धंद्यात रूपांतर करायला हवं.”

“याचा थोडक्यात अर्थ असा की त्याने भीक मागण्याची करियर केली पाहिजे. अण्णा, आता जरा गंभीर व्हा. तुम्ही विनोद करू लागला आहात.”

“फायदा करून देणाऱ्या व्यवसायाची करियरच केली पाहिजे कुबेर. माझ्या या करियरचे अनेक उपकार आहेत माझ्यावर. तुझ्या मॅटर्निटी होमला, नंतर लग्नाला, जयच्या शिक्षणासाठी व त्याच्या पहिल्या बिझनेसकरता या माझ्या धंद्यानेच हातभार लावला. केवळ नोकरीच्या उत्पन्नातून मी एवढा खर्च करू शकणं शक्यच नव्हतं. परंतु लोकांच्या नजरेत खुपू नये व त्यांनी इतर काही तर्क करू नयेत यासाठी आमचं राहणीमान बदलण्याचा आजपर्यंत प्रयत्न केला नाही आणि यापुढे करणारही नाही.”

“याचा अर्थ तुम्ही आपला हा व्यवसाय सोडण्याचा विचारसुद्धा करणार नाही.”

“निदान एवढ्यात तरी मी हा बिझनेस सोडणार नाही. अद्याप तरी माझी प्रकृती ठीक आहे आणि या कामाचा ताणही मुळीच नाही. मी रोज माझ्या पोस्टवर जातो. माझं ठिगळं लावलेलं धोतर हा धंद्याच्या दृष्टीने फायदाच आहे. शिवाय

तिथे मला कुणी ओळखतही नाही. मला यापासून शांती, समाधान आणि सुख मिळतं. कधीकधी तुझी आईसुद्धा येते माझ्याबरोबर.''

''आणि आमच्या सुखाचं काय ? ते आमच्यापासून हिरावून घ्यायचा तुम्हांला काय अधिकार आहे ?''

''तुमचं कुणाचंही सुख हिसकावून घेण्याचा मी प्रयत्न केलेला नाही. तुम्हां मुलांना आपल्या परिने सुख देण्याच्या प्रयत्नातच होतो आम्ही. आता तुम्ही तुमची आयुष्यं सांभाळत तुमच्या मुलांना भरपूर सुख द्या. मला आणि काशीला आमच्या सुख-शांतीचा उपभोग घेऊ द्या. या वयातही आम्ही दोघंही कमवत आहोत हेही सुख काही कमी नाही.''

''हे काम करण्याची आता तुम्हांला मुळीच गरज नाही. अण्णा, या धंद्यात दरमहा कमावता तेवढे पैसे मी आणि जय मिळून तुम्हांला देऊ. तुम्ही हा व्यवसाय थांबवा आता.''

''नाही बेटा, ते एवढ्यात तरी शक्य नाही.''

''तुम्ही असा हट्ट का करता ?''

''हा हट्ट मुळीच नाही. दरमहा या धंद्यात कमावतो तेवढे पैसे तुम्ही मला देऊ शकणार नाही.''

''का ? तुम्हांला अधिक पैसे हवे आहेत का ? मी विचारतो उज्ज्वलाला.''

''मी आता सांगून तुला ते कळणार किंवा पटणार नाही. माझं मृत्युपत्र वाचल्यानंतरच कळेल.''

या वेळी अण्णांच्या विरोधाला न जुमानता काशीताई चहा करण्यासाठी स्वैंपाकघरात गेल्या.

''तुम्ही मृत्युपत्र केलं आहे ?'' कुबेरच्या प्रश्नात आश्चर्य व्यक्त होत होतं.

''चार-पाच वर्षांपूर्वी. मला सर्व गोष्टी वेळेवर करायला आवडतात.''

''कुणाजवळ आहे मृत्युपत्र ?''

''माझ्या वकिलाकडे.''

''नाव काय या वकिलाचं ?''

''ते एक गुपित आहे माझं.''

“का बरं ?”

“त्याला काही खासगी कारणं आहेत माझी.”

“तुमच्या या वकिलांचा कुठे शोध घ्यावा ते आम्हांला कसं कळेल ?”

“त्यांना तू शोधण्याची गरज नाही. माझ्या मृत्यूनंतर वेळ येताच तेच तुम्हांला शोधून काढतील.”

“जेवणाचा मेनू ठरवावा इतक्या शांतपणे तुम्ही या सर्व गोष्टींबद्दल बोलता आहात.”

“जीवन यालाच म्हणतात कुबेर. माझ्या वयाच्या गृहस्थाला मृत्यू हा शब्द अगदी स्वाभाविक, नैसर्गिक वाटतो.”

“तुमचं मृत्युपत्र तुमच्या वकिलाकडे आहे ?”

“ते तुला अगोदरच सांगितलं आहे.”

“मला अगदी खरं खरं सांगता आहात, अण्णा ?”

“अजून विश्वास नाही तुझा माझ्यावर ?”

“नाही अण्णा. एवढी काय दौलत ठेवली आहे की त्यासाठी मृत्युपत्र करण्याची गरज भासली तुम्हाला ?”

“सर्व गोष्टी आठवत नाहीत मला आता. पण काही चाळी, जमीन, बँकेत व इतरत्र गुंतलेले पैसे, काही स्टॉक्स. मी माझं काम चालू ठेवलं तर माझ्या मृत्यूपर्यंत आणखी बरीच भर पडेल त्यात. अर्थात, मी आणखी किती वर्षं जगू शकेन यावर सर्व अवलंबून राहील. त्यासाठीही मी माझ्या विलमध्ये तरतूद केलेली आहे.”

“माझ्यावर आता वेड लागण्याची पाळी आणली आहे तुम्ही. मला अगदी खरं काय ते सांगा. तुम्ही माझी थट्टा तर करत नाही ना ?”

“तुझाच मला फार राग येऊ लागला आहे. माझी सहनशक्ती फार ताणलीस आतापर्यंत. मी यापूर्वी तुझ्याशी कधी खोटं बोललो होतो का ? आणि मी खोटं का बोलावं ?”

“कोण जाणे ! पण सर्व खरं सांगता आहात याची खात्री देत असाल, तर होईल माझ्या सर्व शंकांचं निरसन.”

“मला नाही वाटत तसं. तू तुझ्या वडिलांना नीट ओळखशील तेव्हाच होईल तुझ्या शंकांचं निरसन.”

''मी माझ्या वडिलांना बऱ्यापैकी ओळखून आहे. म्हणून तर मला शंका वाटतात त्यांच्याबद्दल.''

''ठीक आहे कुबेर. मी तुला माझ्या वकिलांचा पत्ता देतो, जाऊन भेट त्यांना लवकरच.''

अण्णांनी आपल्या वकिलांचं नाव व पत्ता एका छोट्या चुरगळलेल्या कागदावर लिहून दिला.

''खोटं सांगून मला फसवण्याचा प्रयत्न नका करू अण्णा. मी नक्की जाऊन भेटेन त्यांना.''

''जरूर जाऊन त्यांना भेट आणि विचारून खुलासा करून घे. मनाचं समाधान होईल तुझ्या. माझीसुद्धा तीच इच्छा आहे. आताच माझ्या मनात एक विचार आला बघ. अगदी बरोबर आहे तुझं म्हणणं. मलाही पटू लागलं आहे. माझी या व्यवसायातून निवृत्त होण्याची खरंच वेळ आलेली आहे. शुभस्य शीघ्रम् ! उद्यापासूनच निवृत्त होईन म्हणतो या व्यवसायातून. फार चांगला जॉब आहे. कुणाला काही नोटीस देण्याचीही जरूर नाही.''

''ओह् अण्णा ! केवळ माझ्या सांगण्यावरून सोडू नका आपला बिझनेस. मी फक्त सूचना केली. त्यावर इतक्या गंभीरपणे आणि घाईने विचार करू नका. तुम्हांला जर तुमच्या कामात शांती आणि समाधान मिळत असेल तर का थांबवता ? फार थकवा पण येत नाही तुम्हांला. त्याखेरीज जे करावंसं वाटतं ते करण्याचं स्वातंत्र्य नक्कीच आहे तुम्हांला. शक्य झाल्यास आपल्या व्यवसायाची जागा बदलता आली तर पाहा.''

''अगदी खरं आहे तुझं म्हणणं.''

''मग काम चालू ठेवणार ना तुम्ही ?''

''मी विचार करीन त्यावर.''

''ठीक आहे. मला जरूर कळवा तुमचा निर्णय. तुमच्या वकिलाचा फोन नंबर देता का ?''

''आता आठवत नाही मला. परंतु डिरेक्टरीत तुला नक्की सापडेल.''

''मी शोधून काढीन.'' कुबेर जाण्यासाठी उठून उभा राहिला, ''तुम्हांला उशीर झाला असेल ना ? मी तुमच्या पोस्टवर माझ्या गाडीने पोहोचवून देतो.''

''नको कुबेर. आज मी सुटी घेईन म्हणतो.''

"बसने जाण्याचा त्रास घेण्यापेक्षा यापुढे मी तुम्हांला रोज गाडीने पोहोचवत जाईन."

"काम चालू ठेवायचं ठरवलं तर मी तुला जरूर कळवेन."

"तुम्ही नीट विचार केलात तर नक्की निर्णय घ्याल काम चालू ठेवण्याबद्दल."

"पाहतो काय करायचं ते !"

"निघतो मी आता. बरीच कामं आहेत."

"काळजी घे. माझ्या वकिलाला भेटायला विसरू नकोस."

"तुम्ही असं खुशीत येऊन का हसता, अण्णा ?"

"कोण जाणे, हसावंसं वाटलं. अरे, तुझ्यासाठी चहा करणारी तुझी आई चहाच विसरून गेली बघ."

"ठीक आहे. मला नकोच होता चहा. उद्या भेटू आपण."

"कदाचित."

◈◈◈◈

# फसवणूक

आपल्या लेझी बॉयवर आरामात रेलून डिटेक्टिव्ह रिचर्ड ब्राउन टीव्हीवरील बातम्या ऐकण्यात दंग होऊन गेले होते. एका सनसनाटी बातमीसाठी दुपारीच त्यांची मुलाखत घेण्यात आली होती. पाच-सहा वर्षांपूर्वीच क्रिमिनल ब्रँचचे अधिकारी म्हणून वॉशिंग्टन डी. सी. या राजधानीच्या शहरात त्यांची नेमणूक झाली होती. अजूनपर्यंत लग्नाचे पाश मागे लावून न घेतल्यामुळे शहरातील चांगल्या वस्तीत ते एकटेच एका छोट्याशा, पण अद्ययावत अपार्टमेंटमध्ये राहत होते. ते आठ-दहा महिन्यांपूर्वी आपल्या वयाच्या तिसाव्या वर्षी, व्यवसायाने वकील असलेल्या एका स्त्रीच्या प्रेमात गुरफटले होते. तिच्या व्यवसायापायीच त्या दोघांच्या संबंधांत गुंतागुंत निर्माण झाली होती. गुन्हेगारी जगाचा पुरेपूर अनुभव असल्यामुळे डिटेक्टिव्ह ब्राउन यांचा आपल्या प्रेयसीच्या व्यवसायाला मनापासून विरोध होता. फॅमिली लॉयर, इंडस्ट्रियल लॉयर इत्यादी वकिली व्यवसायांबद्दल त्यांची काहीही तक्रार नव्हती. क्रिमिनल लॉयर असल्यामुळे तिच्या जिवाला धोका असल्याची सूचना देऊन तिचं मन वळवण्याचा त्यांनी अनेकदा प्रयत्न करून पाहिला होता. परंतु ती आपल्या निश्चयापासून ढळण्यास बिलकूल राजी नव्हती. त्यामुळे महिन्या-दीड महिन्यापूर्वी त्यांनी काही दिवस एकमेकांना न भेटण्याचा निर्णय घेतला होता.

एका खुनाच्या केसमध्ये अत्यंत धोकादायक असलेल्या एका गुन्हेगाराला पकडण्यात आज डिटेक्टिव्ह ब्राउन यशस्वी झाले होते. सकाळपासून ते गव्हर्नर, मेयर, पोलीस कमिशनर व शहरातील इतर प्रतिष्ठित व्यक्तींकडून अभिनंदनपर आलेल्या फोनवर बातचीत करण्यात दंग होऊन गेले होते. स्वतःच्या कर्तबगारीचा त्यांना फार अभिमान वाटत होता.

डिटेक्टिव्ह ब्राउन यांच्या छोट्या मुलाखतीसह टी.व्ही. वर बातमी दिली जात होती, ''अनिता ग्रोव्हर या मतिमंद मुलांच्या शाळेत समाजसेवा करणाऱ्या एका प्रतिष्ठित स्त्रीचा खून केल्याच्या आरोपावरून, त्याच शाळेतील व्हिकी सिंग या शिक्षकाला अटक करण्यात आली असून, गुन्हेगाराला पकडण्यात यशस्वी झाल्याबद्दल डि. ब्राउन यांचे पोलीस कमिशनर मॉरिस यांनी आभार मानले आणि त्यांच्या कामगिरीबद्दल त्यांची स्तुतीही केली.'' टी.व्ही. बंद करून विश्रांती घेण्यासाठी डि. ब्राउन यांनी दिवा मालवून बिछान्यावर अंग झोकून दिलं.

अनिता ग्रोव्हर हे शहरामधील एक बडं प्रस्थ मानलं जात होतं. धनाढ्य इंडस्ट्रियालिस्ट श्री. रुडॉल्फ ग्रोव्हर यांच्या त्या पत्नी असून समाजकार्य करण्यात अग्रगण्य होत्या. राज्यातील अनेक संस्थांशी त्या निगडित होत्या. अनेक संस्थांच्या कमिटीवर चेअरमन, सदस्य किंवा खजिनदार म्हणून त्या काम पाहत असत. जवळजवळ दीड महिन्यापूर्वी त्यांच्याच घरात भरदिवसा त्यांचा गळा दाबून खून करण्यात आला होता. मिळालेली थोडीफार माहिती सोडल्यास कालपरवापर्यंत पोलीस कुणालाही अटक करू शकले नव्हते. अनिताबाईंचे पती रुडॉल्फ ग्रोव्हर हे गव्हर्नर व मेयर महोदयांच्या वर्तुळांत लोकप्रिय असल्यामुळे पोलीस कमिशनर मॉरिस व त्यांच्या खात्यावर गुन्हेगार शोधून काढण्यासाठी बराच दबाव आणला जात होता. पोलीस खात्यातील सर्व अधिकारी खुनी न सापडल्यामुळे हवालदिल झाले होते. अशा परिस्थितीत खुनी व्हिकी सिंगला अटक करण्यात होमिसाइड डिटेक्टिव्ह ब्राउन यांना यश मिळालं होतं.

* * *

डिटेंशन सेंटरच्या बाहेर वार्ताहरांची, टी.व्ही. कॅमेऱ्यांची एकच झुंबड उडाली होती. हातकड्या घालून कोर्टात नेत असता व्हिकी सिंग चेहऱ्यावर हात पालथे धरून आपला चेहरा झाकण्याचा आटोकाट प्रयत्न करत होता. त्याचबरोबर ''मी कुणाचाही खून केलेला नाही, माझ्या हातून खून घडणं शक्यच नाही. मी निरपराधी आहे,'' असं जोरजोरात ओरडून सर्वांना पटवण्याचा प्रयत्न करत होता. वाढलेल्या दाढीच्या खुंटांनी व झोप न आल्यामुळे काळवंडलेला त्याचा ओढग्रस्त चेहरा लहान मुलाप्रमाणे निरागस व कुणाचाही विश्वास बसावा असा निष्पाप भासत होता. पाहणाऱ्यांची लगेच खात्री पटावी की हा माणूस खून करणं शक्यच नाही. याच्या हातून एखादी माशीही मारली जाण्याची शक्यता नाही.

जामीन ठरवण्यासाठी व्हिकी सिंग जज्ज सिंगलटन यांच्या कोर्टात हजर केला गेला. त्याच्या निष्पाप वाटणाऱ्या चेहऱ्याकडे नजर वळताच जज्जसाहेबांनादेखील त्याच्या निरपराधीपणाबद्दल क्षणभर खात्री वाटली. पण क्षणभरच. असे अनेक निष्पाप चेहऱ्याचे खुनी त्यांनी आपल्या खुर्चीत बसून पाहिले होते. जज्ज सिंगलटननी त्याला वकील देण्याचा हक्क आहे असं सांगताच व्हिकीने मान उचलून त्यांच्याकडे नजर वळवली. त्यांच्या डोळ्याला डोळा भिडवत तो उद्गारला. ''मी काहीही अपराध केलेला नाही. मी खुनी मुळीच नाही. त्यामुळे मला वकिलाची मुळीच गरज नाही.''

''प्रत्येक आरोपी स्वत:ला निरपराधी म्हणवत असतो,'' जज्ज सिंगलटन.

''मी खरोखरच निरपराधी आहे. माझ्या हातून खून घडणं शक्यच नाही.''

''असं सर्वच गुन्हेगार म्हणत असतात. तू वकील न दिल्यास तुला कोर्टामार्फत वकील दिला जाईल.''

''माझ्यासाठी वकील नेमून देण्याची जरूर नाही.''

''कॅरॉल जॉन्सन या वकिलाची तुझ्यासाठी नेमणूक केली जात आहे.''

खुनाचं स्वरूप व व्हिकी सिंगची भारतीय पार्श्वभूमी ध्यानी घेऊन त्याला जामिनावर न सोडता कैदेत ठेवण्याचा आदेश जज्ज सिंगलटन यांनी दिला. तो भारतात पळून जाण्याची शक्यता असल्यामुळे जामीन देण्यास नकार दिला.

* * *

डिटेक्टिव्ह ब्राउन हे व्हिकीच्या केसबद्दल विचार करत आपल्या ऑफिसमध्ये बसून कॉफीचे घुटके घेत होते. ते आज स्वत:वर निहायत खूश होते. पुढील काम, साक्षीदार गोळा करणं, व्हिकीची संपूर्ण माहिती मिळवणं, सर्व कागदपत्रं एकत्र करणं या सर्वांना वेळ हवा होता. त्याचे फिंगरप्रिंट्ससुद्धा लॅबमध्ये पाठवायचे होते. दारावर कुणीतरी थाप दिल्यामुळे त्यांची समाधी भंग पावली. त्यांच्या मदतनिसाने त्यांच्या परवानगीने आत प्रवेश केला.

''डि. ब्राउन, मी व्हिकीच्या केसमधून माझी सोडवणूक करण्याची विनंती करण्यासाठी आलो आहे. दुसऱ्या कोणत्याही केसवर बदली केल्यास माझ्यावर मेहरबानी होईल.''

बदलीचं कारण विचारताच तो लगेच म्हणाला, ''अनेकांच्या आणि माझ्याही मते आपण चुकीच्या माणसाला अटक केलेली आहे. व्हिकी सिंग नक्कीच निरपराधी

आहे. मी मिळवलेल्या माहितीवरून त्याच्या शाळेतील मतिमंद मुलांना तो अत्यंत हळुवारपणे वागवत असे, त्यांची सर्व कामं करत असे. त्यांच्यासाठी काहीही काम करण्यास त्याची ना नसे. त्याच्या हातून खून घडणं अशक्य आहे. तो नक्कीच निरपराध आहे.''

''भरदिवसा गळा दाबून त्यानेच खून केला आहे. सर्व साक्षी-पुरावे त्याच्याविरुद्ध आहेत. दिसतं तसं नसतं. त्याच्याखेरीज कुणीही नव्हतं अनिताबाईंच्या घरात. सर्व साक्षीदार का खोटं बोलतील ? पट्टीचा खुनी असाच असतो.''

''पण तो तसा मुळीच वाटत नाही.''

''खून त्यानेच केला आहे याबद्दल खात्री आहे माझी. सर्व पुरावे त्याच्याविरुद्ध आहेत.''

व्हिकीची कोर्टाने नेमलेली वकील, कॅरॉल जॉन्सन, त्याच वेळी डि. ब्राउन यांच्या परवानगीने त्यांच्या खोलीत आली. याच मुलीशी झालेला त्यांचा वाङ्निश्चय मोडला होता. आत येताच कॅरॉलने त्यांच्याकडून व्हिकीची फाईल मागवून घेतली व ती वाचण्यात गढून गेली. डि. ब्राऊन तिच्याकडे पाहत नकारात्मक मान हलवत स्वस्थ बसून राहिले.

* * *

दोन्ही हात एकमेकांत गुंतवून आढ्याकडे नजर लावून आपल्या तुरुंगातील खोलीत व्हिकी पडला होता. खोलीतील शांतता त्याचा जेलमेट पीटर याला सहन होईना. केलेल्या खुनाबद्दल पीटरला मृत्यूची सजा देण्यात आली होती व तो त्या दिवसाची वाट पाहत होता. व्हिकीशी संवाद साधण्याचा पीटर प्रयत्न करू लागला.

''वय काय तुझं व्हिकी ?''

''वयाने काय फरक पडतो ?''

''बरंच काही घडू शकतं. मूल तरुण होतं, तरुण म्हातारे होतात. खुनाच्या मुकदम्याची फाईल एकदा उघडली की बंद होत नाही. तुझी फाईल लवकर बंद व्हावी म्हणून ईश्वराची प्रार्थना कर.''

''म्हणजे काय होईल ?''

‘‘मृत्यूची सजा तुझ्या बाबतीत टळणार नाही. ती लवकर मिळावी म्हणून प्रार्थना कर. तुला माझ्याप्रमाणे वर्षानुवर्षं वाट पाहावी लागू नये यासाठी देवाला साकडं घाल.’’

‘‘मला काहीही होणार नाही. मी काहीसुद्धा केलेलं नाही. कोणताच गुन्हा केलेला नाही मी. निरपराधी आहे मी,’’ निष्पाप चेहऱ्याने व्हिकी शांतपणे म्हणाला.

* * *

व्हिकीची फाईल वाचून पुरी झाल्यावर त्यातील कागदपत्रांच्या काही कॉपीज व आपल्या नोट्स् घेऊन व्हिकीची भेट व शक्य झाल्यास त्याची मुलाखत घेण्यासाठी त्याची वकील कॅरॉल जॉन्सन हिने आपली गाडी व्हिकीच्या तुरुंगाच्या मार्गाकडे वळवली. तो भेटण्याच्या खोलीत आल्यावर तिने स्वतःची ओळख करून दिली व त्याला मदत करण्यासाठी त्याच्याकडून काही माहिती मिळवण्याचा आपला इरादा तिने जाहीर केला. तिला पाहून व्हिकी नाराज झाला असल्याची तिला जाणीव झाली. त्याने तिच्या प्रश्नांना उत्तरं देण्यास नकार दिला. दोन्ही हात छातीशी बांधून तो एकच पालुपद आळवत होता, ‘‘मी कुणाचाही खून केलेला नाही. मी खुनी नाही.’’ अनेक प्रश्न विचारूनही त्याच्याकडून काही प्रतिसाद मिळण्याची आशा न उरल्यामुळे नाइलाजास्तव कॅरॉल जॉन्सन परत जाण्यासाठी उठली.

‘‘तुझ्या नशिबातच शिक्षा लिहिलेली दिसते. नाहीतर तू थोडंतरी सहकार्य दिलं असतंस.’’

‘‘मी काहीही केलेलं नाही. मी कोणताच गुन्हा केलेला नाही.’’

‘‘ते आपल्याला कोर्टात शाबीत करून दाखवावं लागेल.’’

‘‘ठीक आहे, विचारा.’’

‘‘सर्वप्रथम तू स्वतःबद्दलची माहिती स्वतःच्या शब्दांत सांग.’’

‘‘माझं नाव आहे विक्रम सिंग. भारतातील पंजाब राज्यात एका छोट्या खेड्यात माझा जन्म झाला. मी बी.एस.सी. झालो आहे. मी येथील मतिमंद मुलांच्या शाळेत शिक्षक होतो. मिसेस ग्रोव्हरने दिलेल्या देणगीबद्दल सेक्रेटरीने दिलेली पावती आणि पत्र घेऊन मी त्यांच्या घरी गेलो होतो.’’

‘‘पावती तू का घेऊन गेलास ?’’

"सेक्रेटरीला मदत करण्यासाठी. अनिताबाईंना त्या पत्राची आणि इतर काही डॉक्युमेंट्सची निकडीची गरज होती. मी त्यांच्या घरी गेलो तेव्हा त्या लिव्हिंगरूममध्ये होत्या."

"एकट्याच होत्या की आणखी कुणी होतं त्यांच्याबरोबर ?"

यावर व्हिकी थोडा विचारात पडल्यासारखा वाटला व काही न बोलता स्वस्थ बसला.

"तू गप्प का झालास ? तुला माझ्या प्रश्नाचं उत्तर द्यायचं नाही का ?"

"तो मला पण मारून टाकेल. मी अनिताबाईंना वाचवायचा खूप प्रयत्न केला, पण तो खिडकीतून पळून गेला."

"तो कोण होता ?"

"मी ओळखत नाही त्याला. त्यापूर्वी कधी पाहिलं नव्हतं त्याला."

"तू का नाही पळून गेलास ?"

"कारण मी खून नाही केला."

"ठीक आहे. मी निघते आता. तुला आणखी कशाची गरज आहे का ?"

"वाचण्यासाठी काही पुस्तकं आणलीत तर मेहेरबानी होईल."

* * *

व्हिकीशी पहिली मुलाखत झाल्यानंतर कॅरॉल जॉन्सनने त्याच्याबद्दल व या खुनाच्या केसबद्दल मनाशी काही कयास केले. त्यावरून आपल्या अशिलाचा बचाव करण्याकरता तिने अधिक पुरावे गोळा करण्याचा प्रयत्न लगेच सुरू केला. ऑफिसात पोहोचताक्षणीच तिने व्हिकीच्या घरमालकाचा फोन नंबर फिरवला. त्यांच्या संमतीने त्यांना भेटण्याची वेळ ठरवली. दुसऱ्या दिवशी सकाळी अकराच्या सुमारास कॅरॉल जॉन्सनची गाडी व्हिकीच्या घरमालकाच्या ड्राइव्ह वे वर आली. त्या वेळी ते तिची वाट पाहत होते. तिने त्यांना आपली ओळख करून देईपर्यंत घरमालकाला धीर निघेना. स्वतःचा परिचय करून देऊन त्यांनीच तिला प्रथम प्रश्न विचारला, "वकील मंडळी न्यायनिष्ठ व संज्ञावान केव्हापासून होऊ लागली ? त्यात तुम्ही तर कोर्टाने नेमलेल्या वकील. व्हिकीने स्वतःला निरपराधी भासवण्याचा कितीही प्रयत्न केला तरी खुनी तोच आहे याबद्दल खात्री आहे माझी."

"असं ठामपणे कशावरून सांगू शकता तुम्ही ?"

"मी त्याला गेलं वर्षभर ओळखतो आहे. रोज पाहात आलो आहे त्याच्याकडे. चेहऱ्यावरून भोळा, भाबडा, बापुडवाणा वाटतो. खुनी मुळीच वाटत नाही. तरीसुद्धा माझ्या मते तोच खुनी आहे."

आतील खोलीत आवाज ऐकल्याचा भास झाल्यावरून आजूबाजूला पाहत कॅरॉल जॉन्सनने त्यांना विचारलं, "घरात आणखी कोण राहतं तुमच्या ?"

"माझी मुलगी राहते माझ्याबरोबर. परंतु ती आता नोकरीवर गेली आहे."

"व्हिकीकडे कुणी येत असे का ? कोणत्या प्रकारच्या लोकांशी संबंध होता त्याचा ?"

"मी तरी त्याच्याकडे कधी कुणी आलेलं पाहिलं नाही. दार बंद करून एकटाच खोलीत राहात असे. एकलकोंडाच वाटत होता."

या वेळी या गृहस्थाला अधिक प्रश्न विचारण्यात फारसा अर्थ नाही असं मनाशी ठरवून कॅरॉल जॉन्सन जाण्यासाठी उठली. ड्राइव्ह वेमध्ये पार्क केलेल्या आपल्या गाडीचा दरवाजा उघडत असताना तिची नजर घराच्या वरच्या खिडकीकडे वळली. एकवीस–बावीस वर्षांची एक मुलगी खिडकीचा पडदा बाजूस सारून आपल्याकडे निरखून पाहत असल्याचं कॅरॉलच्या लक्षात आलं. तिच्या नजरेस नजर भिडताच ती मुलगी आत निघून गेली.

दुसऱ्या दिवशी सकाळी ऑफिसमध्ये लवकर पोहोचून कॅरॉलने डि. ब्राउनना फोन केला व आपल्यासोबत व्हिकीच्या घरमालकाला भेटण्यासाठी त्याच्या घरी येण्याची तिने त्यांना विनंती केली. त्यांनी ती कबूल करून दुपारी दोन वाजता तिला भेटण्याचं ठरवलं. तिला व्हिकीच्या घराची तपासणी करायची होती. व्हिकीची फाईल उघडून ती काही नोट्स् लिहिण्यात गढून गेली. थोड्याच वेळात तिच्या सेक्रेटरीने फोनवरून सॅली नावाची कुणी तरुण मुलगी तिला भेटण्याचा हट्ट धरून बसल्याचं तिला कळवलं. अपॉइंटमेंट न घेता ही सॅली कोणत्या महत्त्वाच्या कामासाठी आली असावी याबद्दल तर्क करीत कॅरॉलने त्या मुलीला आपल्या ऑफिसमध्ये पाठवण्यास सेक्रेटरीला सांगितलं. आदल्याच दिवशी व्हिकीच्या घरमालकाच्या घरात खिडकीपाशी पाहिलेली मुलगी ऑफिसचा दरवाजा उघडून कॅरॉलच्या पुढ्यात उभी राहिली. तिला खुर्चीत बसण्याची खूण करत कॅरॉल तिला म्हणाली,

"तू मला भेटावंस अशी माझी मनापासून इच्छा होती आणि तू ती पुरी करशील याबद्दल खात्रीही होती."

‘‘तुम्ही ओळखलंत मला ?’’

‘‘माझी स्मरणशक्ती तशी फारशी चांगली नाही. परंतु तुझा चेहरा विसरणं शक्य झालं नाही मला. नाव काय तुझं ?’’

‘‘सॅली.’’

‘‘काय काम करतेस ?’’

‘‘मी मतिमंद मुलांच्या संस्थेत नोकरी करते. व्हिकीची आणि माझी भेट तिथेच झाली. मी तुमच्याशी काही बोलू नये यासाठी माझ्या वडिलांनी मी घरी नसल्याचं तुम्हांला सांगितलं.’’

‘‘व्हिकीला राहायला खोली देण्यासाठी तू वडिलांना गळ घातली होतीस ?’’

‘‘हो. व्हिकी हे त्याचं खरं नाव नाही. त्याचं नाव विक्रम आहे. तो फार सज्जन माणूस आहे.’’

‘‘हे कशावरून ठरवलंस तू ?’’

‘‘मतिमंद मुलांबरोबर काम करताना तो बराच हळवा होत असे. खूप सोशिकपणा व सहनशीलता दाखवत असे. त्यांच्याशी प्रेमाने बोलत असे. त्यांची कोणतीही कामं करण्यास त्याला कधीच कमीपणा वाटला नाही. अतिशय शांत प्रवृत्तीचा आहे तो. भांडण, झगडा अगर आक्रमक वृत्ती त्याच्या स्वभावातच नाही.’’

‘‘समाजकार्यकर्त्या अनिता ग्रोव्हर आमच्या संस्थेला बऱ्याच देणग्या देत असत असं म्हटलं जातं. त्यांच्या सान्निध्यात व्हिकी अतिशय अस्वस्थ आणि बेचैन होत असे. आता त्या पण गेल्या आणि व्हिकीलाही कैद झाली. माझ्या वडिलांना तर तो प्रथमदर्शनीच आवडला नव्हता. मी तुम्हांला भेटले हे कृपा करून माझ्या वडिलांना कळवू नका,’’ एवढं बोलून सॅली जाण्यास उठली. तिच्या भेटीची वार्ता तिच्या वडिलांना न कळवण्याचं आश्वासन पुन्हा एकदा घेऊन ती खोलीबाहेर पडली.

* * *

कॅरॉल जॉन्सन व्हिकीला भेटण्यास येण्यापूर्वी काही वेळ तो आपल्या सेलमधल्या सोबत्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करत होता. त्याचा चेहरा शांत व निश्चयी वाटत होता. जणू काही काहीच घडलं नसून तो आपल्या मित्राशी सहजपणे गप्पा मारत आहे असं वाटत होता.

‘‘तू कशासाठी आलास या तुरुंगात ?’’

“खुनाच्या आरोपाखाली.”

“खरंच खून करू शकलास तू ?”

“हो. एका मित्राने त्याला निकड होती म्हणून माझ्याकडून बरेच पैसे उसने घेतले. माझी जवळजवळ सर्व बचत मी त्याला अडचण असल्यामुळे दिली केवळ मित्र म्हणून. रक्कम परत न करता तो नाहीसा झाला आणि मी पार बुडालो. बायको अगोदरच तीन मुली माझ्या पदरी टाकून निवर्तली होती. दोन वर्षांनंतर तो माझा मित्र शहरात अचानक माझ्या नजरेस पडला. त्याला गाठून मी पैशांबद्दल विचारताच तो ओळख दाखवण्यासही तयार होईना. माझा राग अनावर होऊन मी तो काबूत ठेवू शकलो नाही. गळा दाबून प्राण घेतला मी त्याचा.”

“मुली कुणाकडे आहेत तुझ्या आता ?”

“धाकट्या दोघी फॉस्टर होम्समध्ये आहेत. थोरली दूरच्या एका नातेवाइकांकडे आहे. परंतु ते लोक फारसे चांगले नाहीत.”

“अरे, तू असं का केलंस ? मागचा–पुढचा विचार नाही केलास. पैसा येतो आणि जातो. निदान मुलींची तरी आठवण ठेवायला हवी होतीस.”

“तू नेहमीच असा थंड डोक्याचा राहू शकतोस ?”

“हो. मी कधीच कुणाचा खून करू शकणार नाही.”

“पण तू खून केल्याचा सर्व पुरावा तर तुझ्याविरुद्ध आहे.”

“मी कुणाचाही खून केलेला नाही. माझ्या हातून कुणाचाही खून होणं शक्यच नाही.”

* * *

डि. रिचर्ड ब्राउन यांच्यासोबत कॅरॉल जॉन्सन व्हिकीच्या घरमालकाच्या घरी येऊन पोहोचली.

“काय ठरवलं आहेस व्हिकीबद्दल त्याच्याशी मुलाखत झाल्यानंतर ?” डि. ब्राउननी तिला गाडीतच बसून प्रश्न विचारला.

“पहिल्याच भेटीत माणसाची खरी ओळख नाही होऊ शकत.”

“अनेक वेळा भेटूनही माणसाची खरी ओळख पटणं कठीण असतं काहींच्या बाबतीत,” गाडीतून उतरताना डि. ब्राउन उत्तरले.

दाराजवळील घंटी वाजताच घरमालकांनी दरवाजा उघडला व त्या दोघांवर नजर जाताच त्यांच्या कपाळावर आठी उमटली.

"परत परत येऊन का त्रास देता मला ? जे काही सांगायचं होतं ते सर्व यापूर्वीच सांगून चुकलो आहे. यापुढे त्या वेड्याला पुन्हा खोली भाड्याने देणार नाही."

"तुम्ही त्याला वेडा का म्हणता ?"

"तो माणूस वेडा आहे म्हणून."

घरमालकाशी अधिक वितंडवाद न घालता कॅरॉलने त्याच्याकडून व्हिकीच्या खोलीची किल्ली घेतली व ती डि. ब्राउनबरोबर खोलीत तपासणीसाठी गेली. खोली स्वच्छ होती व सर्व वस्तू जागच्या जागी होत्या. अनेक पुस्तकं व्यवस्थितपणे रचून ठेवली होती. उपयोगी पडेल अशी एकही वस्तू त्यांना सापडली नाही. तेवढ्यात एका पुस्तकात ठेवलेला एक लिफाफा कॅरॉलच्या हाती आला. त्यावर एका मानसोपचारतज्ज्ञांचा पत्ता व आत त्यांच्याकडून व्हिकीला आलेलं पत्र होतं.

व्हिकीला पुन्हा भेटण्याआधी कॅरॉलने त्याच्या सायकिॲट्रिस्टची भेट घेण्याचा विचार केला व तो अमलातही आणला. आपली ओळख करून दिल्यानंतर तिने व्हिकी त्यांचा पेशंट होता का व असल्यास कधीपासून होता याबद्दल चौकशी केली. बरेच आढेवेढे घेऊन व्हिकी आपला गेली दोन वर्षं पेशंट असल्याचं त्यांनी कबूल केलं. परंतु व्हिकीच्या परवानगीवाचून इतर काहीही माहिती पुरवण्यास स्पष्ट नकार दिला.

दुसऱ्या दिवशी व्हिकीची अनुमती घेऊन कॅरॉल डॉ. कूपरना – व्हिकीच्या सायकिॲट्रिस्टना – त्यांच्या ऑफिसमध्ये पुन्हा भेटली. व्हिकी हा स्किझोफ्रेनियाचा बळी असून त्याचं व्यक्तिमत्त्व विभागलेलं आहे अशी माहिती तिला डॉ. कूपर यांच्याकडून मिळाली.

"याचा अर्थ काय ?" कॅरॉल.

"आपल्या हातून काही कृती घडल्यावर अनेकदा त्याला त्या गोष्टीचं पूर्णपणे विस्मरण होतं."

मिळेल तेवढी माहिती डॉ. कूपर यांच्याकडून घेतल्यावर कॅरॉलने त्यांचे आभार मानून पुन्हा व्हिकीच्या घरमालकाला भेटण्याचा विचार केला. दुसऱ्याच दिवशी ती घरमालकाच्या घरी पोहोचली. त्या वेळी तिच्या सुदैवाने त्यांची मुलगी सॅली घरीच होती. बेल वाजल्यावर पुढे होऊन तिनेच दरवाजा उघडला. कॅरॉल

दारात उभी राहिलेली पाहून सॅलीचा चेहरा तिच्या नकळत उजळला. तिने अगत्याने कॅरॉलचं स्वागत केलं. त्याउलट नुकतंच खोलीत पाऊल टाकलेल्या सॅलीच्या वडिलांचा चेहरा कॅरॉलच्या आगमनामुळे काळवंडला व कपाळाला आठ्या घालत ते मनगटावरील घड्याळात पाहत उद्गारले, "हे पाहा, मी यापूर्वीच तुम्हांला व्हिकीसंबंधी मला ठाऊक असलेली सर्व माहिती पुरवलेली आहे. याहून अधिक मला काहीही माहिती नाही. मला आता दुसऱ्या एका महत्त्वाच्या कामासाठी बाहेर जाण्याची घाई असल्यामुळे तुम्ही आपले प्रश्न लवकर आटोपते घ्या."

"ठीक आहे. मला फक्त एकाच गोष्टीचा खुलासा तुमच्याकडून हवा आहे. मला एवढंच पुन्हा सांगा की त्या दिवशी तुम्ही व्हिकीला वेडा का म्हटलंत ?"

"केवळ रागाच्या भरात मी म्हटलं असेल त्याला वेडा. त्यातून कमी–जास्त अर्थ काढण्याचा प्रयत्न करू नका."

"व्हिकी एक चांगला मुलगा असूनही तो केवळ तुमच्या मनाविरुद्ध तुमच्या मुलीला आवडत होता म्हणून तुम्ही त्याच्याविरुद्ध माहिती पुरवलीत ?"

"तो चांगला असल्याची माहिती कुणी पुरवली तुम्हांला ? तो वेडा आहे वेडा."

"माझ्याशी लग्न करण्यासाठी व्हिकीने माझ्या वडिलांकडे मला मागणी घातली त्या वेळी माझ्या वडिलांनी त्याचा आणि माझा रागाच्या भरात खूप अपमान केला. त्याला त्याच्या धर्माबद्दल, देशाबद्दल नाही नाही ते बोलले. तरी व्हिकीने उलट उत्तर दिलं नाही. तो चूप राहिला. परंतु जेव्हा त्यांनी मला थप्पड लगावली आणि ढकलून जमिनीवर पाडलं तेव्हा माझं ओरडणं व्हिकीला सहन झालं नाही. त्याने पुढे होऊन मला सोडवण्यासाठी डॅडींचा गळा पकडला," वडिलांच्या विरोधाला न जुमानता सॅलीने एका दमात खुलासा केला.

"हां. माझा गळा पकडला त्या वेळी त्याचे डोळे खुनशी दिसत होते, रक्त उतरलं होतं त्यांत. चेहराही लालबुंद झाला होता. सॅलीच्या मदतीने मी कशीबशी त्याच्या हातून सुटका करून घेतली आणि त्याला घराबाहेर काढण्यात यशस्वी झालो."

"तुम्ही पोलिसांना का नाही फोन केला ?"

"मी करणारच होतो फोन. परंतु सॅलीने आर्जवं करून, रडून मला त्यापासून परावृत्त केलं."

‘‘त्यानंतर काय झालं ?’’

‘‘काहीही नाही. दुसऱ्या दिवशी पुन्हा असा काही मोकळेपणाने वागला की जसं काही घडलंच नाही.’’

‘‘तोच त्याचा आजार आहे डॅडी आणि त्यावर इलाज करण्यासाठी तो गेली दोन वर्ष नियमितपणे सायकिॲट्रिस्टकडे जात होता,’’ सॅली.

मिळाली एवढी माहिती खूप झाली असं वाटून कॅरॉल जॉन्सन दोघांचेही आभार मानून तिथून निघाली.

* * *

संध्याकाळी उशिरापर्यंत बसून कॅरॉलने आजवर गोळा केलेल्या सर्व माहितीवरून व्हिकीची फाईल त्याच्या पूर्वेतिहासासह तयार केली. आपण व्हिकीची केस फार उत्तम रितीने लढवू याबद्दल तिचा आत्मविश्वास वाढला. व्हिकीला दुसऱ्या दिवशी भेटण्याचं ठरवून ती समाधानाने बिछान्यावर पडली.

सकाळी लवकर उठून व्हिकीची पुन्हा मुलाखत घेण्यासाठी सर्व तयारीनिशी कॅरॉल त्याच्या तुरुंगाच्या रोखाने निघाली. जाताना त्याच्यासाठी दोन-तीन पुस्तकं घेण्यास ती विसरली नाही. व्हिकीला भेटताच प्रथमच तिला त्याच्या चेहऱ्यावर अस्फुट स्मित आढळलं. त्याचा चेहरा तिला शांत व समाधानी वाटला. त्यामागील गूढ उकलणं तिला कठीण झालं होतं. तिच्यासमोर तो खुर्चीवर स्थानापन्न झाल्यावर तिने त्याला प्रश्न विचारला :

‘‘तुझे वडील कोणता व्यवसाय करत असत ?’’

‘‘भारतातील पंजाब या राज्यातील एका खेड्यात शेती होती त्यांची.’’

‘‘त्यांच्यामागे शेती चालू ठेवण्याचा तू विचार केला नाहीस का ?’’

‘‘नाही. एकतर त्यात फारसा पैसा नव्हता आणि मला शेती करणं मुळीच पसंत नव्हतं. मला शिकायचं होतं. कॉलेजशिक्षण घेऊन शहरात स्थायिक व्हायचं होतं.’’

‘‘तुला एक छोटी बहीण असल्याचं कळलं मला. तिच्याबद्दल काही सांगू शकशील का ? तिच्याशी तुझे संबंध कसे होते ? काय करत होती ती ?’’

कॅरॉलच्या तोंडून बहिणीच्या नावाचा उल्लेख ऐकताच व्हिकीच्या चेहऱ्यावरील भाव हळूहळू बदलू लागले व तो थरथरू लागला. हाताच्या मुठी आवळत तो उभा राहून जोरात ओरडू लागला,

"तिला नका मारू. का मारता तिला ? ती नाही जेवू शकत स्वतःच्या हातांनी. मी भरवतो तिला. ती अपंग आहे. अंकल राज घोड्यावरून पडून मेला. लोक म्हणतात, अपघात झाला. माझ्या बहिणीला पछाडलेल्या भुताला गाडून टाकण्यासाठी तो तिला साधूकडे घेऊन गेला होता. लोखंडाच्या सळीने भाजलं त्या साधूने तिला आणि त्यातच मेली बिचारी. त्या साधूला त्याच्या कर्माची शिक्षा दिली देवाने. गाडीखाली येऊन मेला तोही. हा... हा... हा..." व्हिकी मोठमोठ्याने हसू लागला. त्याचा चेहरा पिळवटून निघाला होता. त्याला गार्डच्या स्वाधीन करून कॅरॉलने तिथून काढता पाय घेतला. ती आतून बरीच हादरली होती व्हिकीचा तो अवतार पाहून.

* * *

दोन-तीन दिवसांनंतरची गोष्ट. व्हिकी आज शांत वाटत होता. दोन दिवसांपूर्वीच आपल्या वकिलाच्या पुढ्यात आपण रौद्र रूप धारण केलं होतं हे त्याच्या खिजगणतीतही नव्हतं. तो आपल्या सेलमेटशी गप्पा मारत होता. थंड माथ्याने व्हिकी त्याला अपील करण्याचा सल्ला पुन्हा पुन्हा देत होता. न्याय मागून मिळत नाही तर त्यासाठी झगडावं लागतं हे तो सेलमेटला पटवण्याचा प्रयत्न करत होता. "तुझ्या मुलींसाठी तरी अपील करणं जरुरीचं आहे तुला. पण तू नको करू काळजी. तुझं काहीही झालं तरी मी घेईन तुझ्या मुलींची काळजी."

"तू कशी घेशील त्यांची काळजी ? तुझ्यावर खुनाचा गुन्हा शाबीत झाला तर तुलाही ते मृत्युदंड देतील बहुधा."

"मला काहीही होणार नाही. मी कुणाचाही खून केलेला नाही."

* * *

डि. ब्राउनच्या ऑफिसमध्ये बसून कॅरॉल जॉन्सन त्यांना आधल्याच दिवशीच्या व्हिकीच्या आक्रमक वागणुकीची, त्याने धारण केलेल्या रौद्र स्वरूपाची व त्याच्या मोठ्याने विकट हसण्याची बातमी देत होती.

"हा गृहस्थ खरोखरच मानसिक रुग्ण आहे, रिचर्ड. काल घडलेल्या प्रसंगानंतर माझी खात्री पटली आहे त्याबद्दल."

"अव्वल दर्जाचे खुनी, अट्टल मुरलेले खुनी अनेक वेळा असंच मानसिक आजारापायी वेडेपणाचं किंवा बुद्धिभ्रष्टतेचं नाटक करतात सुटका करून घेण्यासाठी.

मला नुकत्याच मिळालेल्या नवीन माहितीवरून त्याने हा खून जाणूनबुजून केल्याबद्दल माझी खात्री पटली आहे,'' असं बोलून डि. ब्राउननी व्हिकीची फाईल कॅरॉलच्या हाती ठेवली. पुढील काही मिनिटं कॅरॉल नवीन माहिती वाचून नोट्स् लिहिण्यात दंग होऊन गेली. भारतातून आलेली माहिती अशी :

व्हिकीचे वडील मतिमंद होते. त्याचप्रमाणे त्याची धाकटी बहीण शीनाही. त्याचे वडील शीनाला या ना त्या कारणावरून सारखे मारत असत. त्याची बहीण चार वर्षांची व तो नऊ वर्षांचा असताना त्याची आई जळल्यामुळे मृत्यू पावली होती. त्याच्या बापानेच आईचा खून केला असावा अशी अफवा गावात पसरली होती. व्हिकीचं आपल्या बहिणीवर अतोनात प्रेम होतं व आईच्या पश्चात त्यानेच तिचा सांभाळ केला होता. लहानपणीही बाप तिला मारत असताना तो मध्ये पडून तिची सुटका करत असे. पुढे तो कॉलेजमध्ये गेल्यावर कॉलेज दुसऱ्या गावी असल्यामुळे त्याला नाइलाजास्तव शीनाला आपल्या वडिलांच्या हाती सोपवावं लागलं होतं. त्याच वेळी तिला पछाडलेल्या पिशाच्च्याचं उच्चाटन करण्यासाठी तिच्या काकांनी तिला गावातील एका साधूकडे नेलं. पिशाच्च्याने तिच्या शरीरातून निघून जावं म्हणून त्या साधूने तिला तापल्या सळीचे चटके दिले व त्यातच तिचा अंत झाला. त्या वेळी व्हिकी ऐंशी मैलांवर असलेल्या आपल्या कॉलेजच्या गावी होता. शीनाच्या मृत्यूनंतर आठवड्याभरातच त्याच्या काकांचा घोड्यावरून पडल्यामुळे अंत झाला व तो साधू ट्रेनखाली सापडून मरण पावला.

मध्येच डि. ब्राउनचा फोन खणखणल्यामुळे कॅरॉलची समाधी भंग पावली. डि. ब्राउननी फोन उचलून बोलण्यास सुरुवात केली. फोनवर संभाषण चालू असताना त्यांच्या चेहऱ्यावर वेगवेगळे भाव उमटत गेले व त्यांचा चेहरा हळूहळू बदलत गेला. फोन खाली ठेवताच ते एकदम तिडिकीने म्हणाले, ''अनिता ग्रोव्हर यांच्या मृत्यूपूर्वी संस्थेतील जो मुलगा ॲडॉप्शनसाठी दिला होता तो त्या घरातून पळून जाऊन हरवल्याची तक्रार माझ्याकडे आली होती. आज तो गावाच्या दुसऱ्या टोकाला फाटक्या कपड्यांमध्ये अगदी कळकटलेल्या स्थितीत एका रेस्टॉरंटमध्ये खाण्याच्या पदार्थांची चोरी करून खात असताना पकडला गेला. ज्या माणसांच्या हाती ही मुलं विश्वासाने आपली मान सोपवतात तेच लोक त्यांचा विश्वासघात करतात.''

डि. ब्राउन यांच्याशी आणखी थोडी बातचीत करून व व्हिकीला आपण इनसॅनिटी प्लीवर तो मनोरुग्ण असल्यामुळे नक्कीच सोडवू अशी खात्री बाळगून

कॅनॉल डि. ब्राउनसह व्हिकीची भेट घेण्यासाठी तुरुंगात पोहोचली. त्याच्याकडे नजर जाताच ब्राउननी त्याला प्रश्न केला, ‘‘कसा आहेस तू ?’’

‘‘हा प्रश्न कैद्याला नाही विचारण्यात येत. तुम्हांला तर माझा चेहराही पाहावासा वाटत नसेल.’’

‘‘अनिता ग्रोव्हर यांचा खून झाला तेव्हा आणखी कुणी होतं तिथे ?’’

‘‘हो. मला माहीत आहे तो कोण होता. मुलं ॲडॉप्शनसाठी कुठे नेली जात असत तेही मला माहीत आहे.’’

‘‘तुझ्या बहिणीला ज्या साधूने मारलं त्याला ट्रेनखाली कुणी ढकललं ?’’

हा प्रश्न कानांवर पडताच व्हिकीचा चेहरा लालेलाल झाला, डोळ्यांत रक्त उतरलं, त्याच्या हाताच्या मुठी आवळल्या गेल्या. भिंतीवर हात आपटून तो मोठ्याने ओरडू लागला.

‘‘मी नाही ढकललं कुणाला गाडीपुढे. मी दुसऱ्या गावी परीक्षा देत होतो, त्याला मृत्यू आला तेव्हा. मी खुनी मुळीच नाही, मी कुणाचाही खून केलेला नाही.’’

डि. ब्राउननी गार्डच्या मदतीने त्याला तिथून हलवून दुसऱ्या खोलीत नेले. तिथे थोडा वेळ तो निपचित पडून राहिला. काही वेळाने डोळे उघडून शांतपणे विचारू लागला,

‘‘मी इथे कसा आलो ? काय झालं आहे मला ?’’

‘‘तुला काहीच आठवत नाही ?’’

‘‘नाही. आपण अनिताबाईंविषयी बोलत असल्याचं आठवतं आहे मला.’’

बोलता बोलता व्हिकी पुन्हा थरथरू लागला, ‘‘मी कुणालाही मारलं नाही. मी निरपराध आहे.’’

* * *

व्हिकीबद्दल सर्व माहिती गोळा करून कॅरॉलने आपला डिफेन्स पुरा केला व त्या अनुरोधाने व्हिकी मनोरुग्ण असल्यामुळे त्याने केलेल्या कृत्याला तो जबाबदार ठरू शकत नाही व त्याची मानसोपचारतज्ज्ञांकडून त्यासाठी तपासणी करून घ्यावी अशी जज्जसाहेबांना विनंती केली. तिने दिलेल्या माहितीवरून जज्ज सिंगलटन यांनी तिची विनंती मान्य करून कोर्टातर्फे त्याची सायकिॲट्रिस्टकडून तपासणी व्हावी असा हुकूम दिला.

व्हिकीचा जेलमेट दुसऱ्या दिवशी डि. ब्राउनना भेटण्यासाठी त्यांच्या ऑफिसमध्ये आणला गेला. व्हिकीशी आजवर झालेलं आपलं संभाषण त्यांना ऐकवून व त्याच्या शांत स्वभावाची ग्वाही देऊन व्हिकीच्या हातून खून होणं कसं अशक्य आहे याबद्दल त्यांची खात्री पटवून देण्याचा त्याने आटोकाट प्रयत्न केला.

* * *

सरकारी मानसोपचारतज्ज्ञाकडून व्हिकीची तपासणी चालू असता कॅरॉल बरीच मोकळी होती. तिला थोडी विश्रांती मिळाल्यावर संधी साधून डि. ब्राउननी स्वत:बरोबर रेस्टोराँमध्ये जेवायला येण्याची तिला विनंती केली व तिनेही ती मान्य केली. त्यांच्या मनात काहीतरी खळबळ चालू असल्याची कॅरॉलला जाणीव झाली. ते काहीतरी विचारात गढल्याप्रमाणे वाटत होते. अर्थात त्यांच्या मनातील वादळ व्हिकीसंबंधी नसून खासगी स्वरूपाचं होतं. दुरावलेली मनं पुन्हा सांधण्याचा विचार करूनच त्यांनी आज तिच्याशी बोलण्याचं ठरवलं होतं.

''कॅरॉल, तू आपल्या निर्णयावर पुन्हा एकदा विचार करू शकशील का ? दुसरी कॅरॉल मला दुनियेत शोधून सापडणं कठीण आहे. तुझ्या कर्तबगारीविषयी मला मुळीच शंका नाही. फक्त तू क्रिमिनल लॉयर होऊ नयेस एवढंच माझं म्हणणं होतं तेही तुझ्या काळजीमुळे आणि तुझ्यावरील प्रेमामुळे.''

''मला कुणापासून धोका नाही आणि मी धोक्याला घाबरतही नाही, रिचर्ड.''

''तू नाही घाबरलीस तरी मी घाबरतो. हे गुन्हेगार फार खतरनाक असतात, धोकेबाज असतात. त्यांच्यावर विश्वास ठेवून चालत नाही. माझा कित्येक वर्षांचा अनुभव सांगतो मला.''

''व्हिकी गुन्हेगार नाही, मनोरुग्ण आहे. त्याला मेंटल हॉस्पिटलमध्ये ट्रीटमेंटची गरज आहे. मृत्युदंडाची नाही.''

''नाही कॅरॉल, तो पट्टीचा गुन्हेगार आहे. मनाचा आजार हे त्याने सर्व गुन्ह्यांतून सुटका करून घेण्यासाठी रचलेलं ढोंग आहे, नाटक आहे.''

''मुळीच नाही. या बाबतीत मी तुझ्याशी सहमत होऊ शकत नाही. आपल्या हातून काय घडलं आहे याचं त्याला लगेच विस्मरण होतं. आठवण होते ती अ‍ॅटॅक आल्यावर फ्लॅशबॅकमुळे. तो मनोरुग्ण आहे हे मी कोर्टात नक्कीच सिद्ध करून दाखवू शकेन.''

"ठीक आहे. आपण आपल्या मनांतून व्हिकीला बाजूला ठेवू थोडा वेळ. माझ्या प्रश्नाला काय उत्तर द्यायचं ठरवलं आहेस ?"

"त्याचं उत्तर ह्या केसमध्ये यशस्वी झाले तर आपोआपच मिळेल तुला."

"ठीक आहे. मी वाट पाहीन. आपण निघू या आता. परवा व्हिकीची insanity plea बद्दल कोर्टाची तारीख आहे. तुलाही थोडीफार तयारी करायची असेल."

* * *

व्हिकीच्या केसला बरीच प्रसिद्धी मिळाल्यामुळे त्याच्या insanity plea साठी दिलेल्या तारखेला जज्ज सिंगलटन यांचं कोर्ट खच्चून भरलं होतं. सरकारी सायकिॲट्रिस्ट साक्षीच्या खुर्चीत बसून प्रॉसिक्युटरच्या प्रश्नांना उत्तरं देत होते.

"व्हिकी हा पॅरनॉइड स्किझोफ्रेनियाचा बळी आहे. वेडाचा झटका येण्यासाठी त्याला कोणतंही क्षुल्लक कारण पुरेसं होतं. अशा तऱ्हेचा झटका आल्यावर आपण काय करतो ते त्याला समजत नाही आणि केल्यावर त्याची आठवणही राहात नाही."

व्हिकीच्या सायकिॲट्रिस्टनेही सरकारी सायकिॲट्रिस्टच्या म्हणण्याला दुजोरा दिला. दोघांची साक्ष पुरी झाल्यावर व्हिकीला साक्षीला बोलावण्यात आलं. कॅरॉल जॉन्सनने प्रॉसिक्युटरला व्हिकीची नाजूक मानसिक स्थिती विचारात घेऊन प्रश्न विचारण्याची कोर्टातर्फे विनंती केली.

"तू जिथे वाढलास त्या गावाचं नाव काय ?" प्रॉसिक्युटर.

"आझमगढ," व्हिकीने शांतपणे उत्तर दिलं.

"त्या गावात एक प्रसिद्ध साधू होते त्यांचं नाव काय ? आठवण आहे तुला ?"

"हो. त्यांचं नाव गुरुदेवसिंग होतं."

"गुरुदेवसिंग आज जिवंत आहेत ?"

"नाहीत."

"त्यांना कशाने मृत्यू आला ?"

"त्यांना कुणीतरी ट्रेनखाली ढकललं," व्हिकीच्या आवाजात कंप होता.

"कुणी ढकललं ?"

‘‘ते मला ठाऊक नाही. माझ्या कॉलेजच्या परीक्षा चालू असल्यामुळे मी त्या वेळी दुसऱ्या गावी होतो.’’

‘‘तुझं कॉलेजचं गाव आझमगढपासून किती दूर आहे ? तिथून आझमगढला यायला किती वेळ लागतो ?’’

‘‘गाव ऐंशी मैल दूर आहे आणि अडीच तास लागतात आझमगढला पोहोचायला,’’ व्हिकीचा थंडपणा पाहून सर्वजण आश्चर्यचकित झाले.

‘‘गुरुदेवसिंगचा खून झाला त्या दिवशी तुझी परीक्षा नव्हती, हे खरं आहे ना ?’’

‘‘हो.’’

‘‘राजासिंग कोण होते ?’’

‘‘माझे काका.’’

‘‘ते जिवंत आहेत ?’’

‘‘नाहीत.’’

‘‘ते कशाने मरण पावले ?’’

‘‘घोड्यावरून पडल्यामुळे त्यांना मृत्यू आला.’’

‘‘काका गुरुवारी रात्री घोड्यावरून पडून मेले हे खरं आहे ना ?’’

‘‘हो.’’

‘‘शुक्रवारी तुझी परीक्षा नव्हती ?’’

‘‘हो.’’

‘‘आपली बहीण शीना हिच्या बाबतीत तुला ठाऊक असलेली माहिती सांग.’’

हा प्रश्न विचारताच कॅरॉल जॉन्सन हरकत घेण्यासाठी व्हिकीच्या पिंजऱ्याजवळ आली. तिच्या मते बहिणीच्या आठवणीने त्याला वेडाचा झटका येण्याची शक्यता होती.

‘‘नाही. त्याला सर्व काही चांगलं कळतं, आठवतं. काका, साधू या दोघांचा खून करून त्याने स्किझोफ्रेनियाचं नाटक रचलं आहे ते पचवण्यासाठी. हा माणूस खुनी आहे, अट्टल खुनी आहे,’’ प्रॉसिक्युटर ठासून म्हणाले.

ह्या वेळेपर्यंत शांत राहून थंड डोक्याने उत्तर देणारा व्हिकी थरथरू लागला. त्याच्या डोळ्यांत रक्त दाटून आलं. मोठ्याने ओरडत त्याने साक्षीदाराच्या बॉक्सजवळ उभ्या असलेल्या कॅरॉलचा गळा पकडला. गार्डनी तिची त्याच्या हातांतून सुटका केली.

व्हिकी मनोरुग्ण असून त्याच्या हातून घडलेल्या गुन्ह्याला तो जबाबदार नाही, असा निर्णय देऊन जज्जनी त्याला सायकिॲट्रिस्टची ट्रीटमेंट मिळेल अशा तुरुंगात पाठवण्याचा हुकूम दिला.

व्हिकीला तिथून नेण्यापूर्वी धावत येऊन सॅलीने त्याच्या गळ्याला मिठी मारून रडण्यास सुरुवात केली. तो बरा होऊन त्याची सुटका होईपर्यंत त्याची वाट पाहण्याचं आश्वासनही त्याला दिलं.

कॅरॉलच्या खुर्चीजवळ जाऊन डि. ब्राउननी तिचं अभिनंदन केलं व आपल्या प्रश्नाचं उत्तर मिळाल्याचं सांगून त्यांनी तिला विचारलं, ''तू मुद्दाम त्याच्या बॉक्सजवळ गेलीस ना ?''

''हो. त्याने माझ्यावर हल्ला केल्यामुळे तो वेडा असल्याचा कोर्टाला पुरावा मिळाला.''

ती दोघं बोलत उभी असताना जाता जाता व्हिकी त्यांच्या टेबलापाशी थांबला व फक्त कॅरॉलला ऐकू जाईल अशा आवाजात तिला म्हणाला,

''वकीलसाहेबा, फार उपकार आहेत तुमचे माझ्यावर. मी आपला शतशः आभारी आहे. माझ्या काकाने बहिणीला साधूकडे नेलं. त्या साधूने मारलं तिला. त्या दोघांनाही त्याबद्दल शिक्षा होणं जरुरीचं होतं. त्याचप्रमाणे अनिता ग्रोव्हरलाही छळ होईल अशा ठिकाणी मुलांना पाठवल्याबद्दल, ॲडॉप्शनला दिल्याबद्दल. बाय द वे, फार जोरात नाही ना दाबला गेला तुमचा गळा ? शक्यतो हलके दाबण्याचा मी प्रयत्न केला. माझे प्राण वाचवणाऱ्यांचे प्राण मी घेऊच शकत नाही.''

◈◈◈◈

# नातीगोती

एकेक करत तिघंही त्या दिवशी आले. त्यांपैकी पहिले पाहुणे सर्वजण झोपेच्या अधीन असताना भल्या पहाटे भाड्याच्या गाडीतून आले. पाहुणे येणार हे मुलांना ठाऊक होतं. पण नेमके केव्हा येणार हे कुणालाच माहीत नव्हतं. ते इतक्या लवकर पहाटेच येतील याची मात्र त्यांना कल्पना नव्हती. नील जागाच होता. गाडीचा आवाज ऐकताच तो खिडकीच्या रोखाने धावला. लगेच परत बिछान्याजवळ येऊन त्याने आपल्या बहिणीला जागं करण्याचा प्रयत्न केला.

"लीना, लीना, ते आले आहेत. ऊठ लवकर ...."

"उं... मला हलवू नको रे. झोपू दे ना."

"लवकर खिडकीजवळ ये." नील पुन्हा खिडकीपाशी धावला.

"पटकन ये, बघ तरी."

ह्या वेळेपर्यंत मोठीने छोटीला उठवलं होतं. त्या दोघी मिळून खिडकीपाशी आल्या. ते लोक नुकतेच आले होते व त्यांनी आपली गाडी पार्क केली होती. दोन व्यक्ती गाडीतून हळूहळू उतरत होत्या.

"मी जाऊन स्मिटी आंटीला सांगते"असं म्हणत धाकटी ज्यो दाराकडे धावली. (स्मिटी आंटी हा स्मिता आंटीचा मुलांनी केलेला अपभ्रंश.)

ज्यो खोलीबाहेर गेली असताना नील खिडकीत उभं राहून दरवाज्याजवळ येणाऱ्या पाहुण्यांकडे रोखून पाहू लागला. ती दोघंही – एक स्त्री व एक पुरुष – थकल्यासारखी वाटत होती. रात्रीची फ्लाइट असल्यामुळे असेल कदाचित. ते दोघं मुलांच्या आईचे सख्खे नातेवाईक होते. परंतु यापूर्वी त्यांना कधी पाहिल्याचं नीलला आठवेना.

नील तिथेच खिडकीशी उभं राहून पाहुण्यांकडे पाहत राहिला. त्यांनी बेल वाजवताच स्मिटी आंटीने त्यांना आत घेतल्याचं त्याने पाहिलं. आपल्या पोटात गलबलून आल्याचं त्याला जाणवलं. त्याचे डोळे अचानक जळजळू लागले व त्यांतून त्याच्या गालांवर हळूहळू आसू पाझरू लागले. तो ओठ गच्च आवळून तोंडातून आवाज बाहेर न पडण्याची दक्षता घेऊ लागला.

गेले दोन-तीन आठवडे नील आपल्या भावनांशी झगडत होता. थोड्याफार प्रमाणात त्याने आपल्या भावनांवर विजयही मिळवला होता. पहिल्या काही दिवसांच्या त्याच्या प्रतिक्रियेमुळे असेल कदाचित. पण त्या दिवशी त्याने आपल्या भावना आवरण्याचा यत्किंचितही प्रयत्न केला नव्हता. स्मिटी आंटीच्या मांडीत तोंड लपवून त्याने आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली होती.

''आता आमचं काय होणार?'' त्याने आंटीला विचारलं होतं.

''ईश्वर जाणे बेटा,'' आंटीच्या तोंडून एवढं एकच वाक्य बाहेर पडलं होतं. हात व डोळे वर करून ती म्हणाली होती, ''तोच सर्व देतो आणि तोच सर्व नेतोही''. एवढं बोलून डोळे पुसत ती गप्प बसली होती.

नीलच्या प्रश्नाला आंटीने दिलेलं उत्तर त्याला समजलंच नाही. या सर्वांचा देवाशी काय संबंध आहे हे त्याच्या ध्यानी येईना. त्याला तिच्याकडून एवढंच समजलं होतं की त्याचे मॉम व डॅड दोघंही ॲक्सिडंटमध्ये मरण पावले होते व पुन्हा कधीच परत येणार नव्हते. आपलं व आपल्या भावंडांचं आता काय होणार हा एकच प्रश्न त्याला सतत भेडसावत होता.

''मला मॉम आणि डॅडकडे जायचंय,'' नील ओरडतच दाराच्या दिशेने धावला. स्मिटी आंटीने त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला, पण ती काही बोलण्यापूर्वीच तो बागेत जिथे त्याच्या बहिणी खेळत होत्या तिथपर्यंत पोहोचला. न थांबता तो पायांचा व शरीराचा विसर पडेपर्यंत पळतच राहिला. परत फिरून तो आपल्या घराच्या पायऱ्यांपर्यंत पोहोचला व धडाधड दरवाज्यावर लाथा झाडत दरवाज्याची मूठ पिळत राहिला.

''मॉम, डॅड, मॉम, डॅड,'' जेवढ्या जोरात तो दाराला धडक देत होता, तेवढ्याच जोरात तो आता ओरडू लागला. मागच्या बाजूला जाऊन तिथल्या दरवाज्यावरही त्याने धडका दिल्या. परंतु त्याच्या मॉम व डॅडनी काहीही उत्तर दिलं नाही किंवा ते आलेही नाहीत.

ते कधीच परत येणार नव्हते.

नीलला ते अचानक उमजलं. ते आता येऊ शकणार नव्हते.

नील भानावर आला तेव्हा त्याच्या बहिणी त्याच्याशेजारी गुपचूप उभ्या असल्याचं त्याला आढळून आलं. स्मिटी आंटी सर्वांना हाका मारत होती. ''आता आपण काय करायचं, नील?'' धाकट्या ज्योने प्रश्न विचारला.

नीलने काहीच उत्तर दिलं नाही.

आलेल्या पाहुण्यांसोबत बसून तिघेही डायनिंग टेबलवर चूपचापपणे नाश्ता खात होते. आलेली पाहुणी आशा त्यांच्या आईची सख्खी बहीण होती. तिच्याबरोबर आलेला मिशीवाला गृहस्थ तिचा नवरा असावा असा मुलांनी तर्क केला. तिघंही तिच्याकडे चोरून पाहू लागली. ''इतके दिवस कुठे लपली होती ही मावशी? आजच का उगवली?'' मुलं मनाशीच विचार करत होती. मावशी व तिचा नवरा यांची नजरही मुलांवर, जास्त करून मुलींवर खिळली होती.

मधली लीना साडेसहा वर्षांची तर धाकटी ज्यो नुकतीच पाच वर्षांची झाली होती. दोघीही दिसण्यात आईच्या वळणावर गेल्या होत्या. रंगाने दोघीही उजळ होत्याच, पण त्यांचे केसही सरळ, दाट, लांबसडक व रेशमासारखे मऊ होते. त्या थोड्याशा या आशामावशीसारख्याही दिसत होत्या.

बाहेरच्या दाराची घंटा वाजली तेव्हा स्मिटी आंटीने जाऊन दरवाजा उघडला. आणखी दोन जोडपी घरात शिरली. आत आल्यावर आंटीने त्यांची मुलांशी ओळख करून दिली. ते दोघेही पुरुष मुलांचे मामा होते व त्यांच्याबरोबर आलेल्या स्त्रिया त्यांच्या पत्न्या होत्या.

सर्वांचा ब्रेकफास्ट आटोपल्यावर आलेले पाहुणे बैठकीच्या खोलीत गेले. नील व मुली आंटीला मदत करण्याच्या निमित्ताने स्वैंपाकखोलीतच घुटमळले.

''आता काय होईल, आंटी?'' नीलने प्रश्न विचारला.

''तू आठ वर्षांचा म्हणजे सर्व भावंडांत मोठा आहेस नील. तुला धैर्य दाखवलं पाहिजे अशावेळी.''

मॉम व डॅडना ॲक्सिडंट झाल्यानंतर एकटीच राहणारी स्मिटी आंटी त्यांच्या घरी राहण्यास आली होती. तिचे पती वारल्यापासून गेली दहा-बारा वर्षं ती जवळच्याच एका सबर्बमध्ये राहत होती. तिला मूलबाळ नव्हतं. मुलींना फक्त मॉम आणि डॅड फार दूर गेले आहेत एवढंच तिने सांगितलं होतं. मृत्यू म्हणजे काय ते समजण्याइतपत त्या मोठ्या नव्हत्या.

स्मिटी आंटी ही मुलांच्या आईची मावशी. अकरा वर्षांपूर्वी मुलांचे आईवडील या गावात राहायला आल्यामुळे तिला फार आनंद झाला होता. तिची ही एकच नातेवाईक तिच्या जवळपास राहत होती. तिचे इतर भाचे व भाची न्यू जर्सी, पेनसिल्व्हेनिया व कॅलिफोर्निया अशा ठिकाणी पांगली होती. मुलांच्या आईवडिलांच्या निधनानंतर मुलांची काळजी घेण्यासाठी ती त्यांच्या घरी येऊन राहिली होती. संधिवात व मधुमेह यांसारख्या आजारांपायी वयाच्या ७३ व्या वर्षी एवढ्या लहान मुलांना एकटीने सांभाळणं तिच्या आवाक्याबाहेर होतं. मुलांच्या भवितव्याबद्दल विचारविनिमय करण्यासाठी तिने फोन करून त्यांचे मामा व मावशीला बोलावून घेतलं होतं. कधीतरी पाठवलेल्या ग्रीटिंग कार्डव्यतिरिक्त मुलांची आपल्या नातेवाइकांशी फारशी ओळख नव्हती.

‘‘हे तुमचे नातेवाईक फार प्रेमळ आहेत. ते तुम्हांला काहीसुद्धा कमी पडू देणार नाहीत याबद्दल खात्री आहे माझी. तुम्ही कुणाबरोबर राहावं ते आपण आता ठरवू.’’

‘‘पण आम्हांला आमच्याच घरी राहायचं आहे,’’ नील म्हणाला.

‘‘ते आता कसं शक्य आहे बेटा? तुम्ही स्वतःची काळजी घेण्यासाठी अजून लहान आहात आणि मी तुमची देखभाल करण्यास निरुपयोगी आहे.’’

‘‘मी आठ वर्षांचा आणि सर्व भावंडांत मोठा आहे. मी तुम्हां सर्वांची काळजी घेईन. तू इथेच राहा.’’

यावर स्मिटी आंटी फक्त हसली. ‘‘माझी खात्री आहे तू सर्वांची काळजी घेशील याबद्दल. पण तुलासुद्धा मॉम आणि डॅडची गरज आहे. त्यासाठी तुम्हांला तुमच्या मामा आणि मावशीकडे जावं लागेल.’’

आंटीचं म्हणणं बरोबर असल्याचं नीलला पटू लागलं. मनातल्या मनात तो कुणाकडे राहावं ते ठरवू लागला. त्याला अचानक आपल्या ऑटो मेकॅनिक काकांची आठवण झाली. ते लुइझियानाला राहत होते. ते का आले नाहीत ते मात्र त्याला काही केल्या कळेना. कारण काका त्याचे व तो काकांचा फार लाडका होता. वर्षातून चार-पाच वेळा तरी त्यांची भेट होई. दर दोन-तीन आठवड्यांनी फोनवरही बातचीत होई.

‘‘हे पाहा, तुम्ही तिघं फार चांगली मुलं आहात. आपली चांगली वागणूक तुम्ही मामा आणि मावशीला दाखवा. ते तुम्हां तिघांनाही उद्याच आपल्या घरी नेतील.’’

‘‘मामांची आणि मावशीची नावं तरी काय आहेत आंटी?’’

"मिशीवाल्या छोट्या मामाचं नाव आहे सचिन आणि दुसऱ्याचं नाव आहे नितीन. ते दोघंही डॉक्टर आहेत. एक मुलांचे डॉक्टर तर दुसरे हाडांचे सर्जन आहेत. मावशीचं नाव आहे आशा" आंटीने खुलासा केला.

आंटीच्या मागून तिन्ही मुलं एकमेकांना बिलगून बैठकीच्या खोलीत शिरली. नीलला बहिणींच्या श्वासोच्छ्वासाचा आवाजही ऐकू येत होता एवढ्या त्या घाबरल्या होत्या.

"ही तुमची भाचेमंडळी," आंटीने पुन्हा ओळख करून दिली.

नील सर्वांत पुढे होता. लीना व ज्यो आंटीचा हात धरून मागे उभ्या होत्या. मुलं खोलीत शिरेपर्यंत बैठकीच्या खोलीतून संभाषणाचे आवाज मोठ्याने ऐकू येत होते. आता मात्र खोलीत एकदम शांतता पसरून सर्व डोळे मुलांवर रोखले गेले. सर्व पाहुणे सोफ्यावर आरामशीरपणे विखुरले होते. नीलने सर्व चेहरे निरखून पाहिले. आंटी व तो सोडून कुणाच्याही चेहऱ्यावर पुसटसुद्धा हास्य दिसत नव्हतं. त्याला एकाएकी भीती वाटू लागली. तिथून पळून जावंसं वाटू लागलं. जणू काही त्याने फार मोठा गुन्हा केला होता व ही जमलेली माणसं त्यासाठी त्याला शिक्षा करणार होती. तो आलटून पालटून एकेकाच्या चेहऱ्याकडे पाहू लागला तेव्हा त्याच्या ध्यानात आलं की या सर्व मंडळींचे, स्मिटी आंटी व आपल्या बहिणींचेही चेहरे, रूप व रंग आपल्या मॉमसारखे आहेत. ते मॉमचे नातेवाईक आहेत हे पटत होतं.

शांततेचा भंग करत स्मिटी आंटी नीलला म्हणाली, "नील, तू इथे येऊन तुझ्या बहिणींजवळ का नाही बसत?"

नील बहिणींच्या जवळ सरकला. जणू काही तिघंही लिलावासाठी ठेवलेले गुलाम होते.

"फार चांगली मुलं आहेत ही. मी त्यांना जन्मापासून पाहात आले आहे," स्मिटी आंटी म्हणाली.

मंडळी अजूनही गप्पच होती. आंटीने तिघांनाही आपापली नावं सांगण्याचा आदेश दिला व मुलांनी आज्ञाधारकपणे तो पाळला. पाहुण्यांनीही मुलांना आपली ओळख करून दिली. परंतु त्यांच्या चेहऱ्यावर मात्र हास्य काही उमटलं नाही.

"स्मितामावशी, तू या मुलांना बाहेर का पाठवत नाहीस? म्हणजे आपल्याला निवांतपणे आणि मोकळेपणे बोलता येईल."

‘‘बाळांनो, तुम्ही आतल्या खोलीत जाऊन खेळा; पण फार लांब जाऊ नका. म्हणजे पुन्हा बोलावू तेव्हा लगेच येता येईल.’’

मुलांनी लगेच आंटीच्या आज्ञेचं पालन केलं. आत जाऊन ज्यो जमिनीवर बसून खेळू लागली. लीना व नील चूपचापपणे दरवाज्यापाशी उभं राहून आतील संभाषण ऐकण्याचा प्रयत्न करू लागले.

‘‘मी व शीलाने आधीच विचार केलेला आहे,’’ मिशीवाला मामा बोलू लागला, ‘‘मुलींना नेण्यास आम्ही तयार आहोत.’’

‘‘सचिन, जरा थांब,’’ दुसरा मामा त्याला थोपवत म्हणाला,‘‘मला वाटतं दोघींपैकी एक आम्ही नेऊ शकू.’’

सर्व पाहुणे एकाच वेळी बोलू लागले. तसा सर्वांचा आवाज चढू लागला. आशामावशीसह सर्वांना फक्त मुलीच हव्या होत्या.

‘‘याचा अर्थ या भावंडांना विभागण्याचा तुमचा विचार आहे. ती तिघं एकत्र नाही राहू शकणार एकाजवळ?’’ स्मिटी आंटीने त्यांना थांबवत प्रश्न विचारला.

‘‘तीन मुलं? आम्हांला दोनसुद्धा जास्तच आहेत. पण आम्ही मुली न्यायला तयार आहोत,’’ सचिन म्हणाला. सर्वांनी पुन्हा एकाच वेळी बोलायला सुरुवात केली.

‘‘तुम्ही सर्वजण सुशिक्षित, सुसंस्कृत माणसांसारखं का वागत नाही?’’ आंटीने विचारलं. ‘‘त्यांना विभागलेलं मला मुळीच आवडणार नाही. हूं .... पण तुमच्यासारख्या डॉक्टर्सना तीन मुलं म्हणजे फार झाली, नाही का? कारण ती तुमची स्वतःची नाहीत म्हणून?’’

‘‘मग तुला समजतं तर! त्यांना विभागलंच पाहिजे आम्हांला. आधीच दोन मुलगे आहेत म्हणून आम्हांला मुलगीच हवी आहे,’’ सचिन.

‘‘तुम्हां सर्वांना मुलीच का हव्या आहेत? तुमच्यापैकी एकहीजण मुलगा न्यायला का तयार नाही?’’

खोलीत एकदम शांतता पसरली. सर्वजण एकमेकांच्या चेहऱ्याकडे पाहू लागले. दाराला कान लावून उभ्या असलेल्या नीलला एकाएकी भीती वाटू लागली.

‘‘तुम्हांला मुलगा का नको? कारण तर कळू द्या.’’

‘‘आम्हांला मुलगा आहे.’’

‘‘आम्हांलाही आहे.’’

"या आशाला तर फक्त मुलगीच आहे."

"मुली वाढवणं सोपं असतं. मुलं दांडगट असतात."

"आंटी, सर्व गोष्टी तुझ्या खरंच ध्यानात येत नाहीत की तू वेड घेऊन पेडगावला जात आहेस?" आशा.

"सरळ काय ते बोला."

"मुलगा, अं..... मुलगा हुबेहूब त्याच्या वडिलांसारखा दिसतो."

"काय?" आंटीचा आवाज उंचावला.

"तू ऐकलंस माझं बोलणं. तो काळ्या माणसांसारखा दिसतो म्हणून तो नको आहे आम्हांला कोणाला," नितीन.

"सत्य टाळण्यात मुळीच अर्थ नाही मावशी," सचिन.

"तुमच्या सख्ख्या बहिणीची मुलं आणि .....".

"तुला नाही समजणार मावशी," आशा.

"नाहीच समजणार आणि समजू नये अशीच इच्छा आहे माझी. इतक्या वर्षांनंतरही तुम्ही असं करू शकता यावर विश्वासच बसत नाही माझा. तुमच्याकडून ही अपेक्षा नव्हती केली मी. तुमच्या स्वतःच्या बहिणीचा मुलगा तुमच्यासाठी फार काळा आहे, हां."

नीलने खाली वाकून आपल्या हातांकडे पाहिलं, नंतर आपल्या बहिणींच्या हातांकडे व पुन्हा आपल्या हातांकडे.

"माझं स्वतःचं रक्त असं बोलू शकेल आणि ते ऐकायला मी जिवंत राहीन असं मला वाटलं नव्हतं. माझ्या स्वतःच्या बहिणीची मुलं."

"मावशी, तू एका गौरवर्णीय अमेरिकन माणसाशी लग्न केलंस. बरीच वर्षं या भागात आमच्या बहिणीच्या जवळ राहिलीस. तुला आपला समाज कसा आहे ते कसं समजणार?"

नीलने आपलं डोकं, चेहरा शर्टाच्या बाहीला पुसला व बाहीकडे पाहिलं.

"सविताने लग्न केलं तेव्हा आम्हां सर्वांना किती त्रास झाला ते तुला ठाऊकच आहे. शेवटी तीच दूरच्या राज्यात राहायला गेली तेव्हा आमची सुटका झाली. आमच्याकडे पाहा जरा. आम्ही किती उजळ आहोत. हा मुलगा आमच्या दिवंगत बहिणीचा मुलगा आहे हे आम्हांला सर्वांना सांगावं लागेल यापुढे. आपल्या

समाजातील लोक आम्हांला नाही नाही ती नावं ठेवतील, कुत्सित हसतील, बोलतील. कोणाकडे जाण्याची, पार्टीमध्ये कुणाला तोंड दाखवायची सोय असणार नाही. आमच्या राहणीचा काही दर्जा आहे. पण या मुलाला भाचा म्हणून घरात ठेवल्यावर तो राहणार नाही.''

''हे विचार माझ्या मनाला कधीच शिवले नाहीत.''

''आहे हे असं आहे मावशी. नीलला आमच्याबरोबर नेणं आम्हां सर्वांच्या दृष्टीने योग्य ठरणार नाही.''

''यासाठी तुम्ही तिचं हे लग्न होऊ देणार नव्हता. तिला भारतात पाठवून दुसऱ्या कुणाशीतरी लग्न उरकून टाकणार होता तिचं. परंतु तिने तुमचं न ऐकता डेव्हिडशी लग्न केलं. तेही घरातून पळून जाऊन. काय वाईट झालं तिचं त्यामुळे? सुखी होती पोर.''

नील खाली बसला व हळूहळू आपल्या बहिणींना स्पर्श करू लागला. त्याने त्याच्या हातांकडे व पुन्हा पुन्हा आपल्या हातांकडे पाहिलं. हळूहळू त्याचे डोळे चकाकू लागले. त्याचा चेहरा फुलू लागला. गाल फुगू लागले. त्याने ओठ गच्च आवळून धरले. थांबवण्याचा कितीही प्रयत्न केला तरी त्याला हुंदके आवरणं अशक्य झालं. लीना व ज्यो भेदरून आपल्या भावाकडे पाहू लागल्या. बऱ्याच संयमाने नीलने रडण्याचा आवेग आवरला.

बैठकीच्या खोलीतील आवाज पुन्हा उंचावले गेले. नील पटकन दरवाज्यापाशी गेला. आता मात्र त्याचा स्वतःवरील ताबा सुटला. दरवाजा धाडकन लोटून तो बैठकीच्या खोलीत शिरला. मिशीवाल्या मामाच्या मांडीवर बसून तो त्याच्या छातीवर बुक्के हाणू लागला. मामाने रागाच्या भरात जोर करून त्याला जमिनीवर ढकललं आणि तो आपली चुरगळलेली पँट व शर्ट नीट करण्याचा प्रयत्न करू लागला. जमिनीवरून उठून नीलने पुन्हा मामाला मारावयास सुरवात केली.

मामांपासून दूर करून आंटीने नीलला स्वतःजवळ बसवलं. सभा तिथेच संपुष्टात आली. त्यानंतर सबंध दिवस घरातील वातावरणात एक विचित्र शांतता व खिन्नता पसरली होती. पाहुणेमंडळी आपल्या खोल्यांमध्ये परतली. कुणीच कुणाशी बोलत नव्हतं. दुसऱ्या दिवशी सकाळी कुणालाही बरोबर न घेता सर्वांचा औपचारिकपणे निरोप घेऊन सर्व पाहुणे आपापल्या गावी परत गेले.

घर अगदी सुनं सुनं वाटत होतं. मुलंही भविष्याच्या अनिश्चिततेमुळे भीतीने गांगरून गेली होती. मुलांना समोरासमोर तोंड देण्याचं टाळत संध्याकाळी आंटी

आपल्या खोलीत बसून विचारांत गढून गेली होती. आता पुढे काय? सांपत्तिक स्थिती उत्तम असलेल्या आपल्या भाच्यांवर व भाचीवर आंटीचा सर्व भार होता. बहिणीच्या मृत्यूनंतर तरी तिची भावंडं सर्व विसरून मुलांना जवळ करतील अशी तिला आशा वाटत होती. परंतु गेल्या दहा वर्षांत त्यांच्या वागणुकीत व आचारविचारांत काहीही फरक पडल्याचं तिला आढळून आलं नाही.

मुलांच्या काकाचा विचार तिच्या मनात अनेक वेळा डोकावला होता. नाही असं नाही. परंतु छोटं गराज चालवणाऱ्या, फार न शिकलेल्या एका ऑटो मेकॅनिकचं उत्पन्न ते काय असणार? शिवाय स्वतःची दोन मुलं सांभाळून भावाच्या तीन मुलांचाही भार उचलणं सांपत्तिकदृष्ट्या त्याला शक्य होईल की नाही याबद्दल आंटीला शंका होती. या काकाचं भावाच्या मुलांवर फार प्रेम होतं. वर्षातून कमीतकमी दोनदा तरी तो त्यांना भेटत असे. एरव्ही महिन्याभरात अनेकदा फोनवर बातचीत होत असे. पुढील विचारविनिमयासाठी सविताच्या भावंडांना बोलावल्याचं आंटीने त्याला कळवलं होतंच. त्यानेही तिच्या इच्छेला मान देऊन तिला दुजोरा दिला होता, पण आता काय? पाच मुलांचा सांभाळ करून त्यांना योग्य ते शिक्षण देणं काकाला झेपेल का? परवडेल का? तो मान्य करेल का? एवढी मोठी जबाबदारी पेलण्यास मुलांचा काका राजी होईल का? विचार करकरून आंटीला थकवा आला.

बहिणींसमवेत टेलिव्हिजन पाहत बसला असताना कसल्यातरी आठवणीने तिथून उठून नील आंटीच्या खोलीपाशी आला व दरवाजा वाजवून आत शिरला. आंटीला रॉकिंग चेअरवर बसलेलं पाहून तिच्या मांडीवर मुक्काम ठोकत त्याने तिच्या गळ्याला मिठी मारली. तिच्या गालावरील आसू आपल्या शर्टाने पुसत त्याने तिचा चेहरा स्वतःकडे वळवला व म्हणाला, "आंटी, तूच धीर सोडलास तर आम्ही काय करावं गं? तू नेहमी म्हणतेस ना की सर्वांना जरी आपण नकोसे झालो तर देव आपल्याला कधी दूर लोटत नाही. तू मुळीच काळजी करू नकोस. देव आपली सर्वांची काळजी घेईल. शिवाय मी आहे ना? मी आता मोठा झालो आहे."

त्याच्या इवल्याशा तोंडातून बाहेर पडलेले ते वक्तव्य ऐकून तो आपल्या शिकल्यासवरलेल्या भाच्यांपेक्षाही किती समजंस आहे हे आंटीला जाणवलं. त्याचा आत्मविश्वास पाहून तिला कळवळून आलं व नकळत तिच्या तोंडून हुंदका बाहेर पडला. तिला त्याचा फार अभिमान वाटला व तेवढीच आपल्या भाच्यांची, त्यांच्या खोट्या मोठेपणाची, दांभिकतेची व मनाच्या कोतेपणाची चीड आली. आंटीच्या

गळ्याभोवतीची मिठी घट्ट करत नील पुढे म्हणाला, ''मी आताच अंकल जॉनना फोन करतो बघ. त्यांचा रंगसुद्धा माझ्यासारखाच काळा आहे. ते मला नक्कीच नाकारणार नाहीत. पण लीना आणि ज्योचं काय? त्या आमच्यासारख्या काळ्या नाहीत म्हणून अंकलना त्यांची लाज वाटणार नाही ना?''

आंटीने नकारार्थी मान डोलवली.

आंटीच्या साहाय्याने नीलने लुइझियानाच्या अंकल जॉनचा फोन नंबर फिरवला. काकांशी फोनवर बोलताना त्याच्या चेहऱ्यावरील खिन्नता कुठल्याकुठे पळाली. त्याचा चेहरा उत्साहाने फुलून आनंदाने ओसंडत होता काकांच्या भेटीबद्दल बेत करताना.

तिसऱ्याच दिवशी दुपारी मुलांचे अंकल जॉन, आँट डोरोथी आपल्या दोन मुलांसह व्हॅनमधून त्यांच्या दाराशी हजर झाली. त्यांना पाहताच तिन्ही मुलं खूश झाली. वातावरणातील निराशा, खिन्नता केव्हाच नाहीशी झाली. काकांनी येताना आपल्यासोबत सूर्यप्रकाश आणला होता व मुलं त्यात न्हाऊन निघाली होती.

सकाळी नाश्ता करता करता काकांनी मुद्द्याला हात घातला. त्यांचा हसतमुख, विनोदी चेहरा थोडासा गंभीर झालेला पाहून ते आल्यापासून सारखी चिवचिव करणारी मुलं गांगरून एकदम गप्प झाली. हातातील पेपर नॅपकिनला तोंड पुसत अंकल जॉन घसा खाकरत आंटीला म्हणाले, ''आम्ही जिवंत असताना माझ्या भावाची मुलं सोशल वेल्फेअरने आपल्या ताब्यात घेऊन फॉस्टर होम्समध्ये ठेवलेली मला मुळीच सहन होणार नाही. तुझी हरकत नसेल तर ही तिन्ही मुलं आमच्याकडेच राहून आमच्या मुलांबरोबर वाढतील. डोरोथीची व आमच्या दोन्ही मुलांचीही हीच इच्छा आहे. तिघंही कॉलेजशिक्षण पुरं करून आपल्या आईवडिलांप्रमाणे पुढे येतील यासाठी मी जरूर तेवढे कष्ट घेईन. मी त्यांच्या शिक्षणाची हमी घेतो. त्यांच्याबरोबरच आमचीही मुलं शिकतील.'' मुलांचे चेहरे आनंदाने उजळले. त्यांनी उत्सुकतेने स्मिटी आंटीच्या चेहऱ्यावर नजर स्थिरावली. परंतु आंटी काही उत्तर देण्यापूर्वी अंकल जॉननीच पुढे बोलण्यास सुरुवात केली,

''तू सुद्धा आमच्या जवळपास राहायला यावंस अशी आमची सर्वांची फार इच्छा आहे. तुझंही आता वय झालं आहे आणि तू या गावात एकटीच राहतेस. अडीअडचणीला जवळपासही कुणी नाही. या वयात तुला मदतीची गरज असल्यामुळे तू एकटं राहू नयेस असं आम्हां सर्वांना मनापासून वाटतं. तू आम्हांला तुझ्या भाचीच्या जागी मान. मुलांनाही त्यांच्या आईची नातेवाईक जवळ

असल्यामुळे खूप आनंद होईल. नाही म्हणू नकोस. या बाबतीत तडकाफडकी निर्णय घेणं कठीण आहे हे मी मान्य करतो. पण तू जरूर विचार कर आणि आम्हांला कळव. आमच्या घराचे दरवाजे तुझ्यासाठी नेहमी उघडे राहतील.''

मुलांचा आनंद त्या छोट्या घरात मावेना. ती परवानगी घेऊन बाहेर खेळायला पळाली. या कमी शिकलेल्या ऑटो मेकॅनिकचे ते भाष्य ऐकून आंटी भारावून गेली व तिच्या मनात मावेनासा झालेला आनंद तिच्या डोळ्यांवाटे गालांवर पाझरू लागला.

परत येऊन आपल्या भावाच्या घराची, वस्तूंची, इन्शुरन्सची, पैशांची व्यवस्था लावण्याचं आश्वासन देऊन आपल्या गावी आंटीने जरूर राहावयास यावं अशी तिला कळकळीची विनंती करून अंकल जॉननी परतीच्या प्रवासाची तयारी केली. आपल्या बॅगांसह गाडीकडे जात असताना मुलांची पावलं जड झाली व आईवडिलांच्या आठवणीने त्यांचे डोळे पुन्हा पुन्हा भरून येऊ लागले. त्यांच्या चेहऱ्यावर उत्साह, आनंद व विरह यांचं मिश्रण होतं. त्यांच्या मिठीतून सुटका करून घेणं आंटीलाही फार कठीण जात होतं.

पाचही मुलांसह अंकल जॉनच्या व्हॅनने लुइझियानाकडे प्रयाण केलं. धुळीचे कण डोळ्यांत शिरल्यामुळे आंटीने डोळ्यांना रुमाल लावला. तिच्या मनात प्रश्न उभा राहिला, ''खरंच, रक्ताचा रंग कोणता बरं असावा?''

◈◈◈◈

# मिस्टर डिसूझा

एका मोठ्या खोलीतील टेबलावर त्यांच्या नावाची पाटी झळकत होती. "Dr. Manuel Q. DeSouza." महॉगनी लाकडावर ठळक अक्षरांत नक्षीकामासह त्यांचं नाव कोरलं होतं.

ही त्यांना दिलेली भेट डॉ. डिसूझांनी कौतुकाने अगदी काळजीपूर्वक जपून ठेवली होती. सरकारी नोकरीत सरकारची पंचवीस वर्षं सेवा केल्यावर बऱ्याच लांबलचक भाषणानंतर त्यांना ही भेट देण्यात आली होती. या गोष्टीला आता जवळजवळ पाच वर्षं उलटून गेली होती. त्यांच्या सेवानिवृत्तीच्या वर्षापर्यंत – जानेवारीच्या एकविसाव्या दिवसापर्यंत – त्यांनी आपला विक्रम मोडला नव्हता. एकही दिवस रजा घेतली नाही की कामावर येण्यास उशीर केला नाही. त्यांना 'डॉक्टर' का म्हटलं जातं याची फार लोकांना कल्पना नव्हती. ते वैद्यकीय डॉक्टर नाहीत ही गोष्ट मात्र सर्वांना ठाऊक होती. त्याचप्रमाणे त्यांच्या नावातील Q हे आद्याक्षर कोणत्या नांवासाठी आहे ही बाब कुणालाही ठाऊक नव्हती, की कुणी जाणून घ्यायचा प्रयत्नही केला नव्हता.

डॉ. डिसूझा, सर, मॉर्निंग, मॅनी या सर्व नावांना ते साद देत असत. डॉ. डिसूझा ऑफिसमध्ये दुसऱ्या नंबरच्या हुद्द्यावर होते. सर्वांत वरच्या हुद्द्यावर ऑस्टिन गोल्डस्मिथ होते. त्यांची नेमणूक राजकीय पातळीवरून करण्यात आली होती. गोल्डस्मिथ ही एक वल्ली होती. लठ्ठपणात गणना व्हावी इतके अंगाने भरलेले, हजरजबाबी, विनोदबुद्धी असलेले ते एक अधिकारी होते. इतर अनेक कामांबरोबर ऑफिसचं मुख्य काम शेतकऱ्यांना आर्थिक साहाय्य करणं हे होतं.

ॲग्रीकल्चर कॉलेजमध्ये असताना आपण डेप्युटी ॲडमिनिस्ट्रेटरच्या हुद्द्यावरून सेवानिवृत्त होऊ हे डॉ. डिसूझांना स्वप्नातसुद्धा खरं वाटलं नसतं. परंतु थोडा ॲक्सेंट असलेला, छोट्या बांध्याचा हा सावळा गृहस्थ काहीही प्रश्न उभे न करता पुढ्यात आलेलं प्रत्येक काम यशस्वीपणे पुरं करत असे. त्यामुळे ते कुणाच्या हेवादाव्याचं किंवा मत्सराचं स्थान होऊ शकले नाहीत. ब्युरोक्रॅटिक सरकारी गोंधळात ते सहजपणे दर पाच-सहा वर्षांनंतर वरच्या ग्रेडवर पोहोचत होते.

काही वर्षांनंतर डॉ. डिसूझांनी फावल्या वेळात युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्नियात क्लासेसना हजर राहून ॲग्रीकल्चर इंजिनिअरिंगमध्ये डॉक्टरेट मिळवली असल्याचं सर्वांना समजलं. ज्या स्त्रीकडे आपल्या विद्यार्थिदशेत ते पेइंग गेस्ट म्हणून राहत असत, त्याच स्त्रीशी त्यांनी नंतर लग्न केलं. मूलबाळ नसलेली ती एक विधवा स्त्री होती. मार्था – त्यांची पत्नी – सुगरण, कोणत्याही विनोदावर मनमोकळं हसणारी, अघळपघळ बोलणारी एक ठेंगणीठुसकी स्त्री होती.

डॉ. डिसूझांची डॉक्टरेट पुरी होण्याआधीच मार्थाला दिवस गेले होते. लागोपाठ चार मुलं झाल्यावर कुटुंबनियोजन करण्यात ते यशस्वी झाले. डॉ. व सौ. डिसूझा नियमितपणे चर्चला जाणारं दांपत्य होतं.

ॲडमिनिस्ट्रेटरचे असिस्टंट म्हणून त्यांची जेव्हा नेमणूक झाली तेव्हा कुणालाही फारसं आश्चर्य वाटलं नाही. ते मेहनती होते. त्यांनी घेतलेले निर्णय जरी फारसे धाडसी नव्हते, तरी ते विचारपूर्वक घेतलेले असत. सर्वांना आश्चर्याचा धक्का देणारी एकच गोष्ट डॉ. डिसूझांच्या सरकारी आयुष्यात घडली. ती म्हणजे त्यांची डेप्युटी ॲडमिनिस्ट्रेटरच्या हुद्द्यासाठी निवड खुद्द ॲडमिनिस्ट्रेटर श्री. गोल्डस्मिथ यांनी स्वतः केली. अर्थात लवकरच सर्वांना या अचानक केलेल्या नेमणुकीचा उलगडा झाला. ॲग्रीकल्चर ब्रँचचे विज्ञानविषयक ज्ञान आणि सर्वसाधारण कारभाराची अचूक व बारीकसारीक माहिती यामुळे डॉ. डिसूझा ऑफिसची सर्व जबाबदारी सांभाळत असताना श्री. गोल्डस्मिथ इतर ठिकाणी पैसे कमावण्यास कामांतून मोकळे झाले.

डॉ. डिसूझा यांना दोन मुलगे व दोन मुली होत्या. संसाराला थोडाफार हातभार लावावा या दृष्टीने त्यांची पत्नी, मार्था, एका ग्रोसरी स्टोअरमध्ये नोकरी करत होती. त्यामुळे तिला ग्रोसरीही स्वस्तात मिळत असे. तसा दोघांनी मिळून बराच पैसा जमा केला होता. त्यामुळे म्हातारपणाची चिंता नव्हती. डिसूझांचे सेवानिवृत्तीचे दिवस आता फार दूर नव्हते.

ऑफिसची वेळ संपल्यानंतरही ऑफिसमध्ये उशिरापर्यंत राहून काम करणं हा डिसूझांचा नित्यनेम होता. ते आपलं दुपारचं जेवण बरोबर आणत असत व जेवता जेवता काम चालू ठेवत असत. त्यामुळे ऑफिसच्या स्टाफबरोबर छोट्या गप्पा मारणं त्यांना सहज टाळता येत असे. हाताखालील स्टाफशी सतत संभाषण करून त्यांच्याशी संवाद साधल्यामुळे रिलेशनशिप चांगली होते व त्याचा कामांत फायदा होतो हे त्यांनी अनेक सेमिनार्समध्ये ऐकलं होतं. परंतु ते फार भिडस्त, लाजाळू स्वभावाचे असल्यामुळे त्यांना सहजपणे कुणाशी असं संभाषण करणं जमत नसे. अगदी साधी बातचीतसुद्धा कुणाशी करणं त्यांच्या आवाक्याबाहेर होतं.

"हाय, मिसेस डिसूझा कशा आहेत?"

"ती ठीक आहे. थँक यू."

"आणि मुलं?"

"देवाच्या दयेने तीही मजेत आहेत."

"तुमचा सर्वांत मोठा मुलगा किती वर्षांचा झाला आता?"

"अठ्ठावीस."

"लग्न झालं त्याचं?"

"हो. हल्लीच झालं."

त्यानंतर संभाषण इथेच थांबत असे, तेसुद्धा प्रश्न विचारणारा कंटाळल्यामुळे.

त्यांच्याच शाखेतील स्टॅन त्यांना अधूनमधून हट्टाने आपल्या घरी घेऊन जात असे. स्टॅनचा अनौपचारिकपणा डिसूझांना मनापासून आवडत असे. त्याने जगभर केलेल्या प्रवासाची वर्णनं ऐकण्यात ते नकळत रंगून जात असत. वर्षा-दीड वर्षापूर्वी त्यांच्या हाताखाली लागलेल्या रस्टीने घराचं एक्स्टेंशन गेल्या वर्षीच करून घेतलं होतं. पण तो लवकरच एका महागड्या वस्तीत घर घेणार होता. डिसूझांना त्याचं रहस्य जाणून घ्यायची फार इच्छा होती. परंतु त्याला काही विचारण्याचा धीर त्यांना झाला नाही.

गोल्डस्मिथ नेहमी देशाबाहेर दौऱ्यावर असत. जाण्यापूर्वी डिसूझांवर साऱ्या ऑफिसचा कारभार सोपवून ते जात असत.

एके दिवशी संध्याकाळी सहाच्या सुमारास गोल्डस्मिथ डिसूझांच्या केबिनमध्ये शिरले.

"मॅनी, तुला प्रायव्हेट सेक्रेटरी हवी आहे का? फक्त तुझ्यासाठी? एक फार चांगली उमेदवार आहे. मला जर सेक्रेटरी नसती तर मी माझ्यासाठीच घेतली असती."

मॅनीने, डॉ. डिसूझांनी मान वर करून गोल्डस्मिथकडे आश्चर्याने पाहिलं. तशी त्यांना सेक्रेटरीची गरज होतीच.

"तुम्ही म्हणाल तसं. माझी मुळीच हरकत नाही."

"ठीक आहे. उद्या पर्सनेल डिपार्टमेंटच्या मॅक्सला फोन कर. ती मुलगी सर्व परीक्षा चांगल्या तऱ्हेने पास झाली आहे. दिसायलाही सुरेख आहे," असं म्हणत गोल्डस्मिथनी मॅनीकडे पाहून डोळे मिचकावले.

सकाळी डॉ. डिसूझा हे सर्व संभाषण विसरले. साधारण दहाच्या सुमारास त्यांच्या ऑफिसच्या दारावर थाप वाजली.

"कोण आहे?" डिसूझांनी चष्म्याच्या बायफोकल भिंगातून मान वर करून विचारलं.

"मला पर्सनेल खात्याने पाठवलं आहे," एक तिशीच्या वयाची स्मार्ट स्त्री आत प्रवेश करत उद्गारली.

"का?"

"तुमची सेक्रेटरी म्हणून माझी नेमणूक झाली आहे."

"हां, हां. तुम्ही अपॉइंटमेंट पेपर्स बरोबर आणले आहेत का?"

"मि. गोल्डस्मिथची सही झाल्यावर पाठवू असं त्यांनी सांगितलं आहे. मि. गोल्डस्मिथ अद्याप आलेले नाहीत."

"तुम्ही कुठे बसाल?

"दाराबाहेर एक छोटं टेबल मोकळं ठेवण्यात आलं आहे माझ्यासाठी. तिथं बसेन."

"अंहं, ते टेबल मेरीचं आहे. ती इथली क्लार्क आहे आणि सध्या रजेवर आहे ती. तात्पुरतं तुम्ही तिथे बसा. मी प्रॉपर्टी खात्याला फोन करतो आणि दुसरं टेबल मागवतो तुमच्यासाठी."

गोल्डस्मिथनी म्हटल्याप्रमाणे ही लिझ तितकीशी सुंदर नव्हती असं त्यांना वाटलं. ती ३२ वर्षांची, सर्वसाधारण मुलींच्या मानाने थोडी उंच होती.

लिझ त्या ऑफिसमध्ये लगेच रुळली. प्रथम प्रथम आपल्याआधी कामावर येणाऱ्या बॉसला पाहून ती ओशाळत असे. नंतर तिनेही आठच्या जरा आधी येण्याचा सराव केला. डॉ. डिसूझा कधीही उशिरा येत नाहीत, ऑफिसच्या वेळेनंतर उशिरा घरी जातात, कधी रजा घेत नाहीत या इतरांनी चघळलेल्या बातम्या तिच्या कानावर येण्यास फारसा वेळ लागला नाही. तिच्या लक्षात आलं की डिसूझा एक चांगले बॉस आहेत. कधीकधी तिला पेचात टाकण्याइतपत विसरभोळेही आहेत. एकंदरीत तिच्या दृष्टीने डॉ. डिसूझा विचारी असून तिची काळजी घेत.

लिझने बरीच किरकोळ कामं स्वतःच्या हाती घेतली. काही दिवसांनी ती आपलं लंचसुद्धा घरून आणू लागली.

अफवा कशा व केव्हा सुरू झाल्या कुणालाच कळलं नाही. परंतु डॉ. डिसूझा व लिझच्या प्रेमसंबंधांच्या बातम्या सर्व ऑफिसभर पसरू लागल्या. मसाला लावून मि. गोल्डस्मिथच्याही कानी आल्या. मोठ्यांदा हसून ते म्हणाले, "तुम्हां सर्वांना त्यांची बदनामी केल्याबद्दल कोर्टात खेचलं पाहिजे. डॉ. डिसूझा असं कधीच करू शकणार नाहीत," ते जोरजोरात हसू लागले.

काही दिवसांनी एका वयस्क स्त्रीने लिझला बाजूला नेऊन तिच्या भल्यासाठी या अफवांची बातमी तिच्या कानावर घातली. ह्या वेळेपर्यंत लिझला अस्पष्टशी शंका आली होतीच.

लंचनंतर खोलीत आलेल्या लिझचा चेहरा पाहून काहीतरी बिनसलं असल्याची डॉ. ना शंका आली.

"काय झालं?" त्यांनी विचारलं.

"बाहेर सर्वजण आपल्याबद्दल काहीबाही बोलत आहेत."

डॉ. ना वाटलं, आपल्याला आता नक्कीच उलटी होणार. त्यांच्या पोटात ढवळू लागलं व ते पांढरेफटक पडले. टेबलावर पडलेल्या फाईलवर नजर स्थिर करत ते काही क्षण स्वस्थ बसले. ते साठ वर्षांचे होते व यापूर्वी स्वतःच्या संदर्भात असं काहीही त्यांच्या ऐकिवात नव्हतं. त्यांना प्रश्न पडला, अशा परिस्थितीत इतर लोक काय करत असतील? आजवर त्यांनी अशा गोष्टी फक्त टी.व्ही. वर किंवा सिनेमात पाहिल्या होत्या.

बाथरूममध्ये जाऊन डॉ. डिसूझांनी आपला चेहरा स्वच्छ धुतला. त्यांच्या पोटात जास्तच ढवळू लागलं व तळहातांना घाम येऊ लागला. लिझच्या चेहऱ्यावरील खिन्नता, उदासीनता त्यांच्याने पाहवेना.

"आपण आता काय करायला हवं?" लिझने घाबरून विचारलं.

"आपण आज संध्याकाळी बोलू त्याबद्दल. मला नेहमीच्या ठिकाणी भेट."

लिझ आपल्या जागेवर जाऊन बसली. नोकरी सोडून गेलेल्या मेरीची सर्व कामं तिच्याच अंगावर पडली होती.

लिझ पोहोचण्यापूर्वीच डॉ. डिसूझा भेटीच्या जागी येऊन तिची वाट पाहत गाडीत बसलेले तिला दिसले. लिझ आल्यावर ती दोघं नेहमीच्या हॉटेलमध्ये पोहोचली. आपलं प्रेमप्रकरण जाहीर झाल्याचं कळल्यामुळे सुरुवातीला एकमेकांना स्पर्श करणं त्यांना जरा कठीण गेलं. परंतु लवकरच एकमेकांच्या सान्निध्यात ती दोघं रमून गेली. पुढचं काम सोपं झालं.

लिझने दुसऱ्या सेक्शनमध्ये बदली करून घ्यावी असं त्या दोघांनी ठरवलं. एकमेकांना भेटू नये असं मात्र त्यांनी मुळीच ठरवलं नाही. तो विचार सहन करण्यापलीकडे होता. प्रेमप्रकरण कधी सुरू झालं ते त्यांनाही आठवेना. परंतु ते सुरू झाल्यापासून डॉ. ना सकाळी उठून कधी ऑफिसमध्ये पोहोचतो असं होऊन जाई.

लिझ येण्यापूर्वी मि. गोल्डस्मिथचे चावट जोक्स ऐकण्याची त्यांना सवय करून घ्यावी लागली होती. लिझ भेटल्यापासून त्यांना इतरही अनेक आवाज असतात याची प्रथम जाणीव झाली. ते आवाज त्यांच्या कानांना गोड वाटू लागले. मार्थाच्या शरीराखेरीज इतरही काही वास असतात हे त्यांना कळू लागलं. स्त्रीच्या शरीराचा सुगंध हुंगण्याची चटक लागली. त्यांचं मन अनेकदा लिझची मार्थाशी तुलना करू लागलं.

लिझ भेटेपर्यंत मार्थाखेरीज इतर कुठलीही स्त्री त्यांना माहीत नव्हती. आता साठाव्या वर्षी त्यांना एकाएकी लिझ सापडली होती. संपूर्णपणे त्यांची झाली होती. ते तिच्या जन्मखुणांपासून तिच्या शरीराचा कणनूकण ओळखत होते.

त्यांच्या एका ओळखीच्या कुटुंबाकडून शेजारणीला व शेजारणीकडून मार्थाला डॉक्टरांबद्दल बातमी कळली.

"नाही. ते शक्यच नाही. माझा नाही विश्वास बसत या अफवेवर," मार्था.

"मी जे काही ऐकलं ते मैत्रीण म्हणून तुला सांगणं माझं कर्तव्य होतं. ते मी केलं. पुढचं तुझं तू पाहून घे," शेजारीण.

"बाई गं, ते साठ वर्षांचे असून आजोबाही झाले आहेत."

"कितीही म्हातारा झाला तरी पुरुष तो पुरुषच ठरतो."

"ते म्हातारे झाले आहेत. मला नाही वाटत की त्यांच्या काही वासना या वयात जागृत आहेत."

"मला खरंच तुझी दया येते."

"ही स्त्री त्यांची सेक्रेटरी आहे म्हणतेस?"

"हो," एवढं बोलून संशयाची ठिणगी टाकून शेजारीण निघून गेली.

मार्थाने बऱ्याच दिवसांनी आपला आवडता स्कर्ट-ब्लाउज चढवला, मोत्यांचा नेकलेस व इयरिंग्ज घातले. ऑफिसमध्ये येऊन तिने डॉक्टरांना व इतरांना आश्चर्यचकित केलं. डॉ. च्या प्रेमप्रकरणाची बातमी तिच्यापर्यंत पोहोचली असावी याची सर्वांना खात्री पटली.

ह्या वेळपर्यंत लिझची दुसऱ्या खात्यात बदली झाली होती. त्यामुळे डॉक्टरांच्या नव्या पुरुष सेक्रेटरीने मार्थाला ऑफिसमध्ये सर्व ठिकाणी फिरवलं. ऑफिसातील सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला. तरीसुद्धा संध्याकाळी घरी आल्यावर मार्थाने डॉ. ना त्या प्रेमप्रकरणाबाबत जाब विचारलाच. त्यांनीही या अशा अफवांवर विश्वास ठेवला म्हणून तिला मूर्ख ठरवलं. "मी आता म्हातारा झालो आहे. यापुढे अशा अफवांवर विश्वास ठेवत जाऊ नकोस," डॉ.नी तिची बोळवण केली. डेप्युटी ॲडमिनिस्ट्रेटरच्या कामांत ते कितीही निपुण असले तरी खोटं बोलण्याच्या बाबतीत सराव नसल्यामुळे त्यांना ते फार कठीण गेलं.

मि. गोल्डस्मिथनी डॉ.ना सेवानिवृत्ती आणखी एक-दोन वर्षं पुढे ढकलण्याची विनंती केली. त्यांच्या मते सर्व ऑफिसमध्ये फक्त डॉ.ना टेक्निकल ज्ञानाबरोबर प्रशासनाच्या व्यवहाराची व कामाची सविस्तर माहिती होती. आपली अजून या ऑफिसला गरज आहे हे जाणून डॉ.ना अतिशय आनंद झाला व त्यांनी आपली सेवानिवृत्ती पुढे ढकलण्याचा विचार पक्का केला.

मार्था मात्र सेवानिवृत्त होण्यासाठी त्यांच्या मागे लागली होती. गावाला जाऊन आपल्या नावावर असलेल्या जमिनीची लागवड करून शेती करण्याचा तिचा विचार होता. ॲग्रीकल्चर तज्ज्ञ म्हणून तिला त्यांची फार गरज होती.

मार्थापुढे डॉ.चं काहीही चालेना. त्यांना सक्तीने सेवानिवृत्त व्हावं लागलं. ते स्वतःला व दैवाला दोष देऊ लागले. त्यांना स्वतःच्या दुबळेपणाची, नालायकपणाची चीड येऊ लागली. आपण मि. गोल्डस्मिथचं लाच खाणं का

उघड करू शकलो नाही? ऐन ख्रिसमसच्या वेळी नोकरी बदलणाऱ्या सॅमची कानउघाडणी का करू शकलो नाही? मार्थाचं न ऐकता नोकरीवर का राहू शकलो नाही? ते आरशात पाहत स्वतःलाच प्रश्न विचारू लागले. उशिरा येण्याबद्दल केव्हाही तत्काळ सबब तयार असणाऱ्या आपल्या नव्या सेक्रेटरीप्रमाणे आपण धीट का होऊ शकलो नाही?

मे महिन्याच्या पहिल्या तारखेला डॉ. डिसूझा अखेरीस सेवानिवृत्त झाले. पंधरा तारखेला सर्व कागदपत्रांवर सह्या करण्यासाठी आणि तीस वर्षांच्या विश्वासू व प्रामाणिक सेवेबद्दल मिळणारा ब्रॉन्झचा प्लॅक आणण्यासाठी ते ऑफिसमध्ये जाऊन आले. त्यांच्या पार्टीला व त्यांनी दिलेल्या भाषणाला ऑफिसमधील सर्वजण हजर होते. लिझसुद्धा. ती लाजत लाजत इतरांबरोबर कपकेक्स व पेय वाटत होती. सर्वांनी "He is a jolly good fellow" गाऊन त्यांना मोठ्या प्रेमाने निरोप दिला.

सोळा तारखेला आपल्या घरातील ऑफिसमध्ये बसून डॉ.नी काही चेक्स लिहिले. काही बँकेत जाऊन कॅश केले. पैसे व काही चेक्स चेस्ट ऑफ ड्रॉवरवर ठेवून त्यांनी आपला आवडता सूट अंगावर चढवला व गळ्याला आवडती टाय बांधली. ते मनाशीच हसले व बराच वेळ खिडकीजवळ येऊन उभे राहिले. बाहेर डॉगवुड व अझेलियाला बहर आल्यामुळे त्यांची बाग रंगीबेरंगी रंगांनी नटली होती. डॉ.नी समाधानाचा सुस्कारा सोडला व ते मागे वळले. खोलीच्या मध्यभागी त्यांनी चटई अंथरली. चटईवर 'हॅपी बर्थ डे डॉ. मॅन्युअल डिसूझा' असं लिहिलं होतं. ते हळूवारपणे चटईवर बसले.

त्या शांत वस्तीत बंदुकीचा आवाज जोरात घुमला. सर्वजण आवाजाच्या रोखाने धावत आले. डॉ. खोलीच्या मध्यभागी चटईवर रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. त्यांच्या छातीतून रक्त वाहत होतं व त्यांच्या अंगात त्यांचे आवडते कपडे होते.

कॉफिनमध्ये डॉक्टर कुठल्यातरी पार्टीला निघाल्याप्रमाणे दिसत होते. स्वच्छ व नीटनेटके – नीटनेटके व स्वच्छ !

◈◈◈◈

# सायंकाळची सोबत

नुकताच आलेला 'इंडिया टुडे' वाचण्यात गढून गेलेल्या अशोकला उद्देशून स्वयंपाकघरातून बाहेर येत सुनीता म्हणाली, "ऐकलंस का? समीरचा फोन आला होता, तू मधाशी बाहेर गेला होतास तेव्हा."

मासिकातून मान वर न करताच अशोकने विचारलं, "हूं, काय म्हणताहेत आमचे थोरले चिरंजीव?"

"शार्लासुद्धा बोलली काही वेळ माझ्याशी आज. फार खुशीत होती."

"आज अचानक कशी काय आठवण झाली दोघांना? काही काम होतं?"

"होतं आणि नव्हतंही. एक आनंदाची बातमी कळवण्यासाठी फोन केला होता दोघांनी. शार्लाला दिवस गेले आहेत. तीन महिने उलटले आहेत."

"अरे वा! फारच छान बातमी आहे. शेवटी कुटुंब वाढवण्याचं काम मनावर घेतलं म्हणायचं दोघांनी."

"दिसतंय खरं तसं. सुरुवातीला माझ्या प्रकृतीची आस्थेनं चौकशी करून मूळ मुद्द्यावर आली दोघं. शार्लाला नुकतंच प्रमोशन मिळालं आहे. पैशांबरोबर जबाबदारीही तेवढीच वाढली आहे. तिच्या बाळंतपणाच्या वेळी मी त्यांच्याकडे राहून काही आठवडे मदत करू शकेन का याबद्दल चौकशी करत होती दोघं. मधुमेह, संधिवात आणि ओव्हरवेट यांमुळे तिच्या आईला मदत करता येईल असं वाटत नाही म्हणाली."

"तू काय उत्तर दिलंस त्यांना?"

"माझी काहीच हरकत नाही मदत करायला. तू आल्यावर तुझ्याशी विचारविनिमय करून उत्तर देईन असं सांगितलं मी त्यांना."

"तुला जायला काहीच हरकत नाही. पण मी मात्र इथेच राहीन. अधूनमधून भेटायला येत जाईन सर्वांना," असं म्हणून अशोकने पुन्हा मासिकात मान खुपसली.

सुनीताच्या मनाने भूतकाळात झेप घेतली. लग्नानंतरचा व त्यानंतर अमेरिकेत स्थायिक झाल्यावरचा चित्रपट झरझर तिच्या नजरेसमोर सरकू लागला. पस्तीस वर्षांपूर्वी ती अशोकबरोबर उत्तर अमेरिकेत आली. त्या वेळी त्यांच्या लग्नाला फक्त एक वर्ष पुरं झालं होतं. अशोकचं कॉलेजशिक्षण पुरं होऊन स्थिरस्थावर होण्यास चार वर्षं लागली. हा सुरुवातीचा काळ कष्टाचा असला तरी उमेदीचा होता. याच सुमारास समीरचा जन्म झाला तेव्हा त्यांच्या आनंदात भर पडली. समीरनंतर चार वर्षांनी मिहीर जन्माला आला. त्या वेळी दोघंही सुखाच्या शिखरावर पोहोचली. प्रथम शिकागोला व त्यानंतर गेली बावीस वर्षं नॉर्थ कॅरोलायनामध्ये ती दोघं स्थायिक झाली होती. थोरला समीर बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशनमध्ये ग्रॅज्युएट झाल्यानंतर एम.बी.ए. होऊन न्यू यॉर्कला वॉलस्ट्रीटवर खोऱ्याने पैसे ओढत होता. अलिकडेच शहरातील उत्तम सुखसोयींनी युक्त असलेल्या अपार्टमेंटच्या राहणीला कंटाळून न्यू यॉर्क शहराच्या सबर्बमध्ये एका महाग आलिशान घरात राहत होता. त्याने शार्ला नावाच्या न्यू जर्सी येथील एका अमेरिकन मुलीशी लग्न केलं होतं. शार्लाचे वडील कुठल्याशा औषधांच्या कंपनीचे चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर होते. तिची आई हायस्कूलच्या प्रिन्सिपलच्या पदावरून प्रकृतिअस्वास्थामुळे लवकर सेवानिवृत्त झाली होती. शार्ला इलेक्ट्रॉनिक इंजिनिअर असून एका मोठ्या कंपनीत मॅनेजरच्या हुद्द्यावर होती. तिची धाकटी बहीण लिंडा डॉक्टर होती. लग्न होऊन सहा वर्षं झाली तरी शार्ला-समीरनी आपल्या कुटुंबाचा विस्तार होऊ दिला नव्हता.

मिहीर बाल्टिमोरच्या जॉन्स हॉपकिन्स मेडिकल स्कूलमधून ऑर्थोपीडिक सर्जन झाला होता. एक यशस्वी सर्जन म्हणून त्याची गावातच दांडगी प्रॅक्टिस होती. वयाच्या चोविसाव्या वर्षी त्याने बीना नावाच्या एका पंजाबी मुलीशी लग्न केलं होतं. त्याला पाच वर्षांचा मुलगा व तीन वर्षांची मुलगी होती. बीना गावातील प्रख्यात कार्डिॲक सर्जनची मुलगी असून तिची आई व दोघे मोठे भाऊही डॉक्टर होते. तिला आपल्या माहेरचा फार ओढा होता. त्यामुळे अशोक-सुनीता यांना मिहीर-बीना व नातवंडांचा सहवास फार थोडा वेळ मिळत असे. गावात असूनही शक्य झाल्यास दीड-दोन महिन्यांतून एखादी ओझरती भेट व दीड-दोन

आठवड्यांतून एखादा फोन वाट्यास येई एवढंच. बीना सिस्टिम्स अॅनॅलिस्ट असून एका मोठ्या कंपनीत वरच्या हुद्द्यावर होती. कामाच्या निमित्ताने तिला बराच प्रवास करावा लागे. अशा वेळी मुलं तिच्या माहेरी राहत.

सर्व काही सुरळीतपणे चालू असताना दोन वर्षांपूर्वी सुनीताच्या दोन्ही ब्रेस्ट्समध्ये ती चेक-अपला गेली तेव्हा गाठी आढळून आल्या. चाचणी झाल्यावर तिची शंका खरी असल्याचं आढळून आलं. ट्यूमर मलिग्नंट निघाल्यामुळे शस्त्रक्रिया करून मॅस्टेक्टमी करावी लागली. शस्त्रक्रिया यशस्वी होऊन गेली दोन वर्षं ती रेमिशनमध्ये होती. तिचा कॅन्सर ॲक्टिव्ह नव्हता. तिची प्रकृती आता तशी चांगली होती. अशोकही तिची फार काळजी घेत असे. शस्त्रक्रियेच्या वेळी समीर तीन दिवस व शार्ला एक दिवस राहून गेले. मिहीर रोज तिला हॉस्पिटलमध्ये भेटण्यासाठी येत असे. बीना मुलांचं व ऑफिसच्या कामाचं निमित्त सांगून कर्तव्य म्हणून एक-दोनदा भेटून गेली. समीरचा दर दोन दिवसांनी व मिहीरचा रोज घरी फोन येत असे. पुढे हे फोनही विरळ झाले.

या आजारापासून सुनीताच्या मनात कुठेतरी अशुभाची पाल चुकचुकली. ती सतत आपल्याच विचारांत दंग राहू लागली. अनेक कुशंका तिच्या मनात थैमान घालू लागल्या. तिला पूर्ववत हसती बोलती करण्याचा अशोक आपल्या परीने खूप प्रयत्न करत असे. परंतु ती पूर्वीप्रमाणे कधीच खुलली नाही. स्वतःच्या आजारापेक्षाही अशोकचं आपल्या पश्चात कसं होईल ही चिंता तिला ग्रासत होती. तो आजारी पडल्यास नर्सिंग होम किंवा असिस्टेड लिव्हिंग यांसारख्या जीवन-साहाय्य देणाऱ्या सुविधा त्याच्या वाट्याला येऊ नयेत यासाठी ती ईश्वराकडे मनोभावे प्रार्थना करत होती. मुलांची दूरत्वाची वागणूक व त्यांच्या बायकांचा अलिप्तपणा पाहून ती मनातून खरोखरच घाबरली होती. प्रकृतीने सुदृढ असेपर्यंत अशोक तिची काळजी घेईल याबद्दल तिची खात्री होती. परंतु ज्या वयात जोडीदाराची, मुलाबाळांची, नातेवाइकांची, नातवंडांची मानसिक गरज भासते त्या वयात तिच्या पश्चात त्याने काय करावं? तिला विचारच करवेना. असिस्टेड लिव्हिंग, नर्सिंग होम, वृद्धाश्रम हे शब्द तिच्याभोवती गरगर फिरू लागले. सुनीताची तब्येत अधिक ढासळल्यास लवकर रिटायरमेंट घेण्याची अशोकने तयारी ठेवली होती.

शार्ला यथावकाश बाळंत होऊन तिला मुलगा झाला. समीर-शार्लाएवढाच अशोक-सुनीता यांना आनंद झाला. अडीच महिन्यांपर्यंत सुनीताने मनापासून मुलाची काळजी घेतली व शार्लाला मदत केली. शार्ला दूरवर जाई तेव्हा सुनीता

एकटीच घरकाम सांभाळून बाळाचं सर्व काम करत असे. शार्लीनेही त्याबद्दल तिचे मनापासून आभार मानले.

"तुमची मदत मिळाली नसती तर मी माझी नोकरी टिकवू शकले नसते. हाऊ कॅन आय रिटर्न द फेवर, मॉम?" शार्ला.

सुनीताच्या मनात विचार आला, "हा काय प्रश्न झाला? थोडा चांगुलपणा दाखवून प्रेम आणि माया लावली असती तरी फार उपकार झाले असते माझ्यावर. पण या संस्कृतीत त्याची अपेक्षा करणंच चुकीचं आहे." समीरनेही तिचे मनापासून आभार मानले. अडीच महिन्यांनंतर सुनीता आपल्या घरी परतली.

का कोण जाणे, पण परत आल्यापासून सुनीता शरीराने व मनानेही बरीच थकली. अनेकदा ती अशोकला कळवळून म्हणे, "अशोक, आपण भारतात राहिलो असतो तर मुलं इतकी दुरावली असती का रे आपल्यापासून? की हा फक्त या देशाचा शाप आहे आपल्याला? गावात राहूनही नातवंडं क्वचितच नजरेस पडतात. व्यवसायापायी मुलाला भेटायलाही वेळ सापडत नाही तर सुनेला भेटण्याची गरजही भासत नाही. का आलो आपण या देशात? काय हे आयुष्य! भारतात निदान शेजारी–पाजारी, नातेवाईक सतत भेटले असते. कुणालातरी वेळ मिळाला असता बोलायला आपल्याशी. कुणालातरी गरज भासली असती आपली."

"तसं असतं तर भारतातही वृद्धाश्रमांची संख्या का वाढली असती? घरोघरी मातीच्याच चुली. तिथे तरी आजकाल कुठे विचारतात मुलं आईवडिलांना?"

सुनीताच्या मनात विचार आला, ही आपली मधली पिढी. चारी बाजूंनी तोंडं बंद झालेली. मुकाट्याने सर्व सहन करणारी. लग्नानंतर सासरी सर्व बंधनांत राहावं लागलं, छोट्या छोट्या बाबतींत बोलणी खावी लागली. परंतु त्यांच्या आयुष्याच्या सायंकाळी आपणच त्यांना आधार दिला, इथे आणलं, त्यांची आजारपणं काढली. आजच्या पिढीला कसलंच बंधन नाही. मी, माझं, मला या व्यतिरिक्त इतर कोणतीच सर्वनामं माहीत नसलेली ही पिढी.

पुन्हा एकदा परीक्षेची वेळ येऊन ठेपली. मलिग्नंट ट्यूमरमुळे सुनीताचा गर्भाशय काढून टाकण्यासाठी तिच्यावर शस्त्रक्रिया करावी लागली. सुनीताने धीर सोडला. तिची सेवा करण्यासाठी अशोकने सेवानिवृत्ती घेतली. नवीन घरी राहायला गेल्यामुळे, मूल लहान असल्यामुळे व व्यवसायाच्या व्यापामुळे दोन दिवस राहून समीर परत गेला. मिहीरच्याच हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया झाल्यामुळे तिथे असेपर्यंत त्याची रोज भेट घडत होती. घरी परतल्यानंतर तीही दुर्मीळ होऊन फोनवरच तिच्या

प्रकृतीची चौकशी होऊ लागली. एरव्ही विश्वसनीय मित्रमंडळी होतीच – नैतिक आधार देण्यासाठी व जेवणखाण पुरवण्यासाठी. हेच तर येथील नातेवाईक !

का कोण जाणे – कदाचित इच्छाशक्ती नष्ट झाल्यामुळेही असेल – सुनीता या दुखण्यातून वाचू शकली नाही. मिहीरने जबरदस्तीने अशोकला आपल्या घरी नेलं. परंतु बीनाच्या अलिप्त वागणुकीमुळे तो चार दिवसांच्या वर तिथे राहू शकला नाही. समीरकडे राहण्याचा प्रश्नच नव्हता. धडधाकट सासऱ्याला घरात ठेवून घेणं त्याच्या पत्नीच्या संस्कृतीत बसत नव्हतं. सुनीताच्या आठवणी त्या मोठ्या घरात अशोकला छळू लागल्या. अखेर वसंतच्या – आपल्या मित्राच्या – आग्रहास्तव घर विकून कॅलिफोर्नियाला वसंतच्या शहरी जाण्याचा निर्णय त्याने पक्का केला. सुनीताच्या मृत्यूनंतर एक वर्षाच्या आतच सानफ्रॅन्सिस्कोला स्थायिक होऊन त्याने मित्राच्या मदतीने पार्टटाइम कन्सल्टिंगचं काम सुरू केलं.

दोन–तीन वर्षं सुरळीतपणे निघून गेली. वसंतचा त्याला फार मोठा आधार होता. तो जवळजवळ त्यांच्या कुटुंबाचाच एक घटक बनून गेला होता. नवीन मित्रमंडळीही त्याने जमा केली होती. या सर्वांबरोबर सुनीताच्या आठवणी साथ देत असत. क्वचित केव्हातरी मुलांचे फोन येत. तेवढाच त्यांच्याशी संबंध. ख्रिसमसला भेटकार्ड व भेटवस्तू पाठवण्यापलीकडे मुलांनी फारसं प्रेम कधी व्यक्त केलं नाही.

पुढील उन्हाळ्यात वसंतची मामेबहीण त्याच्याकडे काही दिवस राहण्यासाठी आली होती. तिच्या मुलाने – राकेशने – सानफ्रॅन्सिस्कोला मित्राच्या भागीदारीत कॉम्प्युटरचा व्यवसाय सुरू केला होता व तो बऱ्यापैकी चालला होता. वसंतची मामेबहीण शोभा जवळजवळ पन्नास–एकावन्नची असेल. दहा वर्षांपूर्वी एका अपघातात आपल्या पतीचं निधन झाल्यानंतर तिने हिमतीने नोकरी चालू ठेवून आपल्या मुलाचं – राकेशचं शिक्षण पुरं केलं होतं. वयाच्या सव्विसाव्या वर्षी तो आज स्वतःचा कॉम्प्युटरचा व्यवसाय यशस्वीपणे सांभाळत होता. त्याचं एका सुरेख, सुस्वभावी, पण अनाथ असलेल्या अमेरिकन मुलीवर प्रेम जडलं होतं व साखरपुडाही झाला होता. त्याची वाग्दत्त वधू जेनी, त्याच्या आईला आई मानत होती व तिच्यावर स्वतःची मुलगी करणार नाही एवढं प्रेम करत होती.

शांत स्वभावाच्या, साधी राहणी असलेल्या, सोज्ज्वळ चेहऱ्याच्या शोभाने प्रथमदर्शनीच आपल्या व्यक्तिमत्त्वाने अशोकच्या मनात स्वतःविषयी आदर निर्माण केला होता. त्याच्या मनाची पकड घेतली होती. एक–दोन महिन्यांतच राकेशचं

लग्न झालं. दहा–बारा मित्रमंडळींच्या साक्षीने प्रथम नोंदणी पद्धतीने व नंतर देवळात भारतीय पद्धतीने. अशोकही वसंतबरोबर राकेशच्या लग्नाला उपस्थित होता. त्याच वेळी गप्पांच्या ओघात वसंतने अशोकजवळ त्याचे पुढील आयुष्याबाबत काय बेत आहेत याबद्दल विचारणा केली.

“अरे, या वयात कुणी पुढील प्लॅन्स करतं का? भविष्यकाळ फार थोडा शिल्लक राहिल्यामुळे मन भूतकाळातच जास्त रमतं बघ,” अशोक हसत उत्तरला.

“म्हणून या वयातच पुढील आयुष्याची आखणी करणं जास्त महत्त्वाचं आहे अशोक,” गंभीर होत वसंत उत्तरला.” तरुणपणी नाही एवढी या उतारवयातच सोबतीची अधिक गरज भासते.”

“खरं आहे तुझं म्हणणं. तरीसुद्धा पासष्टी जवळ आल्यावर कुणी स्त्री माझी सहचारिणी व्हायला मी कोट्यधीशही नाही की हॉलिवूडचा नटसुद्धा नाही,” अशोक चेष्टेच्या सुरात म्हणाला.

“पण तुला जर एखादी अनुरूप; तुझं मन, भावना समजून घेणारी, सुनीताच्या स्मृतीचा आदर करणारी सोबतीण भेटली तर?”

“तर विचार करेनही कदाचित,” अशोकने त्याला उडवून लावण्याचा प्रयत्न केला.

“तू विचार करच यावर,” वसंतने त्याला एक–दोन आठवड्यांचा अवधी दिला.

दोन–अडीच आठवड्यांनंतर वसंतने जेव्हा अशोकजवळ शोभाचा विषय काढला तेव्हा तो भांबावून गेला. विचार करून कळवतो एवढं उत्तर देऊन त्याने ती वेळ निभावून नेली. परंतु दोन–तीन दिवसांतच आपल्याला भेटायला येण्यासाठी त्याला शोभाचाच फोन आला तेव्हा तिला भेटायला जाण्याखेरीज त्याला गत्यंतरच उरलं नाही.

फुलांचा गुच्छ घेऊन तो दुसऱ्या दिवशी धडधडत्या अंतःकरणाने शोभाच्या दारात उभा राहिला. राकेश व जेनी हनीमूनहून परत न आल्यामुळे शोभा घरी एकटीच होती. अशोक सोफ्यावर स्थिरस्थावर झाल्यानंतर त्याच्या हाती चहाचा कप देऊन शोभाने मुद्द्यालाच हात घातला.

“वसंतने तुम्हांला असं एकदम विचारायला नको होतं. इतक्यात विचारणार नाही असं कबूल केलं होतं त्याने माझ्याजवळ. सर्व सुरळीत चालू असताना या

वयात मी पुन्हा लग्नाचा विचार का करावा याबद्दल तुम्हांला आश्चर्य वाटणं स्वाभाविक आहे. तेही नुकतंच मुलाचं लग्न झालं असताना. तुमच्या या शंकेचं निरसन करण्यासाठी मी तुम्हांला आज भेटायला बोलावलं आहे. राकेशचा संसार नवा आहे. जेनी जरी अतिशय प्रेमळ असली आणि अगदी मनापासून आपला जीव माझ्यावर ओवाळून टाकत असली तरी तिच्या आणि आपल्या संस्कृतीत बराच फरक आहे. याखेरीज तिला स्वतःचा संसार आहे. तिच्याही काही वेगळ्या कल्पना असतील स्वतःच्या संसाराबद्दल. राकेश मला एकटं कधीच राहू देणार नाही आणि मलाही ते शक्य होणार नाही. गेली दहा वर्षं मी कशी काढली ते माझं मलाच ठाऊक. पण या आयुष्याच्या उतरणीला भावना मोकळ्या करण्यासाठी, कुणाच्यातरी खांद्यावर मान टाकून अश्रूंना वाट मोकळी करून देण्यासाठी जोडीदाराची गरज भासते. मीही त्याला अपवाद नाही. हे सर्व मोकळेपणाने तुमच्याजवळ बोलून मन उघडं केल्याबद्दल मला आगाऊ समजू नका. तुमच्या मुलांबद्दल मला फारशी माहिती नाही. जेनी आणि राकेश यांची या लग्नाला मनापासून परवानगी आहे.''

शोभाच्या मोकळेपणाने अशोक भारावून गेला. त्याला स्वतःच्या मुलांची आठवण झाली. त्यांनी दाखवलेला अलिप्तपणा व दिलेली दुराव्याची वागणूक यापायी त्याच्या मनाला सतत त्रास होई. राकेशचं आईवरील प्रेम पाहून त्याला तिचा थोडा हेवाही वाटला. त्यालाही आपलं एकाकी जीवन, एकलेपण निराश करतच होतं. आयुष्य सरत आल्यावरसुद्धा आपण रिक्तहस्त असल्याची त्याला प्रकर्षाने जाणीव झाली.

''मी लग्नाबाबत फारसा विचार केलेला नाही. आपल्या दीड-दोन वर्षांच्या भेटीत, ओळखीत मला तुमची बरीच ओळख पटली आहे. आपल्या आवडीनिवडी पण बऱ्याच अंशी जुळतात. मलासुद्धा माझ्या एकाकी जीवनात आज साथीदाराची गरज भासते आहे. परंतु सुनीताची स्मृती मी कधीच विसरू शकणार नाही. पुन्हा लग्न करणं म्हणजे मला तिच्या स्मृतीशी प्रतारणा केल्यासारखं वाटतं,'' सर्व धैर्य एकवटून अशोकने आपले विचार शोभाजवळ उघडे केले.

''तुमचं मन समजू शकते मी. मलाही मोहनच्या आठवणी विसरणं कसं शक्य आहे? जोवर आपण दोघंही एकमेकांच्या दिवंगत साथीदारांचा आदर करण्याचं आश्वासन पाळू शकतो तोवर मला वाटतं, आपलं सहजीवन नक्कीच सुखावह होईल. आजवर लग्नाचा विचार माझ्याही मनाला शिवला नव्हता. परंतु आता

राकेशचं लग्न झाल्यानंतर तो करावा लागला. तुमच्या मुलांबद्दल मी काहीच सांगू शकत नाही. परंतु जेनी आणि राकेश मला कधीच घराबाहेर काढणार नाहीत याबद्दल माझी खात्री आहे. तरीसुद्धा आपण आपला भार त्यांच्यावर टाकत आहोत ही जाणीव मला सारखी सतावते.''

''शोभा, या बाबतीत विचार करण्यासाठी मला थोड्या अवधीची जरूर आहे. दोन–चार दिवसांत मी माझा निर्णय नक्की कळवतो.'' आपल्या मुलांशी बातचीत करून आपला निर्णय लवकरच कळवण्याचं आश्वासन शोभाला देऊन अशोक घरी परतला. त्याच संध्याकाळी त्याने समीर–मिहीरच्या घरी फोन लावले. आपला पुनर्लग्न करण्याचा विचार त्याने दोघांच्याही कानावर घातला. आजवर फारसा काही संबंध न ठेवणारी आपली मुलं आपल्या लग्नाला मुळीच हरकत घेणार नाहीत किंवा विरोध करणार नाहीत याबद्दल त्याची खात्री होती. परंतु आजवर फारसा लागाबांधा जोडण्याचा प्रयत्नही न करणाऱ्या त्याच्या मुलांनी या लग्नाबद्दल केवळ प्रतिकूल मतच प्रदर्शित केलं नाही तर अक्षरशः त्याच्यावर चिडून त्याच्या लग्नाला आक्षेप घेतला. मुलांनी या वयात लग्न करण्याच्या त्याच्या कल्पनेबद्दल आपली नाराजी व्यक्त केली व तो आपल्या दिवंगत आईशी प्रतारणा करत असल्याचा त्याच्यावर आरोप केला. अचानक आपल्या मुलांना आईवरील प्रेमाची आठवण कशी झाली याचं त्याला आश्चर्य वाटलं व मुलांचा रागही आला.

''डॅड, तुम्ही एवढ्या लांब कॅलिफोर्नियाला एकटे राहता म्हणून तुम्हांला या वयात साथीदाराची गरज भासू लागली आहे. खरं तर तुम्ही आता वृद्धाश्रमाचा विचार करावा असं मला वाटतं. आतापर्यंत तुमची प्रकृती चांगली आहे. परंतु आता पासष्टीनंतर प्रकृतीच्या तक्रारी सुरू झाल्यावर म्हाताऱ्या बायकोपेक्षा वृद्धाश्रमाचा आणि त्याच्याशी संबंधित असलेल्या असिस्टेड लिव्हिंग सुविधेचा अधिक फायदा होईल तुम्हांला. शिवाय तुमच्याजवळ नर्सिंग होमचा इन्शुरन्स आहेच. तुम्ही परत या बाजूला राहायला या. काही फार छान वृद्धाश्रम आहेत इथं जवळपास. मी चौकशी करून ठेवीन,'' मिहीरने आपला मौल्यवान सल्ला दिला.

समीरनेही जवळजवळ तसेच विचार मांडले. त्याही पुढे जाऊन ''या भागात राहावयास आलात तर नातवंडंही जवळ राहतील'' अशी आठवण करून देऊन त्याने अशोकला ईस्ट कोस्टला परत बोलावले. कधीतरी दोन–तीन महिन्यांत एकदा चुकून नजरेस पडणारी किंवा क्वचित कधीतरी फोन करणारी नातवंडं जवळ राहिली किंवा दूर राहिली तरी फारसा फरक पडणार नाही असा विचार अशोकच्या

मनात आला. त्याचं मन अनेक वर्षं मागे गेलं. सुनीताची त्याला फार आठवण आली. किती सत्य होतं तिच्या विचारांत ! आपल्या उतारवयातील आयुष्याची चिंता तिचं मन पोखरत होती. म्हणूनच नसेल ना लवकर गेली ती? भारतात परत जाऊन नव्याने पुन्हा संसार थाटण्याचा विचार करत होती ती. तिथे निदान कुणा नातेवाईक अगर मित्रमंडळींची मदत होईल याबद्दल आशा बाळगत होती. परंतु ती आशाही कदाचित फोल ठरण्याचा संभव होता. आपल्याला अखेर कुणाचीही सोबत नसते हेच खरं !

दुसऱ्याच दिवशी अशोकने प्रथम शोभाला व नंतर वसंतला आपला शोभाशी लग्न करण्याचा निर्णय कळवला. राकेश आणि जेनी जवळच असल्यामुळे त्याची भविष्याबद्दलची चिंता मिटली होती. त्याच्या मनात विचार आला, ‘‘राकेशसारखी मुलं असण्याचं भाग्य ज्यांच्या वाट्याला येत नाही, त्यांचं या देशात काय बरं होत असावं?’’

◈◈◈◈

# अखेरची इच्छा

सूर्यास्ताच्या जरा आधी अतुल घरी पोहोचला. घर जसजसं जवळ येऊ लागलं तशी त्याच्या हृदयाची धडधडही वाढू लागली होती. सर्वत्र नीरव शांतता पसरली होती. सारं कसं अस्वाभाविकपणे स्तब्ध उभं राहिलं होतं. नेहमीप्रमाणे त्याची आजी आज पुढील ओसरीवर आपल्या आरामखुर्चीत नव्हती हे त्याला लगेच जाणवलं. आज तिची खुर्ची रिकामी होती, एकटी होती व निष्प्राण वाटत होती. आजवरच्या त्याच्या आठवणीत आजी नेहमी तिथेच बसत असे. ऊन असो वा पाऊस, ती त्या खुर्चीत बसून येणाऱ्याजाणाऱ्यांचं हसून स्वागत करत असे. त्याच्या बालपणी त्याच्या दृष्टीने या ओसरीला फार महत्त्व होतं. घरात शिरताच आजीकडून आपलं नक्कीच स्वागत होईल याबद्दल त्याला खात्री असे. आपल्या छोट्याशा बटव्यात ती त्याच्यासाठी, सर्व मुलांसाठी लाडू, बिस्किटं, बेदाणे, जर्दाळू, गोळ्या अशा खाण्याच्या अनेक जिनसा लपवून ठेवत असे.

वाड्यातील अंगणातून अतुल धावत सुटला व पायऱ्या चढून वर आला. नुकत्याच बाहेर आलेल्या त्याच्या आईने तिथेच त्याचं प्रेमाने स्वागत केलं.

"आजी ठीक....."

त्याचं वाक्य पूर्ण होण्याआधी होकारार्थी मान हलवत तिने त्याला मिठीत घेतलं. गेल्या तीन वर्षांत दोघांची भेट झाली नव्हती.

अतुल आजीच्या खोलीपाशी पोहोचला तेव्हा तिच्या खोलीत दोन स्त्रिया तिच्या सोबतीसाठी व मदतीसाठी मूकपणे तिच्याजवळ बसलेल्या त्याला आढळल्या. आईबरोबर तो आजीच्या पलंगाजवळ आला. आजीचे डोळे मिटलेले होते. तिचा सुरकुतलेला सावळा चेहरा फिक्कट वाटत होता, डोळे खोल गेले होते व चेहऱ्यावरील नेहमीचं हास्य मावळलेलं दिसत होतं.

बऱ्याच वेळाने आजीने थोडी हालचाल केली. तिचे ओठ विलग होऊन काहीतरी पुटपुटले. तिने डोळे बंद ठेवूनच खोल आवाजात विचारलं, ''माधव घरी आला का?''

''अजून तरी नाही, पण येतील लवकरच,'' त्याच्या आईने तिला सांगितलं. माधव म्हणजे अतुलचे वडील. आजीचा थोरला मुलगा.

''जरा डोळे उघडून पाहा बरं. तुझा लाडका नातू तुला भेटण्यासाठी अमेरिकेहून आला आहे,'' त्या स्त्रियांपैकी एकजण आजीला म्हणाली.

मोठ्या कष्टाने आजीने हळूहळू डोळे उघडण्याचा प्रयत्न केला. अतुलची आई लगेच उठून त्याला आजीच्या शेजारी जागा देण्यासाठी दूर झाली. तो आजीच्या शेजारी बिछान्यावर बसला व तिचा हात हाती घेत म्हणाला,

''आजी, मी घरी आलो आहे.''

''अतुल, घरी यायला फार वेळ लावलास रे!'' आजी हळूहळू कष्टाने म्हणाली. तिने त्याचा हात आपल्या हातात धरून ठेवला. त्याचा हात तसाच हाती ठेवून आजी पुन्हा झोपी गेली. तिला त्रास होऊ नये म्हणून त्यानेही आपला हात तसाच तिच्या हाती राहू दिला.

अतुलचं आपल्या आईवडिलांपेक्षा आजीवर अधिक प्रेम होतं. त्याच्या बालपणी त्याची आई आपल्या मोठ्या संसाराच्या पसाऱ्यात, घरकामात दंग असे. त्याच्याबरोबर किंवा त्याच्या भावंडांशी खेळण्यास, त्यांच्याशी गप्पा मारण्यास, गोष्टी सांगण्यास अगर त्यांना पुस्तके वाचून दाखवण्यास तिला कधीच सवड नसे. त्याचे वडील तापट व कडक शिस्तीचे होते. त्यांच्या वागण्याबोलण्यात कडवटपणा डोकावत असे. आजीजवळ मात्र मुलांसाठी भरपूर वेळ असे. अमर्यादित प्रेम त्याला आजीकडून मिळालं होतं. बालपणच्या सर्व सुखद स्मृती त्याच्या मनात अजूनही ताज्या होत्या. या आठवणींनीच त्याला तिच्या या अंतिम क्षणी अमेरिकेहून तिच्या भेटीसाठी खेचून आणलं होतं. आज तिच्या चेहऱ्यावरील तृप्ती पाहून तिच्या भेटीला येण्याचा निर्णय घेतल्याबद्दल त्याला फार आनंद झाला.

झोपेतच आजीने अतुलचा हात घट्ट पकडून ठेवला. त्याने आपल्या दुसऱ्या हाताने तिच्या हातावर थोपटल्यासारखं केलं. तिने डोळे उघडले. परंतु त्यात हरवून गेल्याचा भाव होता. हळूहळू तिने अतुलवर नजर स्थिर केली. ती थांबत थांबत त्याला म्हणाली,

''तू येशील याबद्दल मला खात्री होती. मी सर्वांना तसं सांगत होते बघ.''

अतुलचे वडील घरी आल्यानंतर हातपाय धुऊन आपल्या आईच्या खोलीत आले. तिच्या निद्रिस्त चेहऱ्याकडे पाहत ते काही क्षण स्तब्ध उभे राहिले. अतुलवर नजर पडताच पसंतिदर्शक मान हलवून ते खोलीबाहेर पडले.

वडिलांच्या चेहऱ्यावरील भाव पाहून त्यांना आपल्या भेटीची ओढ लागली असावी हे जाणूनही अतुलने जास्तीत जास्त वेळ आजीच्या खोलीत घालवून त्यांच्या भेटीला जाण्यास दिरंगाई केली. आजी तशीच झोपून राहिल्यामुळे थोड्या वेळाने उठून तो वडिलांना भेटण्यासाठी खोलीबाहेर पडला.

वडिलांच्या खोलीपाशी पोहोचताच अतुलच्या पोटात रागाबरोबरच भीतीचा गोळा उभा राहिला. लहानपणी करत असू तसं परत पावली आजीच्या खोलीत जावं असा विचार क्षणभर त्याच्या मनात आला. तिथे त्याला नेहमी सुरक्षित वाटत असे.

अमेरिकेला गेल्यापासून अतुलचा आपल्या वडिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन थोडाफार बदलला होता. त्याला आता समजू लागलं होतं की आपल्याला वाटे तेवढे आपले वडील दुष्ट नव्हते, किंवा फार पुराणमतवादीही नव्हते. आजोबांच्या अकाली मृत्यूमुळे वडिलांच्या आयुष्याची शोकांतिका झाली होती. तरुणपणीची स्वप्नं रंगण्यापूर्वीच धुतली गेली होती. वास्तवाचा स्वीकार करत शिक्षण सोडून घराची, कुटुंबाची जबाबदारी त्यांना उचलावी लागली होती. त्यामुळे त्यांच्यात एक प्रकारचा कडवटपणा निर्माण झाला होता, मनात विषाद दाटला होता. अतुलला आपल्या वडिलांबद्दल आता सहानुभूती वाटू लागली होती. त्याने वडिलांच्या वागणुकीबद्दल त्यांना मनोमन क्षमाही करून टाकली होती.

दैनंदिन धकाधकीच्या जीवनात न सापडणारा अवधी अतुलला अमेरिकेहून परतताना विमानाच्या प्रवासात मिळाला होता. आपल्या वडिलांकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन आता बदलला होता व तो आत्मविश्वासाने त्यांना सामोरा जाऊ शकणार होता. आपले वडील त्याला निराशा व वैफल्य पदरी पडलेल्या मनोदुर्बल टीनेजरप्रमाणे भासू लागले. वडिलांशी समझोता करण्याचा त्याने निर्णय घेतला. त्यांच्याबरोबर करण्याची अनेक संभाषणं त्याने मनाशी घोळवली. आता त्यांच्या खोलीबाहेर उभा राहून तो स्वतःला धैर्य देण्याबद्दल देवाची मनोमन प्रार्थना करत होता.

अतुल खोलीबाहेर उभा असतानाच जेवण तयार असल्याची व सर्वांना जेवण्यासाठी येण्याची आईची हाक ऐकू आली. तो लगेच तिथे जाण्यासाठी वळला. आजचं संकट उद्यापर्यंत टळलं होतं.

शांत असलेल्या जेवण्याच्या खोलीत भांड्यांचा व ताट-वाट्यांचा आवाज अतुलला अस्वस्थ करण्याइतपत मोठा वाटत होता. सर्वजण जेवण्यासाठी टेबलाभोवती बसले. आजीची उणीव त्याला प्रकर्षाने जाणवली. अतुल हेतुपूर्वक वडिलांपासून काहीशा अंतरावर असलेल्या खुर्चीवर बसला होता. त्याच्या नकळत त्याच्या मनाविरुद्ध त्याचं शरीर वडिलांच्या पूर्वीच्या कडक शिस्तीत वागत होतं. परंतु मन मात्र सैरभैर भटकत होतं. त्यांच्या सवयीप्रमाणे वडिलांनी भरभर जेवण्यास सुरवात केली. खाण्याकडे त्यांचं लक्ष नसावं असं वाटत होतं. ते स्वतःच्याच विचारांत गढलेले दिसत होते. अधूनमधून त्यांची नजर अतुलवर रोखली जाई, परंतु त्यामध्ये त्याला ओळखीचा, आपलेपणाचा भाव आढळला नाही.

''गेल्या तीन वर्षांत अमेरिकन लोकांनी तुला काय काय शिकवलं?'' पाण्याचा घोट घेत वडिलांनी त्याला विचारलं.

''इंजिनिअरिंग, फिजिक्स, मेटॅलर्जी.....''

अतुलचं वाक्य पुरं होण्यापूर्वीच वडिलांनी त्याला थांबण्याची खूण केली. या मोठ्या विषयांची नावं ऐकून त्यांच्यावर फारशी छाप पडलेली दिसत नव्हती.

''माझं म्हणणं एवढंच की तू शिकलास काय? तुला कोणत्या प्रकारचं ज्ञान प्राप्त झालं आहे? या पाश्चात्त्य कॉलेजमध्ये जाऊन तू काय मिळवलंस?''

''त्याचा विस्तार करून सांगणं कठीण आहे, किचकट आहे,'' अतुलने कसाबसा सांगण्याचा प्रयत्न केला.

वडिलांचे मुडपलेले ओठ व उंचावलेल्या भुवया पाहून तो मध्येच थबकला. थोडं खाकरून पुन्हा म्हणाला,

''पाश्चात्त्य देशातील युनिव्हर्सिटीत मिळणारं ज्ञान बरंच विकसित असतं. विद्यार्थ्यांना अनेक संस्कृतींची समज देत मूलभूत शास्त्रं शिकवली जातात. त्यानंतर विद्यार्थ्यांना आपल्या आवडीप्रमाणे व कुवतीप्रमाणे विषय निवडण्याची मुभा असते.''

''कॉम्प्लिकेटेड आणि ब्रॉड, हां?'' त्याच्या वडिलांनी तिरसटपणे विचारलं, ''आयुष्य यशस्वीपणे जगण्यापेक्षा मानवाला अधिक किचकट काय असणार? त्यांनी शिकवलं नसेल तर मी सांगतो तुला. जुनी भारतीय शिक्षणपद्धती माणसाला माणूस म्हणून जगायला शिकवते.''

अतुल यावर काहीच उत्तरला नाही. खाली मान घालून तो मुकाट्याने जेवण्याचा प्रयत्न करू लागला. नाहीतर त्याला वडिलांशी संवाद साधण्याची कसरत करावी लागणार होती. कदाचित तो रागाच्या भरात नको ते बोलून गेला असता.

"तुला यावर काय म्हणायचं आहे?" वडील संभाषणाचा धागा उचलत जवळजवळ भांडण करण्याच्या पावित्र्यात म्हणाले.

"आजच्या काळात ती शिक्षणपद्धती बदलावी लागेल."

"गेली तीन वर्षं तू अमेरिकेत उच्च शिक्षण घेत आहेस आणि आज काहीही न शिकता परतला आहेस. तुला व्यावहारिक ज्ञान प्राप्त न करता आल्यामुळे निढळाच्या घामाने मिळवलेला पैसा वाया गेला आहे. तो व्यावहारिकपणा तू माझ्याकडून शीक. तुझं पहिलं कर्तव्य कुटुंबासाठी आहे. बिछान्यावर शेवटचे क्षण मोजत असलेल्या तुझ्या आजीसाठी आहे. तुला पाहण्यासाठी ती तुझ्या वाटेकडे आतुरतेने डोळे लावून बसली होती. तुझं कर्तव्य म्हणजे तिच्या खुशीसाठी तू लगेच लग्न करावंस. जिच्याशी तुझा तीन वर्षांपूर्वी वाङ्निश्चय झाला आहे ती मुलगीही तुझी वाट पाहते आहे."

"मी आताच लग्न करू शकत...." अर्ध्या वाक्यावरच अतुलचा आवाज त्याला सोडून गेला.

"त्यासाठी तुला काहीच त्रास घ्यावा लागणार नाही. मी जय्यत तयारी ठेवली आहे. गुरुजींना विचारून, पंचांग पाहून परवाचा मुहूर्त नक्की केला आहे. आजीची तब्येत इतकी खालावली आहे की ती कोणत्याही क्षणी जाऊ शकते. परवापर्यंत तरी ती तग धरेल अशी देवाकडे प्रार्थना आहे. केवळ तुझ्या लग्नासाठी तिचा आत्मा अजून जिवंत आहे," एवढं बोलून त्याचे वडील उठले.

दुसऱ्या दिवशी नाश्ता झाल्यावर त्याच्या बहिणीने त्याला त्याच्या लग्नाविषयी सविस्तर माहिती पुरवली. त्यांचं कुटुंब त्याच्या येण्याची वाटच पाहत होतं. लग्न घरातल्या घरातच अगदी साध्या पद्धतीने होतं व त्याची सर्व तयारी झाली होती.

"तू एवढी उत्साही का आहेस या लग्नाबद्दल?"

"मी वहिनीच्या आगमनाची उत्सुकतेने वाट पाहते आहे. आम्ही दोघी जिवाभावाच्या मैत्रिणी आहोत. फार चांगली आहे ती. आम्ही एकाच कॉलेजमध्ये शिकत आहोत आणि याच वर्षी दोघीही ग्रॅज्युएट होणार आहोत."

‘‘कशासाठी?’’ त्याने उगीचच फटकारलं.

‘‘शिक्षण कशासाठी घेतात?’’ तिने उलट सवाल केला.

बहिणीच्या रागाकडे अतुलने दुर्लक्ष केलं. त्याची वाग्दत्त वधू सेजल ग्रॅज्युएट का होणार आहे ते त्याला ठाऊक होतं. स्वतःची करिअर असावी अगर आपण काही व्यवसाय करावा याची तिला मुळीच आवड नव्हती. परंतु त्याला कॉलेजशिक्षण घेतलेली मुलगी पत्नी म्हणून हवी असल्यामुळे केवळ त्याच्या समाधानासाठी सेजल कॉलेजची पदवी मिळवणार होती.

‘‘मी सेजलशी लग्न करू शकत नाही हे कुणालाच कसं समजत नाही? तिला मी गेल्या तीन वर्षांत पाहिलेलंसुद्धा नाही. तिच्याशी पत्रव्यवहारही केलेला नाही. केवळ मला अडकवून टाकण्यासाठी आजीने माझा तिच्याशी साखरपुडा घाईघाईत उरकून टाकला.’’

‘‘मग तिने आता काय करावं असं तुझं म्हणणं आहे?’’

‘‘त्याचा विचार मी का बरं करावा ? तो तिचा प्रश्न आहे.’’

‘‘ती तुझी वाग्दत्त वधू असल्यामुळे ती आता तुझी जबाबदारी आहे.’’

‘‘तू सुद्धा अशी कशी बदललीस, रूपा?’’

‘‘मी मुळीच बदलले नाही. जबाबदारी आणि कर्तव्य या दोन्ही गोष्टी माझ्या मनावर सतत ठसवल्या गेल्या आहेत.’’

‘‘एक स्वतंत्र विचारांची व्यक्ती म्हणून माझ्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्यं माझ्यापुरती मर्यादित आहेत. समाजाचं, मानवजातीचं भलं करावं ही माझी जबाबदारी नव्हे. माझं मुख्य कर्तव्य म्हणजे तुम्हां सर्वांच्या खोट्या, नकली समजुती नष्ट करणं हे आहे.’’

‘‘सेजलला बरबाद करायचं तू का ठरवलं आहेस?’’

‘‘तिने स्वतःच आपले प्रश्न सोडवले पाहिजेत.’’

‘‘ते कसं?’’

‘‘सर्वांत प्रथम या बंधनयुक्त समाजापासून स्वतःची सुटका केली पाहिजे. कुटुंबाच्या सनातनी विचारांना झुगारून देऊन स्वतःच्या हक्कांसाठी झगडायला हवं.’’

‘‘भाषणं नको देऊस. तू व्यासपीठावर उभा नाहीस,’’ रूपा फणकारली. ‘‘ती हे सर्व कसं करू शकेल एवढंच सांग मला.’’

"तुम्हां सर्वांना परिस्थितीशी तडजोड करण्याची सवयच झाली आहे." अतुल मान हलवत म्हणाला, "तू सुद्धा माझ्याबरोबर अमेरिकेला चल. तुझी माझ्या मित्रमैत्रिणींशी ओळख करून देईन, लिंडाशी ओळख करून देईन. त्यामुळे तुझ्या विचारसरणीत नक्कीच फरक पडेल."

"ही लिंडा कोण?"

"लिंडाशी साखरपुडा झाला आहे माझा. इथून परतल्यावर लग्न करणार आहे मी तिच्याशी."

"सेजलशीही तीन वर्षांपूर्वी तुझा वाङ्‌निश्चय झाला आहे."

"तिच्याशी लग्न ठरवताना माझं मत किंवा माझी परवानगी कुणीच घेतली नाही. माझं प्रेम लिंडावर आहे, सेजलवर नाही. लग्न यशस्वी होण्यासाठी प्रेमाची गरज असते, रूढींची नाही."

"यामुळेच अमेरिकेत घटस्फोटाचं प्रमाण जास्त आहे का?"

अतुल चडफडत गप्प बसला. बहिणीकडून त्याने ही अपेक्षा केली नव्हती. याउलट आपल्यावतीने ती मध्यस्थी करून या लग्नाला मोडता घालील अशी त्याची जवळजवळ खात्री होती.

निराश होऊन अतुल पुढील ओसरीवर आला. त्याची नजर आजीच्या खुर्चीवर गेली. त्याला इथे सतत आसरा मिळत गेला होता. त्याच्या सर्व समस्या सोडवल्या गेल्या होत्या. हळूवारपणे त्याने खुर्चीच्या विटलेल्या, जीर्ण झालेल्या हातावरून हात फिरवला. त्या क्षणी त्याच्या मनात विचार आला की आजी आपली ही चिंता दूर करू शकेल का? परंतु त्याच्या ध्यानी आलं की ही समस्या तर तिनेच निर्माण करून ठेवली होती. तो तिथे विचार करत उभा असताना त्याची आई तिथे येऊन आजीच्या खुर्चीत स्थानापन्न झाली. त्याला ते कसंतरीच वाटलं.

"तुझी आजी आज बऱ्याच दिवसांनी प्रथमच शांतपणे झोपली आहे." ती म्हणाली, "तुझ्या येण्याने तिच्या प्रकृतीत चांगलाच फरक पडला आहे."

"हे फारच छान झालं. आता सर्व गोष्टींची एवढ्यातच घाई करण्याची गरज नाही."

"लग्न उद्याच होईल. या बाबतीत तुझ्या वडिलांचं आणि आजीचं एकमत आहे." ती थोडं थांबून पुन्हा म्हणाली, "याला घाई म्हणता येणार नाही. तुझ्या

आजीचं आता काहीच खरं नाही. त्यात तू पुन्हा अमेरिकेला गेल्यावर कधी परत येशील देव जाणे! सेजलला तरी असं किती दिवस ताटकळत ठेवायचं?''

''मला जर हे आधीच ठाऊक असतं तर मी इथे येण्याचा विचारही केला नसता. माझ्या भावनांची इथे कुणालाच कदर नाही असं आढळून येतं.''

त्याच्या आईने त्याच्यावर फक्त थंड नजर फेकली.

''माझं कुणीच का ऐकत नाही ? मी सेजलशी लग्न करू शकत नाही कारण मी एका अमेरिकन मुलीच्या प्रेमात पडलो आहे. तिच्याशी माझी एंगेजमेंट झाली आहे. माझ्या भविष्याच्या दृष्टीनेही तिच्याशी लग्न करणं फार महत्त्वाचं आहे. ''

''लग्न होईपर्यंत या गोष्टीचा तुझ्या वडिलांपाशी उल्लेखही करू नकोस.''

अतुल रागाने तिथून निघून गेला. तो जाणून होता की त्याच्या अमेरिकेतील कॉलेजशिक्षणासाठी त्याला जरी शिष्यवृत्ती मिळाली असली तरी विमानाच्या भाड्याचा व सुरुवातीच्या राहण्याचा खर्च त्याच्या वडिलांनी कर्ज काढून उभा केला होता. त्याच्या लग्नात येणाऱ्या हुंड्यातून हे कर्ज फेडलं जाणार होतं. यासाठीही सर्वांना त्याच्या लग्नाची घाई झाली होती. आजी केवळ निमित्तमात्र होती.

आईशी झालेल्या संभाषणानंतर आपली या लग्नातून सुटका होईल याची शक्यता फारच कमी असल्याबद्दल त्याची खात्री पटली होती. आपल्या कुटुंबात त्याने यापूर्वी लिंडाबद्दल कुणाला काही कळवलं नव्हतं. त्यालाही आता फार उशीर झाला होता.

जवळच्या काही नातेवाइकांसोबत संध्याकाळी अतुलचं जेवण झालं. जेवताना अतुल गप्पच होता. त्यामुळे इतरही कुणी फारसं बोलत नव्हतं. त्यानंतर बरीच वडीलधारी मंडळी आजीच्या खोलीत जमली. डोळे उघडून आजीने मानेनेच खुशी व्यक्त केली व अतुलला आपल्याजवळ बोलावलं.

''मी आयुष्याच्या दोरीला घट्ट पकडून राहीन....'' आजीने छताकडे नजर लावत हळूहळू म्हटलं. जणू काही तिथे तिचं आयुष्य टांगलं होतं. ''उद्यापर्यंत.''

''आजी, नको ग बोलू असं. तू अजून बरीच वर्षं जगायला हवंस आमच्यासाठी,'' अतुलच्या डोळ्यांत अश्रू गोळा होऊ लागले. ''ही जवळची सर्व नातेवाईक मंडळी तुझ्या लग्नासाठी जमली असताना त्यांच्यासमवेत जेवणाचा समारंभ माझ्या नजरेसमोर पार पडावा एवढीच माझी इच्छा आहे,'' आजी मोठ्या कष्टाने श्वास घेत थांबत थांबत म्हणाली.

अतुलचा आवाजच हरवला.

अतुलच्या दृष्टीने दुसऱ्या दिवशीची सकाळ फार लवकर उजाडली. आज त्याच्या लग्नाचा दिवस. सर्व तयारी करून तो आजीला नमस्कार करण्यासाठी तिच्या खोलीत गेला. ती थोडीफार गुंगीतच होती. त्याने वाकून हळूवारपणे तिच्या माथ्यावर ओठ टेकले. तिच्या पायांना हात लावून तो खोलीतून बाहेर आल्यावर आपलं स्वातंत्र्य संपुष्टात आल्याचं त्याच्या ध्यानात आलं. त्याच्या तक्रारींकडे सर्वांनी दुर्लक्ष केलं. त्याला वराचा पेहराव अंगावर चढवावा लागला. त्याबरोबरच कपाळाला मुंडावळ्याही बांधण्यात आल्या. चालीरीतीप्रमाणे विवाहसोहळा मुलीच्या घरी न होता त्याच्याच घरी पुढील व्हरांड्यात पार पडला. लग्नानंतर वधू–वर आजीच्या खोलीत आले. खोलीत भीषण शांतता होती. नवरीच्या हातातील चुड्यांचा व तिच्या नव्याकोऱ्या शालूचा आवाज ती नमस्कारासाठी वाकली असता या स्तब्धतेचा भंग करून गेला. आईच्या मदतीने आजीचा कृश हात त्या दोघांच्या डोक्यावर फिरून त्यांना आशीर्वाद देत होता. त्यानंतर जेवणंही थोड्याफार शांततेतच पार पडली. घरामध्ये एक प्रकारची खिन्नता दाटून राहिली होती.

झोपण्यापूर्वी अतुल आजीच्या खोलीत जाऊन तिला भेटून आला. आजचा दिवस पाहू शकल्याबद्दल तिच्या आजारी चेहऱ्यावरही आनंद ओसंडत होता. जड अंतःकरणाने तिथून उठून अतुल आपल्या शय्यागृहात आला.

शय्यागृह फुलांनी सजवलं होतं. आज त्याच्या आयुष्यातील सर्वांत महत्त्वाचा व आनंदाचा दिवस. पण त्याचा चेहरा मात्र दुःखाने व निराशेने काळवंडला होता. लिंडाच्या आठवणीने आणि तिला तोंड द्यावं लागणार या भीतीने तो मनातून चांगलाच हादरला होता. त्याने वळून सेजलवर नजर स्थिर केली. पांढऱ्याशुभ्र जरीच्या साडीचा पदर अंगभर लपेटून दागिन्यांनी नटलेली, फुलांच्या गजऱ्यांनी भारावलेली त्याची नववधू मान झुकवून मोठ्या आशेने बिछान्याच्या कडेला अवघडून बसली होती. जवळच ठेवलेला पाण्याचा तांब्या तोंडाला लावून अतुल गटागट पाणी प्यायला.

"मी फार थकलो आहे आज. तू झोपून जा," आवाजात शक्य तेवढं मार्दव आणून अतुलने सेजलला सांगितलं. दोघांमधील संबंध कसा असावा हे फक्त तोच ठरवणार होता. तो विचार करत खुर्चीवर बसून राहिला. लिंडा समजूतदार मुलगी आहे. ती आपल्याला नक्कीच समजून घेईल. कुटुंबातील मोठा मुलगा असल्यामुळे

हे लग्न करून आपण आपलं कर्तव्य पुरं केलं. आईवडिलांनी, आजीने पसंत केलेली मुलगी सून म्हणून या घरात आणली. सेजलची पत्नी म्हणून निवड केली ती तिच्यावरील प्रेमामुळे मुळीच नव्हे. हा एक समझोता होता. त्यातून त्याची सुटका नव्हती.

आजीच्या आजाराविषयी आलेल्या फोनबद्दल तो इथे येण्यापूर्वी जेव्हा लिंडाशी बोलला तेव्हा ती तुटक शब्दांत त्याला एवढंच म्हणाली, ''ही तुझी समस्या आहे आणि ती तुझी तुलाच सोडवावी लागेल.'' या तिच्या विधानाने तो जरी दुखावला गेला असला तरी त्याला तिचं म्हणणं स्वीकारणं जरूर होतं. सर्व विचार करूनच तो आजीच्या भेटीसाठी घरी परतला होता. परंतु त्या वेळी स्वतःच्या लग्नाचा विचारही त्याच्या मनाला शिवला नव्हता.

दोन्ही हातांनी आपलं डोकं घट्ट दाबून धरत अतुलने टेबलावर टेकवलं व तो परतीच्या तारखेचा विचार करू लागला. आजी आता फार थोड्या दिवसांची सोबतीण होती. लग्न झाल्यावर आता फार वेळ इथे थांबण्याची जरूरही नव्हती. पण या मुलीचं काय? त्याच्या बहिणीने सांगितल्याप्रमाणे ती आता त्याची जबाबदारी होती. त्याने तिला सोडून दिल्यास तिचं पुन्हा लग्न होणं अवघड होतं. तिच्या कोणत्या अपराधाबद्दल तिला ही शिक्षा मिळत होती ?

अतुलने सेजलकडे दृष्टी वळवली. ती अजूनपर्यंत तशीच अवघडून बसून राहिली होती. कदाचित रात्रभर तशीच बसून राहणार होती. तो तिला उद्देशून म्हणाला, ''तू झोप आता. माझी वाट पाहू नकोस.'' ती त्यावर काहीच बोलली नाही. ती रडत असल्याचं त्याच्या ध्यानी आलं तेव्हा तो उठून तिच्याजवळ बसत हळूवारपणे तिला म्हणाला, ''विचार करण्यासाठी मला थोडा अवधी हवा आहे. माझ्या मनाची तयारी नसताना हे सर्व फार घाईत झालं. मी लवकरच परत जाणार आहे. पत्राने तुला सर्व खुलासा करीन.''

सेजल मुसमुसत तशीच बिछान्यावर पडली. अतुल बाजूच्या खुर्चीवर बसून रात्रभर विचार करत जागत राहिला.

आजी इच्छामरणी ठरली. म्हटल्याप्रमाणे दुसऱ्याच दिवशी तिचं प्राणोत्क्रमण झालं.

सातव्या दिवशी अतुल अमेरिकेला जाण्यास निघाला. त्याची आई त्याचाशी फार काही बोलली नाही. वडिलांची त्याच्याशी बोलण्याची जास्त इच्छा दिसली नाही. ते अधूनमधून त्याच्यावर फक्त रागाचा व तिरस्काराचा

कटाक्ष फेकत होते. निघण्यापूर्वी त्याने बहिणीला सेजलवर लक्ष ठेवून तिला मदत करण्यास सांगितलं. त्याचप्रमाणे सेजललाही आपलं कॉलेजशिक्षण पूर्ण करण्याविषयी आग्रह केला.

अतुल अमेरिकेला परतल्यावर जवळजवळ एका महिन्यानंतर न्यू हेवन कोर्टामार्फत सेजलच्या नावावर एक रजिस्टर्ड पत्र आलं. त्या पत्रामुळे सेजलच्या व अतुलच्या दोन्ही कुटुंबांत खळबळ माजली, रडारड सुरू झाली. अतुलच्या वकिलामार्फत सेजलला आलेली ती घटस्फोटाची नोटीस होती. तिने हा घटस्फोट न झगडता स्वीकारावा अशी तिला विनंतीही केली होती. अगोदरच दुःखी झालेल्या त्या कुटुंबावर हा जणू बॉम्बहल्लाच होता. सेजलची स्थिती फारच केविलवाणी झाली होती. तिच्या आईवडिलांना तोंड दाखवणं अतुलच्या कुटुंबालाही अवघड होऊन बसलं होतं. अतुलची आई सेजलला स्वतःच्या मुलीसारखं वागवत होती. अखेर दोन्ही कुटुंबांशी विचारविनिमय करून अतुलच्या आईने न्यू जर्सीमध्ये राहणाऱ्या आपल्या मामेभावाला पत्र लिहून सर्व हकिकत सविस्तरपणे कळवली व सेजलला मदत करण्यासाठी त्यांना गळ घातली. पुढील सर्व गोष्टी लगोलग घडल्या. मामांनी तिकीट पाठवून सेजलला आपल्याकडे बोलावून घेतलं. या सुरेख, निष्पाप व स्वाभिमानी मुलीला पाहून त्या पतिपत्नींचं काळीज गलबलून आलं. आपल्या भाच्याच्या अविचारी वागणुकीची त्यांना मनापासून चीड आली. त्यांनी तिच्यासाठी एका प्रसिद्ध वकिलाची निवड केली.

"तू आता मुळीच काळजी करू नकोस सेजल. तुझा यात काहीही अपराध नाही. आम्ही तुला सर्वतोपरी मदत करू," त्यांनी सेजलला धीर दिला. तिचा विनम्र स्वभाव, मूकपणे अंगावर पडेल ते काम आनंदाने करायची तयारी, हसतमुख चेहरा पाहून मामामामीही भारावून गेली होती. सल्ल्यासाठी त्यांनी न्यू यॉर्कहून आपल्या मुलालाही बोलावून घेतलं.

परतल्यानंतर अतुलने लिंडाला आपल्या लग्नाविषयी काही पत्ता लागू दिला नाही. त्याच्या दृष्टीने एकदा घटस्फोट मिळाल्यानंतर काही सांगण्याची गरजही भासणार नव्हती. ती दोघं जरी एकत्र राहत होती व लवकरच लग्न करणार होती तरीसुद्धा लिंडाला विश्वासात घेऊन सर्व सांगणं अतुलला प्रशस्त वाटलं नाही.

दोन-चार दिवसांतच लिंडाने आपण आपल्या डॉक्टरेटच्या संशोधनासाठी न्यूझीलंड व ऑस्ट्रेलिया येथे दोन महिन्यांकरता जात असल्याची बातमी त्याला दिली. परत आल्यावर लगेच लग्नाचे बेत आखण्याचा विचारही सांगितला. अतुल

खूश होता, कारण तोवर त्याच्या घटस्फोटाचा निकाल लागून ते प्रकरण कायमचं मिटणार होतं. ऑस्ट्रेलियाला जाण्यापूर्वी काही कामासाठी लिंडा न्यू जर्सीलाही जाऊन आली.

न्यू जर्सीहून परत आल्यावर तिने हळवं होऊन अतुलला विचारलं, "अतुल, पुढील दोन महिने मला ऑस्ट्रेलियाला वरचेवर फोन करशील ना? मला विसरणार तर नाहीस?"

"तू त्याची मुळीच काळजी करू नकोस. फोनच नाही तर पत्रंही पाठवत जाईन अधूनमधून," अतुलने तिला आश्वासन दिलं व ती निश्चिंत मनाने ऑस्ट्रेलियाला गेली.

लिंडा ही अतुलच्या भविष्यातील अलिबाबाच्या गुहेची तिळा होती. कॉलेजशिक्षण जवळजवळ संपवून तो स्टुडंट व्हिसावर ट्रेनिंगसाठी नोकरी करत होता. लिंडाशी लग्न होताच या देशात कायम राहण्याचा परवाना मिळणार होता. ही संधी हातची गमावण्याइतपत तो खचितच मूर्ख नव्हता.

कोर्टाच्या तारखेच्या जवळजवळ एक आठवडा आधी सेजल मामा-मामींबरोबर त्यांच्या मुलाकडे - अनिलकडे - न्यू यॉर्कला राहायला आली होती. अतुल परतण्यापूर्वी फक्त पाच-सहा दिवसच ती अतुलला भेटली होती. त्यांचा संसार कधीच थाटला गेला नव्हता. त्यामुळे पोटगीसाठी दावा करण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता. तिचा अमेरिकेला येण्याजाण्याचा खर्च, इथे राहण्याचा खर्च, तिला फसवून मनस्ताप दिल्याबद्दल नुकसानभरपाई व भारतीय कायद्याप्रमाणे तिचे सर्व दागिने तिला मिळण्याची सवलत एवढ्या गोष्टींची मागणी होती.

न्यू यॉर्कमधील तो आठवडा सेजलच्या जीवनात महत्त्वाचा व मोलाचा ठरला. अनिलच्या विनोदी व मनमोकळ्या स्वभावामुळे तिच्या चेहऱ्यावरील गांभीर्य हळूहळू नाहीसं होऊन ती पूर्ववत आनंदी दिसू लागली होती. तिची सहनशक्ती, नम्रता व समजूतदारपणा यामुळे अनिल भारावून गेला. सेजलही कित्येक महिन्यांत मनमोकळेपणे हसली नव्हती.

कोर्टातून घरी परतण्यापूर्वी अनिलने सेजलला एका रेस्टोरॉंमध्ये नेलं. ऑर्डर देऊन झाल्यावर त्याने तिला विचारलं, "डिव्होर्स मिळाल्यानंतर काय करायचा विचार आहे तुझा?" त्याच्या अनपेक्षित प्रश्नाने सेजल गोंधळून गेली. थोडा वेळ विचार करून तिने उत्तर दिलं, "करण्याजोगं काय आहे माझ्या हाती? भारतात परत जाऊन कोणत्यातरी व्यवसायाचं - बहुधा शिक्षिकेचं - शिक्षण पुरं करीन.

त्यानंतर पुढेमागे स्वतंत्र राहण्याचा प्रयत्न करीन. आईवडील हयात असेपर्यंत त्यांच्याकडे राहणं शक्य होईल. परंतु भावांचा संसार सुरू झाल्यानंतर माझी अडगळ मी त्यांना भासू देणार नाही.'' एवढ्या लहान वयात पुढील परिस्थितीचा विचार करण्याची तिची वृत्ती पाहून अनिलचा तिच्याविषयीचा आदर दुणावला.

''तुला जर या केसमध्ये कोर्टातर्फे अतुलकडून काही पैसे मिळाले तर तू ते पैसे कसे खर्च करशील?''

''सर्वांत प्रथम मामांनी माझ्यासाठी केलेला विमानभाड्याचा खर्च आणि माझ्यासाठी केलेला राहण्याचा खर्च यांचे पैसे मी त्यांना परत करीन. उरलेच पैसे तर माझ्या लग्नापायी माझ्या आईवडिलांना झालेला खर्च परत करीन.'' तिचे डोळे अश्रूंनी भरून आले. ते पुसण्याचा प्रयत्न करत तिने विचारलं, ''मला अतुलकडून काही पैसे मिळण्याची खरंच काही शक्यता आहे का?''

''हो. माझ्या वकील मित्राच्या अंदाजाप्रमाणे फार नाही तरी तुला काही पैसे जरूर मिळावयास हवेत.''

सेजलच्या मुखातून एक हलका हुंदका बाहेर पडला. बहुधा तिला आपल्या आईवडिलांची, त्यांनी सोसलेल्या दुःखाची आठवण झाली असावी असं अनिलला वाटलं.

थोडा वेळ जाऊ देऊन त्याने तिला प्रश्न केला, ''पुन्हा लग्न करण्याचा विचार केला आहेस का तू?''

''एका लग्नाची ही कथा झाल्यावर भारतात कोण लग्न करील माझ्याशी?''

''मग इथे अमेरिकेतच राहण्याचा का विचार करत नाहीस?''

''कशाच्या जोरावर राहू मी इथे?''

आपला उजवा हात हळूवारपणे तिच्या डाव्या हातावर ठेवत व तिच्या भेदरलेल्या चेहऱ्यावर आपली नजर स्थिर करत अनिलने तिला विचारलं, ''माझ्याशी लग्न करायला तयार होशील तू सेजल?''

आपला हात न उचलता सेजलने डोळे मिटून घेतले. हे स्वप्न की सत्य याचा तिला उलगडा होईना. अनिल पुढे म्हणाला,

''मॉम आणि डॅड माझ्या इच्छेविरुद्ध जाणार नाहीत याबद्दल खात्री आहे माझी. मी त्यांची परवानगी मिळवीनच. प्रश्न तुझ्या संमतीचा आहे. आताच उत्तर देण्याची घाई नाही. विचार करून तुझा निर्णय कळव मला.''

कोर्टात सेजल उपस्थित राहणार हे समजल्यावर अतुल चांगलाच हादरला होता. तिला त्याच्याच मामामामींसमवेत पाहून तर त्याला अधिकच धक्का बसला.

सेजलपासून अतुलला घटस्फोट मिळाला. तिच्या विमानभाड्याचा खर्च, तिला अमेरिकेत राहण्यासाठी करावा लागलेला खर्च व तिला सहन कराव्या लागलेल्या दुःखाची भरपाई यासाठी त्याच्या खिशाला जवळजवळ ९००० डॉलर्सचा भुर्दंड बसला. स्वतःचे दागिनेही ती ठेवू शकणार होती. मनातल्या मनात अतुल बराच चडफडला. परंतु घटस्फोट मिळून या लग्नापासून सुटका झाल्याबद्दल थोडा खूशही झाला. लिंडाला आता या लग्नाचा काहीच सुगावा लागणार नाही म्हणून त्याने सुटकेचा निश्वास सोडला.

दोन आठवड्यां नंतर लिंडा ऑस्ट्रेलियाहून परतली. आल्यावर दुसऱ्याच दिवशी तिने आपलं सामान बांधण्यास सुरुवात केली. अतुल संध्याकाळी ऑफिसमधून परतण्यापूर्वीच आपलं बरंचसं सामान तिने घरातून हलवलं होतं. त्याला काहीच उलगडा होईना. तो आवाज जरा चढवून तिला म्हणाला, "लिंडा, तू परत आल्यावर आठवड्याच्या आत आपल्या लग्नाची नोटीस देण्याचं आपण ठरवलं होतं. तू हे काय चालवलं आहेस? कुठे निघालीस?"

लिंडा शांतपणे उद्‌गारली, "माझ्याशी अप्रामाणिकपणे वागणाऱ्या माणसाशी लग्न करण्याची माझी मुळीच इच्छा नाही."

अतुल मनात चमकला. "मी तुझ्याशी काय अप्रामाणिकपणा केला ते तरी सांगशील?"

"मला न कळवता भारतात जाऊन तू लग्न केलंस. मी भेटून आले तुझ्या पत्नीला."

"मला समजून घेण्याचा प्रयत्न कर थोडा. अगदी नाइलाज झाला होता माझा. सर्वांनी मिळून लग्नाची सक्ती केली माझ्यावर." तो क्षणभर थांबून दीर्घ श्वास घेत म्हणाला, "दोन आठवड्यांपूर्वी घटस्फोट मिळाला मला. मी त्या लग्नबंधनातून मुक्त झालो आहे."

"एका निष्पाप मुलीचा नाहक बळी देऊनच ना? मी ऑस्ट्रेलियाला जाण्यापूर्वी तुझ्या मामांचा मला फोन आला होता. त्या वेळी भेटून आले मी सेजलला. अतिशय निष्पाप, साधी मुलगी आहे ती. तिचं आयुष्य तर तू बरबाद केलंसच, पण मलाही

कशाचा थांगपत्ता लागू दिला नाहीस. मी तुझी पत्नी होणार आहे यासाठी तरी विश्वासात घेऊन मला मोकळेपणी सर्व सांगायला हवं होतंस. स्वार्थापायी तू इतका आंधळा झाला होतास की तुला आई, वडील, बहीण, पत्नी किंवा प्रेयसी या सर्व नात्यांचा विसर पडला. So long,'' एवढं बोलून लिंडा घरातून निघून गेली. अतुल धाडकन सोफ्यावर कोसळला व ओक्साबोक्शी रडू लागला. त्याच्या सर्व आशाआकांक्षांचा एका क्षणात चुराडा झाला होता.

दोन-अडीच महिने असेच उलटून गेले. एका छोट्या समारंभात सेजलचा अनिलशी विवाह पार पडला. आपले सासूसासरे व पती यांच्यासोबत सेजल आपल्या लग्नाच्या रिसेप्शनसाठी मुंबईला जाण्याकरता न्यू यॉर्कच्या इंटरनॅशनल विमानतळावर विमानात चढण्यासाठी रांगेत उभी होती. स्टुडंट व्हिसा संपुष्टात आल्यामुळे व ग्रीन कार्डची नकारघंटा मिळाल्यामुळे मायदेशी परत जाण्यासाठी अतुल त्याच विमानात चढत होता.

◈◈◈◈

# कशासाठी हा अट्टाहास !

निमा ही माझी प्राथमिक शाळेपासूनची जिवाभावाची मैत्रीण. निमा–सुमाची जोडी म्हणून आम्ही ओळखल्या जात होतो. सुमित्रा या माझ्या नावाचं सुमा हे छोटं रूप तर निमा हे नीलिमाचं. तसं पाहिलं तर आम्हां दोघींत काहीही साम्य नव्हतं. मैत्रीचा साधारण विभाजक सोडल्यास. परंतु 'unlike poles attract' हा फिजिक्सचा सिद्धान्त इथे लागू पडला होता हे मात्र खरं. निमा गोरीपान, सुरेख, काळेभोर केस असलेली, मोठ्या व बोलक्या डोळ्यांची; तर माझा रंग सावळा, तोकडे केस व बारीक डोळे. नाकी–डोळी नीटस असले तरी तिच्यापुढे कधीच उठून दिसले नाही. मी दहाजणींत तर ती शंभरजणींत उठून दिसणारी. तिचे आई–वडील डॉक्टर असून घरात भरपूर पैसा, गाड्या, नोकर–चाकर होते. मी मॅट्रिकपर्यंत शिक्षण झालेल्या एका सरकारी कारकुनाची, दोन खणांच्या चाळीत राहणारी मुलगी. आईचं शिक्षणसुद्धा मॅट्रिकपर्यंतच झालेलं. परंतु तिला वाचनाची फार आवड होती. ओव्या व कविता लिहिण्याचा तिला नाद होता. संतवाङ्मय तिने अनेक वेळा वाचलं होतं व ती त्यावर चर्चाही करत असे. आपल्या वाचनाच्या आवडीची देणगी तिने मलाही दिली होती. वडिलांची शास्त्रीय संगीताची आवडही मी उचलली होती. निमा दोन भावांवर झालेली एकुलती एक मुलगी व त्यात शेंडेफळ असल्यामुळे घरात सर्वांची फार लाडकी होती. मी माझ्या आईवडिलांची उतारवयात झालेल्या तीन मुलींतील वडील बहीण असल्यामुळे बरीच जबाबदारी खांद्यावर बाळगत होते. काहीही असलं तरी आमची मैत्री मात्र पक्की होती.

स्वतःच्या घरी सर्व सुबत्ता असूनही निमा आपल्या घरी जाण्याऐवजी माझ्या घरी येणं जास्त पसंत करत असे. आपल्या श्रीमंतीचा गर्व तिला कधीच नव्हता. मला तिचं मोठं, नीटनेटकं, आधुनिक घर, स्वैंपाक्याने बनवलेले केक्स व बिस्किटं,

समोसे खाणं आवडत असे. ती आमच्या घरी आली की सतत माझ्या आईभोवती घोटाळत असे. पहिल्याच भेटीत ''आई, मी तुम्हांला 'ए आई' म्हटलं तर चालेल का? माझ्या आईला मी मम्मी म्हणते, पण मला आई म्हणायला जास्त आवडतं,'' असं विचारून तिने माझ्या आईचं मन प्रथम भेटीतच जिंकलं. ''आई, आम्ही घरी येतो तेव्हा तू नेहमी घरी असतेस म्हणून मला इथे यायला आवडतं. नाहीतर आमच्याकडे फक्त नोकर आमच्या स्वागतासाठी तयार असतात नेहमी,'' किंवा ''आई, मला किनई तू केलेले पोहे, थालीपिठं, पिठलं खूप आवडतं. आमच्या घरी हे पदार्थ कधीच होत नाहीत,'' असं म्हणत आईने पुढे केलेल्या पदार्थांवर ती ताव मारत असे. आईलाही तिचं फार कौतुक वाटे. माझ्या छोट्या बहिणीसुद्धा तिच्याकडे आदराने पाहत असत. अशी ही आमची मैत्री निमा मेडिकल कॉलेजमध्ये जाईपर्यंत टिकून राहिली.

एस.एस.सी. झाल्यानंतर ती कॉलेजमध्ये सायन्सला, तर नोकरी करणं भाग पडल्यामुळे मी आर्ट्सला दाखल झाले. असं असूनही आम्ही नित्यनेमाने भेटत होतो. ती मेडिकलला गेल्यानंतर मात्र या भेटी कमी होत होत जवळजवळ बंद झाल्या. त्यानंतर भेट झाली ती काही वर्षांनी तिच्या व राजीवच्या लग्नात. राजीवही डॉक्टर होता व निमाही ह्या वेळेपर्यंत मेडिकल कॉलेजमधून यशस्वीरीत्या बाहेर पडली होती. लग्नानंतर सहा महिन्यांतच दोघंही अमेरिकेला जाणार होती. पुढे ती वाशींग्टन डी. सी. भागात असल्याचं कळलं तेव्हा आमचा संबंध पूर्णपणे तुटला होता.

काही महिन्यांतच माझंही लग्न अनिलशी, एका आर्किटेक्टशी झालं. बहिणीही ग्रॅज्युएट होऊन मार्गाला लागल्या होत्या. मधलीने स्वतःचं लग्न जुळवलं होतं. एक-दोन वर्षांतच अनिलने अमेरिकेत येण्याचं ठरवलं. आम्ही प्रथम टेक्ससला आलो व पुढे काही वर्षांनी नॉर्दर्न व्हर्जिनियात स्थायिक झालो. एक दिवस आम्ही एका पार्टीला गेलो असता ''अगं सुमा, तू? काही बदल झाला नाही तुझ्यात. एवढ्या वर्षांत अगदी होती तशीच राहिली आहेस,'' असं म्हणत एक स्त्री माझ्याजवळ आली. अगदी तोकडे केस व लांब काळा झगा या नव्या अवतारात निमाची ओळख पटणं मला जरा अवघड गेलं. परंतु तिने मारलेल्या मिठीत आजवरच्या विरहाचे पडदे बाजूला सारून बालपणच्या मैत्रीचे धागे पुन्हा जुळले.

निमा एक प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून प्रख्यात होती. आपल्या प्रेमळ, परोपकारी व आनंदी स्वभावामुळे ती एक यशस्वी व पॉप्युलर डॉक्टर म्हणून

ओळखली जात होती. राजीव अॅनॅस्थेशियॉलॉजिस्टचा व्यवसाय करत असला तरी फारसा धडपड्या नव्हता. त्याच्या भारतीय नवरेपणात फारसा फरक पडला नव्हता.

निमाला दोन्ही मुलीच होत्या. थोरली मोना व धाकटी सोना. दोघीजणींत जवळजवळ आठ वर्षांचं अंतर होतं. मोना सात वर्षांची होईपर्यंत तिची आबाळ होऊ नये म्हणून तिच्या आजी-आजोबांकडे म्हणजे निमाच्या आईवडिलांकडे वाढली होती. निमा-राजीवचा रेसिडेन्सी संपवून इथे जम बसल्यानंतर तिला इथे आणण्यात आलं होतं. ती घरी आल्यानंतर एक वर्षाच्या आतच सोनाचा जन्म झाला.

सात वर्षांची होईपर्यंत मोनाचा फारसा सहवास न घडल्यामुळे निमाला तिला कुठे ठेवू, कुठे नको असं वाटत होतं. ती मोनावर भेटींचा, वस्तूंचा, प्रेमाचा वर्षाव करून आजवर न करता आलेल्या लाडांची भरपाई करण्याचा अट्टाहास करत होती. निमा तिच्याशी सतत बोलण्याचा प्रयत्न करून मोनाला बोलतं करण्याची आशा बाळगत होती. परंतु मोना बरीच अबोल, थोडीफार एककल्ली, अलिप्त असल्याचं तिच्या ध्यानी येऊ लागलं. मोना विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं देई, पण स्वतःहून काही बोलण्याचा प्रयत्न करीत नसे. तिची वाक्यंही दोन-तीन शब्दांच्या वर नसत. घरात कुणाशी बोलण्याऐवजी टी.व्ही. पाहणं ती जास्त पसंत करत असे. सुरुवातीला राजीवनेही तिच्याशी संवाद साधण्याचा, तिला गोष्टी वाचून दाखवण्याचा बराच प्रयत्न करून पाहिला. परंतु तोही त्यात अयशस्वी झाला. मोना फारसं बोलत नसे व गोष्टी ऐकण्यात उत्साहही दाखवत नसे. शेवटी कंटाळून राजीवने मोनाचा नाद सोडून दिला व तिची जवळजवळ सर्व जबाबदारी निमाला उचलावी लागली.

मोनामध्ये काहीतरी उणीव असल्याचं पहिल्या एक-दोन महिन्यांतच निमाच्या ध्यानी आलं. फोनवरून तिने आपल्या आईकडे त्याबद्दल विचारणा केली.

''मम्मी, तुला नाही वाटत मोना इतर मुलींहून वेगळी आहे? ती फार कमी बोलते. अनेकदा काय बोलते ते कळतही नाही.''

''लहान आहे ती अजून. त्यात एवढ्या लहान वयात आईवडिलांपासून दूर राहिलेली.''

''पण ती इतर मुलांशी खेळतही नाही. टी.व्ही. तरी पाहात राहते, नाहीतर मोठ्यांच्या आसपास घोटाळते.''

“अगं, तिथली भाषा जरा वेगळी आहे म्हणून असेल कदाचित. तुम्हां अमेरिकेतील लोकांचा, डॉक्टरांचा स्वभावच संशयी आहे बघ. सारख्या काही ना काही शंका काढत असता कशाबद्दल तरी. कारणाशिवाय काळजी करण्याची सवयच आहे बघ तुम्हां लोकांना. सुधारेल ती हळूहळू. जरा रुळू दे तिला.”

निमाने आणखी काही दिवस वाट पाहण्याचा विचार केला. खरं असेल मम्मीचं म्हणणं कदाचित. आपण निष्कारण काळजी करत बसलो आहोत.

निमाच्या मनाचं समाधान फार काळ टिकू शकलं नाही. महिन्याभरातच तिला मोनाच्या शाळेतील काउन्सेलरचा, मोनाच्या वागणुकीबाबत चर्चा करण्यासाठी भेटण्यास येण्याबद्दल फोन आला. निमाच्या मनात पाल चुकचुकली.

ठरलेल्या दिवशी ती व राजीव मोनाच्या शाळेत मीटिंगसाठी हजर झाले.

“डॉ. भावे, मोनामध्ये काही उणीव किंवा तिच्या वागण्यामध्ये काहीतरी वेगळेपणा असल्याचं तुम्हांला आढळून आलं आहे का?” शाळेच्या काउन्सेलरनी मुद्द्यालाच हात घातला.

निमाने स्वतः केलेलं मोनाचं निरीक्षण व आपल्या आईशी त्याबद्दल झालेलं संभाषण त्यांच्या कानी घातलं.

शाळेतही ह्या गोष्टी शिक्षिकांच्या ध्यानात आल्या होत्या. त्यांच्या मते मोना नेहमी मोठ्यांच्या मागेमागे असते. ती बरोबरीच्या मुलांशी खेळायला मुळीच तयार नसते. तिच्या बोलण्यातही बराच दोष असून ती आपल्या मनातील भावना, गोष्टी बोलून दाखवू शकत नाही. त्याचप्रमाणे तिच्या वयाच्या मुलांच्या मानाने ती लिहिण्या-वाचण्यातही बरीच मागे आहे. या सर्व गोष्टी निमा व राजीवला कळवण्यात आल्या. तिला स्पेशल एज्युकेशनची गरज असून त्यासाठी प्रथम शैक्षणिक व मानसिक चाचणी घेण्यासाठी त्यांची परवानगी घेण्यात आली.

सर्व चाचण्या पुऱ्या झाल्यानंतर पुन्हा मीटिंग बोलावण्यात आली. व्यवसायाचं निमित्त सांगून त्या मीटिंगला हजर राहण्यास राजीवने नकार दिला. त्याच वेळी निमा समजून चुकली की यापुढे मोना आपली एकटीची जबाबदारी ठरणार. दुसऱ्या मीटिंगचा एकंदरीत सारांश असा की, मोनाला स्पीच व लँग्वेज डिसेबिलिटी असून तिला स्पीच व लँग्वेज थेरपीची अत्यंत आवश्यकता आहे. तिला लर्निंग डिसेबिलिटी असून ती शिकण्यातही थोडी मंद आहे व त्यासाठी तिला स्पेशल एज्युकेशनची गरज आहे. तिच्या पालकांची परवानगी असल्यास या सर्व सर्व्हिसेस तिला शाळेतर्फे पुरवण्यात येतील.

आपल्या हृदयाची धडधड थांबत थांबत चालत असल्याचा भास निमाला क्षणभर झाला. तिचं मन या सर्व गोष्टींचा स्वीकार करण्यास मुळीच तयार नव्हतं.

तिसऱ्या दिवशी मोनाचं पब्लिक स्कूलमधील नाव काढून निमाने तिला खाजगी शाळेत दाखल केलं. या शाळेत विद्यार्थी व शिक्षक यांचं प्रमाण बरंच कमी असल्यामुळे तिला हवी तेवढी दक्षता मिळू लागली. मोनाची स्पीच थेरपीही खाजगीरीत्या सुरू करण्यात आली. तिच्या वागण्यात व अभ्यासात थोडीफार प्रगती दिसू लागली.

बरोबरीच्या मुलांशी मात्र मोना कधीच जवळीक साधू शकली नाही. ती एकटीच खेळणं पसंत करीत असे. याच सुमारास व्यवसायाचा व्याप आणि त्याबरोबरच ताण वाढल्याने व सोनाचाही जन्म झाल्यामुळे निमाचं मोनाकडे थोडंफार दुर्लक्ष होऊ लागलं. तिला अपराधीपणाची भावना वाटू लागली, सतावू लागली.

दोन्ही मुली भराभर वाढत होत्या. माझी स्पेशल एज्युकेशनमध्ये व त्यातल्या त्यात लर्निंग डिसेबल्ड व मंदगती मुलांना शिकवण्याची स्पेशलिझेशन आहे हे जाणून निमाने मोनाला ट्यूशन देण्याची मला गळ घातली व मी ते काम आनंदाने स्वीकारलं. धाकटी सोना अभ्यासात तर अतिशय हुशार होतीच, पण स्पोर्ट्स् व नाचातही प्रवीण असून त्यात बक्षिसं मिळवत होती. राजीवचा तिच्यावर फार जीव होता. तो मोनाशी मात्र फक्त कामापुरतं किंवा तिच्यावर रागावण्यापुरतं बोलत असे. मोनाने त्याचा धसकाच घेतला होता.

निमा मात्र आपल्या परीने मोनासाठी जे काही करता येणं शक्य होतं ते करण्याचा प्रयत्न करत होती. खाजगी शाळा फक्त आठव्या इयत्तेपर्यंतच उपलब्ध असल्यामुळे नववीपासून तिने मोनाला स्पेशल एज्युकेशनसाठी नाइलाजास्तव पब्लिक स्कूलमध्ये पाठवलं. मोना दिवसेंदिवस स्वार्थी, आळशी व एकलकोंडी बनत चालली होती. तिच्या बोलण्यात, भाषेत वा वागण्यात फारसा फरक पडला नव्हता. शिक्षणातही ती तिच्या वयाच्या मुलांच्या तुलनेत जवळजवळ पाच-सहा वर्षं मागे होती. या सत्याचा स्वीकार करण्यास निमा मात्र अद्याप तयार नव्हती. मोना शाळेतून डिप्लोमा मिळवून बाहेर पडल्यावर निमाने तिला कम्युनिटी कॉलेजमध्ये जाणं भाग पाडलं. दोन प्रायव्हेट ट्यूशन्स, दर आठवड्याला माझं मार्गदर्शन मिळाल्यावर जवळजवळ आठ वर्षांनी मोना कम्युनिटी कॉलेजची ए.ए.डिग्री मिळवण्यात यशस्वी झाली. तिने टीचर असिस्टंट बनण्यासाठी चाइल्ड

केअरचा कोर्स पुरा केला. या कालावधीत ड्रायव्हिंग लायसन्स मिळवून ती सुरक्षितपणे ड्रायव्हिंगसुद्धा करत होती. कामाचा मात्र तिला फार कंटाळा असे. कोणत्याही कामासाठी तिच्यावर अवलंबून राहणं शक्य होत नसे. ती ते पुरं करीलच याची खात्री देता येत नसे. धाकटी सोना दुसऱ्या राज्यात कॉलेजमध्ये शिकत होती. निमा मात्र अजूनही मोनाच्या नर्स किंवा शिक्षिका होण्याची स्वप्नं रंगवत होती. मध्यंतरीच्या काळात राजीवला हृदयविकाराचा झटका आल्यामुळे ट्रिपल कॉरोनरी बायपास सर्जरीच्या दिव्यातून पार पडावं लागलं होतं. त्या वेळेपासून त्याने घरातील अनेक बाबींतून अंग काढून घेतलं होतं.

मोनाला या वयात मित्र तर नव्हतेच, परंतु फारशा मैत्रिणी गोळा करण्याच्या कामीही ती अयशस्वी ठरली होती. जिवाभावाची अशी तिच्या वयाची एकही मैत्रीण तिला नव्हती. काही महिन्यांपूर्वी मॅक्डॉनल्ड या फास्ट फूड रेस्टोरांत काम करत असताना तिच्याबरोबर काम करणारी तिच्याच वयाची मुलं व मुली ती व्हर्जिन आहे म्हणून तिची खूप चेष्टा करीत असत. मोना याबाबत निमाकडे किंवा कुणा मैत्रिणीकडे बोलू शकत नसल्यामुळे तिच्या मनाचा फार कोंडमारा होई. शेवटी कंटाळून तिने मॅक्डॉनल्डची नोकरी सोडली व ती एका डे केअर सेंटरमध्ये टीचर असिस्टंट म्हणून काम करू लागली.

मोनाला जिवाभावाची अशी एकच मैत्रीण होती व तीसुद्धा तिच्याहून फार मोठी. तीही दुसरी-तिसरी कुणी नसून मीच - म्हणजे गेली पंधरा वर्षं तिला ट्यूशन व सल्ला देणारी सुमामावशीच होते. अधूनमधून मोना माझ्यापाशी आपलं मन मोकळं करत असे.

"मावशी, एक प्रश्न विचारू?"

"एकच का? अनेक विचार."

"मावशी, व्हर्जिन म्हणजे काय गं?"

"तू हा शब्द कोणाकडून ऐकलास, मोना?"

"मी ज्या मॅक्डॉनल्डमध्ये काम करत होते तिथे सर्व को-वर्कर्स मला व्हर्जिन म्हणून चिडवत असत. व्हर्जिन असणं इतकं का वाईट असतं, मावशी?"

मी मोनाला व्हर्जिन या शब्दाचा अर्थ तर समजावून सांगितलाच, पण त्याबरोबरच काही 'फॅक्ट्स् ऑफ लाइफ' समजावून दिल्या. अमेरिकन व भारतीय संस्कृतीमधील फरकसुद्धा तिला समजेल अशा भाषेत समजावून सांगितला. जी गोष्ट आपल्या संस्कृतीमध्ये चांगली व आदरणीय समजली जाते तीच गोष्ट पाश्चात्त्य

संस्कृतीत जुनाट, बुरसटलेल्या विचारांची, काहीजणांना कमीपणाची वाटणारी ठरते हेही पटवण्याचा प्रयत्न केला. तिची आई गायनॅकॉलॉजिस्ट असतानाही तिच्या मुलीला या गोष्टी समजावून सांगण्याची वेळ माझ्यावर यावी याचा मला खेद वाटला.

आपल्या घराण्यातील इतर नातेवाईक मुलींप्रमाणे मोनालाही डॉक्टर नवरा मिळावा यासाठी आता निमाची धडपड सुरू झाली. माझ्या मनाची घालमेलही तितक्याच वेगाने सुरू झाली. एके दिवशी मी तिला लंचसाठी घरी बोलावलं व मोनाचा विषय काढला.

"मोनाच्या भविष्याबद्दल तू काय ठरवलं आहेस, निमा?"

"ती इतर मुलींप्रमाणेच आहे. तिचं लवकरच लग्न करण्याचं ठरवलं आहे मी."

"तिच्या नावावर भरपूर पैसे ठेवले आहेस ना?"

"हो, इतके की तिला जन्मभर पैशांची ददात भासणार नाही."

"गरज पडेल तेव्हा तिला सहजपणे मिळू शकतील ना?"

"हो. केव्हाही."

"तिच्या नवऱ्याने सर्व पैसे स्वतःच्या नावावर केले तर?"

"तिच्या नावावर बरेच पैसे आहेत. तिला काहीही कमी पडणार नाही."

"निमा, माझं बोलणं शांतपणे ऐकून घे. ती सहजपणे पैसे काढू शकेल अशी व्यवस्था करू नको. ट्रस्ट कर तिच्या नावे."

"तू माणसांवर विश्वास ठेवायला का तयार होत नाहीस, सुमा?"

"मोना भाची आहे माझी. तिला कोणत्याही प्रकारे हानी पोहोचलेली सहन होणार नाही मला."

"ती मुलगी आहे माझी हे विसरलीस. तिचं भलं व्हावं अशी माझीही मनापासून इच्छा आहे."

"म्हणूनच म्हणते तुला की ट्रस्ट कर तिच्या नावाने. ट्रस्टीज ठरवतील तिला कधी व किती पैसे मिळावेत ते."

या संभाषणातील गंभीरता निमाच्या ध्यानात आली की नाही कोण जाणे! पण मैत्रिणीने तगादा लावल्यामुळे ती व राजीव वकिलामार्फत मोनाच्या नावे ट्रस्ट

करून आले. मोनाला पैसे देताना तिला ते का हवेत, किती हवेत व त्यांची तिला खरोखरच गरज आहे का याची शहानिशा करून फक्त ट्रस्टीजकडून तिला पैसे मिळण्याची व्यवस्था करण्यात आली होती. मी मनापासून समाधानाचा सुस्कारा सोडला.

त्यानंतर जवळजवळ अडीच-तीन महिन्यांनी मला प्रथम निमाचा व नंतर मोनाचा असे दोन फोन आले. सांगलीच्या एका डॉक्टरशी मोनाचं लग्न निश्चित करण्यात आल्याची बातमी होती. दोन आठवड्यांनी लग्न सांगलीला होणार होतं. मोनाबद्दल त्या डॉक्टरला सर्व हकिकत उघडपणे, मोकळेपणे सांगितली होती असं मला निमाकडून कळलं. मोनाची फंक्शनल पातळी, जाणण्याची, समजण्याची पातळी नऊ ते दहा वर्षं वयाच्या मुलीएवढी आहे हे त्याला कळवण्यात आलं असूनही त्याने तिचा पत्नी म्हणून स्वीकार करण्याचा विचार कळवला होता. त्यामुळे तो अत्यंत उदार मनाचा आहे अशी निमाची ठाम समजूत झाली होती. मुलगा गरिबीत वाढला होता व त्याला अमेरिकेत येण्याची अत्यंत निकड होती. इथे येण्याची ही चांगली संधी असल्याचीही कबुली त्याने निमाजवळ दिली होती. अॅन्जायनाचा अटॅक आल्यामुळे राजीव लग्नाच्या वाटाघाटींसाठी जाऊ शकला नव्हता. का कोण जाणे, पण आनंद होण्याऐवजी ही बातमी ऐकून माझ्या मनात मोनाविषयी काळजी वाटू लागली. कुठेतरी अशुभाची पाल चुकचुकली.

सांगलीला लग्न झाल्यावर इथे येऊन निमाने मोनाच्या लग्नाचं रिसेप्शन धूमधडाक्याने पार पाडलं. राजीव बराच अलिप्त राहिल्यासारखा वाटत होता. मोनाचे पतिराज रेसिडेन्सीच्या शोधात होते व ती आपल्याच हॉस्पिटलमध्ये मिळवून देण्याच्या खटपटीत निमा होती.

आठवड्याभरातच आपला पती रोहन याच्यासह मोना माझ्या घरी मला नमस्कार करण्यासाठी आली. ती माझी व रोहनची प्रथम भेट. मुलगा स्मार्ट व देखणा होता, डॉक्टर होता. असं असताना त्याने थोड्याशा बावळट वाटणाऱ्या, काळ्यासावळ्या, मंद बुद्धीच्या मुलीशी का लग्न करावं? केवळ पैशांसाठी? की अमेरिकेत येण्याची संधी मिळावी म्हणून? निमा इतकी आंधळी का व्हावी? केवळ डॉक्टर जावई मिळावा म्हणून? माझ्या मनात विचारांचं थैमान सुरू झालं. रोहनच्या बोलण्याने मी भानावर आले. तो सांगत होता, "आंटी, मोनाला काही दिवस आपल्या घरी ठेवा आणि घरकाम नि स्वैंपाक करायला शिकवा. घरी हाऊसकीपर असल्यामुळे ती फार आळशी झाली आहे." मला धक्काच बसला.

आठवड्यापूर्वीच इथे आल्यावर मोनाशी ओळख झालेल्या या सद्‍गृहस्थाला ती आळशी आहे हे कसं कळलं? तिने तर नोकरी करून कॉलेज पुरं केलं होतं. त्याचं ते बोलणं मला मुळीच रुचलं नाही. त्याने आणखीही मुक्ताफळं उधळण्यास सुरुवात केली.

"आंटी, नोकरी करण्यापेक्षा मोनाने घरी राहावं असं मला वाटतं. नाहीतरी लहान, बंडखोर मुलांबरोबर काम करून ती फार दमते. शिवाय मलाही घरकामाची मुळीच सवय नाही आणि या वयात ते जमेल असंही वाटत नाही."

"आंटी, मोनाची बी.एस. पर्यंत शिकायची फार इच्छा आहे. पण माझ्या दृष्टीने तिची तेवढी कुवत नाही आणि जास्त शिकून तरी ती काय करणार आहे? शेवटी मुलांनाच सांभाळणार ना? तुम्ही तिच्याशी बातचीत करा. ती फार मानते तुम्हांला."

मला काही हे लक्षण चांगलं वाटलं नाही. मी निमा व मोना या दोघींना वेगवेगळं भेटीला बोलावलं. त्याच दिवशी संध्याकाळी मोना माझ्याकडे आली व आल्याआल्याच माझ्या खांद्यावर मान टाकून स्फुंदून स्फुंदून रडू लागली. मी थोडा वेळ तिच्या भावनांचा आवेग ओसरू दिला. तिला बोलतं कसं करावं हे गेली पंधरा वर्षं मी जाणून होते. तिच्या पाठीवर हळूच थोपटत मी तिला विचारलं,

"मोना, रोहन फार देखणा मुलगा आहे. पण त्याला आपलं इंग्रजी मात्र नक्कीच सुधारावं लागेल. नाहीतर पेशन्ट पोटाबद्दल तक्रार करील, तर हा त्याच्या लंग्ज्‌वर इलाज करायचा, दोघांनाही एकमेकांचं इंग्रजी न समजल्यामुळे."

माझ्या अपेक्षेप्रमाणे मोना एखाद्या निष्पाप बाळाप्रमाणे खुदकन् हसली.

"का रडत होतीस मोना?" मोनाचा चेहरा एकदम उतरला. हसू गायब झालं व डोळे पुन्हा आसवांनी भरून आले.

"मावशी, आई सारखी माझ्या तक्रारी रोहनला सांगत असते आणि तो सर्वांच्या पुढ्यात त्याबद्दल माझा अपमान करतो, काल तुझ्या पुढ्यात केला तसा. मी आळशीच आहे, मला स्वैंपाकच नीट करता येत नाही, माझ्या सवयी वाईट आहेत, मी गलिच्छपणे राहते, असं आई माझ्याबद्दल त्याला सांगते. माझ्या सवयी एवढ्या वाईट होत्या तर तिने त्या आतापर्यंत का नाही सुधारल्या? तिला कधी वेळच नसतो मला शिकवायला. मी आतापर्यंत जे काही शिकले ते तुझ्याकडे शिकले बघ," मोना स्फुंदत म्हणाली.

मोनाच्या बाबतीत निमाचं बरंच काही चुकलं होतं. वर्तमानपत्रसुद्धा वाचता न येणाऱ्या, तिसऱ्या-चौथ्या इयत्तेची पुस्तकं अडखळत वाचणाऱ्या, एक-दोन मिनिटांच्या वर कुणाशी संभाषण साधू न शकणाऱ्या आपल्या काळ्यासावळ्या मुलीचं, इथे येण्याची निकड असलेल्या डॉक्टरशी लग्न करून देण्याचा अट्टाहास तिने का केला? केवळ पैशांच्या जोरावर मी जावई विकत घेऊ शकते हे लोकांना पटवण्यासाठी?

रोहनच्या दृष्टीने त्याला सोन्याचं अंड देणारी कोंबडी सापडली होती. तिचा पैसा आपल्या हातात कधीच येणार नाही हे कळल्यावर तो काय करेल? त्याने आपले आई-वडील, बहीण-भाऊ इथे कायमचे आणल्यावर सर्वजण मोनाला कसं वागवतील? माझ्याकडे एकही उत्तर नव्हतं.

मोनाच पुढे म्हणाली, ''मी कॉलेजमध्ये न जाता वर्षभरात मूल होऊ द्यावं असं रोहनचं म्हणणं आहे. मी हॉस्पिटलमध्ये पडेल ते काम करीन, पण घरी आल्यावर काहीही करणार नाही असं त्याने सांगून टाकलं आहे.''

''मी बोलेन तुझ्या आईशी आणि रोहनशी,'' मी तिला आश्वासन देत म्हटलं, ''परंतु तुझ्या माझ्यात झालेली ही बातचीत आपल्यातच राहू दे. तू त्याबाबत कुणाजवळ बोलू नकोस.''

''मावशी, तुझ्या माझ्यात काय बोलणं होतं ते मी गेल्या दहा-पंधरा वर्षांत आईलाही कधी सांगितलं नाही.''

दुसऱ्या दिवशीच मी निमाला बाहेर जेवायला नेऊन रोहनशी झालेलं माझं संभाषण, त्याचा मोनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन व तिला कमी लेखण्याची त्याची सवय हे सारं समजावून सांगितलं. त्याला मोनाबद्दलच्या तक्रारी सांगितल्याबद्दल तिची कानउघाडणीही केली.

महिन्याभरातच मोना व रोहन यांनी निमाच्या घराजवळच एका अपार्टमेंटमध्ये आपला संसार थाटला. निमाच्या साहाय्याने मोनाने युनिव्हर्सिटीत एका कोर्ससाठी नाव दाखल केलं व ती पूर्ववत माझ्याकडे मदतीसाठी येऊ लागली. थोड्याच अवधीत तिचं वजन बरंच कमी झाल्याचं मला आढळून आलं. स्वतःची कॉफी करून घेण्यापलीकडे तिला रोहनची फारशी मदत मिळत नव्हती. तिच्याकडून अपेक्षा मात्र फार होत्या. मोनाच्या स्वैंपाकाला नावं ठेवणं, तिच्या घर स्वच्छ न ठेवण्याबद्दल तक्रार करणं, ग्रोसरी वेळेवर न आणल्याबद्दल तिला दाटणं या गोष्टी रोहन न चुकता वारंवार करत होता.

सेमेस्टर संपल्यानंतर माझी व मोनाची फारशी भेट झाली नाही. तिचा जेव्हा काही महिन्यांनंतर फोन आला तेव्हा तिला दिवस गेल्याचं व तिचे सासूसासरे तिच्याकडे आल्याचं तिच्याकडून कळलं. मीच तिला विचारलं,

"तू तर काळजी घेत होतीस एवढ्यात मूल नको म्हणून. मग हे कसं झालं?"

"आईने मला दिलेल्या बर्थ कंट्रोल पिल्स रोहनने फेकून दिल्या. मूल न होऊ देण्यासाठी इतर साधनं आहेत. मी गोळ्यांच्या विरुद्ध आहे असं तो म्हणाला. मला इतर साधनं ठाऊक नव्हती."

रोहनच्या रेसिडेन्सीच्या कामांमुळे तो दिवसातील अनेक तास हॉस्पिटलमध्ये कामात व्यग्र असे. अनेकदा लागोपाठ दोन-तीन दिवस घरी येऊ शकत नसे. अशा वेळी मोना माहेरी जाई व रोहनसाठी जेवण घेऊन परत येई. ग्रोसरी स्टोअर, लॉन्ड्री व माहेर या व्यतिरिक्त तिचा इतर कुणाशी फारसा संबंध येत नसे. नशिबाने डोहाळेही फार कडक नव्हते.

त्यानंतर निमाचा फोन आला तो मोनाला जुळ्या मुली झाल्या हे कळवण्यासाठी. मुलींसाठी भेटीदाखल काही वस्तू घेऊन मी मोनाला भेटण्यास गेले. जुळं व त्यात दोन्ही मुली झाल्याबद्दल मोनाजवळ रोहनने अनेकदा आपली नाराजी व्यक्त केली होती. खरं तर जुळी मुलं हा त्याच्या घराण्याला मिळालेला आशीर्वाद होता. त्याची धाकटी बहीण व भाऊ जुळे होते. मुली निमासारख्या गोऱ्या व सुरेख होत्या. मोनाचं मात्र अगदी चिपाड झालं होतं. सासू-सासरे एव्हाना भारतात परतले होते. त्यांच्या जाण्यायेण्याचा खर्चही निमाने केल्याचं मला मोनाकडून कळलं. मोनाची काळजी आता माझ्या मनात जास्तच घर करून बसत होती.

आपली जुनी हाऊसकीपर व स्वैंपाकासाठी एका भारतीय स्त्रीची सोय करून निमाने बाळंतपणानंतर मोनाची सासरी पाठवणी केली. तिची डे केअरमधील टीचर असिस्टंटची नोकरी रोहनने यापूर्वीच सोडायला लावली होती. आपल्यासारख्या डॉक्टरची पत्नी टीचर-असिस्टंटचं काम करते हे त्याला कमीपणाचं वाटत होतं. जुळं झाल्यावर नोकरी चालू ठेवणं मोनाला शक्य झालं नसतं. निमा आपल्या परीने करता येईल तेवढी मदत करण्याचा प्रयत्न करत होती. रोहनही तिचा व तिच्या पैशांचा उठवता येईल तेवढा फायदा घेत असे. रेसिडेन्सी पूर्ण झाल्यानतंर त्याने सासू-सासऱ्यांच्या जिवावर प्रायव्हेट प्रॅक्टिस सुरू केली.

धाकटी सोनाही आपलं वैद्यकीय शिक्षण पुरं करून रोहनच्याच हॉस्पिटलमध्ये रेसिडेन्सी करू लागली होती. रोहनही आता आपल्या प्रॅक्टिसमध्ये स्थिरस्थावर झाला होता. त्याने नवीन घर घेतलं होतं. तेही निमाने पुरवलेल्या पैशांमधूनच. आईवडिलांना या देशात आणण्यासाठी ग्रीन कार्ड मिळवलं होतं व ती दोघं इथे येण्याच्या मार्गावर होती. त्यांच्यामागून बहीण-भाऊही. मोना आपलं एकलेपणाचं जीवन मुलींना वाढवण्यात घालवत होती. माहेरा खेरीज तिला जाण्यासाठी फारशी ठिकाणंही नव्हती. तिला पुन्हा दिवस गेल्याचं कळलं. शक्य होईल तशी मी तिला मदत व थेरपी पुरवत होते. मन मोकळं करण्यासाठी तिला माझ्याशिवाय इतर कुणी नव्हतं. रोहनला या वेळी मुलगाच हवा असल्याचं मला मोनाकडून कळलं. रोहनने आपल्या प्रॅक्टिसमध्ये जम बसवला होता. परंतु मोनाला त्याचा सहवास क्वचितच मिळत असे.

सोनाने एके दिवशी ती धक्का देणारी बातमी घरी आणली. हॉस्पिटलमधील एका नर्सशी रोहनचे विवाहबाह्य संबंध होते हे तिला त्या नर्सकडून कळलं होतं. तो बहुतेक वेळा त्या नर्सच्या अपार्टमेंटमध्ये राहत असल्याचंही तिला कळलं होतं. सर्व ऐकल्यानंतर निमा बरीच हादरली. माझ्या मदतीने तिने रोहनची भेट घेऊन त्याची कानउघाडणी करण्याचा निश्चय पक्का केला.

आम्ही एका रेस्टोरांत त्याला भेटलो. त्याने निर्लज्जपणे कबुलीजबाब तर दिलाच, परंतु निमाला उलट सवाल करण्यासही त्याने मागेपुढे पाहिलं नाही.

''आंटी, तुम्ही जेव्हा आपल्या रिटार्डेड मुलीचं माझ्याशी - एका डॉक्टरशी - लग्न ठरवलंत तेव्हा असं काही होऊ शकेल हा विचारही तुमच्या मनाला शिवला नाही? एवढ्या तुम्ही आपल्या पैशाने आंधळ्या झाल्या होत्या?'' सार्वजनिक ठिकाणी नसतो तर त्याच्या मुस्कटात भडकवायलाही मी कमी केलं नसतं, एवढं माझं रक्त उकळत होतं.

''मोनाकडून मला नुकतंच कळलं की तिला मिळणारा सर्व पैसा ट्रस्टीजच्या हातात आहे. हे खरं आहे का?''

निमाने मुकाट्याने होकारार्थी मान हलवत उत्तर दिलं, ''तुझ्यासारखा नीच विचारसरणीचा जावई मिळाला तर मोनाचं रक्षण करण्याचा तोच एक उपाय माझ्यापाशी होता,'' एवढं कसंबसं बोलून ती उठली.

बाळंतपणासाठी मोना माहेरी आलेली होती. मुलगा होणार की मुलगी हे जाणून घ्यायचं निमाने ठरवलं. मोनाला पुन्हा मुलगी होणार आहे हे कळताच तिचं काळीज थरारलं.

यथावकाश मोनाने एका सुरेख मुलीला जन्म दिला. मुलीला एकदा पाहून गेल्यावर रोहनने पुन्हा तोंड दाखवण्याचा प्रयत्न केला नाही. महिन्या-दीड महिन्यांत मला निमाचा फोन आला. हुंदके देऊन रडता रडता बोलत असल्यामुळे ती काय सांगत आहे याचा मला अर्थबोध होईना. ती फोनवर काही सांगण्याच्या मनःस्थितीत नसल्याचं जाणून मी तिच्याकडे जायला उठले.

निमाच्या घरी पोहोचले तेव्हा राजीवला दोन मोठ्या नातींशी खेळता खेळता मोठ्यांदा हसताना पाहून मला आश्चर्याचा धक्काच बसला. पण तितकाच आनंदही झाला. निमाचे डोळे मात्र रडून रडून सुजलेले आढळले. मोना छोटीला घेऊन आपल्या खोलीत झोपली होती. मला काहीच उलगडा होईना.

''सुमा, आता कसं होणार गं या पोरीचं?'' निमाने गळा काढला.

''हे पाहा निमा, मला सर्व समजावून सांगशील का? की कोड्यातच ठेवणार आहेस?

''हे वाच म्हणजे कळेल तुला सगळं,'' असं म्हणत तिने एक लिफाफा माझ्या हाती ठेवला.

रोहनच्या वकिलामार्फत आलेली ती घटस्फोटाची नोटीस होती. वाचून फार वाईट वाटलं, दुःख झालं, पण आश्चर्य मात्र वाटलं नाही. हे असं काही घडेल याची मला यापूर्वीच थोडीफार कल्पना आली होती. नोटीस वाचून ती खाली ठेवून मी एकवार राजीव व निमाकडे निरखून पाहिलं. मुलींना फॅमिली रूममध्ये पिटाळून राजीव हळूहळू बोलू लागला.

''सुमा, निमाला आणि तिच्या भावांना पहिल्यापासून मोनासाठी डॉक्टर नवरा शोधण्याचा का मोह होता ह्या गोष्टीचा मला अजूनही उलगडा झालेला नाही. इथल्याच कुणा होतकरू मुलाची निवड करून त्याला प्रामाणिकपणे सर्व गोष्टींची समज देऊन मोनाचं लग्न करून द्यायला हवं होतं. परंतु भावांच्या अट्टाहासामुळे आणि थोड्याफार प्रमाणात निमाच्याही हट्टामुळे ती माझा सल्ला मानायला तयार नव्हती. रोहनने त्याला या देशात येण्याची किती निकड आहे आणि त्यासाठी काहीही करण्याची त्याची तयारी आहे हे लग्नाआधी कबूल केलेलं असल्यामुळे या सर्वांनी त्याची जावई म्हणून निवड केली. त्याचा इरादा कुणाच्याही ध्यानी येण्याजोगा होता. परंतु त्याकडे सर्वांनी जाणूनबुजून कानाडोळा केला. मोनाच्या बाबतीत माझंही बरंच काही चुकलं आहे. तिच्यातील मंदबुद्धीचा स्वीकार करणं मला शक्य झालं नाही. माझ्या नकळत मी तिच्यापासून दुरावत होतो.''

आवंढा गिळून तो काही क्षण स्तब्ध राहिला व डोळे पुसून पुन्हा बोलू लागला, ''यापुढे माझ्या या दुरावलेल्या मुलीच्या आयुष्याची सूत्रं माझ्या हातात घेण्याचं मी ठरवलं आहे. मोनाला मुलींची कस्टडी मिळाली पाहिजे. नाहीतर पोरीला वेड लागण्याची पाळी येईल. त्याचप्रमाणे आमच्याकडे कितीही पैसा असेना का, तिला मुलींसाठी रोहनकडून चाइल्ड-सपोर्ट मिळायला पाहिजे. त्याची जबाबदारी त्याने निभावलीच पाहिजे. मी त्यासाठी उत्तम दर्जाचा वकील द्यायला तयार आहे. या नातींकडून मी बरंच काही शिकलो आहे. मी तर आता रिटायर झालोच आहे. भरपूर वेळ आहे माझ्यापाशी. मोना पुन्हा डे-केअरमध्ये नोकरी सुरू करेल. तिचा आणि तिच्या मुलींचा सांभाळ आम्ही करू, कुणी भेटला हरीचा लाल पुढेमागे तर सर्व बाजूंनी विचार करून तिला पुन्हा संसार थाटून देऊ.''

आता दाखवत असलेला त्याचा हा समजूतदारपणा, मोनाबद्दलचा जिव्हाळा इतके दिवस कुठे लपला होता?

निमाच्या तोंडून एकही शब्द बाहेर पडला नाही. परंतु तिच्या चेहऱ्यावरून ती बरीच सावरली असल्याचं जाणवलं. जड, पण समाधानी मनाने मी घरी जाण्यास उठले.

वर्षभरातच मोनाला चाइल्ड सपोर्टसह मुलींची कस्टडी मिळाली. ती डे-केअरमध्ये पुन्हा काम करू लागली. राजीव-निमा आपला इतर व्याप कमी करून नातवंडांत रमली. आज घेतलेले निर्णय दोघांनीही समजूतदारपणे मोनाचं लग्न ठरवण्यापूर्वी घेतले असते तर !

◈◈◈◈

# आजन्म कारावास

सोनियाला झोप जणू वैरीण वाटत होती. पावसाच्या सरी नुकत्याच कोसळून गेल्या होत्या व त्यामुळे हवेत गारवा होता. मंद वाऱ्याची झुळूक अंगावर आली तेव्हा सोनियाच्या शरीरावर एक गोड शिरशिरी उठली. हनीसकलृचा मधुर वास तिला सुखावून गेला. खिडकीच्या जाळीवर तिने नाक हळूवारपणे टेकवलं, जणू काही सारा सुगंध ती नाकात साठवून ठेवण्याचा प्रयत्न करत होती.

बाहेरचं जग शांत होतं. सोनियाच्या चेहऱ्यासारखंच. पण आपल्या बाह्य स्तब्धतेच्या आत कुठेतरी अनेक आवाज बंड करत असल्याचं तिला जाणवत होतं. आपल्या मनात स्वतःला न ओळखता येणारी वेगळीच हुरहूर व शरीरात थंडाव्याबरोबरच दाहकणारी आगही आहे असं तिला वाटलं.

दुपारी धुऊन वाळवलेल्या केसांची पिन काढून सोनियाने केस हलकेच मोकळे केले. शांपूचा मंद सुवास तिच्या रंध्रारंध्रात भरला. केस तिच्या नाजूक खांद्यांवर शालीप्रमाणे लपेटले गेले. सोनियाच्या शरीराला एक प्रकारची अनाहूत ओढ लागली व तिला एक सूक्ष्म वेदना जाणवली. याच तिच्या काळ्याभोर, लांब केसांवर व डोळ्यांवर गॅरी लुब्ध झाला होता.

त्या स्तब्ध बेडरूममध्ये तिच्यामागे गॅरी शांतपणे बिछान्यावर झोपला होता. त्याच्या काळ्या केसांतून आता काही रुपेरी केस चमकत होते. तो अधूनमधून हलके घोरतही होता. त्याला अशी शांतपणे झोप लागू शकते याची सोनियाला खंत वाटली. गॅरीच्या चेहऱ्यावर झोपेतही अस्फुट स्मित व प्रसन्नता असल्याचा सोनियाला भास झाला. तो बहुधा काहीतरी सुखद स्वप्नाचा आस्वाद घेत असावा असा तिने तर्क गेला. अशा क्षुल्लक गोष्टींना महत्त्व देण्यात अर्थ नाही, हा वैवाहिक

जीवनाचाच एक भाग आहे; असा कयास बांधून सोनियाने तो विचार मनातून झटकून टाकण्याचा प्रयत्न केला.

पुरोगामी विचारांच्या आईवडिलांच्या तालमीत वाढलेली ती एक साधी, सरळमार्गी मुलगी होती. भाऊ तिच्याहून दीड-दोन वर्षांनी लहान होता. सोनिया तीन-चार वर्षांची असताना तिचे आईवडील उत्तर अमेरिकेत येऊन स्थायिक झाले. तिचं शैशव व यौवन याच देशात फुललं होतं. वयाच्या बाविसाव्या वर्षी सोनिया तिच्या युनिव्हर्सिटीत तिच्याहून एक वर्ष पुढे असलेल्या गॅरीच्या प्रेमात पडली होती. लग्नाला तिच्या आईवडिलांचा सक्त विरोध होता, तो गॅरी परधर्मीय वा अमेरिकन होता म्हणून नव्हे, तर तो आफ्रिकन अमेरिकन होता म्हणून. सोनियानेही घरातून पळून जाऊन त्यांच्या मर्जीविरुद्ध गॅरीशी रजिस्टर्ड विवाह केला होता. गॅरी हुशार व कर्तबगार होता, परंतु तो एका गरीब कुटुंबात वाढला होता. त्याच्या घरातही हा विवाह कुणाला मान्य नव्हता. त्यामुळे त्याही कुटुंबात तिचं आपुलकीनं वा उत्साहानं स्वागत झालं नसतं. त्यांनीही फारशी जवळीक दाखवली नव्हती. गॅरी प्रेमळ होता, सुसंस्कृत होता व तिचं त्याच्यावर मनापासून प्रेम होतं. गॅरीही स्वतःला विसरून तिच्यावर प्रेमाचा वर्षाव करत असे. तिच्या सुखाचा प्याला काठोकाठ भरला होता.

शरीरातील भुकेची ओढ सोनियाला बेचैन करीत होती. त्याकडे दुर्लक्ष करण्याचा तिने निष्फळ प्रयत्न करून पाहिला. गॅरीला झोपेतून उठवण्याची तिला प्रबळ इच्छा झाली. आठवड्यातील पाच दिवस तो नोकरीच्या गावी राहून वीकेंडला घरी येत असे. स्वतः दमलेला असूनही तिला घरकामात हातभार लावत असे. त्याला जागं करण्याचा बेत सोनियाने बदलला.

गेल्या सहा-सात महिन्यांपासून सोनियाला गॅरीच्या वागणुकीतील बदल जाणवू लागला होता. लग्नानंतरची गॅरीच्या सहवासात घालवलेली पाच-सहा वर्षं तिला आठवली. घरी आल्याबरोबर तिच्याभोवती रुंजी घालणारा, तिला जवळ घेणारा, रात्रीची आतुरतेने वाट पाहणारा गॅरी आता थंडावल्यासारखा वाटत होता.

लग्नानंतर अडीच वर्षांत नीलचा जन्म झाला. तो प्रकृतीने सुदृढ व बुद्धीने तल्लख होता. त्यानं वडिलांचं रूप व आईचा रंग उचलला होता. त्याच्यानंतर तीन वर्षांनी शॉन जन्माला आला. त्यानं रंग व रूप दोन्हीही आईकडून घेतलं होतं. जन्मापासूनच शॉनची वाढ मंद व बोलणं-चालणं उशिरा होत असल्याचं

दोघांच्याही लक्षात आलं. सोनिया व गॅरी चांगलेच हादरले. त्यांना दोघांच्याही कुटुंबांकडून शारीरिक वा नैतिक पाठबळ मिळण्याची शक्यता वाटत नव्हती. दोन्ही कुटुंबांनी त्यांच्याशी जवळजवळ संबंध तोडल्यासारखंच होतं. अशा परिस्थितीत शॉनची काळजी घेण्यासाठी सोनियाला नोकरी सोडून घरी राहणं भाग पडलं होतं. गॅरी सोनियाच्या पाठी खंबीरपणे उभा राहिला. परंतु जवळजवळ त्याच सुमारास त्याचीही दीडशे मैल दूर असलेल्या एका छोट्या गावातील शाखेमध्ये बढती मिळून बदली झाली. शॉनचे सर्व स्पेशालिस्ट डॉक्टर, हॉस्पिटल व स्पेशल शाळा इथेच, ड्यूकसारख्या मोठ्या गावातच उपलब्ध असल्यामुळे त्यांनी आपलं घर न विकता इथेच राहण्याचा निर्णय घेतला. शॉनला कोणताही सांसर्गिक आजार लगेच होई. त्याचप्रमाणे त्याच्या चालण्यातही व्यंग असल्यामुळे तो तोल जाऊन वारंवार पडत असे व त्याला दुखापत होत असे. यासाठी चांगलं हॉस्पिटल व तज्ञ डॉक्टर जवळ असणं जरुरीचं होतं. वीकेंड हजबंड होण्याचा निर्णय गॅरीने स्वखुशीने घेतला. तो सोमवारी पहाटे निघून शुक्रवारी संध्याकाळी उशिरा परत येत असे. आल्यावर सोनियाला घरात मदत, जरूर पडेल तेव्हा घराची दुरुस्ती, ग्रोसरी आणणं, मुलांशी खेळणं अशी अनेक कामं करत असे. दोघांच्याही कुटुंबीयांनी मात्र मदतीचा हात पुढे केला नाही.

तीन-चार वर्षं निघून गेली. आठवडा संपून शुक्रवार कधी उगवतो ते सोनियाला कळतही नसे. सर्व रहाटगाडगं नियमितपणे सुरळीत चालू होतं. नील आठ वर्षांचा व शॉन पाच वर्षांचा झाला होता. नील 'ऑनर रोल'वर असून शाळेच्या सॉकर व बास्केटबॉल टीम्समध्ये खेळत होता. शॉनही त्याच्या शाळेत बऱ्यापैकी रुळला होता. त्याला आठवड्यातून एक वेळ इंजेक्शन घेण्यासाठी डॉक्टरकडे जावं लागे. इतर तपासणीसाठी अधूनमधून हॉस्पिटलची वारीही करावी लागे. शुक्रवारी गॅरी येईतोवर घरात बेकिंगचा घमघमाट सुटलेला असे. दर शनिवार-रविवारी ती गॅरीच्या आवडीचा स्वयंपाक करत असे. मुलांच्या अंघोळी आटोपलेल्या असत. मुलं जेवून गॅरीच्या वाटेकडे डोळे लावून पेंगत टी.व्ही. पाहत बसलेली असत. सोनिया गॅरीच्या स्पर्शासाठी, त्याच्या सहवासासाठी आसुसलेली असे.

काही महिन्यांपासून गॅरीच्या वागण्यात होत चाललेला बदल सोनियाच्या ध्यानी येऊ लागला होता. घरातील काम आटपून ती बेडरूममध्ये येईस्तोवर गॅरी झोपून गेलेला तिला आढळून येई. तिला वाटे, तो आठवडाभर काम करून इथे

वीकेंडला येतो व इथे आल्यावरही त्याच्यामागील कामाचा व्याप संपत नाही. थकत असेल बिचारा! एवढं सर्व काम करूनही सवड काढून मुलांशीसुद्धा खेळतो. त्याच्यावरील प्रेमानं तिचं मन भरून आलं. आपल्याला जाणवत असलेला गॅरीतील बदल हा केवळ आपल्याच मनाचा खेळ असेल असं ठरवून सोनियाने तो विचार झटकून टाकला.

थंडी वाजू लागल्यामुळे खिडकी बंद करून सोनिया बिछान्याजवळ आली. "Susie baby, come closer, I miss you very much," – झोपेत बरळत गॅरीने कूस बदलली. नंतरही काही वेळ तो अधूनमधून झोपेत बोलत राहिला. तो काय बोलत आहे ते सोनियाला स्पष्टपणे समजलं नाही तरी 'सूझी' या नावाचा दोन–तीन वेळा तरी त्याच्या तोंडून उल्लेख झाल्याचं तिनं ऐकलं. तिला धक्काच बसला व ती दोन पावलं मागे सरली. तिच्या आश्चर्याची जागा प्रथम रागानं व नंतर स्वतःविषयीच्या सहानुभूतीनं घेतली. ती पूर्णपणे उद्ध्वस्त झाली होती. ब्लँकेट उचलून ती खोलीबाहेर वळली व खाली येऊन फॅमिली रूमच्या सोफ्यावर तिनं अंग झोकून दिलं. ती स्फुंदून स्फुंदून रडू लागली. अंगात एकदम हुडहुडी भरून आल्यासारखं तिला वाटलं. या क्षणी कोणतीही ऊब तिच्या शरीरातील व मनातील हुडहुडी कमी करण्यास असमर्थ ठरत होती.

उभं आयुष्य सोनियाच्या नजरेसमोर तरळून गेलं. तिच्यापुढे एक मोठं प्रश्नचिन्ह उभं राहिलं. आपली शंका खरी असेल, तर यापुढे काय? तिला राग तर आलाच होता. पण त्याचबरोबर काळजीही वाटत होती. राग, गॅरी तिच्याशी एकनिष्ठ राहिला नाही म्हणून; तर काळजी, तो तिला सोडून निघून जाईल म्हणून. सर्व निर्णय उद्यावर ढकलून तिनं झोपण्याचा प्रयत्न केला. घराच्या भिंती तिला तुरुंगासारख्या भासू लागल्या. जणू ती कैदी बनून या तुरुंगात अडकली होती. "शिक्षा फक्त मलाच का? शॉन गॅरीचाही मुलगा आहे". ती विचार करू लागली, "तो स्वच्छंदपणे जीवन जगू शकतो. आपली मात्र एका दिवसापुरतीही सुटका का होऊ नये?" सोनिया स्वतःलाच हे उत्तर नसलेले प्रश्न विचारत होती. "हे सारं माझ्याच वाट्याला का यावं? आईवडिलांची आज्ञा न पाळता लग्न केलं म्हणून? परधर्माच्या आंतर्वर्णीय माणसाशी लग्न केलं म्हणून?"

हळूहळू दुःखाची जागा कडवटपणाने घेतली. सोनियाला वाटलं, आपल्याजवळ काही पैसे असते तर? उगीच नोकरी सोडण्याची घाई केली आपण. आफ्रिकन–अमेरिकन माणसाशी विवाह केल्यामुळे भारतीय मैत्रिणीही दुरावल्या

आपल्याला. एक मन बंड करण्यासाठी आक्रंदत होतं, 'गॅरी, मुलं, घर, सर्व सोडून जा. या कैदेतील जाचापासून स्वतःची सुटका करून घे.' सर्वतोपरी तिच्यावर अवलंबून असलेल्या तिच्या अत्यंत लाडक्या शॉनसाठी तिचं दुसरं मन तिला निघून जाण्यापासून परावृत्त करत होतं.

दुसऱ्या दिवशी उठली तेव्हा सोनियाचे डोळे सुजले होते. चेहरा मात्र निश्चयी दिसत होता. काहीही प्रसंग न घडता नाश्त्याचा सोहळा नेहमीप्रमाणे उरकण्यात तिने यश मिळवलं. मुलांनी गॅरीचं सर्व लक्ष आपल्यावर केंद्रित करून घेतलं होतं. मुलं व गॅरी बाहेर गेल्यावर तिनं शॉपिंग व इतर सामानाची यादी तयार केली. दर शनिवारी सर्वांनी एकत्र लांबच्या शॉपिंग सेंटरमध्ये खरेदीसाठी जाण्याचा प्रघात होता.

खेळून आल्यावर मुलं व गॅरी घरात आले. प्रत्येकाच्या हाती एकेक संत्र्याच्या रसाचा ग्लास ठेवून ती गॅरीकडे वळत त्याला उद्देशून म्हणाली, "आज मी तुमच्याबरोबर शॉपिंगला येत नाही. गॅरी, मी लंचसाठी सँडविचेस व डिनरसाठी कॅसरोल करते. तू एकटाच मुलांना घेऊन जा. मुलांच्या हाती पैसे देऊन त्यांचे नसते लाड मात्र करू नकोस."

गॅरी मुलांसह बाहेर पडल्यावर पाच-दहा मिनिटांतच फोनची घंटा खणखणली. पलीकडून एका स्त्रीचा आवाज गॅरीशी बोलण्याची विनंती करत होता. सोनियाने तो घरी नसल्याचं सांगताच, "तो परत आल्यावर त्याला त्याच्या ऑफिसमधील सूझीला फोन करायला सांग, महत्त्वाचं काम आहे", असा निरोप देऊन त्या स्त्रीने फोन बंद केला. सोनियाला गॅरीच्या झोपेतील बरळण्याची आठवण झाली. तिने मनाशी काहीतरी निश्चय केला व लगेच बाहेर जाण्याची तयारी सुरू केली. तिला अचानक आपल्या साखरपुड्याच्या अंगठीचं स्मरण झालं. चांगल्यापैकी हिरा बसवलेली अंगठी खरीदण्यासाठी गॅरीनं पैसे साठवण्याकरता एंगेजमेंट बरेच दिवस लांबवली होती. तिने बोटातील अंगठी काढून पर्समध्ये टाकली. कपभर गरम कॉफी पिऊन ती गाडी घेऊन बाहेर पडली. सोनियानं पहिलंच दुकान गाठलं ते होतं पॉन-शॉप. वस्तू गहाण ठेवून पैसे मिळवण्याचं दुकान. आत जाऊन तिने आपली एंगेजमेंट रिंग काउंटरवर ठेवली. काउंटरपलीकडील गृहस्थांनी ती अंगठी काळजीपूर्वक तपासली. अंगठीतील हिरा खरा नसून क्यूबिक झिर्कोनिया असल्यामुळे फार पैशांची अपेक्षा करू नकोस असं त्यांनी तिला सांगितलं. अंगठी उचलून बोटात घालण्याऐवजी सोनियाने ती पुन्हा पर्समध्ये टाकली. तिच्या डोळ्यांत

अंगार फुलले होते. चेहऱ्यावर राग, निराशा, विफलता, दुःख व अपमान यांचं मिश्रण होतं. मनातल्या मनात तिनं आपला पराभव मान्य केला. मनात आखलेल्या योजना रद्द करून तिने गाडी घराच्या दिशेकडे वळवली.

घरात पाऊल टाकताच सोनियानं पायांतील बूट काढून रागाने भिरकावले. तिच्या आवडीच्या कॅसरोलच्या वासानं तिला मळमळू लागलं. ती स्वतःच्या कमनशिबावर चिडली होती. आपल्या दैवाला दोष देत होती. घराच्या बाहेर पडून ती एक-दोन दिवसांपुरतं तरी आयुष्य उपभोगणार होती. एकटीच भटकणार होती. कुठल्यातरी आलिशान हॉटेलमध्ये रात्रभर राहून पुढील आयुष्याचा विचार करणार होती, भविष्याच्या योजना आखणार होती. गॅरीला धडा शिकवण्यासाठी ती त्याला न सांगता घराबाहेर पडली होती. दोन दिवसांपुरतं तरी एकट्याने घर व मुलं सांभाळणं किती अवघड आहे हे त्याला पटवून देणार होती. परंतु सर्वच बिनसलं होतं. हातातील छोट्या सूटकेसमधील सामान काढून सोनियानं जाग्यावर ठेवलं व सूटकेस पुन्हा क्लॉझेटमध्ये ठेवून दिली.

गाडी परतल्याचा व हॉर्नचा कर्कश आवाज आणि त्याबरोबर मुलांच्या चिवचिवण्याचा आवाज तिच्या कानी पडला. मुलांचे उत्साही, आनंदी बोल जवळ येऊ लागले तरी सोनिया आपल्या बेडरूममध्ये आरशात पाहत बिछान्यावर निश्चलपणे बसून राहिली.

धडक मारून पुढील दरवाजा उघडल्याचा आवाज व त्यामागोमाग शॉनचे उतावळे शब्द तिच्या कानी आले. ''मॉम, तू कुठे आहेस? हे बघ मी तुझ्यासाठी काय आणलं आहे.''

''मी माझ्या खोलीत आहे, शॉन'' ती थंडपणे उत्तरली.

धाड धाड जिना चढून शॉन वर आला. ''मी तुझ्यासाठी प्रेझेंट आणलं आहे बघ, मॉम,'' शॉनने घाईघाईत सांगितलं. त्याच्या चेहऱ्यावर उत्साह, अभिमान व तिच्याविषयीचं प्रेम ओसंडत होतं. थोडा वेळ तो दरवाजात थबकला. तिचे काळेभोर केस व डोळे घेऊन तो जन्माला आला होता. वयाच्या मानाने उंचीला कमी व बराच रोड होता. वाऱ्याने त्याचे केस विस्कटले होते. त्याच्या हातांत एक पिवळ्या व निळ्या रंगाच्या रानटी फुलांचा गुच्छ होता. ''ही फुलं मी स्वतः माझ्या हातांनी तोडली आणि तुझ्यासाठी हा गुच्छ बनवला,'' त्यानं अडखळत, पण अभिमानानं सांगितलं.

मान उचलून सोनियाने शॉनकडे पाहिलं आणि तिची नजर प्रथम त्याच्या चिखलाने बरबटलेल्या बुटांकडे व नंतर चिखलाचे ठसे उमटलेल्या तिच्या खोलीतील कार्पेटकडे वळली. सोनियाचं आत्तापर्यंत अडवून ठेवलेलं उसनं अवसान गळून पडलं.

''तू काय केलं आहेस ते पाहा जरा,'' सोनिया किंचाळली. ''माझ्या खोलीतल्या कार्पेटचं वाटोळं केलंस तू.'' फुलं जमिनीवर फेकून देत तिने एका हाताने शॉनला स्वतःजवळ खेचलं व जवळच असलेल्या ड्रेसिंग टेबलावरचा केसांचा ब्रश दुसऱ्या हाताने उचलला. सर्व शक्ती एकवटून सोनियाने त्या ब्रशने शॉनला मारायला सुरुवात केली.

''स्वच्छ कार्पेट चिखलानं खराब करायचा नसतो हे शीक जरा'' सोनिया गरजली, ''हा मार शिकवेल तुला.''

प्रथम शॉनचं रडणं तिच्या रडण्यात मिसळलं. नंतर तो एकाएकी रडायचा थांबला तरी तिचा हात चालूच राहिला. एका हाताने त्याला घट्ट पकडून दुसऱ्या हाताला रग लागेपर्यंत शॉनला सोनियाने मारून घेतलं. शेवटी थकून विफलतेने ब्रश जमिनीवर भिरकावला व त्याला जवळ घेऊन तिनेच मोठ्याने रडायला सुरुवात केली. हा अनुभव दोघांनाही आगळा होता.

सोनियाच्या डोळ्यांतून आसवांच्या धारा वाहत होत्या. त्यातून तिला गॅरीची धिप्पाड मूर्ती दाराच्या चौकटीत उभी असलेली दिसली. त्याच्या शेजारीच उभ्या असलेल्या नीलनं त्याचा हात घट्ट पकडून ठेवला होता. दोघंही भांबावून तिच्याकडे पाहत होते. नीलचा चेहरा भयाकुल होता तर गॅरी आश्चर्याने थक्क झालेला दिसत होता. आजवर ती शॉनला आवाज चढवूनही कधी बोलली नव्हती. त्याला मारणं तर अशक्यच होतं. त्याच्यासाठी सर्व अपराध माफ होते इतका तो सोनियाचा लाडका होता. त्याचा प्रत्येक शब्द तिने हळूवारपणे झेलला होता. त्याला फुलासारखं जपलं होतं.

तिच्या रडण्याचा आवाज वगळता घरात एक विचित्र शांतता पसरली होती. त्यात एकाएकी आणखी एक वेदनांनी भरलेलं रडणं मिसळलं होतं. सोनियाचा लाडका शॉन तिच्या मांडीवर आडवा पडून आता कळवळून रडू लागला होता.

दुपारचं जेवण शांततेत पार पडलं. कुणालाच फारशी भूक नव्हती. न जेवता सोनिया शॉनबरोबर त्याच्या खोलीत जाऊन त्याच्या बिछान्यात पडून राहिली. कुणी कुणाशी बोलत नव्हतं. त्यांच्या खोलीकडे एक कटाक्ष टाकून नील आपल्या

खोलीत जाऊन पुस्तक वाचायचा प्रयत्न करू लागला. लंच झाल्यावर गॅरी घराबाहेर पडला तो संध्याकाळी दिवेलागणीनंतर जेवण्याच्या सुमारास घरी परतला.

अजूनही कुणी एकमेकांशी बोलत नव्हतं. घर एका भयाण स्तब्धतेने भरलं होतं. घड्याळाची टिकटिकही फार जोरात होत होती. गॅरीनं नीलचं होमवर्क तपासलं व जेवण झाल्यावर तो फॅमिली रूममधील सोफ्यावर लवंडून टी.व्ही. पाहण्याचा प्रयत्न करू लागला. नीलनं स्वतःच्या खोलीत शिरून धाडकन दरवाजा बंद केला व सोनिया शॉनबरोबर त्याच्या खोलीत गेली. ती अजूनही रागानं धुमसत होती. दुसऱ्या दिवशी सकाळी गॅरीकडे अंगठीचा व सूझीचा विषय काढण्याचा तिने मनाशी निर्धार केला तेव्हा ती थोडी शांत झाली. शॉनला थोपटत ती तशीच पडून राहिली. पहाटेच्या सुमारास केव्हातरी तिचा डोळा लागला.

दुसऱ्या दिवशी सकाळी सोनियाला जाग आली तेव्हा तिला तिच्या बेडरूममध्ये गॅरी नजरेस पडला नाही. तो जाण्याच्या तयारीत कदाचित किचनमध्ये असेल अशा समजुतीने ती लगबगीने तिथे आली. गॅरी किचनमध्येही नव्हता व ड्राइव्हवेमध्ये त्याची गाडीही नव्हती. ती खिडकीपासून दूर झाली तेव्हा डायनिंग टेबलवर पडलेल्या लिफाफ्याने तिचं लक्ष वेधून घेतलं. लिफाफा तिच्या नावे होता. लिफाफा उघडून ती वाचू लागली.

''प्रिय सोनिया,

तुला प्रिय संबोधत आहे म्हणून तुला माझा राग येईल याबद्दल माझी खात्री आहे. तुला प्रिय तरी कुठल्या तोंडाने म्हणू? तू मला ढोंगी म्हणशील कदाचित आणि तसं म्हणणं चुकीचं ठरणार नाही. गेल्या काही वर्षांत प्रवासाच्या, नोकरीच्या धकाधकीच्या आणि एकलेपणाच्या वावटळीत सापडलो असता सूझन माझ्या आयुष्यात आली. गेले काही आठवडे मी या बाबतीत तुझ्याशी बोलण्याचा असफल प्रयत्न करत होतो. या गुप्ततेचा लवकरच सोक्षमोक्ष करावा असा सूझी हट्ट धरून बसली होती. मला त्याची आठवण करून देण्यासाठीच तिने काल फोन केला होता. तुलाही त्याबद्दल संशय आला असावा. या दुटप्पी जीवनाचा मलाही वीट आला आहे. सूझनशी विचारविनिमय करून मी त्याबाबत निर्णय घेतला आहे. लवकरच माझ्या वकिलामार्फत तुला घटस्फोटाची नोटीस येईल. नीलला बरोबर नेण्याचा विचार मी पक्का केला आहे. शॉन मात्र तुझी जबाबदारी ठरेल. त्याचा सांभाळ करणं माझ्या आवाक्याबाहेर आहे. त्याला आणि तुला पैशांची कमतरता भासू न देण्याची खबरदारी मी घेईन. आपल्यातील नात्याचा अशा रीतीने

शेवट व्हावा अशी माझी इच्छा नव्हती, परंतु मी दुबळा ठरलो. माझा अगदी नाइलाज आहे. Good Luck. -- गॅरी.''

पत्र वाचताच सोनिया खुर्चीत कोसळली. भकास चेहऱ्याने निर्जीवपणे ती त्या पत्राकडे व किचनमध्ये शिरणाऱ्या शॉनकडे पाहू लागली. हालचाल किंवा विचार करण्याची शक्ती तिच्यामध्ये उरली नव्हती. गॅरीबद्दलचा राग, भविष्यात नीलशी होणारी ताटातूट व त्यामुळे निर्माण होणारी पोकळी, शॉनचं तिच्यावर कायम अवलंबून असलेलं केविलवाणं परावलंबी जीवन या सर्व विचारांच्या वावटळीत ती गरगर फिरू लागली. या निरपराध मुलानं कोणता गुन्हा केला होता म्हणून त्याच्या वाट्याला हे पांगळेपण यावं? काहीही अपराध नसताना आजन्म कारावास भोगण्याची शिक्षा आपल्याला मिळाली, ती आपण एक स्त्री आहोत म्हणून की गॅरी व मुलांवर जीव तोडून प्रेम केलं म्हणून?

सोनियाची संवेदनशक्तीच नष्ट झाली.

◈◈◈◈

# क्षण एक पुरे मोहाचा...

दाराची घंटा वाजलेली ऐकून सीमा खुर्चीतून उठली. ''कोण बरं असेल या वेळी?'' स्वतःशीच पुटपुटत ती नाराजीने दार उघडण्यासाठी उठली. खरं म्हणजे लागलेली तंद्री मोडल्यामुळे ती जरा रागावली होती. दाराबाहेर उभ्या असलेल्या युनायटेड पार्सल सर्व्हिसच्या डिलिव्हरी मॅनने तिच्या हातात एक पार्सल ठेवलं व तो निघून गेला. आपल्याला पार्सल पाठवणारं कोण असेल याचं तिला आश्चर्य वाटत होतं. दिवाळी किंवा ख्रिसमसला अद्याप बराच वेळ होता. कुणाचा वाढदिवसही जवळपास नव्हता. मनाशी नवल करीत ती घरात वळली.

सीमाची जिज्ञासा व उत्सुकता तिला स्वस्थ बसू देईना. पार्सल जरी श्री. अमर प्रधान या तिच्या नवऱ्याच्या नावे असलं तरी तो संध्याकाळी घरी येईपर्यंत तिला धीर धरवेना. तिने ते पार्सल उघडलं. आत एक खोका होता व त्यावर लिफाफ्यात एक पत्र होतं. श्री. टर्नर तुमच्या भेटीला येईपर्यंत हा खोका उघडू नये अशा अर्थाचा मजकूर त्या पत्रात होता. खोक्यामध्ये बटन असलेला एक डबा होता व त्यावर प्लास्टिकचं पारदर्शक झाकण होतं. सीमाने झाकण उघडण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. परंतु डबा कुलूपबंद असल्यामुळे उघडता येणार नाही हे तिच्या लक्षात आलं. स्वतःच्या उतावळेपणाला हसत तिने तो खोका बंद करून कॉटखाली सारला व ती स्वैंपाकाच्या तयारीला लागली.

ठीक आठ वाजता दाराची घंटा वाजली. अमर बाहेरच्या खोलीत वाचत बसला होता. तो उठण्यापूर्वी अधीरतेने सीमा दाराकडे धावली. दाराबाहेर मध्यम उंचीचा, थोडा जाडजूड, डोळ्यांवर चष्मा असलेला एक गृहस्थ उभा होता. तिला पाहताच त्याच्या चेहऱ्यावर मंद स्मित उमटलं.

"सौ. प्रधान आपणच का?" त्याने विचारलं.

सीमाने त्याच्या चेहऱ्याकडे निरखून पाहण्याचा प्रयत्न केला. त्याच्या डोळ्यांत एक प्रकारची गूढता असल्याचं तिला जाणवलं. तिने त्याच्या नजरेला नजर देण्याचं टाळत होकारार्थी मान हलवली.

"माझं नाव मिस्टर टर्नर."

"अं, हां हां..." एकदम भानावर येत सीमा हसली. तिची खात्री पटली की आता या सेल्समनकडून आपल्याला त्याच्या प्रॉडक्ट बद्दल काहीतरी ऐकावं लागेल.

"मी थोडा वेळ आत येऊ का?" त्याने विचारलं.

"मी आता कामात आहे. पण थांबा. मी तुमचा खोका घेऊन येते," सीमा उत्तरली. ती वळण्याआधीच त्याने विचारलं, "त्या खोक्यात काय आहे ते जाणून घ्यायची इच्छा नाही का तुमची?"

"मुळीच नाही."

"त्या वस्तूमुळे तुमचा खूप फायदा होणार असला तरीसुद्धा?" तिच्या चेहऱ्याचा आढावा घेत त्याने विचारलं.

"फायदा? कसला? पैशांचा?" सीमाने आश्चर्याने विचारलं.

"हो. पैशांचाच फायदा आहे त्यात. तुमची सांपत्तिक स्थिती एकदम सुधारेल," टर्नर उत्तरला.

सीमाला ते आवडलं नाही. काहीशा घुश्श्यात तिने विचारलं, "तुम्ही काय विकायला आला आहात?"

"मी काहीही विकत नाही."

आतापर्यंत सीमा शेजाऱ्यांशी बोलत असेल या कल्पनेने अमर स्वस्थपणे वाचत राहिला होता. तो आता दाराजवळ आला. टर्नरने स्वतःची ओळख करून दिली.

"ओह! या खोक्याबद्दल बोलायला आलात तुम्ही? हे यंत्र आहे तरी काय?" अमरने विचारलं.

"मी तुमचा फार वेळ घेणार नाही. मी आत येऊ का?"

"तुम्ही जर काही विकणार असाल तर...." त्याचं वाक्य पुरं होण्याआधीच टर्नरने नकारात्मक मान हलवली व तो ठासून म्हणाला, "मी खरंच काहीही विकायला आलो नाही."

अमरने प्रश्नार्थक नजरेने सीमाकडे पाहिलं. तिच्याकडून मानेने संमती मिळताच त्याने टर्नरला आत बोलावलं. आत येताच तो सीमाच्याच खुर्चीत स्थानापन्न झाला व कोटाच्या खिशातून त्याने एक बंद लिफाफा काढला.

''या लिफाफ्यात तुम्हांला पाठवलेल्या यंत्राची किल्ली आहे.'' असं म्हणत त्याने तो लिफाफा टेबलावर ठेवला. ''तुमच्या खोक्यातील यंत्राची घंटा आमच्या ऑफिसात जोडलेली आहे.'' तो प्रत्येक शब्दावर जोर देत हळूहळू बोलला. सीमाला एकदम त्याचा आवाज गंभीर झाल्यासारखा वाटला.

''ही किल्ली कशासाठी आहे?'' अमरने विचारलं. ''आम्हांला सिक्युरिटी सिस्टिमची मुळीच गरज नाही.''

नकारात्मक मान डोलावत टर्नर उत्तरला, ''अं हं, ही सिक्युरिटी सिस्टिम नाही.'' त्याने खुलासा केला, ''तुम्ही जर यातील बटण दाबलंत तर या पृथ्वीवर कुणा एका अनोळखी व्यक्तीला कुठेतरी मृत्यू येईल, पण त्या बदल्यात तुम्हांला एक लाख डॉलर्स मिळतील.'' हे वाक्य जरी अमरला उद्देशून असलं तरी त्याची नजर सीमाच्या चेहऱ्याकडे होती. सीमाने त्याच्याकडे रोखून पाहण्याचा प्रयत्न केला. तिला वाटलं, तो गालातल्या गालात हसतो आहे.

''तुमच्या बोलण्याचा अर्थच मला समजत नाही. तुम्ही जरा स्पष्टीकरण कराल का?'' अमरने चक्रावून विचारलं. टर्नरच्या चेहऱ्यावर आता आश्चर्याची छटा उमटली. ''मी आताच तुम्हांला सर्व स्पष्टपणे सांगितलं आहे,'' तो उत्तरला.

''हा कसलातरी प्रॅक्टिकल जोक तर नाही?''

''मुळीच नाही. आम्ही दिलेली ऑफर सच्ची आहे.''

''तुमच्या बोलण्यात काहीच अर्थ नाही. आम्ही यावर विश्वास ठेवावा असं तर तुम्हांला.....''

त्याला मध्येच तोडत सीमाने जबाब मागितला, ''तुम्ही कोणत्या कंपनीचे प्रतिनिधी आहात?''

यावर टर्नर जरा घुटमळला. ''कंपनीचं नाव सांगायला मला परवानगी नाही. पण ती एक इंटरनॅशनल कंपनी आहे.''

''तुम्ही कृपा करून गेलात तर बरं होईल,'' जरा रागातच अमर म्हणाला.

टर्नर उठून उभा राहिला. ''ऑफ कोर्स!''

''तुम्ही आपला खोका परत घेऊन जा,'' अमर.

''यावर विचार करण्यासाठी तुम्ही हा खोका दोन–तीन दिवस ठेवून का घेत नाही?''

अमरने खोका व लिफाफा बळजबरीने त्याच्या हातात कोंबला. त्याने पुढे होऊन दरवाजा उघडला.

''मी माझं कार्ड ठेवून जातो. तुमचा विचार बदलला तर मला जरूर फोन करा,'' असं म्हणत त्याने आपलं व्हिजिटिंग कार्ड पुढे टेबलावर ठेवलं. तो जाताच अमरने ते कार्ड फाडून त्याचे तुकडे केले आणि रागाने टेबलावर फेकले.

सीमा अद्याप सोफ्यावरून उठली नव्हती. ''हे सर्व प्रकरण काय असावं असं तुला वाटतं, अमर?'' तिने न राहवून विचारलं.

''मला ते जाणून घ्यायची मुळीच इच्छा नाही,'' तो गुरगुरला.

सीमाने हसण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. ''तुला थोडीही उत्सुकता नाही?'' तिने विचारलं.

अमरने नकारात्मक मान डोलावली व आपलं पुस्तक उचलून त्यात मान खुपसली. सीमा स्वैंपाकखोलीत आवराआवर करण्यासाठी गेली.

''तू त्या खोक्याबद्दल काहीच का बोलू इच्छित नाहीस?'' शयनगृहात प्रवेश करत सीमाने विचारलं.

''मला ते सर्व घृणास्पद वाटतं,'' अमर.

''खरं आहे ते, पण तुला काहीच कसं कुतूहल नाही? तुला काय तो प्रॅक्टिकल जोक वाटतो?''

''प्रॅक्टिकल जोक असेल तर मला तो कमी दर्जाचा वाटतो आणि मला त्याबद्दल तिटकारा आहे.''

''मला तर हे मानसशास्त्राचं संशोधन असावं असं वाटतं,'' बिछान्यावर बसत सीमा म्हणाली.

''असेलही,'' अमरने खांदे उडवले.

''कदाचित कुणी विक्षिप्त कोट्याधीश स्वतःच्या करमणुकीसाठी तर हे करत नसेल?''

''शक्य आहे.''

''तुला जाणून घ्यायची खरंच इच्छा नाही?'' सीमाच्या आवाजात व चेहऱ्यावर नाराजी उमटली होती. अमरने नकारात्मक मान डोलावली.

''पण का?'' सीमा अगदी हट्टाला पेटली होती.

''कारण हे सर्व अनैतिक पातळीवरचं आहे,'' अमर दिवा बंद करून बिछान्यावर पडला. सीमाने डोळे बंद केले खरे, पण तिची झोप अजूनही एक लाख डॉलर्समध्ये अडकली होती.

सकाळी ऑफिसला जाण्यासाठी निघताना तिला दिवाणखान्यातील टेबलावर कार्डाचे तुकडे आढळले. पटकन गोळा करून तिने ते पर्समध्ये टाकले व ती ऑफिसला जाण्यासाठी निघाली. लंच टाइममध्ये तिने त्या कार्डाचे तुकडे जोडायचा प्रयत्न केला व त्यात ती यशस्वी झाली. कार्डावर फक्त श्री. टर्नर यांचं नाव व फोन नंबर होता. ते तुकडे जुळवताना आपण हे सर्व का करत आहोत हा प्रश्न ती स्वतःला वारंवार विचारत होती.

ऑफिस सुटायला दहा-पंधरा मिनिटं असताना सीमाने टर्नरचा नंबर फिरवला. पलीकडून घोगरा आवाज आला, ''हॅलो.'' तिने फोन खाली ठेवायचा विचार केला. मनाशी कसलातरी निश्चय करून तिने बोलायचं ठरवलं व स्वतःची ओळख करून दिली.

''येस मिसेस प्रधान,'' टर्नरच्या आवाजात उमेद होती.

''मला त्या यंत्राबद्दल फार जिज्ञासा आहे,'' कापऱ्या आवाजात तिने सांगितलं.

''ते नैसर्गिकच आहे,'' टर्नर उत्तरला.

''तुम्ही जे काही सांगितलंत त्यावर मात्र माझा मुळीच विश्वास बसत नाही.''

''तेही साहजिकच आहे.''

''ते काहीही असो.'' सीमाने आवंढा गिळला, ''जगात कुठेतरी, कुणा अनोळखी व्यक्तीला मृत्यू येईल असं तुम्ही जे सांगितलंत त्याचा अर्थ काय?''

''त्याचा अर्थ तसाच आहे - अगदी तसाच,'' टर्नरने खुलासा केला, ''मृत्यू या जगात कुठेतरी, कुणालाही येईल आणि त्या व्यक्तीची तुम्हांला ओळख नसेल. तुम्ही प्रत्यक्षात मृत्यू पाहू शकणार नाही. या सर्व गोष्टींची मी हमी देतो.''

''हे सर्व एक लाख डॉलर्ससाठी?''

''हो.''

''पण हे सर्व मूर्खपणाचं आणि भयानक आहे.''

"ते जरी खरं असलं तरी तो आमचा प्रस्ताव आहे. तुम्हांला ते यंत्र पुन्हा पाठवू का?"

"नको, मुळीच नको," सीमा ठासून उत्तरली.

सीमा घरी पोहोचली तेव्हा दाराबाहेर तिला तो खोका ठेवलेला आढळला.

त्याच्याकडे पाहत तिने दरवाजा उघडला. स्वतःला तो खोका उचलायचा नाही असं पुन्हा पुन्हा बजावत ती आत गेली व तिने स्वैंपाकाला सुरुवात केली.

काही झालं तरी सीमाचं कुतूहल तिला स्वस्थ बसू देईना. तिने बाहेर जाऊन तो खोका उचलला व स्वैंपाकखोलीत जेवणाच्या टेबलावर ठेवून दिला. ती बाहेरच्या गॅलरीत आली. ऑफिस सुटण्याची वेळ असल्यामुळे रस्त्यावर गाड्यांची वर्दळ होती. तिच्या मनात आलं, या गाड्यांतील माणसांपैकी कुणीतरी एक मरण्याची शक्यता आहे. किंवा जगात कुणीतरी, कुठेही जाईल. प्रत्येक क्षणी अशी कितीतरी माणसं जगाचा निरोप घेतातच नाहीतरी. त्यापैकीच एक गेला तर काय विशेष फरक पडणार आहे? तिच्या मनात विचारांची गर्दी उसळली होती. तिचं मन स्वस्थ बसेना. स्वैंपाकघरात जाऊन तिने खोका भांड्यांच्या मागे कपाटात ठेवून दिला. सकाळी उठल्यावर तो कचऱ्यात फेकून द्यायचा निश्चय करूनच तिने पुन्हा स्वैंपाकाला सुरुवात केली.

"कुणीतरी चक्रम कोट्याधीश लोकांच्या मनाशी खेळ खेळतो आहे," सीमा पुटपुटली. अमरचा घास हातातच थबकला. "तू काय बोलते आहेस तेच कळत नाही. तुला झालं आहे तरी काय?"

सीमा मुकाट्याने जेवू लागली. मध्येच एकदम हात थांबवून ती म्हणाली, "पण ही ऑफर सच्ची असेल तर?"

अमरने चमकून तिच्याकडे पाहिलं. "आणि समजा असली तर काय? तुला काय करायचं आहे? ते बटण दाबून कुणाचातरी खून करावंसं वाटतं तुला?"

"खून?" तिने चक्रावत विचारलं.

"नाहीतर दुसरं काय म्हणायचं त्याला?"

"पण ज्याला मरण येईल तो ओळखीचाही नसेल. शिवाय त्याचा मृत्यू आपण पाहू शकणार नाही. मग हा खून कसा ठरेल? अशी कितीतरी माणसं मरतातच की रोज."

सीमाने तर्कशास्त्र वापरायचा प्रयत्न करून पाहिला.

“अरे देवा! तुझ्या मनात तरी काय आहे? मला खरंच वाटत नाही.”

“कुणी इराणी शेतकरी नाहीतर न्यूझीलंडचा पिग्मी गेल्यास आपलं काय जाणार आहे?”

“पण मरणारी व्यक्ती आपल्याच कॉलनीतील, पाहिलेल्या माणसांपैकी कशावरून नसेल? समोरच्या मैदानावर खेळणाऱ्या मुलांपैकीही एक असू शकेल,” अमरच्या आवाजातील कंप सीमाला जाणवला.

“काहीतरी बरळू नकोस,” ती फणकारली.

“सीमा, कुणी कुणाला मारायचं किंवा कोण मारला जाईल हा प्रश्न नाही. तरीसुद्धा माझ्या मते हा खून आहे.”

“ज्याला आपण ओळखतही नाही अशा व्यक्तीला मृत्यू आला तरीसुद्धा तू याला खून म्हणशील?” तिने विचारलं.

काही क्षण अमर काहीच बोलला नाही. मग त्याने एकदम विचारलं, “तू खरंच ते बटण दाबू शकशील?”

“एक लाख डॉलर्स,” सीमा पुटपुटली. “कधीही न मिळणारी एक अपूर्व संधी आपल्यापुढे चालून आली आहे. आपल्याला स्वतःच्या घराची, नवीन फर्निचरची गरज आहे. किती दिवस असं अपार्टमेंटमध्ये राहायचं? आपल्या बरोबरच्या सर्वांनी घरं घेतली. इतके दिवस जिची स्वप्नं पाहात आहोत ती युरोपची ट्रीपसुद्धा शक्य होईल. एवढंच नव्हे तर आता तिसरं माणूससुद्धा हवं ना घरात? पुरेशा पैशांअभावी आपण तेही आजवर लांबणीवर टाकत आलो आहोत,” सीमाने त्याला समजावण्याचा प्रयत्न केला.

“नाही सीमा, नाही,” त्याचा चेहरा पांढराफटक पडला होता.

“ठीक आहे. पण तू रागावू नकोस असा. हे फक्त वादविवादासाठी आहे.”

जेवण झाल्यावर बाहेरच्या खोलीत जाण्यापूर्वी अमर एवढंच बोलला, “हा विषय इथेच संपलेला बरा. त्याबद्दल यापुढे बोलणं बंद.”

सीमाने फक्त खांदे उडवले.

दुसऱ्या दिवशी सीमा नेहमीपेक्षा लवकर उठली. नाश्त्यासाठी एवढ्या सकाळी उपमा पुढे ठेवलेला पाहून आश्चर्याने न राहवून अमरने विचारले, “आज हे सर्व कशासाठी?”

“काहीही कारण नाही,” सीमा गाल फुगवत म्हणाली. “मला फक्त तुला खूश झालेलं पाहायचं होतं. एवढंच कारण.”

“मग फारच छान,” अमरही खूश होत म्हणाला. त्याचा चहाचा कप भरत सीमा म्हणाली, “फक्त तुला एवढंच दाखवून द्यायचं होतं की मी.....” तिने वाक्य मध्येच सोडलं.

“मी काय सीमा?”

“की मी स्वार्थी नाही.”

“मी तसं कधीच म्हटलं नाही.”

“काल रात्री....” अमर गप्प राहिला.

“सर्व त्या यंत्राबद्दलचं बोलणं. मला वाटलं, तू माझ्याबद्दल गैरसमज करून घेतलास.”

“ते कसं काय?”

“मी फक्त स्वतःच्या स्वार्थाचा विचार करते असं माझ्याबद्दल तुला वाटत असावं.”

“ओह!”

“पण मी माझ्या स्वार्थाचा विचार नव्हते करत.”

“सीमा, बस्स.”

“मी जेव्हा घराबद्दल, ट्रीपबद्दल बोलले...”

“सीमा, हा विषय तू पुन्हा का काढलास?”

“मी फक्त तुला एवढंच सुचवत होते की या सर्वांचा आपण आता खरंच विचार करायला हवा. आपलंही वय वाढत आहे. आता मुलांचाही विचार करायला हवा.”

“आपण त्याबद्दल जरूर बोलू. पण आता नाही.”

“मग कधी अमर?”

त्याने हताशपणे तिच्याकडे पाहिलं. “सीमा....”

“कधी? कधी? सांग ना,” सीमाचा उतावळेपणा शब्दाशब्दांतून व्यक्त होत होता.

"तुला म्हणायचं तरी काय आहे, सीमा?"

"मला एवढंच म्हणायचं आहे की हा नक्कीच कुठलातरी संशोधन प्रॉजेक्ट आहे. या बाबतीत त्यांना सामान्य माणसांची प्रतिक्रिया पाहायची असेल. ही प्रतिक्रिया पाहण्यासाठी ते लोक कुणाच्यातरी मृत्यूची सबब सांगत असतील. सामान्य माणसांची सद्सद्विवेकबुद्धी कुठपर्यंत टिकते ते पाहण्याचाही त्यांचा इरादा असेल. तुला खरं वाटतं का की ते असं उगाचच कुणालातरी मारतील?"

अमर काहीच बोलला नाही. त्याचे हात व ओठ थरथरत असलेले तिला दिसले. थोड्या वेळाने उठून तो खोलीत येरझाऱ्या घालू लागला व एकदम न बोलता घराबाहेर पडला.

तो कामावर गेला तरी सीमा चहाच्या कपाकडे पाहत खुर्चीत बसून राहिली. ऑफिसला जायला उशीर होत आहे याची जाणीव असूनही तिच्याने उठवेना.

कपबशा उचलून ठेवताना ती एकदम थांबली. तिने तो खोका कपाटातून काढला आणि हळूच उघडला. त्याकडे ती काही काळ टक लावून पाहत राहिली. नकळत तिने लिफाफ्यातून किल्ली काढली व ती लावून त्या यंत्राचं काचेचं झाकण उघडलं. स्वतःला पूर्णपणे विसरून ती त्या यंत्राकडे पाहत राहिली.

"किती हा मूर्खपणा!" तिने विचार केला. "हा सर्व मनस्ताप केवळ या अर्थशून्य बटणासाठी!" काहीही कळण्यापूर्वी "आपल्यासाठी अमर" असं म्हणत तिने ते बटण दाबलं. बटण दाबल्यावर मात्र ती थरथरली. पण क्षणभरच. अशा क्षुल्लक गोष्टीसाठी एवढा मनस्ताप करून घेणं मूर्खपणाचं आहे असा तिने विचार केला. तो खोका बंद करून तो तसाच डायनिंग टेबलावर ठेवून दिला व तयारी करून ती घाईत ऑफिसला निघून गेली.

संध्याकाळी घरात येताच सीमाने कुकर लावला व ती भाजी चिरायच्या तयारीला लागणार तेवढ्यात फोनची घंटा खणखणली. तिने अधीरतेने थरथरत फोन उचलला.

"सौ. प्रधान आहेत का?"

"अं... हो. मीच सौ. प्रधान बोलते आहे."

"मी युनियन मेमोरियल हॉस्पिटलमधून बोलतो आहे," पलीकडून आवाज आला. पुढलं बोलणं ऐकत असताना हे सत्य आहे की स्वप्न आहे हे तिला क्षणभर उमगेना. बेल्टवेवर झालेला बऱ्याच गाड्यांचा अपघात, सैरभैर पळणारे लोक, जखमी झालेले प्रवासी, अमरच्या जखमा व हॉस्पिटलमध्ये पोहोचण्यापूर्वी

त्याला आलेला मृत्यू ही सर्व माहिती पुरवून, तिला सांत्वनपर चार शब्द सांगून त्याने तिला ओळख पटविण्यासाठी लगेच हॉस्पिटलमध्ये यायला सांगून फोन खाली ठेवला.

कित्येक क्षण सुन्न होऊन सीमा तशीच उभी राहिली. क्षणात तिच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. आदल्याच वर्षी काढलेल्या अमरच्या पन्नास हजार डॉलर्सच्या लाइफ इन्शुअरन्स पॉलिसीची तिला आठवण झाली. पन्नास हजार डॉलर्स वुइथ डबल इन्डेम्निटी फॉर ॲक्सिडेंटल डेथ. एकूण एक लाख डॉलर्स!

काही क्षण स्वतःचा श्वासोच्छ्वास बंद पडल्याचा तिला भास झाला. ती धावतच स्वैंपाकखोलीत गेली. टेबलावर ठेवलेल्या खोक्यातील यंत्र काढून तिने ओट्यावर आपटायला सुरुवात केली. ते यंत्र फुटलं तेव्हा तिला त्यात काहीच आढळलं नाही. ते कसं जुळवलं होतं तेच तिला समजेना.

कार्ड उचलून तिने टर्नरचा नंबर फिरवला. पलीकडून फोन उचलल्याचा आवाज ऐकू येताच ती जवळजवळ किंचाळली, "मिस्टर टर्नर, मरणारी व्यक्ती मला अनोळखी असेल याची तुम्ही हमी दिली होती." पलीकडून थंड, कोरड्या आवाजात टर्नर विचारत होता, "तुम्ही तुमच्या नवऱ्याला खरोखरच ओळखत होता का मिसेस प्रधान?"

◈◈◈◈

# न चाललेली पाऊलवाट

भेटायला येण्यासाठी भास्करमामांचा फोन आला तेव्हाच श्याम उमजला होता की आता आपली तीन-चार तासांची बेगमी नक्कीच झाली. यातून सुटकाच नाही. मामांनी भाच्याला आपल्या घरी जेवायला बोलावलं होतं. मामी दोन-तीन दिवसांसाठी कुठल्याशा मीटिंग करता फ्लॉरिडाला गेल्या होत्या.

भास्करमामा श्यामच्या आईचे सर्वांत मोठे भाऊ. एम.बी.बी.एस.ची पदवी घेऊन १९६३ साली मुंबईहून ते या देशात म्हणजे अमेरिकेत आले. आल्यावर त्यांनी प्रथम आपल्या आईवडिलांना आणि त्यांच्यातर्फे बहिणीला व मेहुण्यांना या देशात आणलं. त्यांचा मधला भाऊ मुंबईला प्राध्यापक होता. भास्करमामा त्याला प्रेमाने 'मास्तर' म्हणत असत. त्यांनी मुंबई सोडून अमेरिकेत येण्यास नकार दिला होता. परंतु त्यांचा मुलगा शिक्षणासाठी येऊन नंतर अमेरिकेत स्थायिक झाला होता. तो श्यामच्या वयाचा होता. भास्करमामांना मूलबाळ नव्हतं, पण त्यांच्याकडे गडगंज संपत्ती होती. श्याम व त्याचा मोठा फिजिशियन भाऊ नील (हा अनिलचा अमेरिकन अपभ्रंश) मामांचे लाडके भाचे होते. मामामामींचा दोघांवरही लहानपणापासून फार जीव होता.

गेले कित्येक महिने श्यामने आपल्या बेजबाबदार (?) वागण्यामुळे स्वतःवर आईवडिलांचा व मामामामींचा राग ओढवून घेतला होता. तेव्हा आता भास्करमामांकडून काय ऐकावं लागणार आहे याची श्यामला चांगलीच कल्पना होती. परंतु भास्करमामांच्या निमंत्रणाला नकार देणं शक्य नसल्यामुळे तो नाइलाजास्तव त्यांना त्यांच्या घरी भेटण्यास तयार झाला होता.

मामांनी चायनीज जेवण मागवलं होतं व ते श्यामबरोबर जेवण्यास फॅमिली रूममध्ये अवतरले. एप्रिल महिन्यातील कललेली दुपार होती. नुकताच पाऊस

पडून गेला होता. त्यामुळे वातावरणात प्रसन्नता असल्याचं त्याला मामांच्या घराची पायरी चढत असताना जाणवलं होतं. परंतु आता घरात बसल्यावर मात्र त्याचा जीव गुदमरू पाहत होता.

भास्करमामा श्यामच्या समोरच्या सोफ्यावर टेबलावर पाय सोडून आरामात बसले. आजच्या वीकएन्डला ते कॉलवर नसल्यामुळे निर्धास्त होते.

श्याम मामांच्या डोळ्याला डोळा भिडवत नव्हता. त्याच्या चेहऱ्यावर आपली नजर स्थित करत मामांनी आपल्या घोगऱ्या आवाजात श्यामला विचारलं,

''तू किती वर्षांचा झालास हे आठवतंय का तुला? या वयातही तू इतका बेजबाबदारपणे वागू शकतोस?''

आता मात्र आईने मामांना नक्कीच चावी फिरवली असणार याबद्दल श्यामची खात्री पटली.

''गेल्या महिन्यात चोवीस वर्षं पुरी झाली मला.''

''याचा अर्थ गद्धेपंचविशी जवळ आली म्हणूनच असा गद्ध्यासारखा वागतो आहेस ना? निष्कामी, निरुपयोगी, अपयशी, बेजबाबदार –'' त्याच्यावरील आजवर दाबून ठेवलेल्या रागाची वाफ मामांच्या तोंडून बाहेर पडत होती.

मामांचे घारे डोळे, पाणीदार डोळे वयोपरत्वे तपकिरी सुरकुत्यांबरोबर खोलवर दडले होते. त्यांचे जवळजवळ सर्व केस रुपेरी झाले होते. श्यामने मामांच्या डोळ्यांकडे रोखून पाहिलं. त्याच्या मनात विचार आला की किती हळवा आहे आपला मामा! आपल्या भावाच्या लग्नात मामाचे हेच पाणीदार डोळे पाण्याने भरून आलेले श्यामने पाहिले होते. त्याच्या मनात आलं, आपल्या न झालेल्या मुलाची तर मामाला आठवण आली नसेल ना!

''झालं आहे तरी काय तुला?'' मामा त्याच्यावर नजर रोखत म्हणाले. ''तू कधी सेटल होणार आहेस? कधी लग्न करणार आहेस? कधी घर घेणार आहेस? नवी गाडी? कसली मोडकीतोडकी जुनी गाडी चालवतोस? तुला स्वतःची जराही लाज वाटत नाही? कशासाठी कॉलेजशिक्षण घेतलंस? घेऊनच्या घेऊन तेही इंग्लिश लिटरेचरमध्ये. तुझ्यातील लहानपणची सारी हुशारी गेली तरी कुठे?''

भास्करमामांनी सिगरेट शिलगावली व सीलिंगकडे तोंड करून धूर सोडला. निकोटिनमुळे त्यांची बोटं पिवळसर होत चालली होती. श्यामला वाटलं, किती राठ आहेत याचे हात! सर्जनचे हात शोभत नाहीत. अधूनमधून याला स्मोकरचा

खोकलाही येत असतो. याची फुफ्फुसंही खूप काळी झाली असणार. कशासाठी हे सारं! पण त्याला कोण सांगणार?

"तू तुझ्या आयुष्याचा विचार केला पाहिजेस हळूहळू. जीवनाला काहीतरी वळण लावलं पाहिजे. आकार दिला पाहिजे. लोक वाटेल ते बोलू लागतात. आपल्या समाजाची तोंडं कोण धरणार? तुझ्या आईवडिलांनी तुम्हां मुलांसाठी काढलेल्या खस्तांचं काय? तुमच्यासाठी केलेल्या त्यागाचं हेच फळ त्यांना देणार तू?"

कृष्णाने गीतेत केलेला उपदेश त्यांना सुनवावा असा विचार श्यामच्या मनाला क्षणभर चाटून गेला.

"काय बोलतात लोक? कोण काय बोलतं?"

"कुणाची नावं घेण्याची गरज नाही. त्याला महत्त्व नाही."

"माधवकाका आणि त्यांच्या कुटुंबाबद्दल बोलता ना तुम्ही?"

"हो," मामा खांदे उडवून म्हणाले.

"त्यांचा माझ्याशी काय संबंध?"

"तुला खरोखर स्वतःची लाज वाटली पाहिजे. ती माणसं इथे पैशांशिवाय चार-पाच वर्षांपूर्वी आली आणि आज बघ त्यांच्याकडे. त्यांच्या मुलाचा स्वतःचा कॉम्प्युटरचा व्यवसाय आहे. आता तो कोट्याधीश झाला आहे. मोठं घर, नव्या इंपोर्टेड गाड्या."

"कृतघ्न आहेत ती माणसं, मामा. माझ्या डॅडनीच त्यांना स्पॉन्सर केलं. सुरुवातीला ते आमच्याकडेच राहिले. माझ्या वडिलांनीच त्यांच्यासाठी नोकरीची खटपट केली. त्यांनी संसार थाटल्यावर फर्निचरसकट सर्व वस्तू घेऊन दिल्या. आता तर त्यांना आम्हांला भेटण्यासाठीही वेळ मिळत नाही आणि तुम्ही मला त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवायला सांगता?"

"तू हुशार आहेस, सुशिक्षित आहेस. जरा डोळे उघडे ठेवून स्वतःकडे पाहा आणि त्यांच्याकडे पाहा. त्यांच्यापाशी सर्व काही आहे."

"मटिरिअल गोष्टी म्हणजे सर्व काही नव्हे, मामा."

"मूर्खासारखं बडबडू नकोस. तू काय बोलतोस ते तुझं तुला तरी समजतं की नाही कोण जाणे! तू काय करणार आहेस? कोणता व्यवसाय करणार आहेस,

यात मला इंटरेस्ट आहे. ग्रॅज्युएट झाल्यावर तुला चांगली नोकरी मिळाली होती. तुझ्या मनात काय आलं तुलाच ठाऊक! वर्षाच्या आत चांगली नोकरी सोडून ॲक्टिंग-डिरेक्टिंगच्या कोर्ससाठी अचानक युरोपला निघून गेलास. परत आल्यापासून एकही चांगली नोकरी धरली नाहीस. अपार्टमेंटही चांगलं नाही, गाडीही जुनीच....''

''माझी गाडी मला एकदम पसंत आहे. माझी 74 VW Bug.''

''शहाण्यासारखं बोल जरा. त्या पार्टटाइम नोकरीत किती पैसे मिळतात? बिग ब्रदर संस्थेकडून तर काहीच मिळत नाही. फुकाची हमाली. उरलेल्या वेळी म्हणे नाटकात काम करतोस. तुझे आईवडील तुझी समजूत घालू शकत नाहीत. तू म्हणे त्यांना उडवून लावतोस. समाजातील लोकांनी, मित्रांनी विचारल्यास ते काय सांगणार? आपला मुलगा ॲक्टिंग करतो म्हणून? आईवडिलांना समाजात अशी खाली मान घालायला लावताना तुला शरम नाही वाटत?''

''त्यात लाज वाटण्याजोगं काय आहे? तो एक प्रामाणिक व्यवसाय आहे.''

भास्करमामांचा गोरापान चेहरा लालबुंद झाला.

''मी इथे हातात फक्त मेडिकल डिग्री घेऊन आलो. फार पैसे जवळ नव्हते. स्वतःच्या मेहनतीवर हे राज्य उभारलं. तुझ्या आईवडिलांनीही तेच केलं.''

''आता तुझ्याकडे अमाप पैसा आहे. तुझी दोन मोठी घरं आहेत. बरीच रिअल इस्टेट आहे ना, भास्करमामा? तू आणि मामी खरंच खूप सुखी आहात?''

''मला तूच खरं खरं सांग, भविष्यात तुझे कोणते प्रकल्प आहेत? सध्या तू त्यासाठी काय करतो आहेस?''

''तुला सर्व ठाऊकच आहे भास्करमामा. तुझ्या बहिणीच्या या आळशी मुलाबद्दल तुला सर्वांनी माहिती पुरवलेली आहे आजपर्यंत. मला वेगळं सांगायची गरजच नाही. मी ॲक्टिंगसाठी हल्ली नवीन नाटक वाचतो आहे. एका मित्राने भांडवल पुरवलेल्या एका सिनेमाचं दिग्दर्शन करतो आहे व त्यात ॲक्टिंग पण करतो आहे. उरलेल्या वेळात शहरातील काही मुलांचा बिग ब्रदर बनून त्या disadvantaged मुलांना काही वेळेपुरता आनंद देतो आहे. त्यांना सल्ला देतो, सिनेमाला नेतो, गेम्सना नेतो, त्यांच्याशी खेळतो, त्यांना पुस्तकं वाचून दाखवतो. आठवड्यातील काही दिवस नर्सिंग होममधील वृद्ध रुग्णांशी गप्पा मारतो, त्यांना माझे युरोपमधील, नाटकातील अनुभव सांगून हसवतो. त्यांच्याबरोबर मलाही

आनंद होतो, मामा. आयुष्याला काहीतरी अर्थ मिळतो. आठवड्यातून तीन दिवस थिएटरमध्ये नोकरी करतो."

आपण कविताही लिहितो हे मामांना सांगितल्यास त्यांना कदाचित हार्ट अटॅक येईल याची श्यामला भीती वाटली.

भास्करमामांनी ओठ एकावर एक दाबून धरले व मान हलवत ते म्हणाले, "मोठा तत्त्वज्ञानी लागून गेलास. या गोष्टी तू चांगली नोकरी धरून वीकएन्डलाही करू शकतोस."

"माझा ॲक्टिंगचा व्यवसाय मिळेल तसा चालूच आहे मामा."

भास्करमामांनी एक लांब सुस्कारा सोडला. त्यांचा गोरा चेहरा पुन्हा लाल होऊ लागला. त्यांनी ओठ घट्ट आवळून धरले. जणू काही ते रागाच्या भरात काही उणेदुणे शब्द तोंडातून बाहेर पडतील ते आवरून धरण्याचा प्रयत्न करत होते.

"कसला खोटा अभिमान बाळगतोस तू श्याम? तू आज मला माझ्या एका वकील मित्राची आठवण करून दिलीस बघ. अप्रामाणिकपणाचा वास आल्यास तो ती केस हाती घेत नसे. स्वतःबद्दल, स्वतःच्या प्रामाणिकपणाबद्दल खोटा अभिमान बाळगून होता. शेवटपर्यंत गरिबीतच राहिला. बरोबरच्या वकिलांप्रमाणे स्वतःचं घर कधी उभं करू शकला नाही की स्वतःचं वाहन खरेदी करू शकला नाही. त्याच्यासारखाच तूही जीवनातील अनेक सुखांना मुकशील, श्याम."

"सर्वच सुखं पैशाने मिळू शकतात असं कोण ठरवतं, मामा? मी आज सुखी आहे तसाच उद्या राहीन. अशा स्थितीत मला समजून घेऊन माझ्याशी लग्न करणारी मुलगी भेटली तर लग्नही करीन. नपेक्षा लग्नाशिवाय राहीन."

"तू एक शतमूर्ख आहेस."

श्यामला वाटलं, आपण मामांकडून फार ऐकून घेतलं. तो जाण्यासाठी उठून उभा राहिला. त्याच वेळी दरवाज्याची घंटा वाजली. मामांनी दार उघडून श्यामच्या मोठ्या भावाला आत आणलं. नील फॅमिली रूममध्ये येताच धाडकन सोफ्यावर आदळला. त्याचे डोळे सुजवट वाटत होते. रात्रभर हॉस्पिटलमध्ये राहावं लागल्यामुळे असेल कदाचित. आपल्याला निदान असा निद्रानाश करून घ्यावा लागत नाही याबद्दल श्यामला बरं वाटलं.

नील मामांचा वैद्यकीय सल्ला घेण्यासाठी आला होता. निदान श्यामला तरी तसं सांगण्यात आलं होतं.

‘‘तू तुझ्या भावासारखा, नीलसारखा का वागत नाहीस? त्याने पाहा किती यश मिळवलं आहे. सर्व सुखं त्याच्या पायाशी आहेत.’’

‘‘कारण मला त्याच्यासारखं व्हायचं नाही. तो वाट चुकला आहे. हरवला आहे. मी नाही.’’

‘‘नील संसारी, कुटुंबवत्सल गृहस्थ आहे. दोन मुलंही आहेत त्याला. तो आज भरपूर कमावतो आहे. वाट, दिशा चुकला आहेस तू.’’

‘‘माझ्या शुभेच्छा सतत राहतील त्याच्यापाशी.’’ श्यामला वाटलं, आपल्या पश्चात ही सर्व मंडळी आपल्या बाबतीत निराशेने मान हलवत असतील. रस्ता चुकलेला वाटसरू म्हणून आपली संभावना करत असतील.

‘‘मी तुझ्या भल्यासाठीच सांगतो आहे श्याम.’’

‘‘माझ्या भल्यासाठी की वाईटासाठी?’’

‘‘सरळ बोल,’’ भास्करमामांच्या आवाजात जरब होती व आवाज बराच वर चढला होता.

‘‘मी सरळच बोलतो आहे.’’

‘‘तू माझी चेष्टा करतो आहेस.’’

‘‘नाही मामा, तुम्ही माझी थट्टा करता आहात.’’

निराशेने हात बाजूला फेकत मामांनी हताशपणे श्यामला विचारलं, ‘‘तुला हवं आहे तरी काय? भविष्याकडून तुझी अपेक्षा तरी काय आहे? तू पर्वा तरी कशाची करतोस?’’

‘‘सांगतो तुम्हांला, मी कशाची पर्वा करतो ते. थोड्याच वेळापूर्वी मी इथे येण्याआधी रस्त्यावरून चालत होतो. जग फार अस्थिर वाटत होतं. मी मान वर करून आकाशाकडे नजर फेकली तेव्हा एक चमत्कार माझ्या नजरेस पडला. काय माहीत आहे? पाऊस. वसंतातील पाऊस. हळूहळू हलत तो माझ्यापर्यंत पोहोचला आणि त्याने मला हळूवारपणे स्पर्श केला – माझ्याकडून कसलीही अपेक्षा न करता. एका बुकस्टोअरच्या बाहेर मला पावसाने गाठलं म्हणून मी त्या दुकानात शिरलो आणि तासभर पुस्तकांच्या सहवासात आनंदाने घालवला. कुणी हटकलं नाही, पैसे मागितले नाहीत की मलाही कुणी काही दिलं नाही. मी बरीच पुस्तकं हाताळली, कुणीही माझ्याकडे काही मागणी केली नाही. कुणीही मला

बाहेर जाऊन पन्नास–साठ हजार डॉलर्स कमवून आणण्याची सक्ती केली नाही, की मी माझं आयुष्य का बरबाद करत आहे असं विचारलं नाही.''

भास्करमामा उठून उभे राहिले. ''तू पावसापासून दूर राहिलास तर कदाचित तुझ्यात थोडाफार बदल होण्याची शक्यता आहे.''

श्यामने त्यांना अडवून म्हटलं, ''आतापर्यंत बोलण्याचा मक्ता तुम्ही घेतलात मामा. आता मला माझं बोलणं पुरं करू दे. सर्व रंगांची, आकारांची पुस्तकं तिथे होती. काही स्वस्त, काही महाग. त्यांतील काही मी नवीन शाईचा वास घेत वाचलीही.''

भास्करमामा श्यामला थांबवत म्हणाले, ''तू आतापर्यंत काय बोललास ते मला मुळीच समजलं नाही. मूर्ख आहेस तू. आयुष्यात काहीही न मिळवता, न ठेवता जाशील या जगातून. एकटाच राहशील आयुष्यभर.''

श्याम हसला. भास्करमामांनी त्याच्या डोक्यावर हात फिरवून त्याचे केस थोडेसे विस्कटले व त्यांनी आपला मोर्चा नीलकडे वळवला. उबदार पाऊस व नवीन पुस्तकांच्या वासाचा पुन्हा अनुभव चाखत श्याम थोडा वेळ काहीही न बोलता बसून राहिला. नंतर कोट चढवून तो घराबाहेर पडला. मामा त्याच्याकडे निराशेने पाहत होते. या भाच्याने अखेर त्यांना हरवलं होतं.

बाहेर येऊन श्याम आपल्या १९७४ च्या बगमध्ये बसून निघाला. पाऊस आता थांबला होता व आकाशात ढग अलग होत होते. लालभडक सूर्य त्यांतून डोकावत होता. श्याम बुकस्टोअरजवळ पोहोचला, तेव्हा रस्त्यावरील सर्व दिवे एकदम लागल्यामुळे साइडवॉक एकदम उजळून निघाला. आता त्यात रहस्य उरले नव्हते.

◈◈◈◈

# निर्णय

माझ्या मुलांना तिच्याबद्दल प्रेम नव्हतं अशातला भाग नव्हता. पण या देशातील भौतिक गोष्टींची व व्यक्तिस्वातंत्र्याची चटक लागल्यामुळे दिवसातील विविध कार्यक्रमांमधून, आपल्या उद्योगांतून तिच्याकडे फारसं लक्ष द्यायला त्यांच्याकडे वेळ नव्हता. ती म्हातारी होती, थोडीशी अपंगही होती. त्याचप्रमाणे वृद्धांना साजेशा भारतीय मूल्यांना ती जोपासत होती आणि म्हणूनच की काय, माझी मुलं जरी तिचा द्वेष करत नव्हती तरी ती त्यांच्या नजरेला सतत बोचत असल्याची जाणीव मला प्रत्येक क्षणी होत होती.

रोज संध्याकाळच्या सुमारास जेव्हा माझा अठरा वर्षांचा विपिन व सतरा वर्षांचा विनय शाळा–कॉलेजांतून घरी येत, तेव्हा बाहेरच्या व्हरांड्यात आजी त्यांची वाट पाहत आरामखुर्चीत बसलेली पाहून, आपल्या व्यक्तिस्वातंत्र्यावर ती आक्रमण करत आहे असं त्यांना वाटे. माझी कॉलेजकन्या नयना तर आल्यावर तिच्याकडे न पाहता खोलीत जाऊन फोन हातात घेई. पांढऱ्याशुभ्र झालेल्या आपल्या केसांवर भर उन्हाळ्यातसुद्धा काळी शाल ओढून घेऊन बसलेली नऊवारी साडीतील आजी त्यांच्या नजरेला विदूषकासारखी वाटे आणि या सर्वांवर ताण म्हणजे आजी डोळ्यांसमोर वर्तमानपत्र किंवा मासिक आणि तेही बऱ्याच वेळा उलटं धरून बसे. आपण मुलांच्या वाटेकडे डोळे लावून बसतो असं त्यांना वाटू नये व त्याबरोबरच आपण शिक्षित आहोत हे शेजाऱ्यांनी जाणावं यासाठी हा देखावा असे.

माझी आई शिक्षिका होती व तिला वाचनाचा दांडगा उत्साह होता. वाचन हा तिचा एकमेव व्यासंग होता असं म्हटल्यास ते चुकीचं ठरणार नाही. पण या वयात दोन्ही डोळ्यांत मोतीबिंदू पडल्यामुळे तिला वाचता येत नसे आणि ते

कबूल करण्याची तिची हिंमत नव्हती. मला वेळ मिळे तेव्हा मी तिला मासिकं किंवा कथा-कांदबऱ्या वाचून दाखवत असे. माझ्या मुलांनीही शाळा-कॉलेजांतल्या, मित्र-मैत्रिणींच्या बातम्या, गोष्टी आपल्याला सांगाव्या, इंग्रजी मासिकं, पुस्तकं वाचून दाखवावी, राजकारण-सामाजिक समस्यांवर चर्चा करावी अशी तिची फार इच्छा असे. ती बऱ्याच वेळा तसं बोलूनही दाखवत असे. जेवताना ती उत्साहाने चर्चेत भाग घेण्याचा प्रयत्न करीत असे. पण मुलांना तिच्यासाठी वेळ नव्हता. ती आपल्याच व्यवहारांत, मित्रमैत्रिणींत दंग होती.

विपिन व नयनाला आजीला नर्सिंग होममध्ये ठेवायची नाहीतर मुंबईला परत पाठवायची वेळ आली आहे असं वाटे. आता तर त्यांच्या बऱ्याच मित्रमैत्रिणी त्यांच्याबरोबर घरी येऊ लागल्या होत्या. आईला त्या सर्वांचे कपडे, त्यांचं वागणं पसंत नसे व ती त्याबद्दल उघडपणे टीकेच्या सुरात तक्रार पण करी. मित्रांपुढे काहीतरी प्रश्न विचारून, टीका करून आजी आपल्याला मान खाली करायला लावणार याची त्यांना सतत भीती वाटत असे. त्यासाठी मुलं जास्तीत जास्त वेळ मित्रांबरोबर बाहेर किंवा त्यांच्या घरी काढू लागली होती. छोटा विनय अजूनही थोडा वेळ आजीच्या संगतीत घालवत असे. अलिकडे हा वेळ बराच कमी होऊ लागला होता.

नयनाचा एकविसावा वाढदिवस जवळ आला होता. तिच्यासाठी मोठी पार्टी द्यायचा घाट विपिन-विनय रचत होते. पण त्यापूर्वी एका गोष्टीचा सोक्षमोक्ष लावायचा विचार मुलं करत होती. वडिलांशी त्याबद्दल बोलण्याचा प्रश्नच नव्हता. कारण त्यांना भारतीय मुलांनी स्वतःचं वेगळेपण विसरून सर्व बाबतींत अमेरिकन लोकांचं अनुकरण करणं पसंत नव्हतं. म्हणून हे सर्व प्रकरण माझ्याकडे न्यायचं मुलांनी ठरवलं. एकतर त्यांच्या दृष्टीने मी फार समजूतदार होते. दुसरं म्हणजे वेळकाळाप्रमाणे बदलण्याची माझी नेहमी तयारी असे. त्याशिवाय इथल्या समाजाच्या चालीरीतींची त्यांच्या वडिलांपेक्षा मला थोडी जास्त माहिती होती. याला कारण माझा व्यवसाय. मी हायस्कूलमध्ये शिक्षिका होते. पण याहीपेक्षा त्यांची आजी ही माझी आई होती हे मुख्य कारण. माझ्या भावा-भावजयीने छळल्यामुळे एवढ्या लांब का होईना, मी तिला तिच्या म्हातारपणी आश्रय दिला होता.

माझ्या कुटुंबाला ऐशआरामात, सुखात ठेवायची; पण त्याचबरोबर भारतीय मूल्यांना, थोड्याफार प्रमाणात का होईना, जपायची माझी फार इच्छा होती.

त्यासाठी कितीही कष्ट उपसायची माझी तयारी होती. माझ्या नोकरीमुळे बँक अकाउंटबरोबरच सामाजिक स्थान व पर्यायाने हे स्थान मोजण्या-मापण्याची प्रतीकंही हळूहळू वाढत होती. सध्याचं टाउनहाऊस जुनं, लहान व कमी प्रतीचं वाटू लागलं होतं. मोठ्या आलिशान, नवीन घराच्या पहिल्या मोठ्या हप्त्यासाठी मी पैसे जमवले होते. डोळ्यांसमोर बंगला, फुलझाडांनी बहरलेली भोवतालची बाग व दोन गाड्या ठेवण्यासाठी गराज दिसत होतं.

मी स्वैंपाकखोलीत भाजी चिरत असता विनयने येऊन मला मिठी मारली. मी त्याला ढकलत म्हटलं, ''अंहं, तू कितीही लाडीगोडी लावलीस तरी तुला देण्यासाठी माझ्याकडे आज मुळीच पैसे नाहीत. सगळे पैसे नयनाच्या पार्टीसाठी खर्च झाले.'' विनयने बाजूला होऊन नयनाला माझ्यासमोर येण्यासाठी वाट करून दिली.

नयना अगदी तिच्या वडिलांच्या वळणावर गेली होती. तसंच तिची वडिलांवर जरा अधिक माया होती. प्रत्येक गोष्टीत वडिलांप्रमाणे ती स्वतःचंच म्हणणं खरं करत होती. त्या मानाने मी स्वभावाने शांत व नरम होते. कुठलाही ताण सहन करण्याची शक्ती माझ्यात नव्हती. विनय माझ्यावर गेला होता. शांत व सरळ. मधला विपिन अलिप्तच असे. आपला आपण बरा. ना कुणाच्या अध्यात, ना मध्यात.

''आई, आम्हांला तुझ्याशी थोडं खासगी बोलायचंय,'' नयना म्हणाली. मी पदराला हात पुसून थकलेलं शरीर काउंटरला टेकवलं. ''मी पुन्हा सांगते, माझ्याकडे या आठवड्यात मुळीच पैसे नाहीत. पार्टीच्या बऱ्याच वस्तू महाग होत्या. आई सामोसे करणार आहे. त्यामुळे माझा बराच खर्च आणि वेळ वाचेल,'' मी.

''आम्हांला तुझ्याशी आजीबद्दलच बोलायचं आहे,'' नयनाने हळूहळू सुरुवात केली.

विपिनने छताकडे नजर वळवली. विनय माझ्याजवळ येऊन उभा राहिला. जणू काही जे बोललं जाणार आहे त्या धक्क्याने जर माझ्यावर पडायची पाळी आली तर धरायला जवळ असावं या पावित्र्यात तो उभा होता.

''आजीबद्दल काय बोलायचं आहे?'' मीही मनाशी आईबद्दलच विचार करत होते. तिचं भविष्य काय, हा विचार बऱ्याच वेळा मनाला सतावत होता. नव्या घरात संधिवाताने गांजलेल्या, डोळ्यांनी नीटसं न दिसणाऱ्या, बशीत ओतून चहा पिणाऱ्या या म्हाताऱ्या बाईसाठी कुठेच जागा दिसत नव्हती.

''हे बघ आई,'' विपिनचा घोगरा आवाज.

नयना त्याच्याकडे जळजळीत कटाक्ष टाकत, दात आवळत उद्‌गारली, "जेव्हा आमच्या मित्रमैत्रिणी घरात येतात तेव्हा आजी आम्हांला फार शरमिंदं करते. ऑकवर्ड वाटतं बघ. उद्या पार्टीच्या वेळी तू तिला वर बेडरूममध्ये राहायला सांगशील का?" भुवया आकुंचित करून ती गप्प झाली.

"हो आई," विपिनने भर घातली. "ती फार एम्बॅरॅस करते आम्हांला. शिवाय नव्या घरात गेल्यावर काय? मला माझी स्वतंत्र खोली हवी. यापुढे मी आणि विनय एका खोलीत राहू शकणार नाही. आम्हांला प्रायव्हसी हवी. नयनाला तिची खोली मिळेल. मग आजीचं काय?" वडिलांच्या अकाली निधनानंतरचा एका चाळीच्या खोलीतला संसार माझ्या डोळ्यांपुढे झळकला. या सर्व बोलण्यात विनय मात्र गप्पच होता.

माझा आवाज माझ्या नकळत चढला. "तुमची आजी माझी आई आहे हे विसरलात तुम्ही. मी कामावर जाते तेव्हा मला मदत म्हणून ती रोज स्वयंपाक करते. या वयातही आजारी असताना तुम्हांला वेळ नसतो म्हणून बऱ्याच वेळा तुमच्या कपड्यांना इस्त्री करते, कपडे धुते. एवढं करूनही तिला आपली सर्वांची गरज आहे हे तुम्ही विसरता."

"पण तुला यातून काहीतरी मार्ग काढायलाच हवा आई," नयना फणकारली.

मी काउंटरकडे पाठ करून तिच्याकडे तोंड वळवलं. "तुम्ही तुमच्या अमेरिकन मित्रांप्रमाणे आईवडिलांना उलटून बोलायला शिकलात. ऐषआरामाची चटक लागलेली तुम्ही मुलं इथल्या ॲडिक्टेड मुलांपेक्षाही भयंकर आहात. तुम्हांला या देशात आणलं, वाढवलं, शिकवलं ही आमची चूक झाली. बऱ्याच गोष्टींचा मला आता पश्चात्ताप होतो आहे."

एवढं एका दमात बोलून मी पोर्चमध्ये आले. डोळे मिटून आई तिथल्या आरामखुर्चीत डुलत होती. तिच्या चेहऱ्यावरच्या सुरकुत्यांतली काळजी नाहीशी झाल्यासारखी भासली मला. तिला झोप लागली असावी असं समजून मी घरात आले. नाही, मी आईला कुठेही पाठवणार नव्हते. प्रत्येकाला आपले शेवटचे दिवस आपल्या माणसात, सुखासमाधानात घालवण्याचा हक्क होता.

हॉलमधल्या टेबलावरून मी नयना-विपिन-विनयचा फोटो हातात घेतला. विपिन - शांत, उंच, खिलाडू, पण थोडा एककल्ली. नयना - सुरेख, हुशार, कलावंत. लवकरच कॉलेजमधून ग्रॅज्युएट होणार होती. बारावीतला विनय विपिनहून थोडा लहान. पण त्याच्या तरतरीत चेहऱ्यावर हुशारी स्पष्ट दिसत होती. तो ऑनर रोल मिळवत होता. आपल्या म्हाताऱ्या विधवा आजीची - जिने तरुण वयात

पतीच्या पश्चात आपल्या मुलांना भविष्यात सुख मिळावं म्हणून अपार कष्ट केले होते – त्यांना पर्वा नव्हती. ही सर्व मुलं स्वतःमध्येच गुरफटली होती. आजीच्या उरलेल्या शेवटच्या दिवसांत त्यांना तिची अडचण भासत होती.

त्या संध्याकाळी जेवताना सर्वजण गप्प होते. एक प्रकारची विषण्ण स्तब्धता सर्वांनाच बोचत होती. मी केलेल्या स्वैंपाकाला नावाजत आईने आमटीचे भुरके मारायला सुरुवात केली. विनय–विपिननी आजीकडे नाखुशीचा कटाक्ष टाकून मुकाट्याने जेवायला सुरुवात केली. आजीमुळे रोज त्यांचं आवडतं अमेरिकन जेवण मुलांना मिळत नसे. त्यामुळे ती नाराज असत. श्यामने, माझ्या नवऱ्याने, माझ्या नजरेला नजर देण्याचं कटाक्षाने टाळलं आहे असा मला भास होत होता. आई अचानक उठली व जाता जाता ''आज फार थकले गं ! जरा झोपते लवकर,'' म्हणत ती झोपायला निघून गेली. मी फक्त मान डोलावली. पण इतरांनी तिच्याकडे लक्ष दिलं नाही. जेवणानंतर विपिन खेळाच्या प्रॅक्टिसला निघून गेला. टेबल साफ करून नयना आपल्या मैत्रिणीकडे रात्री राहायला जाण्यासाठी कपडे काढायला गेली. तिच्या आधी विनय सायन्स प्रोजेक्टवर चर्चा करण्यासाठी मित्राकडे गेला होता. मी टी.व्ही. लावून काय कार्यक्रम चालले आहेत ते पाहू लागले.

''मंगला, टी.व्ही. लावू नकोस. मला तुझ्याशी काही बोलायचं आहे,'' श्यामचा आवाज. त्या आवाजातील तीव्रतेबरोबर त्यातील धार मला टोचली. आता आणखी काय ऐकावं लागणार आहे याचा विचार करत मी मान वर केली.

''तुझ्या भावाचं मुंबईहून पत्र कधी आलं होतं?'' त्याने प्रश्न केला. ''या वर्षीची थंडी आईंनी मुंबईला घालवावी असं मला वाटतं.''

''ती फार थकली आहे श्याम. या वयात एवढा मोठा प्रवास तिला सोसणार नाही.''

''तू साध्या प्रश्नाचं सरळ उत्तर देशील का? तुला तुझ्या भावाचं पत्र येऊन किती दिवस झाले?''

''बऱ्याच दिवसांत त्याचं पत्र नाही,'' मी जवळचं मासिक उचलत म्हटलं.

''ते मासिक ठेवून दे मंगला आणि ऐक. तुझी आई मुलांना अपसेट करते आहे. मुलं माझ्या पाठीशी लागली आहेत, त्यामुळे मलाही फार त्रास होतो आहे. सर्व माझ्या सहनशक्तीच्या पलीकडे जातंय. तिला ऐकू कमी येतं, मोतीबिंदूमुळे नीट दिसत नाही. ती जवळजवळ त्र्याऐंशी वर्षांची आहे. या देशात अशा वृद्धांना नर्सिंग होममध्ये ठेवतात.''

"आपण भारतीय लोक म्हाताऱ्या माणसांना कधीपासून नर्सिंग होममध्ये ठेवू लागलो? मरेपर्यंत ते आपल्या मुलांजवळ राहतात. माझी आई फार म्हातारी झाली आहे. तिचं फारसं आयुष्य उरलेलं नाही. शेवटचे दिवस मोजते आहे ती," मी डोळे पुसत म्हटलं.

श्यामने माझ्याकडे रोखून पाहिलं आणि उठून फेऱ्या मारत तो म्हणाला, "आपण भारतीय आपल्या गरिबीत, छोट्या जागेत, अस्वच्छ वातावरणात किड्यांसारखं आयुष्य जगतो. फक्त अस्तित्व असतं त्यांना जीवन जगण्याची पात्रता नाही. तुम्हां बायकांशी काही बोललं की लगेच तुमच्या डोळ्यांत पाणी टपकतं. मग पुढचं बोलणंच खुंटतं. मी तुला निक्षून सांगतो की एक तर तुझ्या आईला जावं लागेल नाहीतर थोड्याच दिवसांत नयना घरातून निघून जाईल. ती गावात अपार्टमेंट घेऊन राहणार आहे. मग तुझ्या आईला नव्या घरात स्वतंत्र खोली देता येईल." नयना घरातून जाईल या धास्तीने श्याम अगतिक झाला होता. त्याची विचारशक्ती मंदावली होती.

"काही झालं तरी ती माझी आई आहे. नयनाचं सोड. तू तर भारतात वाढलास. तू असं कसं बोलू शकतोस? या देशात येऊन एवढा बदलू शकतो माणूस?"

"हो, तुझी मुलंही तुझ्याच पोटात वाढली आहेत ते विसरू नकोस. तीही तुझीच आहेत," एवढं बोलून तो रागात दरवाजा लोटून खोलीतून निघून गेला.

मी तळमळत बिछान्यात पडले. रात्र तशीच बिथरलेल्या मनःस्थितीत गेली. मध्यरात्रीनंतर कधीतरी डोळा लागला. श्यामचं म्हणणंही पटत असलं तरी आजारी आईला एवढ्या मोठ्या प्रवासाला पाठवायचा विचारही माझ्या मनाला पटेना आणि तिथे पाठवलं तरी वहिनीच्या खोचक बोलण्यापुढे व आदळआपट करण्यापुढे तिचा बिचारीचा कसा निभाव लागेल? एखाद्या कचऱ्याच्या टोपलीसारखी ती कोपऱ्यात पडून राहील. दोन-तीन वेळचं जेवण तेवढं तिच्यासमोर फेकण्यात येईल. आयुष्यभर तिने आपल्यासाठी एवढे कष्ट काढले, पण शेवटचे चार दिवसही तिला सुखात घालवता येऊ नयेत किंवा तिला सुखात ठेवण्यासाठी एवढंही आपल्याला करता येऊ नये याची मला खंत होती. तरीसुद्धा, सकाळी मुलांना व श्यामला तोंड देण्याची शक्ती माझ्यात उरली नव्हती. भावाला पत्र लिहून तिला मुंबईला पाठवण्याचा निर्णय मी घेतला.

उशिरा डोळा लागूनही सकाळी मला अचानक लवकर जाग आली. घरातील शांतता विचित्र वाटू लागली. पण काहीतरी आवाज ऐकल्यासारखं वाटलं

म्हणून मी बेडरूमच्या बाहेर आले. विपिन–विनय त्यांच्या खोलीत गाढ झोपले होते. नयनाची खोली मोकळी होती. अर्थात ते अपेक्षित होतं. मी खाली स्वयंपाकखोलीत आले. तिथंही कुणी नव्हतं. आई जागेवर नव्हती. आरामखुर्चीचा आवाज ऐकल्यासारखं वाटलं म्हणून मी पोर्चमध्ये आले. आई तिच्या आरामखुर्चीत बसली होती. काळी शाल डोक्यापासून अंगभर ओढलेली होती. तिच्या मांडीवर माझ्या तिन्ही मुलांचा फोटो होता आणि डोळे मिटलेले होते. आरामखुर्ची स्तब्ध होती. काहीही हलल्याचा आवाज ऐकू येत नव्हता. सारं कसं शांत शांत होतं. माझ्या डोळ्यांसमोर माझी आई झोपली होती, कायमची.

एका आठवड्यानंतर सर्व लोक निघून गेल्यावर मी श्यामला व मुलांना जवळ बोलावलं. 'आता आणखी काय?' हा विस्मय सर्वांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. मी एक आवंढा गिळून थंड आवाजात घोषणा केली. "नव्या घराच्या डाउन पेमेंटसाठी साठवलेले काही पैसे मी पुण्याच्या सेवासदनला आईच्या नावे पाठवले आहेत. आपल्याला आता मोठ्या नव्या घराची गरज नाही." श्यामचा चहा त्याच्या घशात अडकून त्याला ठसका लागला. मुलांचा माझ्या शब्दांवर विश्वास बसेना.

"पण आई..." नयनाने बोलण्याचा प्रयत्न केला.

"अंहं, तू नाहीतरी अपार्टमेंटमध्ये राहायला जाणार होतीस. आता तू मोकळी आहेस. तुझं व्यक्तिस्वातंत्र्य तुझ्या हवाली करत आहे. विपिन लवकरच त्याच्या कॉलेजच्या डॉर्ममध्ये जाईल. पुढल्या वर्षी विनयसुद्धा लांब कॉलेजमध्ये जाणार आहे. राहता राहिलो आम्ही दोघं. आम्हांला मोठ्या घराची गरज नाही. माझ्या आईने आपल्या मुलांसाठी आयुष्यभर फार कष्ट काढले. पण तिच्या स्वतःच्या मुलांना व त्यांच्या मुलांना तिचं ओझं वाटलं. मी तिच्या नावे अशाच मुलांनी नाकारलेल्या, म्हाताऱ्यांनी शेवटचे दिवस सुखात घालवावे म्हणून, नवीन ट्रस्ट करून सेवासदनला पैसे पाठवले आहेत आणि यापुढे पाठवत राहीन."

श्यामने मान डोलावली. विपिन माझ्याकडे पाहून फिकटपणे हसला. विनयने उठून आजीचा फोटो हातात घेतला. नयना रागाने उठून खोलीतून निघून गेली तेव्हा बाहेरच्या दाराचा मोठा आवाज ऐकू आला.

मी विनयने आत आणलेल्या आरामखुर्चीवर बसले. मी फार थकले होते. मला विश्रांतीबरोबरच आईच्या मायेची फार गरज भासली.

◈◈◈◈

# आहे मनोहर तरी...

एकटीच चहा पीत असताना आशाने खिडकीबाहेर नजर टाकली. सकाळच्या कोवळ्या उन्हाचे किरण खिडकीतून आत येत होते. खिडकीच्या दारावर बसून एक चिमणी चिवचिवाट करत होती. खिडकीच्या झालर लावलेल्या पडद्यांकडे कौतुकाने पाहत आशाने खोलीवरून नजर फिरवली. तिला आपल्या कलात्मकतेचा, अभिरुचीचा अभिमान वाटला. स्वैंपाकघर सर्व अद्ययावत उपकरणांनी सुशोभित होतं. बाहेरचा दिवाणखानाही तिच्या उच्च अभिरुचीची ग्वाही देत होता. संजयने बाहेरच्या देशांतून आणलेल्या सुरेख वस्तू, तिने करवून घेतलेल्या चांदीच्या वस्तू, उत्तमोत्तम पोर्सलिनची शिल्पं या सर्वांबरोबरच अद्ययावत फर्निचर व पडदे यांनी सुशोभित केलेला दिवाणखाना फार सुरेख दिसत होता. आशाच्या मैत्रिणी किंवा महिलामंडळातील स्त्रिया जेव्हा तिच्याकडे येत तेव्हा तिच्या कलात्मकतेची, श्रीमंतीची व भाग्याची अमाप स्तुती करायला चुकत नसत...

चमनमें रहके वीराना
मेरा दिल होता जाता है ।
खुशीमें आजकल कुछ गम भी
शामिल होता जाता है ।।

शमशादच्या गाण्याचे हे सूर तिने मघाशी लावलेल्या टेपवर ऐकले व ती स्वतःशीच हसली. तिचं मन एकदम भूतकाळात शिरलं.

तीन भावंडांतील आशा ही दुसरी मुलगी. वडिलांची आर्थिक परिस्थिती जेमतेमच होती. त्यात दोन मुली पदराशी व धाकट्याचं इंजिनिअरिंगचं शिक्षण पुरं व्हायचं होतं. थोरल्या रेखाचं लग्न हुंडा द्यायला पैसे नसल्यामुळे तिच्या वडिलांनी

त्यांच्याच ऑफिसमधल्या एका कारकुनाशी लावून दिलं होतं. वरवर पाहता रेखा आपल्या संसारात सुखी होती, पण त्यांची होणारी आर्थिक ओढाताण सर्वांनाच जाणवत होती. सोशल वर्कमध्ये एम.ए. झाल्यावर आशा नोकरी करून घरखर्चाला हातभार लावत होती. गोऱ्या व सुंदर असलेल्या आशाला रेश्माच्या – तिच्या मैत्रिणीच्या – लग्नात रेश्माच्या मामेभावाने – संजयने – पाहिलं व लगेच तिला मागणी घातली. संजय डॉक्टर होता. तिलाच काय, पण घरात सर्वांनाच आकाश ठेंगणं वाटू लागलं.

मुळात हळवी असलेली आशा थोडीशी स्वप्नाळू व रसिक होती. गाण्याची, नाटकाची, नाचाची, कलेची तिला फार आवड होती. तिचं वाचनही दांडगं होतं. सर्वांच्या मते संजय आशाला साजेसा होता. एम.बी.बी.एस. झाल्यावर तो परदेशातून कार्डिॲक सर्जन होऊन आला होता व त्याने मुंबईत क्लिनिक थाटलं होतं. दोन–चार हॉस्पिटल्समध्येही तो प्रॅक्टिस करत होता. देखणा, सुशिक्षित, हुशार संजय आशाला अगदी मनापासून आवडला होता.

साखरपुडा होण्यापूर्वी संजयने तिला स्वतःबरोबर मोकळेपणाने बोलण्याची संधी देण्यासाठी बाहेर नेलं होतं. संजयचा गंभीर चेहरा पाहून ती जरा गांगरली, पण त्याच्या मोकळेपणामुळे थोडी सावरली. संजय तिच्या नजरेला नजर मिळवत म्हणाला होता, "आशा, मी एक यशस्वी सर्जन आहे. संसाराला हातभार लावण्यासाठी नोकरी करायची तुला मुळीच गरज नाही. माझ्या पत्नीने नोकरी केलेली मला आवडणारही नाही. घरात नोकर–चाकर असल्यामुळे घरकामही फारसं करावं लागणार नाही. वाचनात किंवा महिलामंडळात तू आपला वेळ सहज घालवू शकशील. घरातील पार्ट्या वगैरेंची सर्व जबाबदारी तुला एकटीला सांभाळावी लागेल. कारण अशा कामासाठी मला मुळीच वेळ नाही."

एवढं एका दमात बोलून झाल्यावर संजयने तिला काही शंका, प्रश्न असल्यास विचारायची संधी न देता, "या माझ्या अटी आहेत. विचार करून काय ते ठरव," एवढंच म्हणून हा संवाद तिथेच थांबवला. आशाचा फार विरस झाला. त्याच्या भाषणात तिला गर्वाचा दर्प आला व त्याचबरोबर त्याच्यातील रूक्षता जाणवली. तिनेही लगेच काही उत्तर न देता विचार करण्यासाठी वेळ मागून घेतला. घरी या विषयावर चर्चा करण्यात काही अर्थ नव्हता. एवढ्या क्षुल्लक कारणासाठी एवढं चांगलं स्थळ नाकारल्याबद्दल त्यांनी तिची वेड्यात गणना केली असती. रेखाची पैशांअभावी होणारी ओढाताण पाहून तिच्या आईवडिलांना संजयच्या रूपाने देवच

धावून आल्यासारखं वाटलं होतं. हळव्या, भावूक आशाच्या मनाचा विचार करणं कुणालाच सुचलं नाही. बिनहुंड्याचं, बिनखर्चाचं लग्न म्हणजे तिच्या वडिलांना पर्वणीच वाटली. एक दिवस थाटामाटात लग्न होऊन आशा सौ. साठे होऊन या बंगल्याची मालकीण बनून घरात आली.

लग्नानंतरची पहिली काही वर्ष कशी उडून गेली ते आशाच्या लक्षातही आलं नाही. घर सजवणं, नातेवाइकांच्या, मित्रमंडळींच्या भेटी, पार्ट्या यात वेळ पटकन निघून जात असे. लग्नानंतर दोन वर्षांच्या आत अनिकेत व त्यानंतर दोन वर्षांनी झालेल्या सोनियाच्या जन्मानंतर ती आपल्या संसारात पूर्णपणे गुरफटून गेली. संजयला आपल्या व्यवसायाच्या व्यापामुळे मुलांकडे, घराकडे किंवा तिच्याकडे लक्ष देण्यासाठी फारसा वेळ नसे. सर्जरी, प्रॅक्टिस, परदेशच्या वाऱ्या यातच त्याचा बराच वेळ जाई. आशा मात्र पत्नी, आई–वडील, सून या सर्व भूमिका स्वतःच्या रसिकतेची, कर्तृत्वाची, कलेची आहुती देऊन व्यवस्थित पार पाडत होती. भरपूर श्रीमंतीत लोळत असूनही, करण्याजोगं बरंच काही असूनही समुद्रात राहून तहानलेली होती. कुरकुर करणं तिच्या स्वभावातच नव्हतं. सर्व लाथाडून बाहेर पडण्याएवढी ती मूर्खही नव्हती किंवा हे बंधन तोडण्याचं धैर्य तिच्यात नव्हतं. तरीही मनाच्या एका कप्प्यात सतत एक अस्वस्थता, बेचैनी वाटतच होती. आपल्या संवेदनशीलतेचा, रसिकतेचा अवमान तिला अंतर्मुख करत होता. ती आतून फार एकटी होती व हा एकटेपणा तिला सतत जाणवत होता. हे एकटेपण वेगवेगळ्या कारणांमुळे आलं होतं. या वैभवाच्या, औपचारिकतेच्या चरकात आपली संवेदनशील स्वप्नं भरडली जात असल्याचं तिला कळत होतं. वरकरणी सर्व काही दृष्ट लागण्याजोगं असूनही स्वतःच्या संज्ञाप्रवाहात ती एकटी फिरत होती व ह्यातून मुक्त होण्याच्या मार्गाच्या शोधात होती.

महिलामंडळ, अधूनमधून उपस्थित राहावं लागणाऱ्या व द्याव्या लागणाऱ्या पार्ट्या यांतूनही तिला जाणवत असे ते एकलेपण–एकाकीपण. आपलं नॉन–एक्झिस्टंट व नसलेल्या अस्तित्वाचं स्वरूप तिला कुठेतरी खोलवर दुखावत होतं. मी अमक्याची मुलगी, डॉक्टरांची पत्नी, तमक्याची सून, अनिकेत–सोनियाची आई. मला माझं वेगळं असं अस्तित्वच नाही याची खंत होती. आपल्याला स्वतःच्या मनासारखं काही करता येईल का हा प्रश्न सतत भेडसावत होता. मैत्रिणी, नातेवाईक म्हणायचे, "तुझं काय? नवरा प्रसिद्ध डॉक्टर, भरपूर पैसा, कशाचीच कमतरता नाही, वेळही भरपूर. तुला हवं ते करायला मोकळीक आहे. महिलामंडळ, ब्रिजचा

ग्रुप, टेनिस. खरंच फार भाग्यवान आहेस आशा.'' सर्वांच्या तोंडी हीच भाषा असे. या सर्वांत आपल्याला काय हवं आहे ते जाणून घ्यायचा कुणीच का प्रयत्न करत नाही? या सर्वांत आपलं व्यक्तित्व, आवडीनिवडी, छंद, कर्तृत्व एवढंच नव्हे तर अस्तित्वच आपण गमावून बसलो आहोत हे का कळत नाही कुणाला? या विचारांत असताना हल्ली झोपही तिला विसरली होती. आपल्याला या सर्वांची सवय का होऊ नये याचं तिला आश्चर्य वाटे.

माणसाचं मनही मोठं मजेदार आहे. मिळालेल्यात त्याला कधीच समाधान वाटत नाही. ते नेहमी नसलेल्याच्या मागे धावतं. अधूनमधून संजयने घरी राहावं, दोघांनी मिळून फिरायला जावं; नाटकाला, गाण्याला जावं; आपल्या, मुलांच्या व लग्नाच्या वाढदिवसाची त्याने आठवण ठेवावी अशा साध्या गोष्टींची तिने अपेक्षा बाळगली होती. निदान कधीमधी त्याने आपल्याबरोबर घरात संगीत ऐकावं, व्हिडिओ पाहावा असं तिला वाटे. संजयला तिच्याप्रमाणे शास्त्रीय संगीताची किंवा गजलांची मुळीच आवड नव्हती. असलाच वेळ तर तो व्यावसायिक वाचनात, टेनिस खेळण्यात किंवा पार्टीला जाण्यात घालवत असे. आशा मनात तळमळत होती. आता तर अनिकेत पुढील शिक्षणासाठी अमेरिकेला व सोनिया मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलमध्ये गेल्यावर आशाला आपलं एकलेपण प्रकर्षाने जाणवू लागलं. संजय आता फार बडा डॉक्टर झाला होता. आशाच्या बारीकसारीक इच्छांकडे लक्ष देण्यास त्याला मुळीच वेळ नव्हता. त्याला रुटीनची सवय झाली होती. सर्व गोष्टी त्याला जागच्याजागी लागत. आयुष्यातील रोजच्या रुटीनमध्ये बदल झालेला त्याला खपत नसे. तिच्यासकट सर्व गोष्टी आहेत तशाच राहायला हव्या होत्या.

आतापर्यंत कुणाचं आपल्यावाचून अडतं ही जाणीव आशाला संसारात थोडंफार सुख देत होती. पण आता मुलं घरातून बाहेर गेली व संजयची जेवणापासून कपड्यांपर्यंत सर्व काम करण्यासाठी तिने तयार केलेले तत्पर नोकर हजर होते. त्यामुळे आपलं अस्तित्व ही एक अडगळ आहे असं अलीकडे तिला वाटू लागलं होतं....

शमशाद बेगमचं गाणं ऐकताच आशाला स्वतःच्या आयुष्याचं त्या गाण्याशी असलेलं साम्य पाहून हसू आलं. ती हळूच उठली व आपली पर्स घेऊन खोलीच्या बाहेर पडली. जाताना तिनं आपल्या बेडरूमचं दार किलकिलं करून पाहिलं. संजयची तयारी झाली असून तो टायची गाठ बांधत काहीतरी वाचत होता. आशा परत स्वयंपाकघरात आली व मघाशी वाचत असलेल्या पेपरातील काही भाग

कापून तिनं आपल्या पर्समध्ये ठेवला. ''मी आज सुट्टी घेण्याचं ठरवलं आहे'' एवढा मजकूर एका कागदावर खरडून तिनं तो कागद जेवणाच्या टेबलावर ठेवला व ती घराच्या बाहेर पडली.

आशा स्टेशनवर आली. गाडी येण्यास थोडा अवकाश असल्यामुळे तिला थोडा वेळ बाकावर बसता आलं. घाईघाईनं कामावर जाण्यासाठी लोकल पकडणाऱ्या लोकांकडे पाहताना आशाला कोणे एके काळचे आपल्या नोकरीचे दिवस आठवले. त्या दिवसांत हाती पैसे नव्हते. तऱ्हेतऱ्हेच्या साड्या, पर्सेस, चपला नव्हत्या. पण उमेद होती. आज पैसे भरपूर होते. पण तरीसुद्धा उमेदीच्या, उत्साहाच्या व स्वतःच्या शोधात ती काही काळ घराबाहेर पडली होती.

हातातील पेपराच्या कात्रणावरून आशाने पुन्हा एकदा नजर फिरवली. स्त्रियांना स्वतंत्र अस्तित्व आहे का? त्यांना अशा अस्तित्वाची गरज आहे का? असल्यास घराच्या चौकटीतून, कैदेतून बाहेर पडून आपलं स्थान शोधण्याचा प्रयत्न करा अशा आशयाचा मथळा त्यात होता. आशाने कात्रण उचलून पर्समध्ये कोंबलं. आता ऑफिसची गर्दी थोडी ओसरली होती. एवढ्यात एक सात–आठ वर्षांचा, मलिन, फाटक्या कपड्यांतील मुलगा तिच्याजवळ येऊन भीक मागू लागला. त्याच्याकडे पाहून तिचं मन कळवळलं. पर्स उघडून तिनं हाती येईल ती नोट काढून त्याच्या हातात कोंबली. त्याने तिचे आभार मानले व तो लगेच तिच्यापासून दूर पळाला. आपण याला फार पैसे दिले याची जाणीव होऊन ती ते पैसे कदाचित परत मागेल अशा भीतीने त्याने लगेच पळ काढला. नोकरी सोडल्यापासून इतकी वर्षं या अशा गरजू, अनाथ मुलांकडे आपलं कधीच कसं लक्ष गेलं नाही याचं आशाला आश्चर्य वाटू लागलं. आपण एवढ्या कशा बदललो याचा ती विचार करू लागली. आपल्याला काय हवं आहे, काय करायचं आहे याची तिला काहीच कल्पना नव्हती. फक्त संजयने आपल्यासाठी निर्माण केलेल्या तुरुंगातून बाहेर पडून आपल्याला स्वतःला शोधायचं आहे एवढाच विचार तिच्या मनात वारंवार येत होता. कित्येक वर्षांत तिने संजयच्या आवडीनिवडी – ज्या त्याच्या व्यवसायाव्यतिरिक्त फार थोड्या होत्या – आपल्याशा केल्या होत्या. स्वतःच्या आवडीनिवडी आठवायला तिला विचार करावा लागला असता. ती फक्त एक आदर्श गृहिणी बनून राहिली होती.

अकरा वाजता शेवटच्या टप्प्याला गाडी थांबली तेव्हा तिला प्रथमच आपली अधीरता, मनातील खळबळ जाणवली. हातातील पर्स घट्ट पकडून ती झपाझप

चालू लागली. आज कित्येक वर्षांत लोकलने प्रवास करण्याचा पहिलाच प्रसंग! आपल्याला ते जमेल की नाही याची तिला खात्री नव्हती. स्वतःवर विश्वास नव्हता, पण आपला आत्मविश्वास तिला पुन्हा मिळवायचा होता.

गर्दीच्या लोंढ्याबरोबर आशा चालू लागली. हवेत सगळीकडे आनंदी, उत्साही आवाज भरले होते. निदान तिला तरी ते तसे वाटत होते. रस्त्याच्या दुतर्फा फेरीवाले हरतऱ्हेचा माल विकायला बसले होते. संजयने या गर्दीत जर आपल्याला चालताना पाहिलं तर त्याला काय वाटेल, त्याची काय प्रतिक्रिया होईल असा विचार तिच्या मनात येत होता. तिच्या तोंडी एकदम हसू उमटलं. हवेतील उत्साहाच्या मादक सुगंधाचा तिच्यावर अंमल चढत होता. आभाळ नेहमीचंच, पण आज आशाला ते फार भव्य व उंच वाटू लागलं. एरव्ही गरम वाटणारा वाराही फुलांचा मंद सुगंध व थंडाईचे तुषार उडवून गेला. तिच्या मनाची भावना वातावरणात मिसळून एक वेगळीच संवेदना निर्माण करत होती. तेवढ्यात गर्दीत कुणाचातरी धक्का लागून तिच्या हातातील पर्स जमिनीवर पडली व त्यातील सर्व सामान जमिनीवर इतस्ततः पसरलं. खाली बसून ती ते गोळा करू लागली, पण गर्दीत बसणाऱ्या धक्क्यांमुळे तिला ते कठीण जात होतं. त्याच वेळी आपल्याबरोबर आणखी दोन हात आपलं सामान गोळा करीत आहेत हे तिच्या ध्यानात आलं. तिने घाबरून मान वर केली. गोळा केलेलं सामान तिच्या हातात देऊन ती व्यक्ती उभी राहिली. स्वतःला कसंबसं सावरत आशा पुटपुटली, ''थँक यू.'' तिच्यासमोर वयस्क वाटणारे एक गृहस्थ उभे होते.

''तुम्ही फार घाबरलेल्या दिसता,'' त्यांनी बोलायला सुरुवात केली.

आशा उत्तरादाखल फक्त हसली. मनात दाटलेल्या खळबळीमुळे व प्रवासामुळे तिला थोडं थकल्यासारखं वाटलं. ती जवळच्या एका बाकावर टेकली. तो गृहस्थही तिच्या शेजारी बाकावर बसला त्यामुळे आशा थोडी संकोचली. त्याच्या चेहऱ्याकडे नजर जाताच तिला वाटलं की हा गृहस्थ आपल्याला वाटतो तेवढा वयस्क नसावा. त्याच्या बऱ्याच पिकलेल्या केसांमुळे त्याचं वय आहे त्याहून जास्त वाटत होतं.

''तुम्ही कुठे जाणार आहात?'' त्याने विचारलं. त्याच्या बोलण्यात इतका साधेपणा होता की त्या प्रश्नात काही वाकडा हेतू असेल असं तिला मुळीच वाटलं नाही. ''मी नक्की असं काहीच ठरवलेलं नाही. जमल्यास मला आर्ट गॅलरीत जायचं आहे,'' आशा उत्तरली.

"वा मग छानच. मीही तिथेच निघालो आहे. मलाही कंपनी मिळेल."

आशाने प्रथम जरा आढेवेढे घेतले. नंतर तिची पावलं आपोआपच तिच्या नकळत त्याच्याबरोबर आर्ट गॅलरीकडे वळली. तिला हा अनुभव नवखा होता. लग्न झाल्यापासून आज प्रथमच ती कुणाबरोबरतरी आर्ट गॅलरीत आली होती. चित्रकलेच्या व शिल्पकलेच्या बाबतीत त्याचा सखोल अभ्यास असल्याचं तिच्या ध्यानात आलं. त्याच्याकडून बरंच काही शिकायला मिळणार होतं.

"मी आज अशी महान चित्रकारांची पेंटिंग्ज पाहीन याची मला मुळीच कल्पना नव्हती."

"अनपेक्षितपणे घडलेल्या किंवा केलेल्या गोष्टी जास्त आनंददायक असतात. मी बऱ्याच वेळा कुठं जायचं ते न ठरवता घराबाहेर पडतो. पाय किंवा गाडी नेईल तिथं जातो. अनेक वेळा ठरवून जे करता येत नाही ते करतो."

आपण जे यापूर्वी करायला हवं होतं, पण करू शकलो नाही तेच तो उघडपणे बोलून दाखवत आहे असं आशाला वाटलं. तिला अचानक स्वतःच्या आवडी आठवू लागल्या. ती नकळत बोलून गेली. "मलाही केस कापून घ्यायची फार हौस होती, पण संजयला ते आवडणार किंवा खपणार नाही म्हणून मला तसं करायचं धाडस अद्याप झालं नाही."

"संजय तुमच्या पतीचं नाव का? पण नवऱ्याला आपण काही केलेलं नक्की आवडतं की नाही हे ते करून पाहिल्याखेरीज कसं समजणार?"

असंच काहीसं वाक्य आपण पेपरातून कापलेल्या कात्रणात वाचल्याचं आशाला आठवलं.

"माझ्या पत्नीने जेव्हा प्रथम केस कापले तेव्हा मलाही ते आवडलं नाही. पण नंतर मात्र ती आखूड केसांतच जास्त सुंदर दिसत असल्याचं ध्यानात आलं."

आर्ट गॅलरीतच फार वेळ कसा व कधी निघून गेला ते आशाच्या लक्षातही आलं नाही. जवळजवळ अडीच वाजता ती दोघं जवळच्या रेस्टॉरंटमध्ये लंचसाठी शिरली. बोलता बोलता मोकळेपणाने आशाने आपल्या मनातील बेचैनी त्या परक्या गृहस्थासमोर व्यक्त केली तेव्हा तिला फार हलकं वाटू लागलं. मनावरील ओझं एकदम नाहीसं झाल्याचं तिला जाणवलं. कित्येक वर्षांत आपल्याला कुणाशी – प्रत्यक्ष नवऱ्याशीसुद्धा – इतक्या मोकळेपणी बोलता आलं नाही याची तिला खंत वाटली. तसंच आपण या परक्या गृहस्थाशी – की ज्याचं नावही

आपल्याला ठाऊक नाही – इतक्या उघडपणे कसं बोलू शकलो याचं तिला आश्चर्य वाटलं. त्या गृहस्थाच्या शांत, गंभीर व आश्वासक बोलण्यामुळे तिला स्वतःबद्दल आत्मविश्वास वाटू लागला. बरीच वर्षं कोंडलेली वाफ आज बाहेर पडली होती.

आपलं नाव महेश शर्मा असल्याचं त्याने सांगितलं व स्वतःबद्दलची थोडीफार हकिकतही तिच्याजवळ उघडी केली.

"माझं आणि मधूचं लग्न आमच्या रिवाजाप्रमाणे लवकर झालं. बालपणापासून आम्ही एकमेकांना ओळखत होतो. आमच्या आवडीनिवडीही एकमेकांशी मिळत्याजुळत्या होत्या. कला, संगीत, नृत्य, प्रवास..." त्याच्या आवाजातील कातरता तिला जाणवली व त्याच्या डोळ्यांत पाणी तरळत असल्याचा भास झाला. तिला महेशकडून कळलं ते एवढंच की सात-आठ वर्षांपूर्वी एका अपघातामुळे त्याच्या पत्नीचे – मधूचे – दोन्ही पाय पांगळे झाले होते, तिचं बोलणंही स्पष्ट नव्हतं व एका हाताचाही वापर करता येत नव्हता. दोन्ही मुलं लग्नानंतर अमेरिकेत स्थायिक झाली होती. पत्नी घरी बिछान्यातच होती.

त्याच्याकडे पाहत आशाने आश्चर्याने विचारलं, "मग, तिची काळजी कोण घेतं? तुम्ही तिच्याशिवाय असं एकटं बाहेर जाऊन मजा करू शकता?"

"मधूची काळजी घेण्यासाठी घरात नोकराणी आहे. मी हा एक प्रकारचा खेळ स्वतःशीच खेळतो. सौंदर्याच्या, कलेच्या, मजेच्या, करमणुकीच्या शोधात असंच कुठेतरी भटकतो, फोटो घेतो, चित्रं काढतो. सर्व मधूकडे नेण्यासाठी. आजही तिच्याकडे नेण्यासारखं बरंच काही आहे, तुमच्या कहाणीसकट," त्याने डोळे मिचकावीत म्हटलं.

घड्याळाकडे लक्ष जाताच आशाला धक्का बसला. महेशची क्षमा मागत ती उठली व पटकन म्हणाली, "मि. शर्मा, तुमच्या सहवासात माझा आजचा दिवस फार मजेत गेला आणि तो माझ्या कायम आठवणीत राहील. मी तुमची फार आभारी आहे. वाईट एवढंच वाटतं की दिवस फार लवकर संपला. चांगल्या गोष्टी फार वेळ टिकत नाहीत. तुमच्या मधूला माझा नमस्कार सांगा आणि माझ्यातर्फे तुमच्यासारखा पती मिळाल्याबद्दल तिचं अभिनंदन करा."

"सौंदर्य आणि चांगल्या गोष्टी यांचा वेळेशी काहीही संबंध नाही. थोड्या वेळातही बऱ्याच चांगल्या गोष्टी करता येतात. उपभोगता येतात. जमवता येतात," महेश उत्तरला.

'करून अजमावल्याशिवाय कुणाच्या मनाचा पत्ता लागत नाही' हे महेशचे शब्द आशाच्या मनात घुटमळत होते. आपल्याला जे जे काही करावंसं वाटतं व वाटत होतं त्या सर्वांची तिने मनाशी जुळवणी केली. तिचं मन आता बंड करून उठलं होतं. केस कापलेच पाहिजेत. स्टेशनच्या वाटेवरच असलेल्या एका ब्यूटी पार्लरमध्ये तिने केस कापण्यासाठी कुणी मोकळं आहे का याची चौकशी केली व ती आत जाऊन बसली. पार्लरमधून बाहेर पडताना सर्वांच्या नजरा आपल्याचकडे वळत असल्याचा तिला भास होत होता. केस कापल्यावर आपण ऐन तिशीच्या आहोत असं तिला वाटलं. क्षणभर तिच्या हृदयाचा ठोका चुकला. पण फार विचार करण्यात आता अर्थ नव्हता. ती धावतपळत स्टेशनवर आली.

दोन जगांमध्ये आपण लोंबकळत असून कुठल्याही जगाशी आपला संबंध नाही असं आशाला वाटलं. एक मन महेशच्या व्यक्तिमत्त्वाच्या, कलेच्या, सौंदर्याच्या आठवणीने भारलं होतं. तर दुसऱ्या मनात संजयला भेटण्याची, त्याच्या चेहऱ्यावर उमटणारं आश्चर्य अजमावण्याची भयमिश्रित एक्साइटमेंट साठली होती.

घरात पाऊल ठेवताना आशाचं हृदय फार वेगाने धडधडत होतं. घरातील शांततेचा भंग नोकराच्या प्रश्नाने केला. तिनं त्याला कसंबसं उत्तर दिलं. पण आता संजयच्या कोणत्या प्रश्नांना उत्तरं द्यावी लागतील, त्याची काय प्रतिक्रिया होईल, तो रागावला असेल तर काय करेल या काळजीनं तिला घेरलं. दार उघडण्यासाठी किल्ली लावताना तिनं संजयची गाडी पोर्चमध्ये पाहिली होती. तो नक्कीच रागावला असणार याची तिला खात्री पटली. नाहीतर हॉस्पिटल सोडून तो असा अवेळी घरी राहणाऱ्यांपैकी नव्हता. काहीही झालं तरी तिनं स्वतःच्या मनाशी एक निश्चय केला होता. यापुढील आयुष्यात सौंदर्याचा, कलेचा, रसिकतेचा उपभोग तर घ्यायचाच, पण त्याबरोबर स्वतःच्या अस्तित्वाचा इतरांनाही काही उपयोग होऊ द्यायचा. आशाच्या नजरेसमोर सकाळी स्टेशनवर भीक मागणारा मुलगा उभा राहिला. तिनं अशा मुलांसाठी, अनाथ मुलांसाठी आठवड्यातून काही दिवस आपला वेळ राखून ठेवण्याचं ठरवलं. हा निश्चय मनाशी पक्का करूनच आशाने धडधडत्या अंतःकरणाने जिन्याची एकेक पायरी चढून बेडरूमकडे जाण्यास सुरुवात केली.

वरच्या मजल्यावरील भयाण शांततेने आशाच्या मनात भीती निर्माण झाली. संजय आपल्या वागण्याचा काय अर्थ लावेल, तो आक्रस्ताळेपणाने आकाशपाताळ एक करेल का, घरातून बाहेर जायला बंदी तर करणार नाही – भलभलते विचार तिच्या मनात थैमान घालू लागले.

बेडरूममध्ये दोन्ही हात पाठीशी बांधून अस्वस्थपणे येरझाऱ्या घालणारा संजय तिच्या नजरेस पडला. खाली डायनिंग टेबलवर मांडलेल्या प्लेटस् पाहून स्वारी अद्याप उपाशी असावी असा तिचा अंदाज होता. भयाने तिच्या हृदयाचा ठोका चुकला. संजयची नजर तिच्याकडे वळली. त्या नजरेत तिला वेगवेगळ्या भावनांचा संगम दिसला. गेल्या तेवीस वर्षांत न दिसलेली काळजी, आश्चर्य, दुःख, भीती व रिलिफ हे सर्व त्या नजरेत साठलं होतं. खाली मान घालून थरथरत ती त्याच्यासमोर उभी राहिली. सबंध दिवसाच्या आनंदावर पाणी पडलं होतं. तिने क्षमा मागायला तोंड उघडण्यापूर्वीच, "हे बॉब केलेले केस तुला फार शोभून दिसतात, आशा. जवळजवळ पंधरा-वीस वर्षांनी लहान दिसतेस बघ," असं म्हणत त्याने तिचे हात घट्ट पकडले - जणू काही ती पुन्हा निघून जाईल या भीतीने. आशा डोळे विस्फारून आश्चर्याने त्याच्याकडे पाहत राहिली. ती काही बोलण्याचा प्रयत्न करणार तोच, "अंहं, काही खुलासा करण्याची गरज नाही. तुलाही आवडी-निवडी आहेत, तूही रसिक आहेस आणि तुला या सर्वांचा आस्वाद घेताना साथीदाराची गरज आहे हे माझ्या यापूर्वीच ध्यानात यायला हवं होतं. मी माझ्या स्वतःच्या कामात दंग झालो होतो, यशात डुंबत होतो. तुझा विसर पडला होता किंवा तुझ्या गरजांची आठवण ठेवण्याची जरुरीच भासली नाही. आय हॅव टेकन यू फॉर ग्रँटेड फॉर लाँग टाइम, आशा. तू मला क्षमा केलीस तर मी या सर्वांची व्याजासकट नुकसानभरपाई करायला तयार आहे. पण पुन्हा कधीही मला असं न सांगता कुठे जाऊ नकोस."

आशाला हे सत्य आहे की स्वप्न याचा संभ्रम पडला. संजय पुढे बोलू लागला. "हॉस्पिटलला जाताना तू दिसली नाहीस म्हणून तिथे पोहोचल्यापासून तुला फोन करण्याचा प्रयत्न करत होतो. रामसिंगलाही तू कुठे गेलीस ते ठाऊक नव्हतं. तू अशी अचानक निघून गेल्यामुळे माझं कामात लक्ष लागेना म्हणून लवकर घरी आलो. तेव्हापासून तुझाच विचार करत होतो. तू रोज एकटी असतेस तेव्हा तुलाही हा एकलेपणा किती जाणवत असेल याची मला आज प्रथमच जाणीव झाली. मी आजपर्यंत तुझ्यासोबत काहीही केलेलं नाही, कधी सवडच काढली नाही इतका मी माझ्या व्यवसायात गुंतलो होतो. करशील ना मला क्षमा?"

आजमावल्याशिवाय कुणाच्या मनाचा थांग लागत नाही हे महेशचं विधान आठवून आशा खुदकन हसली. संजय तिच्या त्या सुरेख नव्या रूपाकडे 'आ' वासून पाहत राहिला.

◈◈◈◈



## लता देशपांडे

जन्म : ११ मार्च १९३७ (मुंबई)
बालपण व एम.ए.पर्यंत शिक्षण मुंबईत

**शिक्षण :**

१९५८ बी.ए. व १९६० एम.ए. विषय – मराठी, फिलॉसॉफी व संस्कृत – मुंबई विद्यापीठ

१९६३ एम.ए. (एम.आर. सी.) Rehabilitation Counseling University of Florida U.S.A.

१९७४ एम.एस. Special education of mentally challenged & emotionally disturbed children. Syracuse University U.S.A.

१९८७ सी.ए.एस.ई. Administration of special schools, and School law, John Hopkins University, U.S.A.

- प्रा. अनंत काणेकर अॅवॉर्ड, १९५८ – मुंबई
- P.E.O. Scholarship, University of Florida.
- रोटरी इंटरनॅशनल अॅवॉर्ड फॉर कम्युनिटी सर्व्हिसेस, १९७३ – नवी दिल्ली.

**व्यवसाय** – दिल्ली व बाल्टिमोर येथील अपंग व गुन्हेगार मुलांसाठी शिक्षणसंस्थात प्रथम शिक्षिका व नंतर प्रिन्सिपल व नंतर केंद्र शिक्षण संचालक. रंगभूमी, संगीत, क्रीडाविषय व प्रवास यांची अतिशय आवड. प्राथमिक शाळेपासून वाचनाची आवड – वाण्याच्या दुकानातून अथवा इतर कुठूनही आलेल्या पुड्यांच्या वर्तमानपत्राचा कागदाचा तुकडा देखील मन लावून वाचण्याइतपत.

१९९६ साली सेवानिवृत्ती घेतल्यावर लिखाणाला थोडी सुरुवात. आजवर मुंबई येथील 'चैत्राली', 'मीरा–मधुरा' व 'रुची' या दिवाळी अंकांत काही लिखाण प्रसिद्ध. 'मिळून साऱ्याजणी' व 'बृहन्महाराष्ट्रवृत्त' यांतून अधूनमधून लिखाणाला प्रसिद्धी. 'एकता' त्रैमासिकामध्ये नियमितपणे लेखन प्रसिद्ध. ग्रंथालीतर्फे कथासंग्रह ''अनिकेत'' प्रसिद्ध. "Healthy and Tasteful Treasures" Low Calorie, Low Cholesterol, Low Sodium Recipes Book published in 2004.

मृत्यू : ६ एप्रिल २००५, बाल्टिमोर, मेरीलँड, यु.एस.ए.



लता देशपांडे यांचा हा हृदयस्पर्शी 'स्वभावकथां'चा संग्रह. दुर्दैवाने त्या आज आपल्यात नाहीत. त्या अमेरिकेत स्थायिक झाल्या होत्या तरी या कथांमधील व्यक्तिरेखांची वीण मात्र मुंबई–पुण्यातील भारतीयांची!

माणसामाणसातील नाती किती फसवी असतात, किती आपमतलबी असतात, किती ठिसूळ, व्यवहारी आणि सामाजिक व कौटुंबिक कर्तव्यांचा विचार करताना किती बेगडी असतात, याच्या प्रत्यक्ष अनुभूतीने लेखिकेला अस्वस्थ करून सोडले. यातूनच या उत्कट कथांची निर्मिती झाली.

या कथा नव्हेतच, तर प्रत्यक्ष घडलेल्या आणि अजूनही घडणाऱ्या अशा आशयांच्या गोष्टी वाचून आपण क्षणात दिग्मूढ होतो, अंतर्मुख होतो, हे लेखिकेचे यश फारच मोठे आहे.

ओघवती शैली, छुप्या स्वभावांची थेट चिरफाड यांतून एखाद्या व्यक्तिमत्त्वामधला ओलावा व कर्तव्य यांची जपणूक, एखाद्या व्यक्तीच्या मनातील विकृत विचारधारेचे आकलन झाल्यामुळे वाचक म्हणून त्याबद्दल आपल्याला येणारी चीड, अशा सर्व मुद्द्यांमुळे; आणि रंजकता टाळल्यामुळे ह्या सर्व कथा आपल्या मनात घर करून राहतात.

मराठी कथादालनामधले हे एक महत्त्वाचे पाऊल ठरावे.

– प्रदीप गुजर

फुलराणी प्रकाशन